**01 June 2024 – 25 March 2026**

# RCPIT IN NEWS

R. C. Patel Institute of Technology, Shirpur

R. C. PATEL
INSTITUTE OF TECHNOLOGY
An Autonomous Institute



## 2024 – 2026

दिव्य मराठी धुळे सिटी 01-09-2025

**जपानी भाषा प्रमाणपत्र परीक्षेत पटेल अभियांत्रिकीच्या २७ विद्यार्थ्यांचे यश**

परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात केला गौरव

शिल्पकार विकासाचा... देशदूत 29.8.2024

**पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या १९ विद्यार्थ्यांची निवड**

दिव्य मराठी धुळे सिटी 16/02/2025

**पटेल कॉलेज आयआयटी व्हर्च्युअल रँकिंगमध्ये प्रथम**

लोकमत 28/07/2024

**पटेल अभियांत्रिकीत आंतरराष्ट्रीय कक्ष**

सुविधा : विद्यार्थ्यांना परदेशातील नोकरीच्या संधी शोधता येणार

पुण्य नगरी 26/08/2024

**आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या २६ विद्यार्थ्यांची टीसीएसमध्ये निवड**

देशदूत धुळे आवृत्ती epaper.deshdoot.com 22 Nov 2025 - Page 7

**जूनिकॉर्न दुबई समिट २०२६ च्या अंतिम फेरीसाठी सहा विद्यार्थ्यांची निवड**

■ शिरपूर । प्रतिनिधी

शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित, आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीने नवकल्पना आणि उत्कृष्टतेच्या पर्वात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. महाविद्यालयाच्या ए.आय. एम.एल.ई. अँड टी.सी. व डाटा सायन्स अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षातील सहा विद्यार्थ्यांच्या



**शिरपूर शहराचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकत राहील**

शिरपूर एज्युकेशन सोसायटीतर्फे आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या माध्यमातून शिरपूर येथील स्थानिक पातळीवर उच्च प्रतीचे तंत्र शिक्षण उपलब्ध करून देण्याचे कार्य सुरु आहे. म्हणूनच, शिरपूर सारख्या छोट्या शहरातील विद्यार्थी आता राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमधून यशस्वी होत पुढे त्यांची दुबई येथे आंतरराष्ट्रीय स्तरावर तांत्रिक कौशल्य सादर करण्यासाठी निवड झाली आहे. यापुढे देखील शिरपूर शहराचे नाव येथील दर्जेदार शिक्षणासाठी अजून राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकत राहील यात शंका नाही.

–अमरीशभाई पटेल, आमदार

पुण्य नगरी 30/12/2025 www.epunyanagari.com

**आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या १८ प्राध्यापकांना पी.एचडी. प्रदान**

लोकमत 13/03/2025



लायब्ररीचे उद्घाटन करताना राजगोपाल भंडारी समवेत अतुल भंडारी, संचालक डॉ. जे. बी. पाटील, डॉ. प्रमोद देवरे, डॉ अमृता भंडारी, डॉ. स्मितल पाटील आदी.

**विद्यार्थ्यांना परदेशातही नोकरीच्या संधी मिळणार**

सकाळ 21/08/2024

**शिरपूरला ८५० विद्यार्थ्यांना 'प्लेसमेंट ऑफर'**

जागतिक अस्थिरतेच्या काळातही पटेल अभियांत्रिकीची कामगिरी; देश-विदेशात मिळते नियुक्ती

पुण्य नगरी 22/02/2025

**आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या १५ विद्यार्थ्यांची निवड**

पुण्य नगरी 25/05/2025

**आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाला राज्यात १८ वे आणि देशात ९२ वे स्थान**

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

देशदूत 12/03/2026
धुळे आवृत्ती

# राष्ट्रीय तांत्रिक परिषदेत तीन हजारांवर विद्यार्थ्यांचा सहभाग

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत कन्व्हर्जेस २०२६; विजेत्यांना अडीच लाखांची पारितोषिके वितरित

**शिरपूर । प्रतिनिधी**

आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात कन्व्हर्जेस २०२६ ही दोन दिवसयी राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक परिषद उत्साहात झाली. त्यात राज्यभरातील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयांमधील तीन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

परिषदेचे उद्घाटन शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेच्या सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सीईओ डॉ. उमेश शर्मा, प्रमुख पाहुणे डॉ. गौरव जोशी (इन्फोचिप्स या कंपनी चे सिनियर डिझाईन इंजिनिअर), महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे उपस्थित होते. परिषद अंतर्गत विविध विभागांनी आयोजित केलेल्या एकूण १६ स्पर्धांमध्ये अनेक संघांनी आपली कौशल्ये सादर केली. विविध स्पर्धांचे पंचांनी काटेकोर निकषांनुसार मूल्यमापन करून विजेत्यांची निवड खालील प्रमाणे करण्यात आले.

द मार्व्हेल एक्स स्पर्धेत ऋतेश चोपडे, पारस महाजन, प्रथमेश जाधव, प्रणव चोपडे यांनी प्रथम क्रमांक, पार्थ पाटील, विनीत चौधरी, ओम नांद्रे व नयन भदाणे यांनी द्वितीय क्रमांक, सुरजा पाटील, अथर्व मराठे, प्रशांत पाटील, दिगंबर पाटील यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

बॅटल बज स्पर्धेत आर. सी. पटेल पॉलीटेक्निक शिरपूर येथील प्रसाद जैन, हर्षल कोळी, यश पवार, दिनेश सोनवणे यांनी बीजीएमआय गेम मध्ये प्रथम क्रमांक, हर्षल पाटील, कार्तिक पाटील, मिहिर वाघ व निलेश मराठे यांनी द्वितीय क्रमांक, रितेश राठोड, प्रतीक पाटील, निलेश पाटील



व आदित्य पाटील यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

कोडक्रेझ ३.० हॅकाथॉन मध्ये तुषार भामरे, पंकज गढरी, वैभव सोनार, रोहित शेवाळे यांनी प्रथम क्रमांक, गौरव चव्हाण, आदित्य बोरसे, चेतन गुजर, देवेंद्र बोरसे यांनी द्वितीय क्रमांक, भूपेश पाटील, प्रियांशु पाटील, ओजास्विनी बोरसे यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

ट्रेन झेड स्पर्धेत जयेश बोराळे, यशोदीप चौधरी, अनंत देवरे, कुणाल चौधरी यांनी प्रथम क्रमांक, मकरंद देवरे, दिगंबर पवार, निलेश मराठे, मिहिर वाघ यांनी द्वितीय क्रमांक, तनुश्री मोरे, सिया शाह, अनुष्का वानखेडे, कुमकुम वाडिले यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

ब्रिजोमॅनिया स्पर्धेत फरहान काझी, काउनेन खाटीक, महेश पाटील यांनी प्रथम क्रमांक, मेघना पवार, सूरज पवार, अक्षरा चौधरी यांनी द्वितीय क्रमांक, दामिनी मराठे, हितेश महाजन, लोकेश देवरे यांनी सुरीली रेकनोड तृतीय क्रमांक प्राप्त केला.

क्रिएट-एक्स मध्ये ज्युनियर गटात आर्यन सोनवणे, चिराग सोनवणे, सोहम शिंपी यांनी प्रथम, वेद ठाकरे, ओम पाटील व सर्वेश रोकडे यांनी द्वितीय क्रमांक, आयुष गिरासे, समिहान गोराणे, आदित्य गिरासे, योगराज पवार यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

सीनियर गटात हर्ष साळी, तनमय ढिंगे, प्रशांत पोम्नर यांनी प्रथम क्रमांक, हर्षदा शिरसाठ, सुमित भावसार, वृषभ चव्हाण व यश कोठारी यांनी द्वितीय, यश पवार, सयाली पाटील, श्रेया चव्हाण व जैदबेग मिर्झा यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. इंजिनिअरिंग एस्केप हंट स्पर्धेत दिवेश राजपूत, राज बच्छाव, मानस पाटील, हर्षल देसले यांनी प्रथम क्रमांक, नितेश गावंडे, नक्षत्रा आहिरे, हिमानी पाटील, मीत जगताप यांनी द्वितीय क्रमांक, तिलक बिडाके, सतीश धनगर, आदित्य थुबे, गणेश मराठे यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

इलेक्ट्रो टॉय स्पर्धेत कमलेश शिरसाठ व ओम आव्हाड यांनी प्रथम क्रमांक, निखिलेश सोनवणे व वैभव गिरासे यांनी द्वितीय क्रमांक, स्वप्निल रोकडे व जगदीश सुतार यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

ब्रेन चार्ज २.० स्पर्धेत गायत्री पाटील, चैत्राली पाटील, सानिका पाटील, हंसिका पाटील यांनी प्रथम क्रमांक, उमाकांत पाटील, सौरव मोरे, जय पवार, शुभम पाटील यांनी द्वितीय क्रमांक, तेजस्विनी पाटील, मयुरी पाटील, दिव्या बोरसे, प्रिया गोसावी यांनी तृतीय क्रमांक, सचिन भारवड, खुशी चोपडे, नेहा चौधरी, मानसी चौधरी यांनी चतुर्थ क्रमांक प्राप्त केला.

वॉटर रॉकेट स्पर्धेत नितीन दोरीक, दुर्गेश साळुंखे, चेतन मराठे, रुपसिंग मराठे यांनी प्रथम, आकाश पाटील, हेमराज कोळी, मयूर कोळी, दिव्येश पाटील यांनी द्वितीय, गौरव पाटील, नचिकेत पाटील, महेश पवार, अंकित पाटील यांनी तृतीय क्रमांक पटकावला. गुगलर स्पर्धेत प्रेरणा कोटवाल व तेजल बडगुजर यांनी प्रथम, सोहम पाटील, प्रीत केसूर, श्रुती पाटील, खुशी चौधरी यांनी द्वितीय, पुष्कर देवरे, विष्णू माळी, गौरव पाटील, दुर्गेश पाटील, प्राची महाजन, मयूर धनगर यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

ड्रोनव्हर्स स्पर्धेत गौरव चव्हाण व धीरज पाटील यांनी प्रथम, मकरंद देवरे व सुजल शिरुडे यांनी द्वितीय, श्रेयश बारी व प्रणिल सोनवणे यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

डेमोगॉर्गनफस्स ड्रिफ्ट स्पर्धेत हितेश पाटील, रितेश अहिरे, मकरंद महाजन, विशाखा सूर्यवंशी यांनी प्रथम, कल्पेश खलाने, सिद्धेश्वरी पाटील, प्रेरणा निकुंभे, नेहा चव्हाण यांनी द्वितीय, माइनमॅनिया मध्ये पियुष चौधरी, लीना पाटील, मेघना बडगुजर, निकिता पाटील यांनी प्रथम, जैदबेग मिर्झा, श्रेया चव्हाण, सयाली पाटील, यश पवार यांनी द्वितीय, हेमांगी पाटील, साक्षी पाटील, उमेश पाटील, पियुष चौधरी यांनी तृतीय, हाइस्ट कार्निव्हल मध्ये ओम खंडारे, निखिल महाजन, कुशल पाटील, आदेश पाटील यांनी प्रथम, जयदीप पाटील, मनोज पाटील, रोहित नेरकर, गणेश खेळवाडे यांनी द्वितीय, आदित्य जाधव, भावेश धनगर, वेद महाजन, रोहित धनगर यांनी तृतीय क्रमांक, रेव्हेन्यू स्पर्धेत कनिष्ठ गटात वेद ठाकरे व ओम पाटील यांनी प्रथम, निर्विकार पाटील व वेदांत सूर्यवंशी, देवाशिष साळुंखे यांनी द्वितीय, यश साळुंखे, तुषार सूर्यवंशी यांनी तृतीय, पूर्वी सोनावणे, कल्याणी सोनावणे यांनी चतुर्थ क्रमांक प्राप्त केला.

वरिष्ठ गटात जयदीप बोरसे, हर्षला पाटील व साक्षी चौधरी यांनी प्रथम, निर्भय साळुंखे, कृष्णा पाटील, सौरभ बडगुजर, सुदर्शन पाटील यांनी द्वितीय, ध्रुविक मुंडिया, प्रणव बोरसे व मृणाल भावसार, अथर्व चव्हाण यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

या सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिके, सन्मान चिन्हे देऊन गौरविण्यात आले. सदर स्पर्धांमधील विजेत्यांना सर्व मिळून एकूण अडीच लाख रुपयांची पारितोषिके वितरित करण्यात आली. सदर तांत्रिक परिषद यशस्वीतेसाठी विद्यार्थी कल्याण विभागाच्या अधिष्ठाता डॉ. अमृता भंडारी, प्रसिद्धी प्रमुख प्रा. सुहास शुक्ल, कुलसचिव डॉ. प्रशांत महाजन, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद, मुख्य समन्वयक पुष्कर देवरे, श्रुती पाटील, विनीत बारी, कामिनी राजपूत, विद्यार्थी स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

महाविद्यालयाच्या रिफ्लेक्शन स्टुडंट्स क्लब तर्फे ७ मार्च रोजी महाविद्यालयाच्या मुख्य पटांगणावर डीजे नाईट २६ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सुप्रसिद्ध डीजे गॅरी यांच्या उत्साहवर्धक संगीताच्या तालावर तरुणाईने जल्लोष केला. विद्यार्थ्यांनी मित्रमंडळींसह सहभागी होत नृत्य, संगीत आणि आनंदोत्सवाचा मनमुराद आनंद लुटला. विद्यार्थ्यांमध्ये एकात्मता आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देत मनोरंजनाची संधी उपलब्ध करून देणे हा कार्यक्रमाचा उद्देश होता. यामुळे कॉन्वेर्जेस प्रसंगी संध्याकाळी संपूर्ण वातावरण उत्साही आणि आनंदी होते.

या यशस्वी आयोजनाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी समाधान व्यक्त केले.

दिव्य मराठी धुळे सिटी 06-03-2026

**सामाजिक • करवंद गावामध्ये रासेयो अंतर्गत पथनाट्यासह केली गावाची स्वच्छता**

## आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या ७ दिवसीय शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी दिला श्रमसंस्कारांचा संदेश

प्रतिनिधी | धुळे

शिरपूर येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत रासेयो विभागातर्फे करवंद (ता. शिरपूर) येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन केले होते. या सात दिवसीय शिबिरात विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक उपक्रम राबवून ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.

शिबिराचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील व उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून देवेंद्र पाटील, सरपंच हिरामण भील, उपसरपंच सरला पारधी, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.



करवंद येथील शिबिरात सहभागी झालेले रासेयो स्वयंसेवक.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून नेतृत्वगुण विकास आणि श्रमदानाचे महत्त्व पटवून दिले. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी गावात अनेक विधायक उपक्रम राबवले.

नशामुक्तीवर प्रभावी पथनाट्य आणि डिजिटल साक्षरता. संपूर्ण गाव स्वच्छता अभियान, गोरक्षनाथ मंदिर परिसरात वृक्षारोपण आणि माझी वसुंधरा अंतर्गत स्थानिक बंधाऱ्याकाठी स्वच्छता मोहीम. महिला व बालशिक्षणाचे महत्त्व सांगणारे उपक्रम राबवून ग्रामस्थांशी संवाद साधला.

### विविध विषयांवर मार्गदर्शन

शिबिरात विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. प्रा. संदीप देवरे (सामाजिक प्रश्नांतील युवकांची भूमिका), डॉ. श्रीकांत वाडिले (योगाचे महत्त्व), जयपाल गिरासे (शिवविचार), डॉ. अनिल जाधव (प्रथमोपचार) व प्रा. निलेश चोपडे (शिक्षणसंवाद) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून जयेश गिरासे व हर्षदा शिरसाठ यांची निवड करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी या कार्यक्रमप्रसंगी आभार मानले.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

देशदूत 06/03/2026

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत आजपासून तांत्रिक परिषद

### विविध तांत्रिक दालनांचे व प्रदर्शनांचे होणार उद्‌घाटन

■ शिरपूर । प्रतिनिधी

येथील आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीमध्ये कन्व्हर्जेस २०२६ या राष्ट्रीयस्तरावरील तांत्रिक परिषदेचे ६ ते ७ मार्च रोजी आयोजन करण्यात आले आहे. शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे.

यावेळी अहमदाबाद येथील सेमीकंडक्टर डिझाईन आणि उत्पादनात अग्रगण्य असणारी ईइन्फोचिप्स कंपनीचे सिनियर डिझाईन इंजिनिअर डॉ.गौरव जोशी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असल्याचे परिषदेचे समन्वयक व महाविद्यालयाचे उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील अत्याधुनिक बदलांची माहिती मिळावी, भविष्यातील तांत्रिक आव्हानांना पेलण्यासाठी ते सक्षम व्हावे आणि त्यांच्या कल्पकतेला व संशोधनाला हक्काचे व्यासपीठ मिळावे, याहेतूने शिरपूर येथील आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी कन्व्हर्जेस या राष्ट्रीयस्तरावरील तांत्रिक महोत्सवाचे दिमाखदार आयोजन केले जाते. या परंपरेला अनुसरून, कन्व्हर्जेस २०२६ साठी महाविद्यालयीन आयोजन समिती पूर्णपणे सज्ज झाली असून, सहभागी विद्यार्थ्यांसाठी सूक्ष्म आणि शिस्तबद्ध नियोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते विविध तांत्रिक दालनांचे व प्रदर्शनांचे उद्घाटनही होणार आहे.

आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने तंत्रज्ञानप्रेमी विद्यार्थ्यांसाठी कन्व्हर्जेस २०२६ या भव्य महोत्सवाचे आयोजन केले आहे. तंत्रज्ञानातील विविध क्षेत्रांची आवड जोपासणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला व्यासपीठ मिळावे, हा यामागील मुख्य उद्देश आहे. सध्या या परिषदेच्या प्रसिद्धीसाठी विद्यार्थी-स्वयंसेवक राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहचत असून, सादरीकरणे आणि भित्तीपत्रकांच्या माध्यमातून महाविद्यालयीन तरुणांना या उत्सवाचे आमंत्रण देत आहेत.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी https://converges.rcpit.ac.in/ या लिंकवर ऑनलाइन नोंदणी सुरू झाली आहे. या माध्यमातून केवळ तांत्रिक कौशल्येच नव्हे, तर सांघिक समन्वय आणि नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रत्यक्ष अनुभवण्याची सुवर्णसंधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. यात द मार्व्हेल एक्स, ट्रेन झेड, कोडक्रेझ ३.०, ब्रिजोमॅनिया, डेमोगॉर्गनफ्स ड्रिफ्ट, इंजिनिअरिंग एस्केप हंट, हाइस्ट कार्निव्हल, ब्रेन चार्ज २.०, क्रिएट एक्स, रे व्हेन्यू (ज्युनियर), माइनमॅनिया, वॉटर रॉकेट चॅलेंज, गूगलर, बॅटलबझ, ड्रोनव्हर्स, इलेक्ट्रो टॉय या मुख्य स्पर्धा आणि खेळांचे आयोजन सर्जनशीलता, समस्या सोडविणे आणि सहयोगी शिक्षणासाठी सर्वसमावेशक मानवी मूल्य आणि नैतिकता यांच्या विकासासाठी असे विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. या विविध स्पर्धांमधील विजेत्यांना एकूण २.५० लाख रुपयांची पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे.

या परिषदेसाठी राज्यभरातून विविध अभियांत्रिकी तसेच तंत्रनिकेतन महाविद्यालयातील तीन हजारहून अधिक विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी केली असल्याची माहिती या परिषदेचे प्रसिध्दी प्रमुख प्रा.सुहास शुक्ल व कुलसचिव डॉ. प्रशांत महाजन यांनी दिली आहे.

#### परिषदेत विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्यांचे प्रदर्शन करावे

विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर केवळ सोयीसाठी न करता, त्यात सर्जनशीलता, नैतिकता आणि नाविन्य जोडून समाजाच्या उन्नतीसाठी योगदान द्यावे, ही आमची धारणा आहे. निकोप स्पर्धेतून आणि परस्परांच्या सहकार्यातून विद्यार्थ्यांनी आपली कौशल्ये सिद्ध करावीत. यासाठी दरवर्षी आम्ही कन्व्हर्जेस या भव्य तंत्र परिषदेचे आयोजन करण्यात येते. हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग आणि लाखो रुपयांची पारितोषिके हे या परिषदेचे वैशिष्ट्य आहे. याही वर्षी ६ व ७ मार्च रोजी आयोजित या तंत्र महोत्सवात राज्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन आपल्या कौशल्यांचे प्रदर्शन करावे.

**-डॉ.जे.बी.पाटील, संचालक**

R. C. PATEL INSTITUTE OF TECHNOLOGY
An Autonomous Institute

**01 June 2024 to 25 March 2026**

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्यनगरी 02/03/2026

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत विज्ञानाचा उत्सव



**शिरपूर** : येथील शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर.सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. ॲप्लाईड सायन्सेस अँड ह्युमॅनिटीज विभागातर्फे प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध बौध्दिक, सर्जनशील आणि प्रयोगाधारित स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली. विविध स्पर्धा घेण्यात आल्या. निबंध लेखन स्पर्धा 'भारताचे पारंपरिक ज्ञान : शाश्वत भविष्याचा आराखडा' या विषयावर घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी भारतीय पारंपरिक ज्ञान, आयुर्वेद, योग, वास्तूशास्त्र, जलव्यवस्थापन, कृषीपधदती आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यांसारख्या विषयांवर विचार मांडले. या स्पर्धेत पल्लवी जितेंद्र कुवर प्रथम, सिद्धेश्वरी जयदीप राजपूत द्वितीय, कुनिका महेंद्र खैरनार हिने तृतीय क्रमांक संपादन केला.

वक्तृत्व स्पर्धा 'माझा आवडता भारतीय शास्त्रज्ञ' या विषयावर झाली. विद्यार्थ्यांनी विविध भारतीय शास्त्रज्ञांच्या कार्याचा अभ्यास करून त्यांच्या जीवनकार्यावर प्रभावी भाषणे सादर केली. वैज्ञानिक विचारसरणी, देशासाठी दिलेले योगदान आणि प्रेरणादायी जीवनप्रवास यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. या स्पर्धेत अंशिका राजपूत प्रथम, कविता सुरेश माळी द्वितीय तर प्रणव अविनाश बडगुजर याने तृतीय क्रमांक मिळविला. संगणकीय सादरीकरण स्पर्धा 'भारतीय परंपरेची ताकद : प्राचीन ज्ञानातून आधुनिक उपाय' या विषयावर घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेचे सादरीकरण केले. या स्पर्धेत मानसी नामदेव महाजन प्रथम, मैत्रेयी रवींद्र पाटील द्वितीय तर किरण प्रविण पाटील हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

प्रायोगिक कार्यरत नमुना सादरीकरण स्पर्धेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित व जीवशास्त्र या विषयांशी संबंधित उच्च माध्यमिक व त्यापुढील स्तरावरील वैज्ञानिक संकल्पना स्पष्ट करणारे विविध कार्यरत नमुने सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी ऊर्जा निर्मिती, पर्यावरण संरक्षण, पाणी शुध्दीकरण, स्वयंचलित यंत्रणा, जैवविविधता संवर्धन आदी विषयांवर आधारित उपयुक्त व नाविन्यपूर्ण नमुने सादर केले. या स्पर्धेत कनक शशिकांत पाटील व कृतिका नागराज पाटील यांनी प्रथम क्रमांक, नंदिनी राजमल चौधरी व रिया सुनील पाटील यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे व वैज्ञानिक दृष्टिकोनाचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. डॉ. विजय बाविस्कर यांनी समन्वयक म्हणून नियोजनबद्ध कार्य केले. डॉ.सुरेखा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. आभार प्रदर्शन प्रा. अनिल आहिरे यांनी केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतूक केले. स्पर्धांमध्ये एकूण सुमारे १४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा. सुहास शुक्ला, विभागप्रमुख डॉ.सतीश देसले, अधिष्ठाता प्रा.अमृता भंडारी तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

Dhule Edition
Mar 02, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com

**01 June 2024 to 25 March 2026**

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

देशदूत
epaper.deshdoot.com
24 Feb 2026 - Page 3

## शॉर्ट न्यूज

### पटेल अभियांत्रिकीचे श्रमसंस्कार शिबिर



■ शिरपूर । प्रतिनिधी

आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत श्रमसंस्कार शिबिर नुकतेच करवंद येथे संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन संचालक डॉ. जे. बी. पाटील व उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे देवेंद्र पाटील, सरपंच हिरामण भिल, उपसरपंच सरला पारधी उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना रासोयोद्वारे कला व नेतृत्वगुण विकास, श्रमदान आणि समाजसेवेचे महत्त्व पटवून दिले.शिबिरादरम्यान महिला शिक्षण जनजागृती फेरी, स्वच्छता अभियान, नशामुक्तीवर पथनाट्य, गोरक्षनाथ मंदिर परिसरात वृक्षारोपण, माझी वसुंधरा जलसंधारण अभियान अंतर्गत बंधाऱ्याकाठी स्वच्छता, डिजिटल साक्षरता जनजागृती तसेच महिला व बालशिक्षणावरील उपक्रम ग्रामस्थांच्या सहभागातून राबविण्यात आले.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्यनगरी 22/02/2026

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीचे रासेयो शिबिर उत्साहात




**शिरपूर** : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत श्रमसंस्कार शिबिर नुकतेच करवंद येथे झाले.

शिबिराचे उद्‌घाटन संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे देवेंद्र पाटील, सरपंच हिरामण भिल, उपसरपंच सरला पारधी, ग्रा.पं.सदस्य, सल्लागार व ग्रामस्थ उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना रासोयोद्वारे कला व नेतृत्वगुण विकास, श्रमदान आणि समाजसेवेचे महत्त्व पटवून दिले. शिबिरादरम्यान महिला शिक्षण जनजागृती फेरी, स्वच्छता अभियान, नशामुक्तीवर पथनाट्य, गोरक्षनाथ मंदिर परिसरात वृक्षारोपण, 'माझी वसुंधरा' जलसंधारण अभियान अंतर्गत बंधाऱ्याकाठी स्वच्छता, डिजिटल साक्षरता जनजागृती तसेच महिला व बालशिक्षणावरील उपक्रम ग्रामस्थांच्या सहभागातून राबविण्यात आले.

शिबिरात प्रा.संदीप देवरे (यंग फाउंडेशन, धुळे), डॉ. श्रीकांत वाडीले, जयपाल गिरासे, डॉ.अनिल जाधव, प्रा. निलेश चोपडे यांनी अनुक्रमे सामाजिक प्रश्नांतील युवकांची भूमिका, योगाचे महत्त्व, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, प्रथमोपचार व शिक्षणसंवाद या विषयांवर मार्गदर्शन केले. शिबिराची सांगता जिल्हा परिषद केंद्र शाळा करवंद येथे झाली. विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या व विजेत्यांना शालेय साहित्य देण्यात आले. मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी आभार मानले. शिबिरात उत्कृष्ट विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून जयेश गिरासे, हर्षदा शिरसाठ यांची निवड करण्यात आली.

शिबिर यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.भूषण पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.सपना रघुवंशी, प्रा.निलेश महाजन, शिक्षक समन्वयक प्रा.मनोहर पाटील, डॉ.महेश पाटील, प्रा.मनोज पटेल, डॉ.किरण सूर्यवंशी, डॉ.नितीन शिंदे, प्रा. प्रियंका लांजेवार, डॉ.प्रमोद पाटील, प्रा.मनोज पाटील, प्रा. अमित महिरे, क्रीडा विभाग प्रमुख प्रा.निंबाजी राठोड, अविनाश पाटील यांनी प्रयत्न केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनाकरिता महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले.

Dhule Edition
Feb 22, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com

R. C. PATEL INSTITUTE OF TECHNOLOGY
An Autonomous Institute

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
18 Feb 2026 - Page 7

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे जपानी भाषा परीक्षेत यश

**■ शिरपूर । प्रतिनिधी**



शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचालित आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी जपानी भाषेच्या प्रमाणपत्र परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळवले आहे. महाविद्यालयाच्या तृतीय व अंतिम वर्षाच्या पाच विद्यार्थ्यांनी ही परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण करून उल्लेखनीय कामगिरी केली असल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

या परकीय भाषा प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना आवश्यक व प्रभावी भाषिक कौशल्ये आत्मसात करून देत त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील उच्च शिक्षण तसेच करिअरच्या विविध संधींसाठी सक्षम करणे हा आहे. आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून जपानी व जर्मन भाषांचे प्रशिक्षण उपक्रम सातत्याने राबवित आहे. यात विद्यार्थ्यांकडून भाषा ऐकणे, बोलणे, वाचन आणि लेखन या सर्व कौशल्यांचा सखोल व सातत्यपूर्ण सराव करून घेतला जातो. यापूर्वीही विद्यार्थ्यांनी जपानी व जर्मन भाषेच्या विविध प्रावीण्य परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. याप्रमाणे डिसेंबर २०२५ मध्ये पार पडलेल्या जपानी भाषेच्या प्रमाणपत्र परीक्षांमध्ये महाविद्यालयाच्या तृतीय व अंतिम वर्षाच्या पाच विद्यार्थ्यांनी ही परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे.

जेएलपीटी एन पाच स्तरावर हिमांशू गणेश गिरासे (तृतीय वर्ष, इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग), पाटील साईराज पृथ्वीराज (तृतीय वर्ष, मेकॅनिकल इंजिनिअरिंग), वैभव दीपकसिंग गिरासे (तृतीय वर्ष, इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) हे विद्यार्थी यशस्वी ठरले आहेत. तसेच जेएलपीटी एन ४ या अधिक प्रगत व आव्हानात्मक स्तरावर महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी उत्कृष्ट कामगिरी करत उज्ज्वल यश मिळवले आहे. या स्तरावर संस्कृती राजेश पवार (बी.टेक, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग) व दिक्षिता शिवाजी पाटील (बी.टेक, डेटा सायन्स) यांनी ही परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण करून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, ट्रस्टी सौ. जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे कौतुक केले.

या यशामुळे या विद्यार्थ्यांना जपानमध्ये उच्च शिक्षण आणि करिअरच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. या आंतरराष्ट्रीय भाषेच्या प्रशिक्षण वर्गांच्या आयोजनासाठी आणि संचालनासाठी आंतरराष्ट्रीय संबंध आणि उच्च शिक्षण समितीच्या अधिष्ठाता डॉ. स्मितल पाटील, प्रा. मिल्केश जैन यांनी विशेष प्रयत्न केले.

R. C. PATEL INSTITUTE OF TECHNOLOGY

An Autonomous Institute

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
15 Feb 2026 - Page 3

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात सांस्कृतिक महोत्सव

■ शिरपूर । प्रतिनिधी

येथील आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांसाठी चार दिवसीय सांस्कृतिक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देत सांस्कृतिक आणि कलात्मक अभिव्यक्तीद्वारे त्यांच्यामध्ये देशाची परंपरा, संस्कृती, विविधता याविषयी जागरूकता निर्माण करणे हा या सप्ताहाचा प्रमुख उद्देश होता. या महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांची सर्जनशीलता व संघभावना यांचा सुंदर संगम सदर केला, अशी माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी.पाटील यांनी दिली.

विद्यार्थ्यांना त्यांच्या महान संस्कृतीशी आणि परंपरांशी जोडून ठेवण्यासाठी, दर वर्षाप्रमाणे यंदाही आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात पारंपारिक दिवस साजरे करण्यात आले. यामुळे विविध परंपरा, एकतेची भावना, मूल्ये आणि रितीरिवाजांविषयी जागरूकता व आदर निर्माण होण्यास मदत झाली. यात विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी देखील पारंपारिक पेहराव परिधान करीत अनेक सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होत या विविधतेचा एकत्र आनंद साजरा केला.

या महोत्सवाचे उद्घाटन महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. सदर चार दिवसीय सांस्कृतिक महोत्सवात या फेब्रुवारी महिन्याच्या सुरवातीस विविध थीम-आधारित दिवस साजरे करण्यात आले. यात सर्व प्रथम पहिल्या दिवशी पारंपारिक वेश-भूषा दिन साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यार्थ्यांनी



भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडवणारे पारंपारिक पोशाख परिधान केले. रंगीबेरंगी वेशभूषेमुळे संपूर्ण परिसर उत्सवी आणि देखणा दिसत होता. पारंपारिक पेहराव पहिल्या दिवसाच्या आकर्षणाचा केंद्र बिंदू ठरला. पारंपारिक दिनासाठी उपविजेती म्हणून प्रेरणा निकुंभे हिची निवड करण्यात आली.

दुसऱ्या दिवशी ग्रुप डे आयोजित करण्यात आला. यात विद्यार्थ्यांनी गटांमध्ये एकसारख्या संकल्पनांवर आधारित पोशाख परिधान करून एकात्मता, मैत्री आणि संघभावना प्रदर्शित केली. या दिवशी विविध कल्पक संकल्पना आणि समन्वित वेशभूषेमुळे कार्यक्रमात विशेष उत्साह दिसून आला. बॉलीवूड डे साठी उपविजेते म्हणून मयूर मराठे आणि निकिता पाटील यांची निवड करण्यात आली.

तिसऱ्या दिवशी बॉलीवूड डे साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी प्रसिद्ध चित्रपट, कलाकार आणि आयकॉनिक लुक्स यांपासून प्रेरणा घेत विविध पात्रांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी चित्रपटांतील प्रसिद्ध पात्रांचे रूप साकारले. या दिवशी गाणी, नृत्य आणि मनोरंजनामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. बॉलीवूड डे साठी उपविजेते म्हणून मयूर मराठे आणि निकिता पाटील हिची निवड करण्यात आली. यानंतर चौथ्या म्हणजेच महोत्सवाच्या अंतिम दिवशी लिव्हिंग कॅनव्हास डे ने महोत्सवाचा समारोप झाला. या दिवशी विद्यार्थ्यांनी चेहऱ्यावर आणि पोशाखांवर सर्जनशील चित्रकला करून स्वतःला जणू चालते-बोलते कलाकृती बनविले. सामाजिक संदेश, कला आणि कल्पनाशक्ती यांचे सुंदर प्रदर्शन या दिवशी पाहायला मिळाले. यानंतर समारोप व बक्षीस वितरण सोहळा पार पडला. विविध स्पर्धांतील विजेत्यांना प्रमाणपत्रे आणि ट्रॉफी मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन विद्यार्थी कल्याण विभागाच्या अधिष्ठाता व समन्वयक डॉ. अमृता भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, शिक्षकांचे सहकार्य आणि सांस्कृतिक समिती व रिफ्लेक्शन क्लबचे विद्यार्थी प्रतिनिधी समृद्धी जगताप आणि गौरव साळुंके यांच्या प्रभावी नियोजनामुळे हा चार दिवसीय महोत्सव यशस्वी ठरला.

या उत्कृष्ट उपक्रमाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, ट्रस्टी सौ. जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

पुण्यनगरी 14/02/2026

## आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात चार दिवसीय सांस्कृतिक महोत्सव उत्साहात



**शिरपूर** : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी आयोजित चार दिवसीय सांस्कृतिक महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देणे, सांस्कृतिक व कलात्मक अभिव्यक्तीद्वारे देशाची परंपरा, संस्कृती व विविधतेबाबत जागरूकता निर्माण करणे हा या महोत्सवाचा प्रमुख उद्देश होता. विद्यार्थ्यांची सर्जनशीलता आणि संघभावनेचा सुंदर संगम या उपक्रमातून दिसून आला, अशी माहिती संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

या महोत्सवाचे उद्घाटन डॉ. जे. बी. पाटील यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांसह महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी पारंपारिक पेहराव परिधान करत विविध सांस्कृतिक उपक्रमात सहभाग घेतला. त्यामुळे विविध परंपरा, मूल्ये व एकतेची भावना अधिक दृढ झाली. फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीस चार दिवस विविध थीम-आधारित कार्यक्रम राबविण्यात आले. पहिल्या दिवशी 'पारंपारिक वेशभूषा दिन' साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडवणारे पोशाख परिधान केले. रंगीबेरंगी वेशभूषेमुळे संपूर्ण परिसर उत्सवी झाला. या दिवशी उपविजेती म्हणून प्रेरणा निकुंभे हिची निवड झाली.

दुसऱ्या दिवशी 'ग्रुप डे' आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी गटांमध्ये एकसारख्या संकल्पनांवर आधारित पोशाख करून एकात्मता, मैत्री व संघभावना सादर केली. तिसऱ्या दिवशी 'बॉलीवूड डे' साजरा करण्यात आला. प्रसिद्ध चित्रपट व कलाकारांपासून प्रेरणा घेत विद्यार्थ्यांनी विविध पात्रे साकारली. गाणी, नृत्य व मनोरंजनामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण होते. बॉलीवूड डे साठी उपविजेते म्हणून मयूर मराठे आणि निकिता पाटील यांची निवड झाली.

चौथ्या आणि अंतिम दिवशी 'लिव्हिंग कॅनव्हास डे' साजरा करत महोत्सवाचा समारोप झाला. विद्यार्थ्यांनी चेहऱ्यावर व पोशाखांवर सर्जनशील चित्रकला करून स्वतःला चालत्या-बोलत्या कलाकृतींचे रूप दिले. सामाजिक संदेश, कला व कल्पनाशक्तीचे प्रभावी दर्शन यावेळी झाले. समारोपप्रसंगी विविध स्पर्धांतील विजेत्यांना प्रमाणपत्रे व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे संयोजन विद्यार्थी कल्याण विभागाच्या अधिष्ठाता व समन्वयक डॉ. अमृता भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सांस्कृतिक समिती व रिफ्लेक्शन क्लबचे विद्यार्थी प्रतिनिधी समृद्धी जगताप व गौरव साळुंके यांच्या नियोजनामुळे तसेच शिक्षकांच्या सहकार्यामुळे हा चार दिवसीय महोत्सव यशस्वी ठरला.

या उपक्रमाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.


Dhule Edition
Feb 14, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

पुण्यनगरी 11/02/2025

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे यश

### जपानी भाषा जेएलपीटी एन ४ व एन ५ परीक्षेत उमटवला ठसा



**शिरपूर :** येथील शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचालित आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी डिसेंबर २०२५ मध्ये पार पडलेल्या जपानी भाषेच्या प्रमाणपत्र परीक्षांमध्ये यश मिळवले आहे. तृतीय व अंतिम वर्षाच्या ५ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण करून उल्लेखनीय कामगिरी केली असल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील यांनी दिली.

आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत दृष्टीने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून जपानी व जर्मन भाषांचे प्रशिक्षण उपक्रम सातत्याने राबवित आहे. डिसेंबर २०२५ मध्ये पार पडलेल्या जपानी भाषेच्या प्रमाणपत्र परीक्षांमध्ये महाविद्यालयाच्या तृतीय व अंतिम वर्षाच्या ५ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे.

जेएलपीटी एन ५ स्तरावर हिमांशू गणेश गिरासे (तृतीय वर्ष, इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग), पाटील साईराज पृथ्वीराज (तृतीय वर्ष, मेकॅनिकल इंजिनिअरिंग), वैभव दीपकसिंग गिरासे (तृतीय वर्ष, इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) हे विद्यार्थी यशस्वी ठरले आहेत. तसेच जेएलपीटी एन ४ या आव्हानात्मक स्तरावर संस्कृती राजेश पवार (बी.टेक, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग) व दिक्षिता शिवाजी पाटील (बी.टेक, डेटा सायन्स) यांनी ही परीक्षा उत्तीर्ण करून आपली गुणवत्ता सिध्द केली आहे. या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे कौतुक केले. आंतरराष्ट्रीय भाषेच्या प्रशिक्षण वर्गांच्या आयोजनासाठी आणि संचालनासाठी आंतरराष्ट्रीय संबंध आणि उच्च शिक्षण समितीच्या अधिष्ठाता डॉ.स्मितल पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. मिल्केश जैन यांनी प्रयत्न केले.

Dhule Edition
Feb 11, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्य नगरी 31/12/2025

## ‘टेकफेस्ट’ मध्ये पटेल स्वायत्त अभियांत्रिकीचा संघ चमकला



### शिरपूरच्या संघाचा रशियन संघावर विजय

**शिरपूर** : तंत्रज्ञान क्षेत्रातील आशियातील सर्वात मोठा महोत्सव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आयआयटी, मुंबई येथील ‘टेकफेस्ट-२०२५’ मध्ये शिरपूरच्या आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या ‘इंजेनियम ड्राईव्ह्स’ या संघाने ३० किलो आंतरराष्ट्रीय कॉम्बॅट रोबोटिक्स (रोबो वॉर) स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावून राष्ट्रीय स्तरावर महाविद्यालयाचा व शिरपूर शहराचा नावलौकिक वाढवला आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील यांनी दिली.

भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी), मुंबईतर्फे दरवर्षी जागतिक स्तरावरील अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. येथील आय.आय.टी. कॅम्पसमध्ये दि. २० ते २३ डिसेंबर दरम्यान झालेल्या चुरशीच्या स्पर्धेत जगभरातून ३५ हून अधिक आंतरराष्ट्रीय संघ सहभागी झाले होते. इंजिनिअरिंग कौशल्य, रणनीती आणि डिझाइनची कसोटी पाहणाऱ्या या स्पर्धेत म्हणूनच या टेकफेस्टकडे आशिया खंडातील भावी अभियंत्यांसाठीचा नवसंकल्पना व चैतन्याचा उत्सव म्हणून पाहिले जाते. जागतिक स्तरावरील ‘टेकफेस्ट’ स्पर्धेत शिरपूरच्या आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली. यात प्रामुख्याने इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातून अनुराग जमादार, प्रेमकुमार पाटील आणि कॉम्प्युटर इंजिनीअरिंग विभागाचा चैतन्य पाटील यांचा समावेश आहे. संघाने ८, १५, ३० आणि ६० किलो वजनी गटातील ‘डिफेन्स’ आणि ‘अटॅक’ प्रकारचे रोबॉट्स मैदानात उतरवले होते. या स्पर्धेचा प्रवास अत्यंत रोमांचक होता. सुरुवातीला पार पडलेल्या ‘लीग नॉकआउट’ फेरीमध्ये (नॉकआऊट स्टेज) आर.सी. पटेलच्या संघाने विविध आव्हानात्मक बॉट्सशी यशस्वी झुंज देत निर्विवाद विजय मिळवला. त्यानंतरच्या अटीतटीच्या उपांत्यपूर्व फेरीत ३० किलो वजनी गटात या संघाची गाठ रशियाच्या ‘वाईल्डबोट’ या तगड्या आंतरराष्ट्रीय संघाशी पडली होती. या सामन्यात शिरपूरच्या विद्यार्थ्यांनी रशियन संघाचा पराभव करून स्पर्धेत दिमाखात आगेकूच केली. उपांत्य फेरीमध्ये झालेल्या चुरशीच्या लढतीत उत्तर प्रदेशच्या ‘युपी १५’ या संघासोबत टक्कर देत आर.सी. पटेलच्या संघाने अद्वितीय तांत्रिक कौशल्याचे प्रदर्शन केले. मात्र, उपविजेतेपदासह तृतीय क्रमांकावर येत २६ हजार रुपयांचे रोख पारितोषिक संघाने आपल्या नावे केले. या रोबोटिक तंत्रज्ञानाचा वापर भविष्यात संरक्षण आणि लष्करी सेवेत क्रांती घडवू शकतो. डिफेन्स् रोबॉट्सद्वारे मानवी जीव धोक्यात न घालता स्फोटकांचा शोध घेऊन ती निकामी करणे शक्य होईल, तर अटॅक बॉट्सचा वापर शत्रूच्या सीमांवर टेहळणी करण्यासाठी व प्रतिहल्ला करण्यासाठी करता येईल. या व्यतिरिक्त, मोठे कारखाने आणि अणुऊर्जा प्रकल्पांसारख्या संवेदनशील ठिकाणी सुरक्षा व देखरेखीसाठी हे तंत्रज्ञान अत्यंत प्रभावी ठरेल. विद्यार्थ्यांच्या या यशाचे श्रेय महाविद्यालयातील आधुनिक दर्जाच्या प्रयोगशाळा, अद्ययावत तांत्रिक सुविधा आणि शिक्षकांनी दिलेल्या अहोरात्र प्रोत्साहनाला जाते. शिक्षकांनी केवळ तांत्रिक मार्गदर्शनच केले नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती आणि लढाऊ जिद्द निर्माण करण्यासाठी मोठे श्रम घेतले. म्हणूनच ग्रामीण भागातील हे विद्यार्थी आज आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर चमकत असल्याचे दिसून येते. या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, प्राचार्य डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभागप्रमुख, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतूक केले.

Dhule Edition
Dec 31, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्य नगरी 30/12/2025 www.epunyanagari.com

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या १८ प्राध्यापकांना पी.एचडी. प्रदान

### संशोधन आणि नाविन्यपूर्ण उपक्रमात संस्थेची झेप



**शिरपूर :** येथील शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील विविध विभागांच्या १८ प्राध्यापकांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या ३४ व्या दीक्षांत समारंभात राष्ट्रीय मुल्यांकन परिषद, बंगलोरचे संचालक प्रा. डॉ. गणेशन कान्निबिरण यांच्या हस्ते नुकतीच पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.

एकाच वेळी एवढ्या मोठ्या संख्येने प्राध्यापकांनी उच्च शैक्षणिक टप्पा गाठल्याने संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, उत्तर महाराष्ट्रात संस्थेने शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. संशोधनाला चालना देणारी धोरणे आणि तरतूद करून आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीने केवळ अध्यापनावरच नाही, तर संशोधन आणि विकासावर विशेष भर दिला आहे. आय.आय.टी. मुंबई व्हर्च्युअल लॅब्स आणि अत्याधुनिक संशोधन केंद्रांच्या माध्यमातून प्राध्यापकांना जागतिक दर्जाच्या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. या १८ प्राध्यापकांनी आपापल्या क्षेत्रात केलेले संशोधन हे केवळ पदवीपुरते मर्यादित नसून, त्याचा फायदा थेट समाज आणि उद्योगांना होणार आहे. कॉम्प्युटर सायन्स, मेकॅनिकल, सिव्हिल आणि इलेक्ट्रॉनिक्स अशा विविध शाखांमध्ये या प्राध्यापकांनी एआय, शाश्वत ऊर्जा, आणि प्रगत तंत्रज्ञान या विषयांवर शोधकार्य केले आहे. यात पदवी प्राप्त केलेले 'डॉक्टरेट' प्राध्यापकांमध्ये इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाचे डॉ. अनुपकुमार जयस्वाल, डॉ.प्रशांत गोड, डॉ.किरण सोनवणे, डॉ.नरेंद्र लोखंडे, डॉ.भूषण पाटील, सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाचे डॉ.प्रमोद पाटील, डॉ.योगेश सोनवणे, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातून डॉ.भूषण पाटील, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातून डॉ.प्रवीण सरोदे, डॉ.किरण चौधरी, डॉ.भूषण पाटील, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातून डॉ. संदीप सोनवणे, डॉ.मनीषा पाटील, डॉ.मकरंद माळी, डॉ.पुजा सराफ, डॉ.शितल पाटील, डॉ.मुहम्मद सय्यद, अप्लाईड सायन्सेस अँड ह्युमॅनीटीज विभागातून डॉ. विजय सूर्यवंशी यांनी हे संशोधन क्षेत्रातील महत्वाची पदवी प्राप्त केली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे कौतूक केले.



३४ व्या दीक्षांत समारंभात आमच्या १८ प्राध्यापकांना एकाच वेळी पीएच.डी. पदवी देऊन गौरव करणे, ही आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या संशोधन संस्कृतीसाठी अभिमानाची गोष्ट आहे. हे यश जागतिक दर्जाच्या शिक्षणाप्रती असलेली आमची वचनबद्धता देखील सिद्ध करते. या डॉक्टरेट पदव्यांमुळे केवळ महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंचावणार नाही, तर विद्यार्थ्यांच्या संशोधक वृत्तीलाही नवी चालना मिळेल. या सर्व प्राध्यापकांचे योगदान समाज आणि तंत्रज्ञान क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरेल.

-डॉ. जे. बी. पाटील, संचालक

Dhule Edition
Dec 30, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नंदुरबार आवृत्ती
epaper.deshdoot.com
23 Dec 2025 - Page 7

# आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या प्राध्यापकांचे उल्लेखनीय यश

**शिरपूर । प्रतिनिधी**

आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील विविध विद्याशाखेच्या प्राध्यापकांनी नॅशनल प्रोग्रॅम ऑन टेक्नॉलॉजी एन्हांस्ड लर्निंग (एनपीटीईएल) परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन केले आहे. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी आयोजित करण्यात आलेल्या या परीक्षेत आयआयटी आणि आयआयएससी संचालित, उच्च तंत्र शिक्षणातील अभ्यासक्रम पूर्ण करत प्राध्यापकांनी हे यश मिळवले, अशी माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

एनपीटीईएल हा भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने सुरू केलेला एक राष्ट्रीय डिजिटल शिक्षण उपक्रम आहे, जो



आयआयटी आणि आयआयएससी यांच्या सहकार्याने चालवला जातो. अभियांत्रिकी, विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातील मोफत ऑनलाइन अभ्यासक्रम व शैक्षणिक संसाधने उपलब्ध करून देणे, हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. अधिकृत परीक्षा केंद्रावर रिमोट पद्धतीने होणारी ही कठोर प्रक्रिया प्रमाणपत्राचे मूल्य आणि विश्वासार्हता वाढवते ज्याचे अंतिम गुण हे अंतर्गत असाइनमेंट आणि पर्यवेक्षित परीक्षेच्या एकत्रित कामगिरीवर आधारित असतात.

इलेक्ट्रिकल विभागातून डॉ.योगेश किरंगे यांनी पायथन फोर डेटा सायन्स, डॉ. नदीम अंसारी यांनी कंट्रोल सिस्टिमम, प्रा. नीलेश महाजन यांनी असिक्रेडीटेशन अँड औटकॉम बेस्ड लर्निंग - इलेक्ट्रिकल, प्रा. श्रद्धा मुंदडा यांनी बिग डेटा कॉम्पुटिंग - कॉम्प्युटर यांचा समावेश आहे.

एआयएमएल विभागातून डॉ. नितीन शिंदे यांनी रिसर्च मेथोडॉलॉजी, प्रा. प्रियंका लांजेवार ऑपरेटिंग सिस्टिम फंडामेंटल्स, डॉ. किरण चौधरी इंट्रोडक्शन टू ऑपरेटिंग सिस्टिम तसेच ऑपरेटिंग सिस्टिम फंडामेंटल्स, प्रा.जुबेर खाटीक ऑपरेटिंग सिस्टिम फंडामेंटल्स, सिव्हिल इंजिनिअरींग विभागातून प्रा.आकाश पवार सरफेस वॉटर हैड्रोलॉजीफ इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकम्म्युनिकेशन विभागातून डॉ. विनोदकुमार पाटील, सायबर सेक्युरिटी आणि प्रायव्हसी, डॉ. विनीतकुमार पटेल यांनी कंट्रोल सिस्टिम्स, मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातून प्रा.सुनील येवले डेटा सायन्स फॉर इंजिनिर्स आणि अप्लाईड सायन्सेस अँड ह्युमॅनीटीज विभागातून प्रा. समाधान पाटील यांनी कॉम्प्यूटेशनल फ्लूड मेकॅनीक्स या संबंधित विषयांमध्ये यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी सौ. जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे.देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी व सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी कौतूक केले आहे.

पुण्य नगरी

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या प्राध्यापकांचे एनपीटीईएल परीक्षेत यश



**शिरपूर** : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील विविध विद्याशाखेच्या प्राध्यापकांनी नॅशनल प्रोग्रॅम ऑन टेक्नॉलॉजी एन्हांस्ड लर्निंग (एनपीटीईएल) परीक्षेत यश संपादन केले आहे. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी घेण्यात आलेल्या या परीक्षेत आयआयटी आणि आयआयएससीतर्फे संचालित उच्च तंत्र शिक्षणातील अभ्यासक्रम पूर्ण करत प्राध्यापकांनी हे यश मिळवले, अशी माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील यांनी दिली.

'एनपीटीईएल' हा भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने सुरू केलेला एक राष्ट्रीय डिजिटल शिक्षण उपक्रम आहे, जो आयआयटी आणि आयआयएससी यांच्या सहकार्याने चालवला जातो. अभियांत्रिकी, विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातील मोफत ऑनलाइन अभ्यासक्रम व शैक्षणिक संसाधने उपलब्ध करून देणे, हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. अधिकृत परीक्षा केंद्रावर रिमोट पध्दतीने होणारी ही कठोर प्रक्रिया प्रमाणपत्राचे मूल्य आणि विश्वासार्हता वाढवते ज्याचे अंतिम गुण हे अंतर्गत असाइनमेंट आणि पर्यवेक्षित परीक्षेच्या एकत्रित कामगिरीवर आधारित असतात. इलेक्ट्रिकल विभागातून डॉ. योगेश किरंगे यांनी 'पायथन फोर डेटा सायन्स', डॉ. नदीम अंसारी यांनी 'कंट्रोल सिस्टिम', प्रा. नीलेश महाजन यांनी 'असिक्रेडीटेशन ॲण्ड औटकॉम बेस्ड लर्निंग इन इलेक्ट्रिकल', प्रा. श्रद्धा मुंदडा यांनी 'बिग डेटा कॉम्पुटिंग - कॉम्प्युटर' यांचा समावेश आहे. एआयएमएल विभागातून डॉ.नितीन शिंदे यांनी 'रिसर्च मेथोडॉलॉजी', प्रा. प्रियंका लांजेवार 'ऑपरेटिंग सिस्टिम फंडामेंटल्स', डॉ. किरण चौधरी 'इंट्रोडक्शन टू ऑपरेटिंग सिस्टिम तसेच ऑपरेटिंग सिस्टिम फंडामेंटल्स', प्रा. जुबेर खाटीक 'ऑपरेटिंग सिस्टिम फंडामेंटल्स', सिव्हिल इंजिनिअरींग विभागातून प्रा.आकाश पवार 'सरफेस वॉटर हैड्रोलॉजी', इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकम्युनिकेशन विभागातून डॉ. विनोदकुमार पाटील, 'सायबर सेक्युरिटी आणि प्रायव्हसी', डॉ. विनीतकुमार पटेल यांनी 'कंट्रोल सिस्टिम्स', मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातून प्रा. सुनील येवले 'डेटा सायन्स फॉर इंजिनिर्स' आणि अप्लाईड सायन्सेस अँड ह्युमॅनीटीज विभागातून प्रा. समाधान पाटील यांनी 'कॉम्प्यूटेशनल फ्लूड मेकॅनीक्स' या संबंधित विषयांमध्ये यश संपादन केले आहे. या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी त्यांचे कौतूक केले.

Dhule Edition
Dec 21, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
16 Dec 2025 - Page 8

## डॉ.हेमराज कुमावत यांना इंजिनिअरिंग अचिव्हमेंट अवॉर्ड प्रदान

**■ शिरपूर । प्रतिनिधी**



आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीचे डॉ. हेमराज कुमावत यांना प्रतिष्ठित इंजिनिअरिंग अचिव्हमेंट अवॉर्ड प्रदान करण्यात आला.

इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) नाशिक लोकल सेंटरतर्फे आयोजित वार्षिक इंजिनिअरिंग पुरस्कार सोहळा या विशेष कार्यक्रमात आर. सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील प्रा. डॉ. हेमराज आर. कुमावत यांना विज्ञान, तंत्रज्ञान, आपत्ती व्यवस्थापन, शाश्वत पायाभूत सुविधा, कृषी तंत्रज्ञान, डिजिटल नवोपक्रम आणि समाजाभिमुख अभियांत्रिकी या क्षेत्रांतील त्यांच्या विशेष योगदानाबद्दल इंजिनिअरिंग अचिव्हमेंट पुरस्कार प्रदान करण्यात आला. वंदे भारत रेल्वेचे जनक, आयसीएफ, चेन्नईचे माजी महाव्यवस्थापक डॉ.सुधांशु मणी यांच्या हस्ते डॉ.कुमावत यांचा गौरव करण्यात आला.

इंजिनिअरिंग अचिव्हमेंट पुरस्कार हा पुरस्कार अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यक्ती आणि संस्थांच्या उत्कृष्ट कामगिरीचा सन्मान करतो. नवनवीन उपक्रम, उत्कृष्ट तंत्रज्ञान विकास आणि देशाच्या प्रगतीला हातभार लावणाऱ्या कामांना या पुरस्काराद्वारे मान्यता मिळते.

डॉ.हेमराज कुमावत यांनी गेल्या १६ वर्षांहून अधिक काळ अभियांत्रिकी, आरोग्य तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा,पर्यावरणपूरक बांधकाम साहित्य, कृषी रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता निदान प्रणाली, स्मार्ट पायाभूत सुविधा आणि ग्रामीण विकास या क्षेत्रात उल्लेखनीय संशोधन, पेटंट्स आणि नवकल्पनात्मक प्रकल्प साकारले आहेत. त्यांच्या नावावर ३१ युटिलिटी पेटंट्स (६ मंजूर), १३० औद्योगिक डिझाईन (११० नोंदणीकृत) असून त्यांनी ग्रीन काँक्रीट, कार्बन शोषण तंत्रज्ञान, स्मार्ट पूल सुरक्षा प्रणाली, स्वयंचलित ड्रोन, एआय आधारित कृषी तंत्रज्ञान, कमी खर्चिक व्हेंटिलेटर, तसेच सेन्सर-आधारित सार्वजनिक सुरक्षा प्रणाली विकसित केल्या आहेत. बीआयएस कोड सुधारणा आणि पूर संरचनात्मक जोखीम मूल्यमापन यांसारख्या क्षेत्रांतही त्यांचे कार्य नोंदवले गेले.

शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रात त्यांचे योगदानही अत्यंत उल्लेखनीय आहे. अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यावसायिक संस्थांचे आजीवन, व्यावसायिक सदस्य आहेत. त्यांनी विविध परिषदांमध्ये अध्यक्ष आणि तज्ज्ञ म्हणून सहभाग घेतला आहे. चाळीसहून अधिक तज्ज्ञ व्याख्याने दिली आहेत आणि आयआयआरएस-इस्रोच्या सहकार्याने ५५ राष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर डॉ. कुमावत यांच्या कार्याची दखल घेण्यात आली आहे. त्यांचे संशोधन २५ जर्नलमध्ये, २५ परिषद लेखांमध्ये, ७ पुस्तक प्रकरणांमध्ये आणि ९ पाठ्यपुस्तकांमध्ये प्रकाशित झाले आहेत.

या यशाबद्दल शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजी मंत्री, आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे.देवरे यांनी अभिनंदन केले आहे.

सकाळ 11/12/2025

## तीन हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचले उद्योजकतेचे महत्त्व

### पटेल अभियांत्रिकीत आयडिया ॲक्सलेरेट कार्यशाळा, ई- सेलचा पुढाकार

**सकाळ वृत्तसेवा**



**शिरपूर** : कार्यशाळेसाठी उपस्थित शौर्य गायकवाड, उपप्राचार्य डॉ. प्रमोद देवरे व विभागप्रमुख.

शिरपूर, ता. १० : तरूणाईत नवी कल्पनाशक्ती, स्टार्टअप संस्कृती आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) याबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ई- सेलतर्फे आयोजित आयडिया ॲक्सेलरेट या कार्यशाळेला प्रचंड प्रतिसाद लाभला. सलग तीन दिवस चाललेल्या या कार्यशाळेमुळे तीन हजार विद्यार्थ्यांपर्यंत उद्योजकतेचे तत्त्वज्ञान, इनोव्हेशनचे महत्त्व आणि कृत्रिम बुद्धिमत्ते (एआय) चे भविष्यातील उपयोग या संकल्पना प्रभावीपणे पोहचल्या.

आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीचा 'ई-सेल' काही वर्षांपासून विद्यार्थ्यांमध्ये स्टार्टअप संस्कृती रुजवण्यासाठी सातत्याने काम करत आहे. 'आयडिया एक्सेलरेट' ही त्यांची आतापर्यंतची सर्वात व्यापक मोहीम ठरली.

या कार्यशाळेसाठी 'लीप स्टार्टअप'चे संस्थापक व प्रसिद्ध कंटेंट क्रिएटर तथा युवा उद्योजक शौर्य गायकवाड प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी आधुनिक उद्योगक्षेत्रातील बदलत्या मागण्या, उद्योजकता उभारणीची प्रारंभिक पायरी, एआय आधारित नवकल्पना, डिजिटल उद्योजकेतील संधी व आव्हाने या विषयांवर विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. संवादात्मक शैलीतून त्यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून दिल्या.

शिरपूर एज्युकेशन सोसायटी अंतर्गत आर. सी. पटेल इंग्लिश स्कूल, आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालय, एच. आर. पटेल माध्यमिक विद्यालय, शिरपूर व निमझरी येथील आर. सी. पटेल आश्रमशाळा, आर. सी. पटेल इंग्लिश ज्युनिअर कॉलेज व मुकेश आर. पटेल स्कूल कार्यशाळेत सहभागी झाल्या. विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तरे, प्रत्यक्ष उदाहरणे, एआय डेमो आणि स्टार्टअप आयडिया ब्रेनस्टॉर्मिंगमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. उद्योजकतेच्या आड येणारी भीती, भांडवल उभारणीची प्रक्रिया, सोशल मीडियाचा परिणामकारक वापर, एआयचा व्यवसाय वाढविण्यातील वाटा तसेच भविष्यातील रोजगार संधी या विषयांवर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना गायकवाड यांनी उत्तरे दिली. पटेल अभियांत्रिकीचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. प्रमोद देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली वैष्णव पाटील, प्रणिल पवार, प्रा. के. डी. देवरे, प्रा. एन. एम. शिंदे यांनी संयोजन केले.

Dhule, Dhule-Today
11/12/2025 Page No. 3

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

देशदूत

24 Nov 2025 - Page 7

## विद्यापीठ नेमबाजी स्पर्धेसाठी निवड



■ **शिरपूर । प्रतिनिधी**

पंढरपूर येथील कर्मयोगी अभियांत्रिकी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आयोजित आंतरविभागीय नेमबाजी स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थी जयेश रविंद्र देवरे याची अखिल भारतीय विद्यापीठ नेमबाजी स्पर्धेसाठी निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली. अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षातील विद्यार्थी जयेश देवरे याने याआधी आंतर विभागीय स्तरावर सतत चार वेळा विजेतपद मिळविले आहे. या निवडीबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांनी अभिनंदन केले.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
22 Nov 2025 - Page 7

## जूनिकॉर्न दुबई समिट २०२६ च्या अंतिम फेरीसाठी सहा विद्यार्थ्यांची निवड

■ शिरपूर । प्रतिनिधी

शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित, आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीने नवकल्पना आणि उत्कृष्टतेच्या पर्वात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. महाविद्यालयाच्या ए.आय. एम.एल.ई. अँड टी.सी. व डाटा सायन्स अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षातील सहा विद्यार्थ्यांच्या एकमेव संघाची महाराष्ट्रातून जूनिकॉर्न दुबई समिट २०२६ या जागतिक स्तरावरील प्रतिष्ठित कार्यक्रमाच्या अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे.

या सहा विद्यार्थ्यांपैकी यश दिपक येलावे व सिद्धेश विकास चौधरी हे दोन विद्यार्थी प्रतिनिधित्व करण्यासाठी दि. ९ ते १२ जानेवारी २०२६ दरम्यान अकॅडमिक सिटी, दुबई, यूएई येथे होणाऱ्या या समिटमध्ये सहभागी होतील, अशी माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.



या सर्व विद्यार्थ्यांचा माजीमंत्री आ. अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते जनक विला येथे गौरव करण्यात आला. शिरपूर ते दुबई या यशस्वी प्रवासाची सुरुवात २ नोव्हेंबर रोजी मल्ला रेड्डी युनिव्हर्सिटी, हैदराबाद येथे झालेल्या पात्रता फेरीपासून झाली. या स्पर्धेत १ हजार पेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय संघ, त्यात भारताचे केवळ ४० संघ सहभागी झाले होते. यामध्ये आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाचा संघ आपल्या अभिनव कल्पना आणि तांत्रिक कौशल्यामुळे ठळकपणे उभा राहिला. विशेष म्हणजे, अंतिम फेरीत पोहोचणारा महाराष्ट्रातील एकमेव संघ म्हणून त्यांनी राज्याचेही नाव उज्ज्वल केले आहे. जूनिकॉर्न दुबई समिट २०२६च्या अंतिम फेरीसाठी अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षात शिकत असलेले यश दिपक येलावे, सायली भारत जाधव, सिद्धेश विकास चौधरी, दिपाली अर्जुन पाटील, चेतना महेश भावसार व कविता भाऊसाहेब पाटील या सहा विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्यांच्या ए आय पॉवरड् अडॅप्टिव्ह ट्राफिक सिग्नल कंट्रोल सिस्टिमम या अतिशय अभिनव तसेच व्यावहारिक प्रकल्पाचे ध्येय शहरातील वाहतूक व्यवस्थापन अधिक स्मार्ट आणि कार्यक्षम बनविणे होय. या नाविन्यपूर्ण प्रकल्पाच्या सक्षमिकारणासाठी विभागप्रमुख डॉ. यू. एम. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या निवडीबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजीमंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी सौ. जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक, कर्मचाऱ्यांनी कौतूक केले.

### शिरपूर शहराचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकत राहील

शिरपूर एज्युकेशन सोसायटीतर्फे आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या माध्यमातून शिरपूर येथील स्थानिक पातळीवर उच्च प्रतीचे तंत्र शिक्षण उपलब्ध करून देण्याचे कार्य सुरु आहे. म्हणूनच, शिरपूर सारख्या छोट्या शहरातील विद्यार्थी आता राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमधून यशस्वी होत पुढे त्यांची दुबई येथे आंतरराष्ट्रीय स्तरावर तांत्रिक कौशल्य सादर करण्यासाठी निवड झाली आहे. यापुढे देखील शिरपूर शहराचे नाव येथील दर्जेदार शिक्षणासाठी अजून राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकत राहील यात शंका नाही.

–अमरीशभाई पटेल, आमदार

R. C. PATEL
INSTITUTE OF TECHNOLOGY
An Autonomous Institute

**01 June 2024 to 25 March 2026**

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

देशदूत

19/11/2025

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीचे प्रा.डॉ.आर.बी.वाघ यांना पुरस्कार

■ **शिरपूर । प्रतिनिधी**



शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित, आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा.डॉ.आर.बी. वाघ यांना शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल भीष्म आचार्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यामुळे पटेल अभियांत्रिकीचा देखील राष्ट्रीयस्तरावर नावलौकिक वाढला आहे.

हा पुरस्कार भारत एज्युकेशन एक्सलन्स अवॉर्ड (बीईईए) २०२५ या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांतर्गत प्रदान करण्यात आला असून, तो अखिल भारतीय तंत्र शिक्षण संचनालय, दिल्ली (एआयसीटीई) द्वारे मान्यता प्राप्त आणि ब्रेन व्हिजन संस्थेद्वारे आयोजित करण्यात आला होता. या वर्षी संपूर्ण भारतभरातून २५०० हून अधिक शिक्षणतज्ज्ञ व नवोन्मेषकांनी अर्ज केले होते. यात शिक्षण क्षेत्रातील विशेष योगदान, विद्यार्थी केंद्रित अध्यापन शैली, संशोधन कार्य अशा अनेक निकषांद्वारे प्राप्त उमेदवारांचे मूल्यमापन झाल्यानंतर त्यापैकी केवळ ३०० निवडक पुरस्कार्थींची यादी निवड समितीद्वारे प्रकाशित करण्यात आली.

महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा.डॉ.आर.बी.वाघ यांना पुरस्कार बहाल करण्यात आला. या दिमाखदार सोहळ्याला डॉ. बुद्ध चंद्रशेखर (मुख्य समन्वयक अधिकारी, एआयसीटीई, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार) हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

डॉ. वाघ यांचे शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजीमंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी सौ. जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक, कर्मचाऱ्यांनी कौतूक केले.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्य नगरी

## आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीने आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये मारली बाजी



### कबड्डी, खो-खो संघाची कामगिरी

**शिरपूर** : येथील शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या जळगाव विभागांतर्गत आंतरमहाविद्यालयीन कबड्डी व खो-खो स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी विविध महाविद्यालयाचे क्रीडा संचालक देखील उपस्थित होते. यात कबड्डी व खो-खो स्पर्धांमध्ये पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या खेळाडूंनी सरस कामगिरी करीत विजय प्राप्त केला. या स्पर्धांमध्ये जळगाव, नंदुरबार, नाशिक आणि धुळे या जिल्ह्यांतील संलग्न १५ महाविद्यालयांच्या संघांनी सहभाग नोंदविला. खेळाडूंनी अत्यंत शिस्तबद्धता आणि कौशल्यपूर्ण खेळ सादर करून प्रेक्षकांची दाद मिळवली. दिवसभर झालेल्या उत्कंठावर्धक लढतींमध्ये प्रत्येक संघाने आपल्या जिल्ह्याच्या गौरवासाठी उत्कृष्ट प्रयत्न केले. कबड्डी खेळातील अंतिम सामना आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी व एस.एस.बी.टी. फार्मसी महाविद्यालय, बांभोरी, जळगाव यांच्यात रंगला. या सामन्यात आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघाने एकूण १५ गुणांच्या फरकाने जिंकला. संघाचे नेतृत्व लोकेश शिवाजी शिंत्रे या खेळाडूने केले.

कबड्डी स्पर्धेत आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीतीचा संघ संपूर्ण स्पर्धेत अव्वल ठरला. उत्कृष्ट खेळाच्या जोरावर विजेतेपद पटकावले. तसेच पुरुष व महिला खो-खो स्पर्धेतही पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या तीन खेळाडूंनी चमकदार कामगिरी करून विभागीय स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली. या स्पर्धेसाठी क्रीडा संचालक प्रा.निंबाजी राठोड यांनी खेळाडूंना मार्गदर्शन देत कसून सराव करवून घेतला.

या स्पर्धेच्या समारोप सोहळ्यात विजेत्या आणि उपविजेत्या संघांना सन्मानचिन्हे आणि पारितोषिके प्रदान करण्यात आली. अभियांत्रिकी महाविद्यालयाने अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातच नव्हे तर या स्पर्धांच्या माध्यमातून क्रीडा क्षेत्रात देखील उल्लेखनीय कामगिरी करीत भावी अभियंत्यांमध्ये खेळाद्वारे संघभावना आणि आरोग्यदायी स्पर्धात्मकता वातावरण जपण्याचे उत्कृष्ट उदाहरण ठेवले आहे. सर्व खेळाडूंचे शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी, तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी कौतूक केले.


Dhule Edition
Nov 13, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

शिल्पकार विकासाचा...

**देशदूत**

**धुळे आवृत्ती**

epaper.deshdoot.com
12 Nov 2025 - Page 8

# पटेल स्वायत्त अभियांत्रिकीचे यशोदीप मोरे व कोमल कुमावत यांनी राष्ट्रीय स्तरावर पटकावले पारितोषिक

■ **शिरपूर । प्रतिनिधी**

येथील आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपल्या तंत्रज्ञातील कौशल्य बुद्धिमत्तेच्या क्षमतेची झलक दाखवत राष्ट्रीय स्तरावर महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे.

विभागातील विद्यार्थी यशोदीप मोरे व कोमल कुमावत यांनी प्रतिष्ठित अन्नम.एआय हॅकाथॉन २०२५ या स्पर्धेत, भारतीय प्रौद्योगिक संस्था, रोपर येथे आयोजित राष्ट्रीय उपक्रमात तिसरा क्रमांक पटकावला आहे. याद्वारे पटेल अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी देशभरातील हजारो स्पर्धकांमधून सरस कामगिरी करीत आपल्या तांत्रिक उत्कृष्टतेचा ठसा उमटविला अशी माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

भारतीय प्रौद्योगिक संस्था, रोपर (आयआयटी रोपर) यांच्या अन्नम.एआय या कक्षाद्वारे, भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या सहयोगाने कृषी क्षेत्रातील वास्तविक समस्यांवर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) माध्यमातून उपाय शोधण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील ८ आठवड्यांच्या हॅकाथॉन स्पर्धेचे आयोजन केले. या उपक्रमाचा उद्देश देशभरातील विद्यार्थी, संशोधक आणि तंत्रज्ञानप्रेमी नवोन्मेषकांना एकत्र आणून कृषी क्षेत्रात शाश्वत आणि तांत्रिकदृष्ट्या प्रभावी उपाय विकसित करणे हा होता. या प्रतिष्ठित उपक्रमाला शिक्षण मंत्रालय, कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, आणि पृथ्वी विज्ञान मंत्रालय यांचे सक्रिय सहकार्य लाभले असून, देशातील प्रतिभावान विद्यार्थ्यांना संशोधन आणि नवोन्मेषाच्या दिशेने प्रेरित करण्याचे हे एक प्रभावी व्यासपीठ ठरले. महाविद्यालयाच्या इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीचे विद्यार्थी यशोदीप मोरे व कोमल कुमावत यांनी विकसित केलेला ग्रीवेस्ट टू फ्युएल हा प्रकल्प शेतीतील अवशेषांचा उपयोग करून हरित ऊर्जा निर्मिती करण्याच्या दृष्टीने एक अभिनव आणि उपयुक्त प्रयत्न आहे.

या प्रकल्पाच्या माध्यमातून शेतीतील उरलेला कचरा ऊर्जेत रूपांतरित करता येतो, शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधन उपलब्ध होते, तसेच पर्यावरणीय प्रदूषणात घट घडवून आणण्यास मदत होते. या प्रकल्पामुळे कार्बन क्रेडिट निर्मितीलाही चालना मिळते. त्यामुळे हा प्रकल्प ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा आणि शाश्वत विकासाला चालना देणारा ठरतो. ग्रीवेस्ट टू फ्युएल ही संकल्पना पर्यावरणपूरक शेती आणि हरित भारताच्या दिशेने एक प्रभावी पाऊल ठरते. या प्रकल्पाच्या विकासामध्ये मशीन लर्निंग, आयओटी आणि डेटा विश्लेषण या अत्याधुनिक तंत्रज्ञानांचा कुशलतेने वापर करण्यात आला आहे. या प्रकल्पाचे शैक्षणिक मार्गदर्शन डॉ. निरंजन देशपांडे यांनी केले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी संशोधन, प्रयोग आणि तांत्रिक डिझाईन यांचा उल्लेखनीय सांगड घालून एक उत्कृष्ट उदाहरण सादर केले आहे.

या यशस्वी प्रकल्पासाठी यशोदीप आणि कोमल यांनी तीन लाखाचे पारितोषिक जिंकले असून त्यांची निवड आता दुसरा टप्पा – मार्गदर्शित संशोधन व निधी सहकार्यासाठी झाली आहे. या टप्प्यात त्यांना आयआयटी रोपर मधील संशोधकांचे मार्गदर्शन तसेच प्रकल्पाच्या पुढील विकासासाठी आर्थिक सहाय्य मिळणार आहे. यामुळे ग्रीवेस्ट टू फ्युएल या प्रकल्पाचे व्यावहारिक आणि औद्योगिक रूपांतर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ग्रीवेस्ट टू फ्युएल हा प्रकल्प मेक एआय इन इंडिया आणि मेक एआय वर्क फॉर इंडिया या राष्ट्रीय ध्येयाशी पूर्णपणे सुसंगत आहे. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शाश्वत शेती, पर्यावरणपूरक ऊर्जा निर्मिती आणि ग्रामीण नवोन्मेष यांचा प्रभावी संदेश दिला आहे.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजीमंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.सुहास शुक्ल, कुलसचिव डॉ. प्रशांत महाजन यांनी अभिनंदन केले.

**01 June 2024 to 25 March 2026**

R. C. PATEL
INSTITUTE OF TECHNOLOGY
An Autonomous Institute

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
11 Nov 2025 - Page 7

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीतर्फे तंत्रज्ञान हाताळणी कार्यशाळा

**शिरपूर । प्रतिनिधी**

आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांच्या एनर्जी क्लबतर्फे शाळकरी विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय तंत्रज्ञान हाताळणी कार्यशाळांचे आयोजन शहरातील अमरिशभाई आर. पटेल सी.बी.एस.ई. स्कूल आणि तांडे येथील मुकेशभाई आर. पटेल मिलिटरी स्कूल येथे करण्यात आले. या सत्राचा उद्देश शालेय विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी परिचित करून देणे आणि त्यांच्यात विज्ञान व नवोन्मेषाबद्दल कुतूहल जागृत करणे हा होता अशी माहिती महाविद्याल्याचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.



आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय नियमित अभ्यासक्रमातील अध्यापन आणि प्रात्यक्षिक वर्गांसोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम सुरु केले आहे. त्याचाच एक भाग म्हणजे विद्यार्थ्यांचे क्लब गठीत करण्यात आले आहेत. याद्वारे ते त्यांच्या आवड आणि रुची नुसार या क्लबचे सदस्य बनून स्वतः अनेक उपक्रम राबवीत असतात. यामुळे त्यांच्यातील नेतृत्व गुण, सामाजिक जीवन कौशल्य, शैक्षणिक कौशल्यांचा विकास होऊन या सर्वांची त्यांच्या अभियांत्रिकी ज्ञानाशी सांगड घातली जाते. या उद्देशाने प्रेरित होऊन शालेय विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यासाठी परिसंवाद, परिषद आणि कार्यशाळांचे आयोजन केले जात आहे. यामुळे शाळेत असतांनाच विद्यार्थ्यांचे ज्ञान, प्रायोगिक कौशल्य आणि तांत्रिक दृष्टीकोन समृद्ध होण्यास मदत होणार आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन ए. आर. पटेल स्कूल शिरपूरच्या प्राचार्या स्मिता उगले यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना सर्जनशीलतेचा आणि तांत्रिक प्रावीण्याचा समन्वय साधण्याचे महत्व अधोरेखित केले. पहिल्या दिवशी एनर्जी क्लबच्या विद्यार्थ्यांनी मायक्रोकंट्रोलर आणि सेन्सर वर्कशॉप घेण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी आर्डीनो प्रोग्रॅमिंग, विविध सेन्सर इंटरफेसिंग, तसेच हार्डवेअर डिझाइन याबाबत सखोल माहिती आणि प्रत्यक्ष अनुभव प्राप्त करवून दिला. शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वतः कोडिंग करून प्रकल्प साकारले, ज्यामुळे त्यांची समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशीलता, आणि नवोन्मेषी विचारसरणी अधिक दृढ झाली.

एम. आर. पटेल मिलिटरी स्कूल, तांडे येथे सेन्सर आणि रास्पबेरी पाय या विषयी प्रायोगिक सत्र आयोजित केले. या सत्रात इयत्ता सातवी ते नववीच्या विद्यार्थ्यांना सेन्सरचे मूलभूत कार्य, डेटा संकलनाची प्रक्रिया, तसेच रास्पबेरी पायचा वापर करून लघु प्रकल्प कसे तयार करायचे याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून दिले.

या उपक्रमामुळे शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञानाबद्दल कुतूहल, स्टेम शिक्षणाविषयी आवड, आणि स्वतः प्रयोग करण्याची वृत्ती जागृत झाली. अनेक विद्यार्थ्यांनी या सत्रात उत्साहाने सहभाग नोंदवला आणि प्रत्यक्ष अनुभव घेतला. या दोन दिवसीय तांत्रिक उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीच्या विभागप्रमुख डॉ. एस. ए. पाटील, एनर्जी क्लबचे समन्वयक प्रा. एन. एस. महाजन यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्राध्यापक, एनर्जी क्लबचे विद्यार्थी समन्वयकांनी प्रयत्न केले.

लोकमत 11/11/2025

# शिरपूर अभियांत्रिकीच्या 'ॲग्रीवेस्ट टू फ्युएल' प्रकल्पाला राष्ट्रीय स्तरावर तीन लाखांचे बक्षीस

लोकमत न्यूज नेटवर्क

शिरपूर : येथील आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागाने पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर आपली तांत्रिक उत्कृष्टता सिद्ध केली आहे. विभागाचे विद्यार्थी यशोदीप मोरे आणि कोमल कुमावत यांनी प्रतिष्ठित अन्नम एआय हॅकाथॉन २०२५ मध्ये देशभरातील हजारो स्पर्धकांना मागे टाकत तिसरा क्रमांक पटकावला आहे.

भारतीय प्रौद्योगिक संस्था, रोपर (आयआयटी रोपर) यांच्या अन्नम एआय कक्षाद्वारे, भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या सहकार्याने कृषी क्षेत्रातील समस्यांवर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) माध्यमातून उपाय शोधण्यासाठी ८ आठवड्यांची ही राष्ट्रीय हॅकाथॉन आयोजित करण्यात आली होती.



कोमल कुमावत



यशोदीप मोरे

यशोदीप आणि कोमल यांनी विकसित केलेला 'ॲग्रीवेस्ट टू फ्युएल' (Agriwaste to Fuel) हा प्रकल्प शेतीतील अवशेषांचा उपयोग करून हरित ऊर्जा निर्माण करण्यावर आधारित आहे. हा अभिनव प्रकल्प शेतीतील कचरा ऊर्जेत रूपांतरित करतो, ज्यामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधन मिळते. तसेच, यामुळे पर्यावरणातील प्रदूषण कमी होते आणि कार्बन क्रेडिट निर्मितीला चालना मिळते. हा प्रकल्प ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा आणि शाश्वत विकासाला चालना देणारा ठरतो. या प्रकल्पाच्या विकासामध्ये मशीन लर्निंग, आयओटी आणि डेटा विश्लेषण यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा कुशलतेने वापर करण्यात आला आहे. डॉ. निरंजन देशपांडे यांचे या प्रकल्पाला शैक्षणिक मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यार्थ्यांना तीन लाखांचे पारितोषिक मिळाले आहे. याव्यतिरिक्त, त्यांची निवड आता पुढील टप्प्यासाठी झाली आहे, जिथे त्यांना आयआयटी रोपरमधील संशोधकांचे मार्गदर्शन तसेच प्रकल्पाच्या पुढील विकासासाठी आर्थिक साहाय्य मिळणार आहे. यामुळे 'ॲग्रीवेस्ट टू फ्युएल' प्रकल्पाचे व्यावहारिक रूपांतरण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

दिव्य मराठी

## धुळे सिटी 11-11-2025

संशोधन • यशोदीप मोरे व कोमल कुमावत यांना 3 लाखांचे तृतीय पारितोषिक

# आर.सी. पटेल अभियांत्रिकीमधील विद्यार्थ्यांनी शोधला कचऱ्यापासून इंधन निर्मितीचा उपाय

प्रतिनिधी | शिरपूर

येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थी यशोदीप मोरे आणि कोमल कुमावत यांनी मोठी कामगिरी केली आहे. या विद्यार्थ्यांनी प्रतिष्ठित 'अन्नम.एआय हॅकाथॉन २०२५' या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला आहे.

भारतीय प्रौद्योगिक संस्था, रोपर (आयआयटी रोपर) यांच्या 'अन्नम.एआय' कक्षाद्वारे, शिक्षण मंत्रालयाच्या सहकार्याने कृषी क्षेत्रातील समस्यांवर एआय आधारित उपाय शोधण्यासाठी ही ८ आठवड्यांची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. देशभरातील हजारो स्पर्धकांमध्ये सरस ठरत या विद्यार्थ्यांनी तांत्रिक उत्कृष्टतेचा ठसा उमटवला, अशी माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली. ल्यशोदीप आणि कोमल यांनी विकसित केलेला 'ॲग्रीवेस्ट टू फ्युएल' हा प्रकल्प अभिनव आणि अत्यंत उपयुक्त आहे. हा प्रकल्प शेतीतील अवशेषांचा वापर करून हरित ऊर्जा निर्मिती करण्यावर आधारित आहे. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष तथा आमदार अमरिश पटेल, ट्रस्टी जयश्री पटेल, कार्याध्यक्ष भूपेश पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतन पटेल, सचिव रेषा पटेल आदींनी कौतुक केले आहे.

### पुढील विकासासाठी आर्थिक साहाय्य

या यशाबद्दल विद्यार्थ्यांना ३ लाख रुपयांचे पारितोषिक मिळाले आहे. तसेच, त्यांची निवड 'दुसरा टप्पा – मार्गदर्शित संशोधन व निधी सहकार्य' यासाठी झाली आहे. यामुळे प्रकल्पाला आयआयटी रोपरमधील संशोधकांचे मार्गदर्शन आणि पुढील विकासासाठी आर्थिक सहाय्य मिळणार आहे.

### अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा प्रकल्प

या संकल्पनेमुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधन उपलब्ध होते, पर्यावरणीय प्रदूषणात घट होते आणि कार्बन क्रेडिट निर्मितीला चालना मिळते. हा प्रकल्प ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा आणि शाश्वत विकासाला चालना देणारा आहे. मशीन लर्निंग, आयओटी आणि डेटा विश्लेषण या अत्याधुनिक तंत्रज्ञानांचा उपयोग केला आहे.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
02 Nov 2025 - Page 7

## पटेल अभियांत्रिकीत वाचन प्रेरणा दिन



**शिरपूर । प्रतिनिधी**

आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती, मिसाईल मॅन आणि प्रख्यात वैज्ञानिक डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी केले. ग्रंथालय सल्लागार समिती सदस्य व यांत्रिकी अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. प्रवीण सरोदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ग्रंथपाल महेश सोनवणे यांनी प्रदर्शनाची संकल्पना स्पष्ट केली आणि ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या नवीन पुस्तके, ई-संसाधने तसेच इतर अद्ययावत वाचन सुविधांची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.

**लोकमत** 15/10/2025



तलवारबाजी आणि तिरंदाजी स्पर्धेचे उद्घाटन करताना डॉ. जे. बी. पाटील, डॉ. पी. जे. देवरे, कैलास कंखरे, किशोर येवले, विकास महाजन आदी.

## शिरपूरमध्ये तलवारबाजी व तिरंदाजी स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकतीच आंतरविभागीय तलवारबाजी आणि तिरंदाजी स्पर्धा पार पडली. महाराष्ट्रातील नागपूर, संभाजीनगर, पुणे, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर या सहा विभागांच्या विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी महाविद्यालयांचे क्रीडा प्रशिक्षक आणि संघव्यवस्थापकही उपस्थित होते.

स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना विभागांचे नेतृत्व करण्यास संधी दिली जाईल.

### उद्घाटन प्रसंगी यांची होती प्रमुख उपस्थिती

शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष, माजी मंत्री व आमदार अमरिशभाई पटेल, तसेच ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, संचालक डॉ. जे. बी. पाटील, डॉ. पी. जे. देवरे, तसेच महाविद्यालयाचे परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, विभागप्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी खेळाडूंना कौतुकानं अभिनंदन केले.

**आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या यशस्वी आयोजनाने क्रीडा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देत असल्याचे प्रतिपादन केले गेले.**

तलवारबाजीसाठी धुळे विभागाच्या संघटनेचे सचिव कैलास कंखरे तर तिरंदाजीसाठी किशोर येवले आणि जळगाव विभागाचे क्रीडा संचालक विकास महाजन यांचीही उपस्थिती होती.

Hello Dhule
Page No. 2 Oct 15, 2025
Powered by: erelego.com

पुण्य नगरी


# आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत 'एम्बीडेड सिस्टिम ॲण्ड इंडस्ट्री चॅलेंजेस' कार्यशाळेला प्रारंभ



**शिरपूर** : येथील शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचालित आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन विभागात 'हॅन्ड्स ऑन वर्कशॉप ऑन एम्बीडेड सिस्टिम ॲण्ड इंडस्ट्री चॅलेंजेस विथ ए.आय.एम.एल. युजींग एस. टी. एम. ३२ ए.आर. एम.एम.' या विषयावरील चार दिवसीय कार्यशाळेला प्रारंभ झाला.

ही कार्यशाळा आयईटीई स्टुडन्ट फोरम व पॅसेंजर ड्रोन रिसर्च, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली. नियमित अभ्यासक्रमाच्या अध्यापन आणि प्रात्यक्षिक वर्गासोबातच अद्ययावत तंत्रज्ञानाची ओळख होण्यासाठी पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय नेहमीच परिसंवाद, परिषद तसेच कार्यशाळा आयोजित करून विद्यार्थी तसेच प्राध्यापक उत्स्फुर्थ सहभाग नोंदवत असतात. या माध्यमातून इंडस्ट्री, शिक्षण, व्यवसाय, इत्यादी क्षेत्रातील तज्ञ मंडळीना आमंत्रित करून संबंधित विषयावर चर्चा, व्याख्याने आणि प्रात्यक्षिकाद्वारे ज्ञानार्जन होते. इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन विभागातर्फे या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून यात बी.टेक. अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना एम्बेडेड सिस्टीम्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग या आधुनिक तंत्रज्ञानाचे सखोल ज्ञान, तसेच प्रत्यक्ष हार्डवेअरवर प्रात्यक्षिक अनुभव मिळाला. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांची समस्या सोडविण्याची क्षमता, प्रोग्रॅमिंग कौशल्य, टीमवर्क आणि उद्योगाभिमुख दृष्टिकोन विकसित झाला असून, ही कौशल्ये प्लेसमेंटसाठी महत्त्वाची ठरणार आहेत. कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी विभागप्रमुख प्रा.डॉ.व्ही.एस. पाटील, कार्यशाळा समन्वयक प्रा. सुभाष पाटील व आयईटीई स्टुडंट फोरम समन्वयक डॉ.ए.बी. जयसवाल यांनी प्रयत्न केले. कार्यशाळेच्या आयोजनासाठी संस्था अध्यक्ष आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे यांचे मार्गदर्शन लाभले.


Dhule Edition
Sep 29, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

देशदूत
शिल्पकार विकासाचा...
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
18 Sep 2025 - Page 7

## पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी स्वायत्त महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीयस्तरावर बाजी

**शिरपूर । प्रतिनिधी**

आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी स्वायत्त महाविद्यालयाच्या इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर आय. आय.टी., गुवाहाटीच्या तंत्रज्ञान महोत्सवांतर्गत आयोजित टेक एक्सपो या प्रकल्प आधारित राष्ट्रीय स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करीत प्रथम क्रमांक पटकावल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.




आय.आय.टी. गुवाहाटी टेक एक्स्पोमध्ये प्रथम क्रमांक

या स्पर्धेसाठी देशभरातून तब्बल २२४८ संघांनी नोंदणी केली होती. स्पर्धा सिनियर आणि ज्युनियर अशा दोन गटांमध्ये विभागली गेली होती. शिरपूरचा संघ सिनियर कॅटेगरीसाठी निवडला. पहिल्या तीन फेऱ्या ऑनलाइन घेण्यात आल्या. पहिल्या फेरीत संकल्पनापत्र (ब्स्ट्रॅक्ट), दुसऱ्या फेरीत सविस्तर प्रकल्प अहवाल आणि तिसऱ्या फेरीत कार्यरत मॉडेलचे व्हिडिओ प्रेझेंटेशन सादर करण्यात आले. या फेऱ्यांमधून पात्र ठरून संघाने आपले स्थान पक्के केले. यानंतर अंतिम दोन फेऱ्यांसाठी फक्त २० संघांची निवड झाली होती.

या संघात दिपाली पोतदार, जयेश पाटील, भगवंत गिरासे, निकिता गिरासे, ओम सोनवणे या विद्यार्थ्यांचा समावेश होता. या फेऱ्या आय.आय.टी., गुवाहाटी येथे पार पडल्या. महाराष्ट्रातून अंतिम फेरीत फक्त दोनच संघ पोहोचले होते, त्यात अंतिम फेरीत शिरपूरच्या विद्यार्थ्यांच्या संघाने नाविन्यपूर्ण कल्पना, प्रभावी सादरीकरण आणि कार्यक्षम प्रात्यक्षिकाद्वारे परीक्षकांचे लक्ष वेधले. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे संघाने प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्या संघाला ६५ हजार रोख पारितोषिक, सन्मान चिन्ह आणि सुवर्ण प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. स्पर्धेच्या तयारीसाठी इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागाच्या प्रमुख डॉ.एस.ए.पाटील आणि प्राध्यापकांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजीमंत्री आ. अमरिशभाई पटेल, ट्रस्टी सौ. जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे.देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी तसेच महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचाऱ्यांनी कौतूक केले.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्यनगरी 11/09/2025
www.epunyanagari.com

## भविष्यात उपयुक्त असणारी नवीन कौशल्य आत्मसात करा !

### डॉ. जे. बी. पाटील : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या स्टुडंट इंडक्शन प्रोग्रामला सुरुवात



**शिरपूर** : महाविद्यालयीन शिक्षण हा एक महत्त्वाचा टप्पा असतो, त्यासाठी भविष्यात उपयुक्त असणारी नवीन कौशल्य आत्मसात करा असे आवाहन आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील यांनी केले.

येथील आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचा इंडक्शन प्रोग्राम- २०२५ चा स्वागत समारंभ राजगोपाल भंडारी हॉलमध्ये उत्साहात झाला. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ.जे.बी. पाटील यांनी सांगितले की, महाविद्यालय विद्यार्थ्यांना केवळ विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये सुवर्णपदक मिळवण्यासाठीच नव्हे, तर त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठीही नेहमी प्रयत्नशील असते. त्यासाठी, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभाग विविध कंपनीच्या संपर्कात राहून कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी मेहनत घेतो. विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक कौशल्ये विकसित करण्यासाठी मुंबई आणि पुणे येथील नामांकित संस्थांद्वारे दुसऱ्या वर्षापासूनच प्रशिक्षण दिले जाते. याशिवाय, जागतिक स्तरावर स्पर्धात्मक राहण्यासाठी जपानी आणि जर्मन भाषा प्रशिक्षणासारखे अभ्यासक्रमही सुरू केले आहेत. डॉ.पाटील यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक आणि व्यावसायिक कौशल्यांसोबतच व्यक्तिमत्त्व विकासावर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिला.

प्रमुख वक्ते म्हणून देवगिरी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंट संस्थेचे माजी संचालक डॉ.उल्हास शिऊरकर यांनी 'क्रक द कोड ऑफ इंजिनिअरींग' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी यशस्वी अभियंता होण्यासाठी ४ डी चा (डिझायर-प्रबळ इच्छा, डेडिकेशन-समर्पण, डिटरमिनेशन-दृढनिश्चय, आणि डिसिप्लिन-शिस्त) मूलमंत्र विद्यार्थ्यांना दिला. महाविद्यालयाचे उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, सर्व विभाग प्रमुख, विविध समित्यांचे अधिष्ठाता, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाने दोन आठवड्यांचा स्टुडंट इंडक्शन प्रोग्राम तयार केला आहे. यात योग, झुंबा, कला, नृत्य, संगीत, वादविवाद, खेळ, आणि इतर उपक्रमांचा समावेश आहे. मानवी मूल्ये, नैतिक मूल्ये, शारीरिक आणि मानसिक आरोग्य, सायबर सुरक्षा, इंजीनियरिंगचे भविष्य आणि व्यवसाय संधी आणि सादरीकरण कौशल्ये यासारख्या विषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने होणार आहेत.कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.सतीष देसले यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य समन्वयक म्हणून डॉ.जमीर शेख, प्रा.अनिल अहिरे यांनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन डॉ. किशोर ठाकरे यांनी केले. डॉ. सुरेखा पाटील यांनी वक्त्यांचा परिचय, प्रा. अनिल अहिरे यांनी आभार मानले.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

दिव्य मराठी धुळे सिटी 01-09-2025

## जपानी भाषा प्रमाणपत्र परीक्षेत पटेल अभियांत्रिकीच्या २७ विद्यार्थ्यांचे यश

### परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात केला गौरव



जपानी भाषा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत उपस्थित असलेले शिक्षकवृंद.

**शिरपूर** | प्रतिनिधी

आर.सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या विविध शाखांमधील तृतीय व अंतिम वर्ष अभियांत्रिकीच्या २७ विद्यार्थ्यांनी जपानी भाषा प्रवीणता चाचणी एन-५ मध्ये यश मिळवून एक नवीन मैलाचा दगड गाठला आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

आर.सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी हे अभियांत्रिकी महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असते. बहुराष्ट्रीय कंपन्या परदेशी भाषा प्रशिक्षित विद्यार्थ्यांना प्राधान्य देताना दिसतात. याकरिता महाविद्यालयाने काही वर्षांपूर्वी जपानी आणि जर्मन भाषेचे प्रशिक्षण वर्ग सुरू केले. या वर्गांमुळे अनेक विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्यास मदत झाली आहे. तसेच सदर दोन्ही भाषांमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सर्टिफिकेटसह कोर्स पूर्ण केले आहेत. विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम बनवण्यासाठी, २०१७-१८ पासून महाविद्यालयात जपानी भाषेचा विशेष वर्ग सुरू करण्यात आला. या वर्गात अभियांत्रिकीच्या सर्व शाखांमधील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश खुला असतो. जपानी भाषा प्रवीणता चाचणी एन -५ ही एक जागतिक स्तरावरील परीक्षा आहे. जी भाषा कौशल्याची प्रामाणिकता सिद्ध करते. नुकत्याच झालेल्या परीक्षेत शिरपूर येथील २७ विद्यार्थ्यांनी हे प्रमाणपत्र मिळवले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशासाठी महाविद्यालयाच्या ' फॉरेन लँग्वेज सेल' च्या अधिष्ठाता डॉ. स्मितल पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. मिल्केश जैन यांनी प्रयत्न केले.

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
19 Aug 2025 - Page 7

# पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा फुल स्टॅक सॉफ्टवेअर डेव्हलपर सर्टिफिकेशन कार्यक्रमात सहभाग

**शिरपूर । प्रतिनिधी**



आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटी पुणे द्वारा फुल स्टॅक सॉफ्टवेअर डेव्हलपर सर्टिफिकेशनफ हा प्रशिक्षण-कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.

३०० तासांचा एक या विशेष प्रशिक्षण कार्यक्रम नामंकित कंपनींच्या सी.एस.आर. निधीतून नुकताच यशस्वीरित्या पूर्ण केला. यामध्ये अंतिम वर्षाच्या १०० विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहानेसहभागघेतला. सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटी पुणेतर्फे फुल स्टॅक सॉफ्टवेअर डेव्हलपर सर्टिफिकेशन या प्रशिक्षणासाठी राज्यभरातील निवडक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना संधी देण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी सदर विद्यापीठाने आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयास सहभागी केले असून एकूण १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. प्रशिक्षण उपक्रमाचा उद्देश महाराष्ट्र राज्याच्या अंतर्गत भागातील सर्व पात्र पदवीधर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण आणि प्लेसमेंटच्या उत्तम संधी उपलब्ध करून देणे हा होता. ज्या कुटुंबाचे उत्पन्न आठ लाखापेक्षा कमी आहे, अशा वंचित घटकांतील पात्र तरुणांना माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात चांगल्या प्रकारचे प्लेसमेंट-केंद्रित कौशल्य आधारित प्रशिक्षण दिले गेले. या प्रशिक्षणात बेसिक्स ऑफ जावा, जावा: ऑब्जेक्ट ओरिएनटेड लँग्वेज, डव्हान्स्ड जावा कन्सेप्ट्स, ऑब्जेक्ट ओरिएनटेड डिझाईन, फ्रॉन्टेनड डेव्हलपमेंट आणि जावा प्रोजेक्ट सबमिशन या विषयांवर भर देण्यात आली. अभियांत्रिकी पदवी धारकांना अत्याधुनिक उत्पादक कौशल्यातील प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. विद्यापीठाकडून शेवटी सर्व विद्यार्थ्यांना सह्भागानिमित्त प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमात सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटीतर्फे हर्षल पाटील यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. त्यांनी केवळ तांत्रिक ज्ञानच नव्हे, तर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रकल्पांवर काम करणे, उद्योग-मान्य कोडिंग पद्धती वापरणे आणि मुलाखतींची तयारी कशी करावी, याबद्दलही मार्गदर्शन केले. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास मोठ्या प्रमाणात वाढला आणि ते आयटी उद्योगातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी अधिक सक्षम झाले.

या स्तुत्य उपक्रमाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजी मंत्री आ. अमरीशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा सौ.जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव सौ.रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे.देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.सुहास शुक्ल, कुलसचिव डॉ. प्रशांत महाजन, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी समाधान व्यक्त केले. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मिल्केश जैन, प्रा. कृणाल राणे, प्रा. मयूर पाटील, प्रा. कैलास देवरे यांनी प्रयत्न केले.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्य नगरी

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत इंडस्ट्रियल ऑटोमेशन कार्यशाळा



**शिरपूर :** येथील आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्युत अभियांत्रिकी विभागात नुकतेच २१ व्या शतकातील तंत्रज्ञान कौशल्यावर आधारित 'इंडस्ट्रियल ऑटोमेशन व करिअर संधी' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला.

औद्योगिक स्वयंचलन म्हणजे उत्पादन प्रक्रिया आणि इतर औद्योगिक कामांमध्ये मानवी हस्तक्षेप कमी करण्यासाठी रोबोटिक्स, संगणक प्रणाली आणि नियंत्रण तंत्रज्ञानाचा वापर करणे. यामुळे उत्पादनाची गुणवत्ता, वेग आणि कार्यक्षमता वाढते. याचा मुख्य उद्देश मानवी श्रमाची गरज कमी करणे आणि उत्पादन अधिक स्वयंचलित करणे हा आहे. या तंत्रज्ञानाचे महत्व ओळखून आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात या कार्यशाळेचे ए.एम.टी. स्किल एन्हान्समेंट इन्स्टिट्यूट, नाशिक यांच्या सहकार्याने कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेस संदीप कारखानीस (कार्यकारी संचालक, ए.एम.टी.एस.ई.आय., नाशिक) व राजेंद्र कोडमलवार (बिझनेस युनिट हेड, ए.एम.टी. एस.ई.आय., नाशिक) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना इंडस्ट्रियल ऑटोमेशनच्या मूलभूत संकल्पना, करिअरच्या संधी, २१ व्या शतकातील आवश्यक कौशल्ये या विषयांबरोबरच इलेक्ट्रॉनिक किट, ए.सी. ड्राईव्हस/मोटर व पी.एल. सी.चे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. विद्यार्थ्यांना ऑटोमेशन सिस्टीमचे प्रत्यक्ष हाताळणीसह प्रशिक्षण देण्यात आले. मार्गदर्शक तज्ज्ञांनी आधुनिक उद्योग-४.० तंत्रज्ञानाची माहिती देत विद्यार्थ्यांनी या क्षेत्रातील कौशल्ये आत्मसात केली तर भविष्यात त्यांच्यासाठी विपुल करिअर संधी उपलब्ध होतील, असे स्पष्ट केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन तंत्रज्ञानाबाबत जागरूकता आणि आत्मविश्वास निर्माण होऊन उद्योग क्षेत्रातील करिअर घडविण्यास मदत होईल आणि अशा कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांचा तांत्रिक दृष्टिकोन व्यापक होऊन रोजगाराभिमुख शिक्षणास चालना मिळेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यशाळेचे आयोजन विद्युत अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ.शैलजा पाटील, प्रा. निलेश महाजन यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. यासाठी विभागातील प्राध्यापक, तंत्र सहाय्यक व विद्यार्थी यांनी देखील विशेष प्रयत्न केले. या उपक्रमाबद्दल महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी समाधान व्यक्त केले.

Dhule Edition
Aug 28, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

22/08/2025

पुण्यनगरी

# आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत ग्रंथपाल दिवस साजरा



**शिरपूर** : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील यांच्या हस्ते डॉ.रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ग्रंथालय सल्लागार समितीने डॉ.रंगनाथन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत, त्यांच्या ग्रंथालयातील पाच नियम या क्रांतिकारी योगदानाचे वर्णन केले. याप्रसंगी ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथपाल महेश सोनवणे, नवलसिंग राठोड, दीपा गुजराथी, कविता पाटील यांनी केले. कार्यक्रमाला उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट ऑफिसर, ग्रंथालय समितीचे सभासद, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

देशदूत 19/08/2025

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा फुल स्टॅक सॉफ्टवेअर डेव्हलपर सर्टिफिकेशन कार्यक्रमात सहभाग

■ शिरपूर । प्रतिनिधी



आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटी पुणे द्वारा फुल स्टॅक सॉफ्टवेअर डेव्हलपर सर्टिफिकेशनफ हा प्रशिक्षण-कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.

३०० तासांचा एक या विशेष प्रशिक्षण कार्यक्रम नामंकित कंपनींच्या सी.एस.आर. निधीतून नुकताच यशस्वीरित्या पूर्ण केला. यामध्ये अंतिम वर्षाच्या १०० विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहानेसहभागघेतला. सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटी पुणेतर्फे फुल स्टॅक सॉफ्टवेअर डेव्हलपर सर्टिफिकेशन या प्रशिक्षणासाठी राज्यभरातील निवडक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना संधी देण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी सदर विद्यापीठाने आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयास सहभागी केले असून एकूण १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

प्रशिक्षण उपक्रमाचा उद्देश महाराष्ट्र राज्याच्या अंतर्गत भागातील सर्व पात्र पदवीधर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण आणि प्लेसमेंटच्या उत्तम संधी उपलब्ध करून देणे हा होता. ज्या कुटुंबाचे उत्पन्न आठ लाखापेक्षा कमी आहे, अशा वंचित घटकांतील पात्र तरुणांना माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात चांगल्या प्रकारचे प्लेसमेंट-केंद्रित कौशल्य आधारित प्रशिक्षण दिले गेले. या प्रशिक्षणात बेसिक्स ऑफ जावा, जावा: ऑब्जेक्ट ओरिएनटेड लँग्वेज, ड्व्हान्स्ड जावा कन्सेप्ट्स, ऑब्जेक्ट ओरिएनटेड डिझाईन, फ्रॉन्टेनड डेव्हलपमेंट आणि जावा प्रोजेक्ट सबमिशन या विषयांवर भर देण्यात आली. अभियांत्रिकी पदवी धारकांना अत्याधुनिक उत्पादक कौशल्यातील प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. विद्यापीठाकडून शेवटी सर्व विद्यार्थ्यांना सहभागानिमित्त प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमात सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटीतर्फे हर्षल पाटील यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. त्यांनी केवळ तांत्रिक ज्ञानच नव्हे, तर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रकल्पांवर काम करणे, उद्योग-मान्य कोडिंग पद्धती वापरणे आणि मुलाखतींची तयारी कशी करावी, याबद्दलही मार्गदर्शन केले. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास मोठ्या प्रमाणात वाढला आणि ते आयटी उद्योगातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी अधिक सक्षम झाले.

या स्तुत्य उपक्रमाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजी मंत्री आ. अमरीशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा सौ.जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव सौ.रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे.देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.सुहास शुक्ल, कुलसचिव डॉ. प्रशांत महाजन, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी समाधान व्यक्त केले. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मिल्केश जैन, प्रा. कृणाल राणे, प्रा. मयूर पाटील, प्रा. कैलास देवरे यांनी प्रयत्न केले.

दिव्य मराठी

धुळे सिटी 08-08-2025

**शैक्षणिक** • उपक्रमात १६९ विद्यार्थी झाले सहभागी, 'जावा' प्रोग्रामिंग तंत्रज्ञानाबाबत घेतले ज्ञान

# अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी उद्योगाभिमुख प्रशिक्षण

**प्रतिनिधी** | शिरपूर

आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक आणि तांत्रिक कौशल्यांना वाव देण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमात १६९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन 'जावा' प्रोग्रामिंग तंत्रज्ञानाचे सखोल ज्ञान प्राप्त केल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

प्रशिक्षण देणारी कंपनी ही सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट आणि आयटी सेवांच्या क्षेत्रात कार्यरत आहे. ही कंपनी विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञान, प्रत्यक्ष प्रकल्पांचा अनुभव आणि मुलाखतीची तयारी करण्यास मदत करते. त्या अनुषंगाने आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने सदर कंपनीच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक आणि तांत्रिक कौशल्यांना विकसित करण्यासाठी महाविद्यालयात या प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. सदर उपक्रमात १६९ विद्यार्थ्यांनी सहभाग तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक अनुभव आधारित सखोल ज्ञान प्राप्त केले. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना कोर जावा, ॲडवान्स्ड जावा, स्प्रिंग फ्रेमवर्क यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे व्यावसायिक ज्ञान आणि प्रात्यक्षिक अनुभव देणे हा होता. या २६ दिवसांच्या सखोल प्रशिक्षण सत्रामध्ये, विद्यार्थ्यांना उद्योग-मान्य सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट प्रक्रिया, ऑब्जेक्ट-ओरिएंटेड प्रोग्रामिंग, तसेच वेब ॲप्लिकेशन्स तयार करण्याचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगाच्या गरजांनुसार तयार होण्यास मदत झाली.



आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत आयोजित उद्योगाभिमुख प्रशिक्षणात उपस्थित मान्यवर.

**मुलाखतीच्या तयारीकरीता दिले प्रशिक्षण :** या प्रशिक्षणासाठी गौरेश सूर्यवंशी व सुनील जोशी यांचे प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांना वास्तविक जीवनातील प्रकल्पांवर आणि मुलाखतीच्या तयारीकरीता प्रशिक्षित केले. यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात नोकरीची संधी प्राप्त होणार असून, निवड प्रक्रियांमध्ये अधिक मदत होणार आहे. या प्रशिक्षणाच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. मिल्केश जैन, प्रा.कैलास देवरे, प्रा. मयूर पाटील यांनी प्रयत्न केले.

लोकमत

# पटेल अभियांत्रिकीत इंटरनेट ऑफ थिंग्स कार्यशाळा

## विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाने विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवला. त्यांनी 'इंटरनेट ऑफ थिंग्स' या अत्याधुनिक विषयावर तीन दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. ही कार्यशाळा आयएसटीई स्टुडंट फोरम आणि पुण्यातील डॉल्फिन लॅब यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली.

यात इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या तृतीय आणि द्वितीय वर्षातील २२७ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना आयओटी प्रणालीचे सखोल ज्ञान देऊन त्यांच्या भविष्यातील गरजांसाठी तयार करणे हा होता. या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी विभागप्रमुख डॉ. व्ही. एस. पाटील, प्रा. विनीत पटेल, आयएसटीई फोरमचे समन्वयक डॉ. महेश डेम्ब्रानी यांच्यासह विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## प्रात्यक्षिकांवर होता भर

१ या कार्यशाळेत डॉल्फिन लॅबचे संचालक सी. पी. महाजन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर भर न देता, वेगवेगळ्या इलेक्ट्रॉनिक्स सेन्सरचा वापर करून आयओटीचे प्रात्यक्षिक दाखवले. यामुळे विद्यार्थ्यांना संकल्पना चांगल्या प्रकारे समजून घेता आल्या आणि त्यांचे व्यावहारिक ज्ञान वाढले.

२ आयओटीचा वापर करून विद्यार्थी त्यांचे वार्षिक प्रकल्प अधिक प्रभावी कसे बनवू शकतात, याबद्दलही श्री. महाजन यांनी मार्गदर्शन केले. अशा आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंटमध्येही नक्कीच उपयुक्त ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

३ महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये नवीन तंत्रज्ञानाबद्दलची आवड निर्माण करण्यासाठी आणि त्यांना भविष्यातील आव्हानांसाठी तयार करण्यासाठी असे उपक्रम सातत्याने आयोजित केले जातील. शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आमदार अमरीशभाई पटेल यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

Hello Dhule
Page No. 3 Aug 07, 2025
Powered by: erelego.com

R. C. PATEL
INSTITUTE OF TECHNOLOGY
An Autonomous Institute

**01 June 2024 to 25 March 2026**

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

सकाळ



**शिरपूर :** नियुक्तिपत्र विद्यार्थ्यांसह संचालक डॉ. जे. बी. पाटील व सहकारी.

## इंटर्नशिप, प्लेसमेंटद्वारे वर्षभरात ५३६ ऑफर

### पटेल अभियांत्रिकी ठरले रोजगारक्षम महाविद्यालय, ४५५ विद्यार्थ्यांना मिळाली नोकरी

**सकाळ वृत्तसेवा**

शिरपूर, ता. १ : येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात २०२४-२५ मध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित कंपन्यांनी कॅम्पसद्वारे एकूण ४५५ विद्यार्थ्यांना नियुक्ती दिली असून, इंटर्नशिप व प्लेसमेंटमिळून एकूण ५३६ ऑफर्स विद्यार्थ्यांना प्राप्त झाल्या आहेत. अद्यापही अनेक कंपन्यांची निवडप्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

> संस्थाध्यक्ष अमरिशभाई पटेल व संचालक मंडळाच्या सहकार्यामुळे, तसेच सर्व सहकाऱ्यांच्या परिश्रमामुळे विविध उपक्रम राबवित आहोत. गुणवत्तापूर्ण शिक्षण, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या धोरणामुळे ही वाटचाल शक्य झाली.
> **- डॉ. जे. बी. पाटील**, संचालक

#### रोजगाराची चढती कमान

पटेल अभियांत्रिकीत २०२३-२४ मध्ये ४३० विद्यार्थ्यांना नोकरी प्राप्त झाली. तर २०२४-२५ मध्ये ४५५ जण नोकरीपात्र ठरले आहेत. विशेष म्हणजे, जागतिक स्तरावर विविध कारणांमुळे अस्थिरता असतानाही महाविद्यालयाच्या अनेक विद्यार्थ्यांना परदेशातही उच्च वेतनश्रेणीची नोकरी मिळविणे शक्य झाले आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाचे धडे, रोजगार कौशल्य विकसित करणारा अभ्यासक्रम, नामांकित कंपन्यांचे प्रशिक्षणवर्ग, रिअल टाइम प्रोजेक्ट्स हाताळणीचा प्रत्यक्ष अनुभव यामुळे महाविद्यालयाच्या रोजगारविषयक यशाची कमान चढती राहिली आहे.

#### दर्जेदार प्रशिक्षण

यंदा वर्षभरात एक हजार ५०७ विद्यार्थ्यांनी विविध कौशल्याधिष्ठित प्रशिक्षणात सहभाग घेतला. सिंबायोसिस स्किल युनिव्हर्सिटीचा एफ.एस.डी. सर्टिफिकेशन प्रोग्राम, मशिन लर्निंग प्रोग्राम, बजाज इंजिनिअरिंग स्कील्स ट्रेनिंग, सी. व्ही. ड्रॅगन रिझ्युम बिल्डिंग वर्कशॉप, पर्सिस्टंट सिस्टिम्स ए. डब्ल्यू. एस., झेन्सार, फ्रेंड्स युनियन फॉर एनर्जायझिंग लाइव्हज, नांदी फाउंडेशन महिंद्रा प्राइड १-२, सुपर कोडर, क्लाउड ॲप डेव्हलपर ट्रेनिंग अशा दर्जेदार प्रशिक्षण वर्गासह महाविद्यालयाच्या फॉरेन लॅंग्वेजेस सेलच्या माध्यमातून जर्मन आणि जपानी भाषा प्रशिक्षण देण्यात आले.

**वर्ष २०२४-२५**

| | |
|---|---|
| रोजगारप्राप्त विद्यार्थी | ४५५ |
| एकूण प्राप्त ऑफर्स | ५३६ |
| कमाल पॅकेज | ७.५० लाख |
| सरासरी पॅकेज | २.६३ लाख |

#### उद्योगांची पसंती

पर्मासीस टेक्नोलोजीज, कॉग्निझंट, टी.सी.एस. (कॉडेविटा-डिजिटल व निंजा), सेलेबल टेक्नॉलॉजी, अल्टिमेट्रिक, व्हर्टुसो प्रोजेक्ट्स, जी.ई. व्हार्नोव्हा, एल अँड टी टेक्नॉलॉजीज सर्व्हिसेस, वेलस्पन कॉर्प (सिंटेक्स), हिताची अस्टेमो, झायडस, विप्रो पारी, डेलीव्हरी, टेक महिंद्र, फॉक्स सोल्युशन्स, जे.बी.एम. ऑटो, वंडर सिमेंट, रिलायन्स, एम.आर.एफ. क्वांटम इंडस्ट्रीज, एस.जे. कॉंट्रॅक्ट, इंडोव्हांस प्रा. लि., लिअर कॉर्पोरेशन, आर.डी.सी. कॉंक्रीट, सुझलॉन, सुरोज बिल्ड्कॉन, जॅक्सन ग्रीन, टेकबीन, वेब्बर इलेक्ट्रोकॉर्प, एन.आर.बी. बेअरिंग आदी नामांकित कंपन्यांनी पटेल महाविद्यालयास कॅम्पससाठी पसंती दिली आहे. त्यासाठी ट्रेनिंग आणि प्लेसमेंट अधिकारी प्रा. मिल्केश जैन, प्रा. विनीत पटेल, प्रा. कृणाल राणे, प्रा. मयूर पाटील, प्रा. कैलास देवरे, प्रा. आकाश पवार, डॉ. पंडित पाटील, प्रा. कृणाल गांधी यांचे सहकार्य लाभले.

Dhule, Dhule-Main
02/08/2025 Page No. 9

पुण्य नगरी

# आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीतील विद्यार्थ्यांना ५३६ प्लेसमेंटसह इंटर्नशीप ऑफर्स



**शिरपूर** : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या प्लेसमेंट सत्रात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील कंपन्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन एकूण ४५५ विद्यार्थ्यांची विविध पदांवर निवड केली. तसेच विद्यार्थ्यांना इंटर्नशिप व प्लेसमेंटच्या मिळून एकूण ५३६ ऑफर्स आहेत. दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणासह विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपनीशी समन्वय साधून केलेल्या पाठपुराव्याच्या जोरावर महाविद्यालयाने देखील प्लेसमेंटचा मोठा टप्पा ओलांडला आहे. अजूनही अनेक कंपन्याची निवड प्रक्रिया सुरु असल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील यांनी दिली.

याप्रमाणे शैक्षणिक २०२३-२४ मध्ये ४३० तर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ४५५ प्लेसमेंट ऑफर्ससह महाविद्यालयातील विविध शाखांमधील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपनीत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्याचेही त्यांनी सांगितले. द्वितीय वर्षापासून विद्यार्थ्यांसाठी नामांकित कंपनींचे उद्योगजगतातील रोजगार क्षमता वाढवण्यासाठी विविध कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविले. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात १५०७ विद्यार्थ्यांनी विविध कौशल्याधिष्ठित प्रशिक्षणात सहभाग घेतला. प्रशिक्षणांमुळे विद्यार्थ्यांना प्लेसमेंट व इंटर्नशिपच्या संधी अधिकाधिक उपलब्ध झाल्या आहेत. महाविद्यालयाच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना उच्च वेतनश्रेणीवर राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपनीत प्लेसमेंट ऑफर मिळविणे शक्य झाले. यात ॲपमॉसीस टेक्नोलोजीज, कॉग्निझंट, टी.सी.एस., सेलेबल टेक्नोलोजीज, अल्टीमेट्रीक, व्हरटुसो प्रोजेक्ट्स, जी.ई. व्हार्नोव्हा, एल अँड टी टेक्नॉलॉजीज सर्व्हिसेस यासह विविध ५० पेक्षा अधिक कंपन्यांमध्ये एकूण ४५५ विद्यार्थ्यांची विविध पदांवर निवड झाली असून विद्यार्थ्यांना इंटर्नशिप व प्लेसमेंट मिळून एकूण ५३६ ऑफर्स प्राप्त झाल्या आहेत. त्यातून विद्यार्थ्यांना उच्चतम वार्षिक पॅकेज ७.५० लाख रुपये असून सरासरी पॅकेज २.६३ लाख रुपये इतके मिळाले असल्याचे ट्रेनिंग आणि प्लेसमेंट अधिकारी प्रा. मिल्केश जैन यांनी सांगितले. प्लेसमेंट यशस्वीततेसाठी प्रा.विनीत पटेल, प्रा. कुणाल राणे, प्रा.मयूर पाटील, प्रा. कैलास देवरे, प्रा.आकाश पवार, डॉ.पंडीत पाटील, प्रा.कृणाल गांधी यांनी परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ. अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, संचालक डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा.एम.पी. जैन, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी समाधान व्यक्त केले आहे.



### विक्रमी यश

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हे आमच्या महाविद्यालयासाठी अत्यंत यशस्वी ठरले आहे. या वर्षात विद्यार्थ्यांनी ५३६ प्लेसमेंट ऑफर्स मिळवून प्लेसमेंटमध्ये पुन्हा एकदा विक्रमी यश मिळवले आहे. हे यश केवळ आकडेवारी नसून गुणवत्तापूर्ण शिक्षण, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या आमच्या कटिबद्धतेचा पुरावा आहे.

**-डॉ. जे. बी. पाटील**, संचालक

Dhule Edition
Aug 01, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या ५१ विद्यार्थ्यांची निवड

**शिरपूर :** आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी नुकतीच बहुराष्ट्रीय कंपनी सेलेबल टेक्नॉलॉजीजतर्फे इंटर्नशिप साठी निवड प्रक्रिया राबविण्यात आली. त्यात महाविद्यालयातील अंतिम वर्षातील ५१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून 'वर्क फ्रॉम होम' पद्धतीने या विद्यार्थ्यांना सेलेबल टेक्नॉलॉजीजमध्ये रिअल-टाईम प्रोजेक्ट्सवर काम करण्याची संधी मिळणार आहे.

सेलेबल टेक्नॉलॉजीज बहुराष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान कंपनी असून आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित एंटरप्राइझ सोल्यूशन्स आणि डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन सेवा पुरविण्यात विशेष प्रावीण्य ठेवते. कंपनीची निवड प्रक्रिया ऑनलाईन अप्टिट्यूड चाचणी, तांत्रिक मुलाखत आणि एच.आर. मुलाखत अशा तीन टप्प्यांमध्ये विभागलेली असते. विद्यार्थ्यांना पूर्व-मुलाखत मार्गदर्शन, इंडक्शन ट्रेनिंग आणि प्रकल्पाधिष्ठित शिक्षणाच्या माध्यमातून तयार केले जाते. नवोदित उमेदवारांना जागतिक दर्जाची कार्यसंस्कृती, तांत्रिक कौशल्य विकास, आणि रिअल-टाईम प्रोजेक्ट्सवर काम करण्याची संधी मिळते. वरील तीनही महत्वपूर्ण टप्प्यांमध्ये ही प्रक्रिया पार पडली. त्यात आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ५१ विद्यार्थ्यांनी यश संपादित केले.

धनश्री पाटील, दामिनी गोसावी, मितेश चौधरी, भूमिका पाटील, हर्षल गायकवाड, सुवर्णा पाटील, समीक्षा कुलकर्णी, यशोदीप मोरे, उन्नती सुर्यवंशी, तुषार भोसले, देवयानी देवरे, गौरव शिंदे, नेहा गवळी, हीत जैन, रुशिका साठे, गौरव शिंदे, पायल पाटील, वैभव पाटील, हर्षदा माळी, तनया पाटील, कोमल पटेल, दर्शन वराडे, उमेश चौधरी, पूनम मराठे, नामीत धनगर, मानसी सोनजे, निपुण वाणी, सर्वेश वाणी, श्रावणी पाटील, आदित्य यावलकर, दिशा पाटील, तुषार भोईटे, भावेश देसले, चेतन पवार, सुदर्शन बारी, काजल माळी, चेतना महाजन, जागृती देसले, पूर्वा सोनजे, समीक्षा खरचे, वैष्णवी बोरसे, आकाश शिंदे, मानसी बेंडाळे, मेघना पाटील, सार्थक पाटील, सोहन कोळी, श्वेताली भालकर, जयश्री देशमुख, जान्हवी पाटील, तुषार शिंपी, विशाल गिरासे यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरीशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक सुहास शुक्ल, कुलसचिव प्रशांत महाजन, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतूक केले. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, यासाठी ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट अधिकारी मिल्केश जैन, प्रा.मयूर पाटील, प्रा. कैलास देवरे, प्रा.कृणाल राणे यांनी प्रयत्न केले.

Nandurbar Edition
Jul 31, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
01 Aug 2025 - Page 7



## पालक मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ शिरपूर । प्रतिनिधी

आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी राजगोपाल भंडारी हॉलमध्ये आयोजित पालक मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एक हजारहून अधिक विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

महाविद्यालय संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी पालकांशी संवाद साधत महाविद्यालयाचे विविध उपक्रम, कौशल्य विकास प्रशिक्षण सत्रे आणि प्लेसमेंट प्रक्रियेबद्दल माहिती दिली. त्यांनी औद्योगिक क्षेत्राशी असलेल्या मजबूत संबंधांवर प्रकाश टाकत, विद्यार्थ्यांचे करिअर घडविण्यासाठी संस्था करत असलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची माहिती दिली. डॉ. पाटील यांनी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळवलेल्या यशाचे दाखले देत संस्थेच्या गुणवत्ता व्यवस्थापन आणि प्रशिक्षण पद्धतीची प्रशंसा केली. प्राध्यापक वर्ग आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित आहेत, याची पालकांना त्यांनी ग्वाही दिली.

उपसंचालक डॉ.पी.जे.देवरे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी आपल्या उज्ज्वल भविष्याकरिता ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या संपर्कात राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पालकांनीही या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेवुन विद्यार्थ्यांच्या प्रगतीला हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले. प्रा.डॉ.पंडित पाटील व प्रा.मयूर पाटील यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. प्रा. मिल्केश जैन यांनी कार्यक्रमाचा मुख्य हेतू आणि उद्दिष्ट्ये सविस्तरपणे विशद केले. कार्यक्रमानंतर पालकांनी विविध विभागप्रमुख व मार्गदर्शक शिक्षकांशी संवाद साधून आपल्या पाल्यांच्या नोकरीच्या संधींबाबत माहिती घेतली. या स्तुत्य उपक्रमाबद्दल पालकांनी कौतुक केले. महाविद्यालयातील कार्यपद्धतीमुळे विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळत असल्याचा आनंद व्यक्त केला.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्य नगरी

### आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी

# बांधकाम क्षेत्रातील औद्योगिक प्रक्रियेचा घेतला अनुभव

## 'क्वांटम इंडस्ट्रीज'मध्ये पूर्ण केली इंटर्नशिप

**शिरपूर** : येथील आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी शिरपूर येथील क्वांटम इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीत दोन आठवड्यांचे सखोल औद्योगिक प्रशिक्षण (इंटर्नशिप) यशस्वीरित्या पूर्ण केले. या प्रशिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांना बांधकाम क्षेत्रातील प्रत्यक्ष औद्योगिक प्रक्रियेचा अनुभव देणे व त्यांची तांत्रिक तसेच व्यावसायिक कौशल्ये विकसित करणे असा होता. याबाबत माहिती देताना महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

क्वांटम इंडस्ट्रीज ही एक प्रगत, गुणवत्ता प्रधान व विद्यार्थीमैत्र कंपनी असून, उद्योग-शिक्षण सहकार्याच्या माध्यमातून ती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवाची संधी उपलब्ध करून देते. बांधकाम व पायाभूत सुविधा विकासाच्या क्षेत्रात ही कंपनी निवासी इमारती, रस्ते, पूल, आरोग्य सेवा सुविधा यांचे बांधकाम, प्रकल्प व्यवस्थापन, गुणवत्ता नियंत्रण आणि शाश्वत



तंत्रज्ञानाच्या वापरात उल्लेखनीय कार्य करीत आहे.

### गुणवत्ता परीक्षणाचे मिळाले ज्ञान

या इंटर्नशिपमध्ये विद्यार्थ्यांना एस.व्ही. के.एम. हॉस्पिटल, नर्सिंग कॉलेज, स्टाफ क्वार्टर्स, हॉस्टेल बिल्डिंग आणि सावळदे-शिरपूर कॉंक्रीट रोड प्रकल्प यांसारख्या बांधकाम प्रकल्पांमध्ये प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाली. त्यांनी रेडी मिक्स कॉंक्रीट संदर्भातील तांत्रिक बाबी- जसे की मटेरियलचे प्रमाण, मिक्स डिझाईन, बॅचिंग प्लांटमधील प्रक्रिया आणि साइटवरील गुणवत्ता परीक्षण, याबाबत सखोल ज्ञान मिळवले. तसेच बीम-स्तंभ रचना, फॉर्मवर्क, रीइनफोर्समेंटसारख्या स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग विषयक बाबींचाही प्रत्यक्ष अभ्यास केला.

### संवाद कौशल्याचा विकास

विद्यार्थ्यांनी आधुनिक बांधकाम उपकरणांवरही प्रत्यक्ष काम केले. त्यामुळे त्यांच्या तांत्रिक ज्ञानात आणि व्यावसायिक कौशल्यात लक्षणीय वाढ झाली. त्यांनी विविध साइट मिटिंग्ज, गुणवत्ता आढावा सत्रे, वर्कशॉप्स आणि सुरक्षा प्रशिक्षणांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. या प्रक्रियेतून त्यांनी केवळ तांत्रिक बाबी शिकल्या नाहीत, तर व्यावसायिक संवाद कौशल्ये व नेटवर्किंग क्षमता देखील विकसित केल्या.

या उपक्रमामध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये अधोरेखित अनुभवाधारित शिक्षण संकल्पना प्रभावीपणे राबवण्यात आली. विद्यार्थ्यांना थेट उद्योगाच्या कार्यपद्धतीचा अनुभव मिळाल्याने, समस्यांचे विश्लेषण, उपाययोजना व संघटनात्मक कार्यसंस्कृतीचे ज्ञान आत्मसात करता आले. हे प्रशिक्षण त्यांच्या शैक्षणिक ज्ञानाला पूरक ठरून, त्यांना आत्मविश्वासपूर्ण, कुशल व व्यावसायिक दृष्टिकोन लाभलेला अभियंता म्हणून घडवण्यास मदत झाले.



या उपक्रमाचा संस्थेच्या वतीने विशेष गौरव करण्यात आला असून, विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक घडणीसाठी हे प्रशिक्षण एक ठोस आणि परिणामकारक पायरी ठरली आहे. अशा प्रकारचे अनुभवाधारित प्रशिक्षण त्यांच्या करिअरमध्ये निश्चितच सकारात्मक बदल घडवणारे ठरेल.

**-डॉ.जे.बी. पाटील**, संचालक

### उत्स्फूर्त सहभाग

या उपक्रमात अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विभागप्रमुख प्रा. गणेश तपकिरे यांनी सांगितले की, 'या इंटर्नशिपमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात व आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली असून, त्यांना व्यावसायिक जीवनासाठी सक्षम बनवण्याचा आमचा उद्देश निश्चितच सफल ठरला आहे.'

या यशस्वी उपक्रमासाठी क्वांटम इंडस्ट्रीज लि.चे संचालक व प्रकल्प अभियंत्यांचे सहकार्य लाभले. याशिवाय संस्थेचे अध्यक्ष आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा व संचालक जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, विभागप्रमुख प्रा.तपकिरे, स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील प्राध्यापक, परीक्षा नियंत्रक, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचेही योगदान लाभले. या उपक्रमासाठी ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट ऑफिसर मिल्केश जैन, प्रा.एम.जे. पाटील, प्रा.के.पी. राणे व त्यांच्या टीमने परिश्रम घेतले.

Nandurbar Edition
Jul 26, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# आउटलुक -आयसीएआरई वार्षिक क्रमवारीत

# आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीला देशात १९८ तर महाराष्ट्रात २६ वे स्थान



**शिरपूर** : आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने नुकत्याच जाहीर झालेल्या आउटलुक-आयसीएआरई प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशित झालेल्या वार्षिक क्रमवारी- २०२५ मध्ये अखिल भारतीय स्तरावरील खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये १९८ वे तर महाराष्ट्रात २६ वे स्थान मिळवून यश संपादन केल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील यांनी दिली.

आउटलुक-आयसीएआरई रँकिंग हे भारतातील उच्च शिक्षण संस्थांचे मूल्यांकन करणारे एक प्रतिष्ठित आणि महत्त्वाचे माध्यम आहे. आउटलुक-आयसीएआरई रँकिंग कठोर मूल्यमापनावर आधारित असून, यात अनेक महत्त्वाच्या घटकांचा विचार केला जातो. यामध्ये शैक्षणिक आणि संशोधन उत्कृष्टता, उद्योग संपर्क आणि प्लेसमेंट पायाभूत सुविधा आणि सोयीसुविधा, प्रशासन आणि प्रवेश प्रक्रिया आणि विविधता आणि सामाजिक समावेशकता हे प्रमुख निकष आहेत. या सर्व कसोट्यांवर आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावरील शिक्षण संस्थांमध्ये आपले १९८ वे स्थान भक्कम केले आहे. तर महाराष्ट्रातील खाजगी अभियांत्रिकी संस्थांमध्ये २६ वे स्थान पटकावले आहे.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतूल भंडारी, संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी, शिक्षक, कर्मचारी यांनी समाधान व्यक्त केले आहे.

Dhule Edition
Jul 25, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

देशोन्नती

## आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीला पश्चिम भारतातील पादेशिक अन् मागदर्शक केंद्र म्हणुन मान्यता

देशोन्नती वृत्तसंकलन

**शिरपूर -** शिरपूर:उत्तरमहाराष्ट्रातीलअग्रगण्यअभियांत्रिकीसंस्थाआर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाला भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबई च्या(आयआयटी) 'व्हर्च्युअल लॅब्स' प्रकल्पासाठी 'प्रादेशिकआणिमार्गदर्शक केंद्र' म्हणून मान्यता मिळाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

भारत सरकारच्याशिक्षणमंत्रालयाच्या राष्ट्रीयडिजिटलशिक्षणउपक्रमाचा हा एक महत्त्वाचा भाग आहे, ज्याचा मुख्य उद्देश विज्ञान आणि अभियांत्रिकी विषयांच्या प्रात्यक्षिक शिक्षणासाठी देशभरातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रयोगशाळांद्वारे प्रवेश उपलब्ध करून देणे हा आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांना विविध प्रयोगांची ऑनलाईन सिम्युलेशन आणि रिमोट-ट्रिगर प्रयोगशाळा अनुभवता येतात.

एक 'मेंटॉर इन्स्टिट्यूट' म्हणून आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाला पश्चिम भारतातील महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, गोवा, ओडिशाआणि कर्नाटक या राज्यांमधील,महाविद्यालयांना 'व्हर्च्युअललॅब्सनोडल सेंटर' म्हणून मार्गदर्शनकरण्याची संधी प्राप्त झालीआहे. तसेच, प्राध्यापकांसाठी 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम' आणि विद्यार्थ्यांसाठीकार्यशाळा वजागरूकतासत्रांचे आयोजन करणे, ग्रामीण आणि दुर्गम भागांतील संस्थांना डिजिटल माध्यमातून



प्रयोगशाळांची सुविधा पुरवणे, आयआयटी मुंबई आणि स्थानिक संस्थांमध्ये समन्वय साधणे, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्याअनुषंगाने डिजिटल शैक्षणिक साधनांचा प्रसार करणे यासारखी महत्त्वपूर्ण कार्ये देखील महाविद्यालय पार पाडणार आहे. सदर कार्यशाळेचे नियोजन करण्यासाठी महाविद्यालयाला आयआयटी मुंबई यांच्याकडून अधिकृत पत्र प्राप्त झालेअसून त्याअनुषंगाने आर. सी. पटेल स्वायत्तअभियांत्रिकी महाविद्यालयाने 'मेंटॉर इन्स्टिट्यूट' म्हणून कार्य करताना संस्थांमध्येप्रशिक्षण व कार्यशाळांचे यशस्वीआयोजन केलेआहे. राष्ट्रीय स्तरावर ड्रीम्स युनिव्हर्सिटी, ओडिशा; दयानंद सागर कॉलेजऑफ इंजिनिअरिंग, बेंगळुरू; ससी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग, आंध्र प्रदेश; आरएनएस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बेंगळुरू; आणि एमईटी'ज इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग, नाशिक या प्रमुख संस्थांमध्ये 'व्हर्च्युअल लॅब्स' संबधित कार्यशाळा यशस्वीरित्याघेण्यातआल्याआहेत. तसेच स्थानिक पातळीवरशिरपूर येथील आर. सी. पटेल शैक्षणिक संकुल अंतर्गत विविध संस्थांमधील प्राध्यापकांसाठी 'व्हर्च्युअल लॅब्स' कार्यशाळाआयोजित करण्यातआल्या. ज्यात आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, आर. सी. पटेल आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, आर. सी. पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निक, श्रीमती एच. आर. पटेल आर्ट्स अँड सायन्स महिला कॉलेज, एच. आर. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्चआणिआरसीपीईटी'ज इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट शिरपूर यांचा समावेश आहे. अशा प्रकारे व्हर्च्युअल लॅब्स'च्या कार्यशाळांमध्ये देशभरातून १५०० हून अधिक शिक्षक आणि विद्यार्थ्यांना ऑनलाईन माध्यमातूनप्रशिक्षित करून 'व्हर्च्युअल लॅब्स' विषयीचे सखोल माहिती तसेच त्याचे योग्य संचालन करून विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे अनुभूतीपूर्ण प्रात्यक्षिकांची अंमलबजावणी करण्याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. व्हर्च्युअल लॅब कार्यशाळा यशस्वीतेसाठी नोडल सेंटरचे मुख्य समन्वयक आणि ?ल्युमिनी अफेर्स चेअधिष्ठाता डॉ. जगदीश जाधव, डॉ. विपुल पंजाबी, डॉ. किरण सूर्यवंशी, प्रा. योगेश सोनवणे, डॉ. कपिल सनेर, प्रा. कृणाल गांधी, डॉ. प्रदीप पाटील, प्रा. अतुल मैराळे यांनी विभागीय समन्वयक म्हणूनप्रयत्न केले. आयआयटी मुंबई तर्फे प्रादेशिक केंद्र म्हणून निवड झाल्याबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेशा पटेल, आदिंनी आनंद व्यक्त केला.

Dhule Edition
Jul 24, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्य नगरी

# आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या १० विद्यार्थ्यांची निवड

## अँबेट्रॉनिक्स कंपनीत ग्रॅज्युएट ट्रेनी इंजिनिअरपदी मिळाली संधी

**शिरपूर** : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाविद्यालयातील अंतिम वर्षात शिकणाऱ्या १० विद्यार्थ्यांची मुंबई येथील अँबेट्रॉनिक्स इंजिनिअरिंग प्रा.लि. कंपनीत ग्रॅज्युएट ट्रेनी इंजिनिअर या पदासाठी निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील यांनी दिली.

अँबेट्रॉनिक्स इंजिनिअरिंग ही औद्योगिक ऑटोमेशन, सेन्सर्स आणि सुरक्षा प्रणालींच्या क्षेत्रात कार्यरत असलेली एक आघाडीची इलेक्ट्रॉनिक सोल्यूशन कंपनी आहे. या कंपनीमध्ये निवड होणे हे विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या करिअरची एक चांगली सुरुवात मानली जाते. विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमाचे आणि महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रणालीचे हे यश आहे.

नुकत्याच पार पडलेल्या या प्लेसमेंट ड्राईव्हसाठी इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन या शाखांमधील विद्यार्थ्यांसाठी संधी उपलब्ध होती. यात पदवी अभ्यासक्रमातील अंतिम वर्षाचे विद्यार्थी ज्यांना पदवी अभ्यासक्रमाच्या प्रत्येक वर्षी ६० टक्के गुण आहेत असे विद्यार्थी या कॅम्पस प्लेसमेंटसाठी पात्र होते. निवड प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांच्या कौशल्याची कसून चाचणी घेण्यात आली. यात प्राथमिक ॲप्टिट्यूड टेस्ट, त्यानंतर तांत्रिक मुलाखत आणि शेवटी वैयक्तिक मुलाखत असे तीन टप्पे पार पाडण्यात आले. या सर्व टप्प्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाचे गणेश प्रवीण ईशी, प्रथमेश योगेश माळी, सुजित राजेश राठोड, वरुण राजेंद्र पाटील, रणवीर जयपालसिंग राजपूत, रोहित अभिमन्यू कुमावत, यश शशिकांत वाघ, कुणाल प्रवीणभाई पाटील, जिग्नेश अमोल सोनार,



रोशन कैलास बडगुजर या दहा विद्यार्थ्यांची वार्षिक २.८५ लाख रुपये वेतनश्रेणीसह ग्रॅज्युएट ट्रेनी इंजिनिअर या पदासाठी निवड झाली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, विभाग प्रमुख, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी, शिक्षक व कर्मचारी यांनी कौतूक केले. महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मिल्केश जैन, प्रा. के. पी. राणे, प्रा. वि. वि. पटेल, डॉ. पी. एस पाटील, प्रा. के. जे. गांधी आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांसाठी नियमितपणे प्रशिक्षण उपक्रम, मॉक इंटरव्ह्यू, तांत्रिक सत्रे, गटचर्चा आणि ॲप्टिट्यूड तयारीचे विशेष वर्ग आयोजित करण्यात आले होते. या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच विद्यार्थी कंपनीच्या निवड प्रक्रियेत यशस्वी ठरले.

Dhule Edition
Jul 22, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत जीटीटी फाउंडेशन बार्कलेज लाइफस्किल्स उपक्रम



**शिरपूर :** येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकताच जीटीटी फाउंडेशन- बार्कलेज लाइफस्किल्स कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या झाला.

बार्कलेज बँकच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सी.एस. आर.) अंतर्गत जीटीटी फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या प्रशिक्षणाचा लाभ ५२ विद्यार्थ्यांनी घेतला. प्रशिक्षक राजेश बेदमुथा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सकारात्मक दृष्टिकोन आणि यशस्वी कारकीर्द घडवण्यासाठी आवश्यक असलेल्या पैलूंवर भर दिला. या उपक्रमाविषयी बोलताना महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ.जे.बी. पाटील यांनी सांगितले की, या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वासाची पातळी वाढली असून, ते आता नोकरीसाठी अधिक सज्ज झाले आहेत. उद्योगविश्वाच्या गरजा लक्षात घेऊन अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आमचे महाविद्यालय नेहमीच अग्रेसर असते. प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट ऑफिसर प्रा.मिल्केश जैन, प्रा.आकाश पवार आणि स्वयंसेवकांनी योगदान दिले.

या उपक्रमासाठी शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी. जे. देवरे यांचे मार्गदर्शन लाभले.

Dhule Edition
Jul 17, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
14 Jul 2025 - Page 3

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या दोन विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंटमध्ये निवड

**शिरपूर । प्रतिनिधी**

येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील अंतिम वर्षातील डेटा सायन्स शाखेचा विशाल भलकार व आर्टिफिशियल इंटेलिजन्स-मशीन लर्निंग शाखेचा दिगंबर पाटील या दोन विद्यार्थ्यांची सेलेबल टेक्नॉलॉजीज या आंतरराष्ट्रीय कंपनीत ग्रॅज्युएट ट्रेनी इन डेटा सायन्स पदासाठी वार्षिक ७ लाख या आकर्षक वेतनश्रेणीवर निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.



नुकताच पार पडलेल्या सेलेबाल टेक्नॉलॉजीजच्या या कॅम्पस प्लेसमेंटसाठी अंतिम वर्षातील अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी पात्र होते. विशेष म्हणजे, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातून केवळ आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनाच सेलेबाल टेक्नॉलॉजीजच्या निवड प्रक्रियेला सामोरे जाण्याची संधी मिळाली. अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेले आणि पदवी अभ्यासक्रमाच्या प्रत्येक वर्षी ६० टक्के आणि त्यापेक्षा अधिक गुण असलेले विद्यार्थी या प्लेसमेंटसाठी पात्र ठरले.

तीन स्तरांवर झालेल्या या निवड प्रक्रियेत, सुरुवातीला बुद्धिमत्ता चाचणी घेण्यात आली, त्यानंतर तांत्रिक मुलाखत आणि शेवटी एच.आर. राउंड झाला.

या प्रक्रियेतून अंतिम वर्षातील डेटा सायन्स शाखेचा विशाल भलकार व आर्टिफिशियल इंटेलिजन्स-मशीन लर्निंग शाखेचा दिगंबर पाटील या दोन विद्यार्थ्यांची वार्षिक रु. ७ लाख या आकर्षक वेतनश्रेणीसह ग्रॅज्युएट ट्रेनी इन डेटा सायन्स या पदासाठी निवड झाली.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

निवड प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मिल्केश जैन, प्रा. एम. जे. पाटील, प्रा. के. डी. देवरे, प्रा. के. पी. राणे यांनी विशेष प्रयत्न केले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे सातत्यपूर्ण प्रशिक्षण उपक्रम, मॉक इंटरव्ह्यू, तांत्रिक स्पर्धा, गटचर्चा आणि ॲप्टिट्यूड टेस्ट यांचा मोलाचा वाटा आहे.

पुण्य नगरी

# आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या ४ विद्यार्थ्यांची निमॅप इन्फोटेकमध्ये निवड

**शिरपूर** : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील चार विद्यार्थ्यांची मुंबईस्थित आयटी सेवा आणि सॉफ्टवेअर डेव्हेलपमेंट कंपनी निमॅप इन्फोटेकमध्ये सिस्टीम इंजिनिअर या पदावर निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी. पाटील यांनी दिली.

आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाचे ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभाग विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अथकपणे कार्यरत असते. अलीकडेच



झालेल्या कॅम्पस प्लेसमेंटमध्ये, पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाचे विद्यार्थी पात्र ठरले. या निवड प्रक्रियेत तीन टप्पे होते. बुद्धिमत्ता चाचणी, तांत्रिक मुलाखत आणि एच.आर. राउंड. या सर्व टप्प्यांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. या प्लेसमेंटमध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थी मराठे लिशा किशोर, पाटील मयुरेश कैलास, चौधरी रामाकांत भागवत आणि पवार समीर निरंजन या चार विद्यार्थ्यांची निमॅप इन्फोटेकमध्ये वार्षिक २.५० लाख रुपये वेतनश्रेणीवर सिस्टीम इंजिनिअर या पदावर निवड झाली. या प्लेसमेंटच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मिल्केश जैन, व्ही.व्ही. पटेल, प्रा.एम.जे. पाटील, प्रा.के.पी. राणे यांनी प्रयत्न केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतूक केले आहे.

Dhule Edition
Jul 09, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

दिव्य मराठी

धुळे सिटी 09-07-2025

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीमधील विद्यार्थिनी कोमल कुमावत हिची शिष्यवृत्तीसाठी निवड



शिरपूर | येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागाची विद्यार्थिनी कोमल कुमावत हिची न्यूयॉर्क येथील शी-फायनान्स या जागतिक दर्जाच्या वेब ३ शिक्षण कार्यक्रमासाठी निवड झाली आहे. तिला $ ७९९ म्हणजेच भारतीय चलनात ६८ हजार प्रती सत्र अशी शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. कोमलच्या यशामुळे अभियांत्रिकीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला. महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, संस्थेचे अध्यक्ष आमदार अमरीश पटेल यांनी कौतुक केले.

लोकमत



शिरपूर पटेल अभियांत्रिकीत थ्रीडी प्रिंटिंगच्या संदर्भात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील.

लोकमत

# पटेल अभियांत्रिकीत थ्रीडी प्रिंटिंग प्रशिक्षण

## प्रिंटिंग तंत्रज्ञानाच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** शहरातील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातर्फे ३-डी प्रिंटिंग तंत्रज्ञानावर आधारित २ दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

आजच्या औद्योगिक युगात ३-डी प्रिंटिंगचे महत्त्व लक्षात घेऊन, हे प्रशिक्षण महाविद्यालयाच्या विभागांतील प्राध्यापकांसाठी आयोजित करण्यात आले असल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

या प्रशिक्षण दरम्यान थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञानाचे विविध पैलू स्पष्ट करण्यात आले. या तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांना स्वत:चे डिझाइन वेगाने तयार करून त्यावर प्रयोग करण्याची तसेच विविध संकल्पनांची चाचणी घेण्याची संधी मिळते. विशेषत: अंतिम वर्षाच्या प्रकल्पांमध्ये मॉडेल तयार करण्यासाठी लागणारा वेळ आणि खर्च वाचतो. या व्यतिरिक्त, नवीन उत्पादन कल्पनांचे प्रत्यक्ष नमुने (प्रोटोटाइप) तयार करता येतात, जे स्टार्टअप्ससाठी अत्यंत उपयुक्त ठरतात.

## आंतरविद्याशाखीय कौशल्ये विकसित करण्याची संधी

हा प्रशिक्षण कार्यक्रम मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हिल, बायोमेडिकल आणि कॉम्प्युटर यासारख्या विविध क्षेत्रांतील विद्यार्थ्यांना एकत्रितपणे काम करण्याची आणि आंतरविद्याशाखीय कौशल्ये विकसित करण्याची संधी उपलब्ध करून देतो. सध्याच्या उद्योगांमध्ये थ्रीडी प्रिंटिंगचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याने, या तंत्रज्ञानात प्रशिक्षित झालेले विद्यार्थी नोकरीसाठी सहज पात्र ठरतात. नवीन पिढीतील उदयोन्मुख अभियंत्यांना अद्ययावत तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक उत्पादन कौशल्यांमध्ये पारंगत करण्यासाठी या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.
महाविद्यालयाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.

### मान्यवरांनी केले मार्गदर्शन

सदर प्रशिक्षण वर्गाच्या यशस्वी आयोजनासाठी विभाग प्रमुख डॉ. पी. एल. सरोदे यांच्या समन्वयात डॉ. एच. के. वाघ आणि सर्व वर्कशॉप इन्स्ट्रक्टर्स यांनी प्रयत्न केले.

या स्तुत्य उपक्रमासाठी शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांचे मार्गदर्शन लाभले.

Hello Dhule
Page No. 4 Jul 07, 2025
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
04 Jul 2025 - Page 7



## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या विद्यार्थिनींची रोजगार क्षमतेकडे वाटचाल

■ **शिरपूर । प्रतिनिधी**

येथील आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकताच महिंद्रा प्राईड – नांदी फाऊंडेशन कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला. याद्वारे महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींमध्ये व्यवसायिक कौशल्य विकसित करण्याचा मुख्य उद्देश असल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय, शिरपूर आणि महिंद्रा प्राइड क्लासरूम- नांदी फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींना व्यवसायिक कौशल्य प्रशिक्षण देवुन रोजगारासाठी सक्षम करण्याच्या हेतूने व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात महाविद्यालयाच्या सुमारे ७० विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.या उपक्रमांतर्गत युवतींना इंग्रजी भाषा, संगणकीय साक्षरता, मुलभूत सामाजिक कौशल्ये, व्यवसायविषयक कौशल्ये, संवादकौशल्य, रेझ्युमे लेखन, मुलाखतीसाठी तयारी व आत्मविश्वास वाढवणारी जीवनकौशल्ये यांचे प्रशिक्षण प्रदान केले गेले. यामुळे रोजगार कौशल्य विकसित होवुन नामंकित आणि बहुराष्ट्रीय कंपनींच्या निवड प्रक्रियेला आत्मविश्वासाने सामोरे जाण्यास महत्त्वपूर्ण मदत होणार आहे. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मिल्केश जैन यांच्या समन्वयात प्रा. आकाश पवार यांनी प्रशिक्षण कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन केले. या स्तुत्य उपक्रमाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. टील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे आदींनी कौतूक केले.

पुण्य नगरी

# आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत कौशल्य विकास प्रशिक्षण



**शिरपूर :** येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकताच 'महिंद्रा प्राईड-नांदी फाउंडेशन कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम' यशस्वीरित्या संपन्न झाला. याद्वारे महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींमध्ये व्यवसायिक कौशल्य विकसित करण्याचा मुख्य उद्देश असल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक प्रा.डॉ.जे.बी. पाटील यांनी दिली.

आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय, शिरपूर आणि महिंद्रा प्राइड क्लासरूम- नांदी फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ७ दिवसाचा व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. महिंद्रा प्राईड क्लासरूम्स उपक्रमांतर्गत युवतींना इंग्रजी भाषा, संगणकीय साक्षरता, मुलभूत सामाजिक कौशल्ये, व्यवसायविषयक कौशल्ये, संवादकौशल्य, रेझ्युमे लेखन, मुलाखतीसाठी तयारी व आत्मविश्वास वाढवणारी जीवनकौशल्ये यांचे प्रशिक्षण प्रदान केले गेले. यामुळे रोजगार कौशल्य विकसित होऊन नामांकित आणि बहुराष्ट्रीय कंपनींच्या निवड प्रक्रियेला आत्मविश्वासाने सामोरे जाण्यास उमेदवारांना मदत होणार आहे. या उपक्रमात महाविद्यालयाच्या सुमारे ७० विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मिल्केश जैन यांच्या समन्वयात प्रा. आकाश पवार यांनी प्रशिक्षण कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन केले. या स्तुत्य उपक्रमाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतूक केले.

Nandurbar Edition
Jul 04, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीला द वीक-हंसा रिसर्च सर्वेक्षणात राज्यात २३ वे स्थान

**शिरपूर** : भारतातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालयांची क्रमवारी तयार करण्याच्या हेतूने 'द वीक-हंसा रिसर्च २०२५' वार्षिक सर्वेक्षण कार्यक्रम नुकताच हाती घेण्यात आला होता. शैक्षणिक क्षेत्रातील या सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीमुळे या सर्वेक्षणात आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाला सर्वसाधारण क्रमवारीत (शासकीय व खासगी एकत्रित) २४८ वे स्थान, खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय स्तरावर २१९ वे स्थान, पश्चिम विभागातील खासगी संस्थांमध्ये ३१ वे स्थान तर महाराष्ट्रातील खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये २३ वे स्थान प्राप्त झाले, अशी माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

द वीक-हंसा रिसर्च सर्वे हा भारतातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालये निवडण्यासाठी एक महत्त्वपूर्ण आणि सर्वसमावेशक अभ्यास आहे. या सर्वेक्षणाचा मुख्य आधार म्हणजे विविध क्षेत्रांतील महाविद्यालयांचे गुणात्मक आणि संख्यात्मक मूल्यांवर आधारित विश्लेषण. या सर्वेक्षणामध्ये कला, विज्ञान, वाणिज्य, अभियांत्रिकी, वैद्यकीय, दंत वैद्यकीय, विधी, हॉटेल व्यवस्थापन, फॅशन तंत्रज्ञान, जनसंज्ञापन आणि वास्तुकला असे अनेक विषयांचा समावेश करण्यात आला. या सर्वेक्षणात शैक्षणिक तज्ञ, विद्यार्थी आणि



भरती करणारे यांच्या प्राथमिक सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीचा वापर करण्यात आला. यातून महाविद्यालयांची विद्यार्थ्यांच्या आणि तज्ञांच्या दृष्टिकोनातून असलेली प्रतिमा निश्चित करण्यात आली. या व्यतिरिक्त, महाविद्यालयांनी दिलेल्या माहितीच्या आधारे पायाभूत सुविधा, प्राध्यापक, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, अतिरिक्त अभ्यासक्रम, प्लेसमेंट या सारख्या घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ गुणांची गणना करण्यात आली.

या सर्वेक्षणामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात सर्वोत्तम महाविद्यालय निवडण्यास मदत होते आणि महाविद्यालयांना त्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्यास एक महत्त्वाचा मानक मिळतो. सर्वेक्षणाची प्रक्रिया अत्यंत पारदर्शक व सखोल होती. यामध्ये विद्यार्थ्यांचे अभिप्राय, संस्थेचे शैक्षणिक आणि संशोधन कार्य, उद्योगांशी असलेले संबंध, प्लेसमेंटची टक्केवारी, शिक्षकांची पात्रता, उपलब्ध पायाभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांचे यश यासारख्या महत्त्वाच्या पैलूंचा बारकाईने अभ्यास करण्यात आला.

शैक्षणिक क्षेत्रातील या सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीमुळे या सर्वेक्षणात संस्थेला सर्वसाधारण क्रमवारीत (शासकीय व खासगी एकत्रित) २४८ वे स्थान, खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय स्तरावर २१९ वे स्थान, पश्चिम विभागातील खासगी संस्थांमध्ये ३१ वे स्थान, तर महाराष्ट्रातील खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये २३ वे स्थान प्राप्त झाले आहे.

महाविद्यालयाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ. अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी आनंद व्यक्त केला.

Dhule Edition
Jul 03, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

R. C. PATEL
INSTITUTE OF TECHNOLOGY
An Autonomous Institute

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

लोकमत

## पटेल अभियांत्रिकीने आंतरराष्ट्रीय परिषदेत पटकाविला प्रथम क्रमांक

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** शहरातील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष यांत्रिक विभागातील "टेक टॉर्क" विद्यार्थी संघाने आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले कौशल्य सिद्ध केले आहे. आयईईई बॉम्बेतर्फे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय एकदिवसीय परिषदेत त्यांच्या "इको फ्लश" या अभिनव संकल्पनेचे संशोधन संघाने ऑनलाइन पद्धतीने अत्यंत प्रभावीपणे सादर करीत प्रथम क्रमांकाचा मान मिळविला. यामुळे महाविद्यालयाच्या शीरपेचात तुरा रोवला गेला.

"इको फ्लश" ही एक अत्याधुनिक फ्लश प्रणाली आहे, जी हवा आणि पाण्याच्या मिश्रणाचा वापर करून अत्यंत कमी पाण्यात प्रभावी फ्लशिंग करते.

### मान्यवरांकडून कौतुक

यशस्वी संघात चेतन रवींद्र पाटील (संघप्रमुख), उज्ज्वल नरेंद्रसिंग जाधव, धनंजय जाधव चौधरी, तेजस्विनी रमेश सोनवणे, यशश्री कमलेश पाटील आणि प्रतीश जितेंद्र निकम यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांना यांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख डॉ. पी. एल. सरोदे आणि प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. या विजयी संघाचे शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरीशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



"इको फ्लश" प्रणालीत यशस्वी पटेल अभियांत्रिकीचा विजयी संघ.

Hello Dhule
Page No. 3 Jul 02, 2025
Powered by: erelego.com

लोकमत

# शिरपूर येथील पटेल अभियांत्रिकीच्या प्राध्यापकांकडून पेटंटसाठी नोंदणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** शिरपूर येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील सहा प्राध्यापकांना त्यांच्या एआय-इंटिग्रेटेड बायोफर्टिलायझर डिस्पेंसर अर्थात एआय-संचालित जैवखत वितरण यंत्रासाठी भारत सरकारच्या डिझाइन पेटंट कार्यालयाकडून अधिकृत डिझाइन नोंदणी मान्यता मिळाली आहे. डॉ. अमृता भंडारी, डॉ. सतीश देसले, डॉ. मिलिंदकुमार सोनवणे, डॉ. किरण सूर्यवंशी, प्रा. समाधान पाटील आणि डॉ. हेमराज कुमावत यांनी हे अभिनव उपकरण विकसित केले आहे. शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, डॉ. जे. बी. पाटील, डॉ. पी. जे. देवरे यांनी या प्राध्यपकांचा सन्मान केला.



अमृता भंडारी | मिलिंद सोनवणे | किरण सूर्यवंशी | समाधान पाटील | हेमराज कुमावत

## डिझाइन नोंदणीचे महत्त्व

भारत सरकारच्या डिझाइन कार्यालयाकडून मिळालेली ही नोंदणी उपकरणाच्या नावीन्यतेची आणि मौलिकतेची अधिकृत मान्यता आहे. यामुळे संशोधकांना त्यांच्या डिझाइनचे बौद्धिक संपदा हक्क मिळतात, ज्यामुळे त्याची नक्कल थांबते आणि कायदेशीर संरक्षण मिळते. तसेच यामुळे संबंधित यंत्राच्या व्यावसायिक आणि औद्योगिक वापरासाठी विश्वासार्हता निर्माण होते, तंत्रज्ञान हस्तांतरण, उत्पादन परवाने आणि स्टार्टअप्ससाठी संधी उपलब्ध होतात. कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक बनला आहे.

## उपकरणाची वैशिष्ट्ये आणि फायदे

हे अभिनव उपकरण रिअल-टाइम माती विश्लेषणाद्वारे पीएच, ओलावा, नायट्रोजन, फॉस्फरस आणि सेंद्रिय कार्बनची पातळी मोजते. यावर आधारित एआय-आधारित विश्लेषण पोषक घटकांचे अचूक प्रमाण ठरवते आणि नायट्रोजन-फिक्सिंग बॅक्टेरिया, सेंद्रिय कंपोस्ट अर्क आणि मायक्रोबियल इनोक्युलंट्स मातीमध्ये योग्य प्रमाणात वितरित करते. हे यंत्र स्वायत्त आणि सौरऊर्जेवर चालणारे असल्याने ऑफ-ग्रिड शेतीसाठी विशेष उपयुक्त आहे. पारंपरिक सिंथेटिक खतांच्या अतिवापरामुळे मातीतील सेंद्रिय घटक नष्ट होतात, सूक्ष्मजीव विविधता कमी होते आणि पर्यावरणीय प्रदूषण वाढते. या पार्श्वभूमीवर, हे एआय-आधारित उपकरण मातीची नैसर्गिक सुपीकता टिकवते, उत्पादन खर्च कमी करते आणि पिकाची गुणवत्ता वाढवते. शेतीतील चांगल्या उत्पादनासाठी मृदेची गुणवत्ता टिकून राहणे महत्त्वाचे आहे.

Hello Dhule
Page No. 2 Jul 03, 2025
Powered by: erelego.com

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
02 Jul 2025 - Page 7

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या ११९ विद्यार्थ्यांचा 'बेस्ट' उपक्रमात सहभाग

**शिरपूर । प्रतिनिधी**

आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील सर्व विद्या शाखांच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षभरातून नामांकित कंपनीतर्फे उपलब्ध केलेले प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. त्यानुसार बजाज इंजिनिअरिंग स्कील्स ट्रेनिंग (बेस्ट) हा प्रशिक्षण कार्यक्रम नुकताच झाला.

कार्यक्रम हा बजाज ऑटो लि. यांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रमाने प्रेरित असून नवीन पिढीतील उदयोन्मुख अभियंत्यांना अद्यावत तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक उत्पादक कौशल्यातील प्रशिक्षण देण्यासाठी सदर ६ महिने कालावधी असलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील ११९ विद्यार्थ्यांचा सहभाग असून सदर



प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिन्यांचा होता. याद्वारे अभियांत्रिकी पदवी धारकांना अत्याधुनिक उत्पादक कौशल्यातील प्रशिक्षण देवुन त्यांची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न केले गेले. उद्योगासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांना कव्हर करण्यासाठी प्रशिक्षणातील अभ्यासक्रम अत्यंत बारकाईने तयार करण्यात आला असून यात ४.० रोबोटिक्स आणि ऑटोमेशन, मोशन कंट्रोल आणि सेन्सर टेक्नॉलॉजी, मेकॅट्रॉनिक्स आणि स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग इ. विभागांचा समावेश होता. म्हणूनच हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना बेस्ट सेंटर प्रोग्राम अंतर्गत ३ ते ५ लाख वेतनश्रेणीवर नामांकित कंपनीमध्ये निवड होण्याची शाश्वती नक्कीच वाढते.

बेस्ट उपक्रमात पटेल अभियांत्रिकीचा सहभाग हा शैक्षणिक उपक्रमाएवढाच महत्वाचा असून भावी अभियंत्यांच्या भविष्यासाठी पटेल स्वायत्त अभियांत्रिकी नेहमीच वचनबद्ध असते, असे प्रतिपादन संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी केले.

या स्तुत्य उपक्रमाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजीमंत्री, आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे.देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतूक केले.

ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मिल्केश जैन व त्यांचे सहयोगी प्रा. व्ही. व्ही. पटेल, प्रा. पी. एस. पाटील, प्रा. के. पी. राणे, प्रा. के. जे. गांधी यांनी गेली ६ महिने प्रशिक्षण कार्यक्रमाचे संपूर्ण समन्वयन केले. तसेच सर्व सहभागी प्रशिक्षणार्थी ११९ विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग दिसला.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
01 Jul 2025 - Page 7

## शॉर्ट न्यूज

### प्रा.नरेंद्र लोखंडे यांना डॉक्टरेट पदवी



■ **शिरपूर । प्रतिनिधी**

शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचालित स्वायत्त दर्जा प्राप्त आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलिकम्युनिकेशन विभागाचे प्रा. नरेंद्र लालचंद लोखंडे यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथून इलेक्ट्रॉनिक्स या विषयाअंतर्गत डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. कॉम्प्युटर एडेड सिस्टिम फॉर अर्ली डिटेक्शन अ‍ॅण्ड डायग्नोसिस ऑफ लंग कॅन्सर हा डॉ. नरेंद्र लोखंडे यांच्या संशोधनाचा मुख्य विषय होता. या संशोधन कार्यात इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलिकम्युनिकेशन विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. पाटील आणि सहकारी प्राध्यापकांचे मोलाचे सहकार्य लाभले. या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री, आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांनी अभिनंदन केले.

लोकमत

# पटेल अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांची 'सॉफ्टवेअर डेव्हलपर' पदावर निवड

## टी. एस. एस. कन्सल्टन्सीत वार्षिक ४.६० लाखांचे पॅकेज

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** शिरपूर येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील चार विद्यार्थ्यांची टी. एस. एस. कन्सल्टन्सी प्रा. लि. कंपनीमध्ये सॉफ्टवेअर डेव्हलपर या पदावर निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना वार्षिक ४.६० लाख इतके वेतन मिळणार आहे, अशी माहिती संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली. टी. एस. एस. कन्सल्टन्सी ही वित्तीय क्षेत्रासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान पुरवणारी अग्रगण्य कंपनी आहे. कॅम्पस प्लेसमेंटमध्ये पृथ्वीराज विक्रम चौधरी, मितेश सूर्यकांत पाटील, जयेश पोपटराव सोनवणे आणि तुषार गंगाधर देवरे या विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता चाचणी, तांत्रिक मुलाखत आणि एच. आर. राउंड अशा तीन स्तरांवर निवड झाली.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. (वा.प्र.)

Hello Dhule
Page No. 3 Jun 30, 2025
Powered by: erelego.com

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

धुळे आवृत्ती

epaper.deshdoot.com
30 Jun 2025 - Page 7

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या ५ प्राध्यापकांकडून पेटंटची नोंदणी

**शिरपूर । प्रतिनिधी**



शेतीतील महत्वाचा घटक असलेली मृदा आणि त्यातील जैव घटक संवार्धनासाठी तंत्रज्ञानाचा वापर करीत आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा. डॉ. अमृता भंडारी, डॉ. सतीश देसले, डॉ. मिलिंदकुमार सोनवणे, डॉ. किरण सुर्यवंशी, प्रा. समाधान पाटील, डॉ. हेमराज कुमावत या ५ प्राध्यापकांच्या एआय-इंटिग्रेटेड बायोफर्टिलायझर डिस्पेंसर अर्थात ए आय -संचालित जैवखत वितरण यंत्रला भारत सरकारच्या डिझाईन पेटंट कार्यालयाकडून अधिकृत डिझाईन नोंदणी मान्यता प्राप्त झाली आहे.

भारत सरकारच्या डिझाईन कार्यालयाकडून मिळालेली डिझाईन नोंदणी ही संबंधित उपकरणाच्या नाविन्यतेची आणि मौलिकतेची अधिकृत मान्यता असते. ही नोंदणी संशोधकांना त्यांच्या डिझाईनचे बौद्धिक संपदा हक्क प्रदान करते, ज्यामुळे डिझाईनची नक्कल रोखता येते आणि कायदेशीर संरक्षण मिळते. यामुळे संबंधित यंत्राच्या व्यावसायिक आणि औद्योगिक वापरासाठी विश्वासार्हता निर्माण होते. तसेच तंत्रज्ञान हस्तांतरण, उत्पादन परवाना, स्टार्टअप्ससाठी संधी उपलब्ध होतात.

भारत हा कृषी प्रधान देश असल्यामुळे आज कृषी क्षेत्रात सर्वच ठिकाणी तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक झाला आहे. शेतातील चांगल्या उत्पादनासाठी मृदेची गुणवत्ता टिकून राहणे महत्वाचे आहे. मृदेची नियमित देखरेख आणि अचूक पोषक तत्वांच्या वितरणासाठी ए.आय. संचालित जैवखत वितरण प्रणाली या उपकरणचे डिझाईन कायदा २००० आणि डिझाईन नियम २००१ अंतर्गत क्लास १५-०३ मध्ये डिझाईन क्र. ४४९७८४-००१ नोंदविण्यात आले आहे.

या अभिनव उपकरणाच्या संशोधन, अभिकल्पना व विकास प्रक्रियेत पटेल स्वायत्त अभियांत्रिकीचे प्रा. डॉ. अमृता भंडारी, डॉ. सतीश देसले, डॉ. मिलिंदकुमार सोनवणे, डॉ. किरण सुर्यवंशी, प्रा. समाधान पाटील, डॉ. हेमराज कुमावत यांनी सक्रिय योगदान दिले आहे.

उपकरण रिअल-टाइम माती विश्लेषणाद्वारे पीएच, ओलावा, नायट्रोजन, फॉस्फरस आणि सेंद्रिय कार्बन पातळींचे मोजमाप करते. यावर आधारित एआय-आधारित विश्लेषण पोषक घटकांचे अचूक प्रमाण ठरवते आणि नायट्रोजन-फिक्सिंग बॅक्टेरिया, सेंद्रिय कंपोस्ट अर्क आणि मायक्रोबियल इनोक्युलंट्स मातीमध्ये योग्य प्रमाणात वितरित करते.

यंत्राची रचना स्वायत्त, सौरऊर्जेवर चालणारी असून, ऑफ-ग्रिड शेतीसाठी विशेषतः उपयुक्त आहे. पारंपरिक सिंथेटिक खतांच्या अति वापरामुळे मातीतील सेंद्रिय घटक नष्ट होतात, सूक्ष्मजीव विविधता कमी होते आणि पर्यावरणीय प्रदूषण वाढते. अशा पार्श्वभूमीवर, हे एआय -आधारित उपकरण मातीची नैसर्गिक सुपीकता टिकवते, उत्पादन खर्च कमी करते आणि पीक गुणवत्तेमध्ये वाढ करते. प्राध्यापकांच्या या डिझाईनचे पेटंट मिळविल्याबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजीमंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांनी त्यांचे कौतूक केले.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नंदुरबार आवृत्ती
epaper.deshdoot.com
29 Jun 2025 - Page 5

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीला राज्यातील टॉपरमध्ये स्थान

■ शिरपूर । प्रतिनिधी

देशातील प्रतिष्ठित व सर्वाधिक प्रसारित होणाऱ्या इंडिया टुडे तर्फे एमडीआरएच्या सहकार्याने भारतातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालयांची क्रमवारी तयार करण्याच्या हेतू वार्षिक सर्वेक्षणात शिरपूर येथील स्वायत्त दर्जा प्राप्त असलेल्या आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाने महाराष्ट्र राज्यातील टॉपर खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये २७ वे स्थान आणि भारतातील शीर्ष खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये २२५ तर सरकारी व खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये २५६ वे स्थान मिळवल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

इंडिया टुडे-एमडीआरए बेस्ट कॉलेजेस रँकिंग सर्व्हेफहा भारतातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचा आणि प्रतिष्ठित सर्वेक्षण आहे. यात प्रसारित होणारी माहिती आणि सर्व्हेक्षण अतिशय निरपेक्ष स्वरूपाने मांडले जाते. यासाठी इंडिया टुडे आणि एमडीआरए यांच्या संयुक्तपणे प्रयासाने आज पर्यंत अनेक खात्रीलायक सर्वेक्षण यशस्वीरीत्या प्रसिद्ध केले आहेत. मार्केटिंग अँड डेव्हलपमेंट रिसर्च असोसिएट्स (एमडीआरए) ही देखील भारतातील एक प्रमुख विपणन संशोधन आणि सल्लागार संस्था आहे ज्यामध्ये परिमाणात्मक आणि गुणात्मक संशोधनावर लक्ष केंद्रित केले जाते, जे विद्यार्थी, पालक, शिक्षण संस्था आणि नोकरी देणाऱ्या कंपन्यांसाठी फायदेशीर ठरते.



### आमच्या क्रमवारीत लक्षवेधी सुधारणा



इंडिया टुडे-एमडीआरए उत्कृष्ट महाविद्यालये मानांकन २०२५ रँकिंगमध्ये स्थान मिळविण्यासाठी महाविद्यालये आपापल्या शैक्षणिक सुविधा, अभ्यासक्रम, प्राध्यापक वर्ग, संशोधन आणि प्लेसमेंटची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करतात. यामुळे महाविद्यालयांमध्ये निरोगी स्पर्धा निर्माण होते आणि एकूणच शिक्षण क्षेत्राचा दर्जा वाढतो. या सर्व्हेक्षणात गुणवत्ता आणि प्रशासन, शैक्षणिक उत्कृष्टता, पायाभूत सुविधा, व्यक्तिमत्व आणि नेतृत्व विकास, करिअर आणि रोजगाराच्या संधी, प्रशिक्षण कार्यक्रम, या प्रमुख निकषांवर महाविद्यालयांचे सर्वसमावेशक मूल्यांकन केले जाते, ज्यामुळे शैक्षणिक कामगिरीचे सर्वांगीण चित्र समोर येते. आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय प्रत्येक वर्षी या सर्वेक्षणात सहभागी होत असून वर्षागणीक आमच्या क्रमवारीत लक्षवेधी सुधारणा दिसून येत आहे. महाविद्यालयाने वरील सर्व निकषांवर उत्तम गुण प्राप्त केले असून महाराष्ट्रातील अग्रगण्य खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये मागील वर्षाच्या ३२ व्या स्थानावरून प्रगती करीत या वर्षी २७ व्या स्थानावर झेप घेतली आहे.

–डॉ. जे. बी. पाटील, संचालक

भारतातील हजारो महाविद्यालयांमधून योग्य महाविद्यालय निवडणे विद्यार्थ्यांसाठी आव्हानात्मक असते. हे सर्वेक्षण विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमांसाठी (उदा.अभियांत्रिकी, वैद्यकीय, कायदा, कला, वाणिज्य, व्यवस्थापन, इत्यादी) सर्वोत्तम महाविद्यालये निवडण्यासाठी एक विश्वसनीय माहितीचा स्त्रोत म्हणून काम करते. तसेच विद्यार्थी, पालक आणि नोकरी देणाऱ्या कंपन्यांसाठी एक महत्त्वाचा मार्गदर्शक ठरते. म्हणून सदर सर्वेक्षण म्हणजे भारतातील सर्वोत्तम शिक्षण देणाऱ्या संस्थांचा मागोवा घेण्यासाठी बेंचमार्क सेट करण्याचा एक प्रयत्न होता. यात राष्ट्रीय स्तरावरील व्यवस्थापन, विधी महाविद्यालय, अभियांत्रिकी आणि हॉटेल व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रातील शैक्षणिक संस्था आणि महाविद्यालयांसाठी त्यांच्या गुणवत्तेच्या आधारावर आणि प्रसिद्ध केलेल्या माहितीच्या आधारावर अनेक पातळींवर रँकिंग बहाल करण्यात आली.

या सर्व्हेक्षणासाठी इंडिया टुडे - एमडीआरए तर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रश्नावलीत अनेक मुद्दे समाविष्ट करण्यात आले होते. यात महाविद्यालयाची मान्यता, स्वायत्तता दर्जा, इन्फ्रास्ट्रक्चर आणि इतर शैक्षणिक सुविधा. महाविद्यालयाचे प्राध्यापक त्यांचे संशोधन कार्य, शैक्षणिक गुणवत्ता आणि त्यांचे अध्यापन कौशल्य, शैक्षणिक अभ्यासक्रमाची संरचना, शैक्षणिक कार्यक्रम, विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया, प्लेसमेंट, उद्योजकत्व, सामाजिक क्षेत्राची जबाबदारी, इंडस्ट्री इंटरफेस, माजी विद्यार्थी संघटन, महाविद्यालयांचे लक्षवेधी वैशिष्ट्ये, संशोधन अभिमुखता, विद्याशाखा आणि त्यातील अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन पद्धती, उद्योग संवाद आणि सामाजिक भान या प्रमुख मापदंडांचा समावेश करण्यात आला होता. या सर्व निकषांच्या आधारावर महाविद्यालयाला सर्वेक्षणात लक्षणीय स्थान प्राप्त झाले. यानुसार जाहीर झालेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या क्रमवारीत स्वायत्ता दर्जा प्राप्त आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाने महाराष्ट्र राज्यातील शीर्ष खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये २७ वा क्रमांक आणि भारतातील शीर्ष खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये २२५ तर सरकारी आणि खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये २५६ वा क्रमांक मिळवला.

महाविद्यालयाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजी मंत्री. आ. अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी आनंद व्यक्त केला.

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
27 Jun 2025 - Page 7

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या ५ विद्यार्थ्यांची ट्रेनी इंजिनियर पदावर निवड

**शिरपूर । प्रतिनिधी**

आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुंगी इंजिनियर्स प्रा.लि. या बहुराष्ट्रीय कंपनीतर्फे पूल कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले होते. त्यात महाविद्यालयाच्या ५ विद्यार्थ्यांची वार्षिक ३ लाख रूपये वेतश्रेणीवर ट्रेनी इंजिनियर या पदावर निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.



मुंगी इंजिनियर्स प्रा. लि. या कंपनीतर्फे निवडक अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या सर्व पात्र विद्यार्थ्यांसाठी पूल कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले होते. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातून केवळ पटेल स्वायत्त अभियांत्रिकीतील विद्यार्थ्यांना निवड प्रक्रियेला सामोरे जाण्याची संधी प्राप्त झाली होती.

महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमातील अंतिम वर्षाच्या इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल शाखेचे विद्यार्थी ज्यांना पदवी अभ्यासक्रमाच्या प्रत्येक वर्षी ६० टक्के गुण आहेत, असे विद्यार्थी या कॅम्पस प्लेसमेंटसाठी पात्र होते. तीन स्तरावर झालेल्या या निवड प्रक्रियेत सुरवातीला बुद्धिमत्ता चाचणी, तांत्रिक मुलाखत व शेवटी एच. आर. राउंड झाला. यात अंतिम वर्ष इलेक्ट्रिकल शाखेच्या सचिन विनोद लोहार, आदित्य भागवत पवार तसेच मेकॅनिकल शाखेच्या राजेश मोहन पाटील, सुयश मुरलीधर महाले, प्रशांत खुशाल पाटील या ५ विद्यार्थ्यांची वार्षिक ३ लाख रूपये वेतश्रेणीवर ट्रेनी इंजिनियर या पदावर निवड झाली.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजीमंत्री आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव सौ.रेशा पटेल, संचालक अतूल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी.पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी कौतूक केले. या पूल कॅम्पस प्लेसमेंटच्या नियोजनासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा.मिल्केश जैन, प्रा. विनीत पटेल, डॉ.पंडित पाटील, प्रा. कृणाल गांधी, प्रा.कृणाल राणे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी 24/06/2025

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीचा 'टेक टॉर्क' संघ प्रथम



**शिरपूर** : येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष यांत्रिक विभागातील 'टेक टॉर्क' विद्यार्थी संघाने आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले कौशल्य सिद्ध केले आहे.

आय.ई.ई.ई. बॉम्बेतर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत त्यांच्या 'इको फ्लश' या अभिनव संकल्पनेचे संशोधन ऑनलाइन सादर करीत प्रथम क्रमांक मिळवला. या संघात चेतन रवींद्र पाटील (संघप्रमुख), उज्वल नरेंद्रसिंग जाधव, धनंजय जाधव चौधरी, तेजस्विनी रमेश सोनवणे, यशश्री कमलेश पाटील, प्रतीश जितेंद्र निकम यांचा समावेश होता. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक आणि प्रमाणपत्र देऊन विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांना यांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. पी.एल. सरोदे यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी संघाचे शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे यांनी कौतूक केले आहे.

पुण्यनगरी

२२.६.२०२५

# योग दिन उत्साहात साजरा

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय



**शिरपूर :** येथील आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या समन्वयाने आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी लोणेरे, अ.भा.तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली आणि आयुष मंत्रालयाच्या योग संगम यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला. कार्यक्रमाचे संचलन व समन्वय डॉ. विजय बाविस्कर आणि राष्ट्रीय सेवा योजना युनिटने केले. उपस्थित सर्वांनी सूर्यनमस्कार, ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, शवासन यासारख्या विविध योगासनांचा सराव करुन कपालभाती, अनुलोम-विलोम यासारखे प्राणायाम आणि ध्यान यांचाही अभ्यास करण्यात आला. महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी सहभागी झाले होते.

पुण्य नगरी

# आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या प्राध्यापकांच्या शोधनिबंधास पारितोषिक



**शिरपूर** : शहरातील शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील डेटा सायन्स विद्याशाखेचे प्रा. डॉ. किरण चौधरी व प्रा. कैलास देवरे यांनी आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय नाविन्यता आणि वैश्विक स्थिरता विकास परिषदेत सादर केलेल्या शोधनिबंधाला उत्कृष्ट शोधनिबंधाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले.

'मशीन लर्निंग अँप्रोच टू प्रेडिक्ट द परफॉर्मबिलिटी अॅण्ड एमिशन ऑफ डिझेल इंजिन फ्युलड विथ डोपड बायोडिझेल ब्लेंड' हा शोधनिबंध आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय नाविन्यता आणि वैश्विक स्थिरता विकास परिषदेत डॉ. किरण चौधरी व प्रा. कैलास देवरे यांनी सादर केला. ही परिषद जी.एच.रायसोनी विद्यापीठ, अमरावतीच्या विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. हा शोधनिबंध मशीन लर्निंगच्या मदतीने जैवडिझेल आणि योजक मिश्रणाने चालणाऱ्या इंजिनची कार्यक्षमता आणि प्रदूषण अचूकपणे अंदाजित करतो. यासाठी आधुनिक ए. आय. तंत्रांचा वापर करून पारंपारिक उर्जा प्रयोगांची गरज कमी केली आहे. यामुळे इंजिनची कार्यक्षमता वाढवणे आणि पर्यावरणास अनुकूल इंधनाचा शोध लवकर करता येईल. डॉ. चौधरी आणि प्रा. देवरे यांनी वरील संशोधनात पर्यावरण संवर्धनाकडे विशेष लक्ष दिले आहे. या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी.पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे कौतूक केले.

Dhule Edition
Jun 20, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

लोकमत

मस्ट READ

# बदलत्या तंत्रज्ञानाचे विद्यार्थ्यांना दिले धडे

## शिरपूर अभियांत्रिकीत फुल स्टॅक सॉफ्टवेअर प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर** : शहरातील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटी, पुणे आणि कॅपजेमिनी यांच्या संयुक्त विद्यमाने फुल स्टॅक सॉफ्टवेअर डेव्हलपर सर्टिफिकेशन हा प्रशिक्षण-कार्यक्रम नुकताच पार पडला. यात अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना संगणकातील बदलत्या तंत्रज्ञानावर प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी वाढविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

नियमित अभ्यासक्रमासोबतच आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी विविध प्रशिक्षण-कार्यक्रम आयोजित करत असते. यातून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात रोजगार संधी उपलब्ध करण्यास मदत होते. त्या अनुषंगाने पुणे येथील सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटीतर्फे फुल स्टॅक सॉफ्टवेअर डेव्हलपर सर्टिफिकेशन कार्यक्रम पटेल अभियांत्रिकीत आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षणासाठी विद्यापीठाने आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीची निवड केली होती.

**४६**
**विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला होता.**

## संगणकातील तंत्रज्ञानावर दिले प्रशिक्षण...

या प्रशिक्षणात बेसिक्स ऑफ जावा, जावा : ऑब्जेक्ट ओरिएनटेड लँग्वेज, ॲडव्हान्स्ड जावा कन्सेप्टस, ऑब्जेक्ट ओरिएनटेड डिझाईन, फ्रन्टएंड डेव्हलपमेंट आणि जावा प्रोजेक्ट सबमिशन या विषयांवर भर देण्यात आला. याद्वारे अभियांत्रिकी पदवीधारकांना अत्याधुनिक उत्पादक कौशल्यातील प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. प्रशिक्षणात सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सिम्बायोसिस विद्यापीठाकडून प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. प्रशिक्षण कार्यक्रमात सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटीतर्फे भरनी धरन हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. मिल्केश जैन, प्रा. कृणाल राणे, प्रा. मयूर पाटील, प्रा. विनीत पटेल, प्रा. कैलास देवरे यांनी परिश्रम घेतले. दरम्यान, या प्रशिक्षणासाठी विद्यापीठाने विद्यार्थ्यांकडून कुठल्याही प्रकारचे मूल्य आकारले नव्हते. या विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे तज्ज्ञांकडून निराकरण करण्यात आले. या प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर प्रणालीतील बदलाबाबत माहिती मिळाली.

Hello Dhule
Page No. 4 Jun 16, 2025
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
16 Jun 2025 - Page 7

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग

■ शिरपूर । प्रतिनिधी



आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटी, पुणे आणि कॅपजेमिनी यांच्या संयुक्त विद्यमाने फुल स्टॅक सॉफ्टवेअर डेव्हलपर सर्टिफिकेशन हा प्रशिक्षण-कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.

सदर कार्यक्रम हा कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) उपक्रमाने प्रेरित असून पुणे येथील सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटीच्या मार्फत ही कार्यशाळा घेण्यात आली. यासाठी संपूर्ण देशातील महाविद्यालयातून गुणवत्तेच्या आधारावर पटेल स्वायत्त अभियांत्रिकीची निवड करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

नियमित अभ्यासक्रमासोबतच आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी विविध प्रशिक्षण-कार्यक्रम देखील आयोजित करीत असते. सदर उपक्रम हे विद्यार्थांना विविध क्षेत्रात रोजगार संधी उपलब्ध करण्यास सहाय्य करतात. त्याचीच एक उपलब्धी म्हणून पुणे येथील सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटी तर्फे फुल स्टॅक सॉफ्टवेअर डेव्हलपर सर्टिफिकेशन कार्यक्रम पटेल अभियांत्रिकीत राबविण्यात आला. या प्रशिक्षणासाठी राज्यभरातील अनेक महाविद्यालयांची निवड करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी सदर विद्यापीठाने आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयास सहभागी केले असून यात महाविद्यालयाचे संगणक अभियांत्रिकी शाखेतील १९, डेटा सायन्स ३ , ऐआयएमएल ६, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकम्युनिकेशन १८ असे एकूण ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

तीन महिने कालावधी असलेल्या या उपक्रमाचा उद्देश महाराष्ट्र राज्याच्या अंतर्गत भागातील सर्व पात्र पदवीधर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण आणि रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध करून देणे हा होता. समाजात ज्या कुटुंबाचे उत्पन्न आठ लाखापेक्षा कमी आहे अश्या वंचित घटकांतील पात्र तरुणांना माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात चांगल्या प्रकारचे प्लेसमेंट-केंद्रित कौशल्य आधारित प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणासाठी विद्यापीठाने विद्यार्थ्यांकडून कुठल्याही प्रकारचे मूल्य आकारले नाही. या प्रशिक्षणात बेसिक्स ऑफ जावा, जावा: ऑब्जेक्ट ओरिएनटेड लँग्वेज, अॅडव्हान्स्ड जावा कन्सेप्ट्स, ऑब्जेक्ट ओरिएनटेड डिझाईन, फ्रन्टएंड डेव्हलपमेंट आणि जावा प्रोजेक्ट सबमिशन या विषयांवर भर देण्यात आला. याद्वारे अभियांत्रिकी पदवी धारकांना अत्याधुनिक उत्पादक कौशल्यातील प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

प्रशिक्षणात सर्व सहभागी विद्यार्थांना आवश्यक उपस्थिती व कामगिरीच्या आधारावर सिम्बायोसिस विद्यापीठाकडून प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. सदर प्रशिक्षण कार्यक्रमात सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटी तर्फे भरनी धरन विशेष अतिथी म्हणून तर महाविद्यालयाकडून ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मिल्केश जैन, प्रा. कृणाल राणे, प्रा. मयूर पाटील, प्रा. विनीत पटेल, प्रा. कैलास देवरे यांनी विशेष प्रयत्न केले. याबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख, जनसंपर्क अधिकारी व रजिस्ट्रार डॉ. प्रशांत महाजन, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी समाधान व्यक्त केले.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्य नगरी 11/06/2025

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीचे डॉ.कुमावत यांचे बौद्धिक संपदा हक्क विषयावर मार्गदर्शन



**शिरपूर** : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विद्याशाखेचे प्रा.डॉ. हेमराज आर. कुमावत यांनी पेटंट, बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर), नवोन्मेष आणि अभियांत्रिकीमधील उद्योजकता या विषयावर तज्ज्ञ सत्रांची मालिका नुकतीच आयोजित केली.

धुळे, जळगाव, नाशिक, मुंबई व नंदुरबार जिल्ह्यातील अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, कृषी, वैद्यकीय (होमिओपॅथी, आयुर्वेद, ॲलोपॅथी), फार्मसी आणि विज्ञान महाविद्यालयांसह विविध शैक्षणिक संस्थांमध्ये ही सत्रे ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही पद्धतीने घेण्यात आली. हा उपक्रम दोन टप्प्यात प्रथम विद्यार्थ्यांसाठी आणि नंतर प्राध्यापकांसाठी आयोजित करण्यात आला होता. सत्रांमध्ये डॉ. कुमावत यांनी पेटंट व बौद्धिक संपदा हक्कांचा व्यापक आढावा दिला. त्यांनी विविध प्रकारचे पेटंट - उपयुक्तता, डिझाइन आणि कॉपीराइट स्पष्ट केले. पेटंट शोध, विश्लेषण, पेटंट मसुदा तयार करणे आणि दावे लेखन यांचे महत्त्व सांगितले. अभियांत्रिकीमधील नवोपक्रमाच्या भूमिकेबद्दल बोलताना डॉ. कुमावत यांनी शोध आणि नवोपक्रम यांच्यातील फरक अधोरेखित केला. त्यांनी समस्या ओळखण्याच्या पद्धती, अभियांत्रिकी विषयांमधील नवोपक्रमाचे महत्त्व आणि नवोपक्रम परिपक्वतेचे मूल्यांकन करण्यासाठी तंत्रज्ञान तयारी पातळीची प्रासंगिकता यावर चर्चा केली. स्टार्टअप इंडिया, एमएसएमई नवोपक्रम कार्यक्रम आणि डीपीआयआयटी निधी संधींअंतर्गत योजनांवर माहिती दिली. तसेच स्टार्टअप्स आणि उद्योजकता या विषयावर, सत्रांनी कल्पनांना व्यवहार्य स्टार्टअपमध्ये रूपांतरित करण्यासाठी एक रोडमॅप प्रदान केला. डॉ. कुमावत यांनी सहभागींना लीन स्टार्टअप पद्धती, एमव्हीपी (मिनिमम व्हिएबल प्रॉडक्ट) डेव्हलपमेंटची ओळख करून दिली. अभियांत्रिकी स्टार्टअप्ससाठी विशिष्ट आव्हानांवर चर्चा केली. त्यांनी व्यवसाय मालमत्ता म्हणून बौद्धिक मालमत्तेचे मूल्य अधोरेखित केले आणि व्यवसाय विकासात त्याचा धोरणात्मक वापर यावर चर्चा केली. या सत्रांमध्ये आयडिया हॅकेथॉन आणि इनोव्हेशन स्पर्धांच्या वाढत्या ट्रेंडचा देखील शोध घेण्यात आला. प्रत्येक सत्राचा समारोप जलद प्रश्नोत्तरांनी झाला. याबद्दल महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सर्व शिक्षक यांनी समाधान व्यक्त केले.

> डॉ. कुमावत यांनी हॅकेथॉनमध्ये काय समाविष्ट आहे आणि प्रभावीपणे कसे सहभागी व्हावे हे स्पष्ट केले. त्यांनी हॅकेथॉनचे टप्पे - कल्पना, प्रोटोटाइपिंग आणि पिचिंग - आणि सहकार्य आणि टीम-बिल्डिंगसाठी सामायिक धोरणे स्पष्ट केली. यशस्वी स्टार्टअप्समध्ये विकसित झालेल्या हॅकेथॉन प्रकल्पांच्या वास्तविक-जगातील केस स्टडीजने प्रेरणा आणि व्यावहारिक शिक्षण दिले. त्यांनी उद्योग भागीदारांसह सहयोगी संशोधनाला प्रोत्साहन दिले आणि सुरुवातीच्या टप्प्यातील नवोपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी तंत्रज्ञान इनक्यूबेटर आणि प्रवेगकांची भूमिका अधोरेखित केली.

लोकमत

मस्ट READ

# बदलत्या तंत्रज्ञानाचे विद्यार्थ्यांना दिले धडे

## शिरपूर अभियांत्रिकीत फुल स्टॅक सॉफ्टवेअर प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर** : शहरातील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटी, पुणे आणि कॅपजेमिनी यांच्या संयुक्त विद्यमाने फुल स्टॅक सॉफ्टवेअर डेव्हलपर सर्टिफिकेशन हा प्रशिक्षण-कार्यक्रम नुकताच पार पडला. यात अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना संगणकातील बदलत्या तंत्रज्ञानावर प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी वाढविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**४६** विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला होता.

नियमित अभ्यासक्रमासोबतच आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी विविध प्रशिक्षण-कार्यक्रम आयोजित करत असते. यातून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात रोजगार संधी उपलब्ध करण्यास मदत होते. त्या अनुषंगाने पुणे येथील सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटीतर्फे फुल स्टॅक सॉफ्टवेअर डेव्हलपर सर्टिफिकेशन कार्यक्रम पटेल अभियांत्रिकीत आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षणासाठी विद्यापीठाने आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीची निवड केली होती.

## संगणकातील तंत्रज्ञानावर दिले प्रशिक्षण...

या प्रशिक्षणात बेसिक्स ऑफ जावा, जावा : ऑब्जेक्ट ओरिएनटेड लँग्वेज, अॅडव्हान्स्ड जावा कन्सेप्ट्स, ऑब्जेक्ट ओरिएनटेड डिझाईन, फ्रन्टएंड डेव्हलपमेंट आणि जावा प्रोजेक्ट सबमिशन या विषयांवर भर देण्यात आला. याद्वारे अभियांत्रिकी पदवीधारकांना अत्याधुनिक उत्पादक कौशल्यातील प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. प्रशिक्षणात सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सिम्बायोसिस विद्यापीठाकडून प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. प्रशिक्षण कार्यक्रमात सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटीतर्फे भरनी धरन हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. मिल्केश जैन, प्रा. कृणाल राणे, प्रा. मयूर पाटील, प्रा. विनीत पटेल, प्रा. कैलास देवरे यांनी परिश्रम घेतले. दरम्यान, या प्रशिक्षणासाठी विद्यापीठाने विद्यार्थ्यांकडून कुठल्याही प्रकारचे मूल्य आकारले नव्हते. या विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे तज्ज्ञांकडून निराकरण करण्यात आले. या प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर प्रणालीतील बदलाबाबत माहिती मिळाली.

Hello Dhule
Page No. 4 Jun 16, 2025
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

देशदूत
पांझराकान खोरे....

सोमवार, दि. २ जून २०२५ ७

## अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी

### पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात सीएसआर सर्वेक्षणात महाराष्ट्रात द्वितीय

**शिरपूर । प्रतिनिधी**

येथील स्वायत्त दर्जा प्राप्त असलेल्या आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाने अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रात आपली उत्कृष्ट कामगिरी पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या सीएसआर अभियांत्रिकी महाविद्यालये सर्वेक्षण २०२५ मध्ये महाविद्यालयाने टॉप इमर्जिंग इंजिनिअरिंग कॉलेजेस ऑफ सुपर एक्सलन्स श्रेणीत १६ वा क्रमांक पटकावला आहे, तर महाराष्ट्रामध्ये द्वितीय क्रमांक मिळवून आपले अग्रगण्य स्थान भक्कम केले आहे.



महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, शैक्षणिक क्षेत्रातील या सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीमुळे सीएसआर अभियांत्रिकी महाविद्यालये सर्वेक्षण २०२५ च्या रँकिंगमध्येही महाविद्यालयाने महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्थांमध्ये द्वितीय क्रमांक पटकावून आपले स्थान अबाधित राखले आहे.

सीएसआर अभियांत्रिकी महाविद्यालये सर्वेक्षण हे देशभरातील अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या कामगिरीचे सर्वंकष मूल्यांकन करते. यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता (प्राध्यापक, शिक्षण पद्धती, अभ्यासक्रम), संशोधन आणि विकास (प्रकाशने, पेटंट, प्रकल्प), पायाभूत सुविधा (प्रयोगशाळा, ग्रंथालय, वर्गखोल्या), प्लेसमेंट्स आणि करिअर संधी (प्लेसमेंट रेकॉर्ड, उद्योग संबंध), विद्यार्थी विकास आणि जीवन (सामाजिक-सांस्कृतिक उपक्रम, सपोर्ट सिस्टम) तसेच सामाजिक जबाबदारी (समुदाय सेवा, पर्यावरणीय जागरूकता) या प्रमुख निकषांचा समावेश असतो.

आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने या सर्व निकषांवर उत्तम गुण प्राप्त करत महाराष्ट्रातील अग्रगण्य अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये द्वितीय स्थान पटकावले आहे. याचबरोबर राष्ट्रीय स्तरावर मसर्वात उत्कृष्ट उदयोन्मुख अभियांत्रिकी महाविद्यालयांच्याफ श्रेणीमध्ये महाविद्यालयाने १६ वे स्थान मिळविले आहे. महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांच्या मते, सदर यश हे महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, समर्पित शिक्षण पद्धती आणि उत्कृष्ट व्यवस्थापनाचे फलित आहे.

महाविद्यालयाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आनंद व्यक्त केला.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

**पुण्यनगरी** 31/05/2025

# आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय 'सीएसआर' सर्वेक्षणात राज्यात द्वितीय

## राष्ट्रीय स्तरावरील 'सुपर एक्सलन्स' श्रेणीतही १६ वे स्थान

शिरपूर : येथील स्वायत्त दर्जा प्राप्त असलेल्या आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाने अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रात आपली उत्कृष्ट कामगिरी पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या सीएसआर अभियांत्रिकी महाविद्यालये सर्वेक्षण २०२५ मध्ये महाविद्यालयाने 'टॉप इमर्जिंग इंजिनिअरिंग कॉलेजेस ऑफ सुपर एक्सलन्स' श्रेणीत १६ वा क्रमांक पटकावला आहे, तर महाराष्ट्रामध्ये द्वितीय क्रमांक मिळवून आपले अग्रगण्य स्थान भक्कम केले आहे.

महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, शैक्षणिक क्षेत्रातील या सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीमुळे सीएसआर अभियांत्रिकी महाविद्यालये सर्वेक्षण २०२५ च्या रँकिंगमध्येही महाविद्यालयाने महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्थांमध्ये द्वितीय क्रमांक पटकावून आपले स्थान अबाधित राखले आहे.

सीएसआर अभियांत्रिकी महाविद्यालये सर्वेक्षण हे देशभरातील अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या कामगिरीचे सर्वंकष मूल्यांकन करते. यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता (प्राध्यापक, शिक्षण पद्धती, अभ्यासक्रम), संशोधन आणि विकास (प्रकाशने, पेटंट, प्रकल्प), पायाभूत सुविधा (प्रयोगशाळा, ग्रंथालय, वर्गखोल्या), प्लेसमेंट्स आणि करिअर संधी (प्लेसमेंट रेकॉर्ड, उद्योग संबंध), विद्यार्थी विकास आणि जीवन (सामाजिक-सांस्कृतिक उपक्रम, सपोर्ट सिस्टम) तसेच सामाजिक जबाबदारी (समुदाय सेवा, पर्यावरणीय जागरूकता) या प्रमुख निकषांचा समावेश असतो.

आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने या सर्व निकषांवर उत्तम गुण प्राप्त करत राज्यात अग्रगण्य अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये द्वितीय स्थान पटकावले आहे. राष्ट्रीय स्तरावर सर्वात उत्कृष्ट उदयोन्मुख अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या श्रेणीमध्ये



महाविद्यालयाने १६ वे स्थान मिळविले आहे. महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांच्या मते, सदर यश हे महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, समर्पित शिक्षण पद्धती आणि उत्कृष्ट व्यवस्थापनाचे फलित आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ. अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त केला.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

शिल्पकार विकासाचा...
देशदूत 30/05/2025

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या यशोदीप मोरेची निवड

**शिरपूर । प्रतिनिधी**

स्वायत्तता दर्जा प्राप्त आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागातील तृतीय वर्षाचा विद्यार्थी यशोदिप मोरे याची कोड फॉर गव्हटेक आणि आपना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डेडिकेटेड मेंटरिंग प्रोग्राम २०२५ या इंटर्नशिप करिता एक लाख रुपयांच्या स्टायपेंडवर निवड झाली आहे. यशोदीपची निवड ४ हजार २०० हून अधिक अर्जदारांमधून करण्यात आली आहे.



इंटर्नशिप ही ऑनलाइन पद्धतीने राबवली जाणार असून त्यामध्ये शासनासाठी तांत्रिक उपाययोजना, ओपन-सोर्स सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, आणि डिजिटल इनोव्हेशन वर काम करण्याची संधी मिळणार आहे. इंटर्नशिप कालावधी महिन्याचा असणार आहे. या कालावधीत यशोदिप मोरे याला एक लाख इतके स्टायपेंड दिले जाणार आहे. या दरम्यान यशोदिपला अनुभवी तंत्रज्ञांसोबत थेट काम करण्याची संधी, देशपातळीवरील नेटवर्किंग, आणि करिअरमध्ये वेगाने प्रगती करण्याची दिशा मिळणार आहे.

महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. शैलजा पाटील, प्राध्यापक, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल यांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्याला या कार्यक्रमासाठी आवश्यक असलेले तांत्रिक ज्ञान, मार्गदर्शन, ओपन-सोर्स प्रकल्पांचा अनुभव आणि उद्योगजगतातील संधी गवसल्या.

या स्तुत्य निवडीबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजी मंत्री आ. अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे आदींनी कौतूक केले आहे.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

देशदूत 29/05/2025

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे एनपीटीईएल परीक्षेत सिल्व्हर व एलिट ग्रेडसह घवघवीत यश



■ शिरपूर । प्रतिनिधी

एज्युकेशन सोसायटी संचलित, आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नॅशनल प्रोग्राम ऑन टेक्नॉलॉजी एन्हान्स लर्निंग (एनपीटीईएल) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

ही परीक्षा भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी आयोजित करण्यात आली होती. आयआयटी आणि आयआयएससीतर्फे संचालित उच्च तंत्र शिक्षणातील विषयांवरील अभ्यासक्रम पूर्ण करून तब्बल २२७ विद्यार्थ्यांनी यात यश संपादन केल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी.पाटील यांनी दिली.

एनपीटीईएल ही स्वयमम प्लॅटफॉर्मचा एक भाग आहे, जी मॅसिव्ह ओपन ऑनलाइन कोर्सेस शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देते. आयआयटी आणि आयआयएससी बंगळुरू सारख्या संस्थांमधील उच्च शैक्षणिक गुणवत्ता असलेल्या प्राध्यापकांद्वारे त्यासाठी अभ्यासक्रम तसेच शैक्षणिक संसाधने तयार केले जातात.अभियांत्रिकी व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील अद्ययावत आणि नवनवीन संकल्पनांवर आधारित हे अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थी दिलेल्या कालमर्यादेतच पूर्ण करून यावरील अति उच्च काठीण्य पातळी असलेल्या परीक्षांना सामोरे जातात. यामुळे पारंपारिक मार्गाव्यातिरिक्त ज्ञान प्राप्त करण्याची सवय लागते आणि त्याचबरोबर सदर एनपीटीईएल च्या प्रमाणित उमेदवारांना मुलाखत देतेवेळी निवडकर्त्यांवर विशेष प्रभाव देखील मिळवता येतो.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी क्लाऊड कॉम्पुटिंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग, इंट्रोड्क्शन टु इंटरनेट ऑफ थिंग्ज, ऑप्टिकल वायरलेस कम्युनिकेशन्स बीयोंड ५ जी अँड आय. ओ. टि., इंट्रोड्क्शन टु इलेक्ट्रिक अँड हायब्रीड इलेक्ट्रिक वेहिकल्स, पॉवर क्वालिटी, मेन्टेनन्स अँड रिपेअर ऑफ कॉंक्रेट स्ट्रॅंक्टचर, एन्विरॉन्मेंटल रेमेडिएशन ऑफ कॉंटॅमिनटेड साईट्स, प्रिंसिपल्स ऑफ इंडस्ट्रियल इंजिनीरिंग, ऑप्टिमिझशन फ्रॉम फंडामेंटल्स, अडवान्सड कॉम्प्युटर नेटवर्क्स, सोशल नेटवर्क्स, रिइन्फोर्समेंट लर्निंग या विषयांमध्ये अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करून परीक्षेस सामोरे गेले होते. नुकताच जाहीर झालेल्या निकालात महाविद्यालयातील एकूण २२७ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश संपादन केले आहे. त्यापैकी १४ विद्यार्थ्यांनी त्यात सिलव्हर ग्रेड तर ८३ विद्यार्थ्यांना एलिट ग्रेड प्राप्त केला आहे. त्याचबरोबर १३० विद्यार्थ्यांनी एनपीटीईएलच्या वरील विषयांवर अभ्यासक्रम मर्यादित काळातच यशवीरित्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र संपादित केले आहे.

महाविद्यालयाच्या संगणक अभियांत्रिकी विभागाचे प्रा.डॉ. मोहम्मद अली मुझफ्फर अली सय्यद यांनी एनपीटीईएल समन्वयक म्हणून विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेले अभ्यासक्रमाबद्दलची माहिती, परीक्षेची नोंदणी बद्दल वेळोवेळी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजीमंत्री आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### हे विद्यार्थ्यांच्या क्षमतेचे विशेष प्रदर्शन



आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी आधुनिक शिक्षण पद्धतीचा अवलंब करावा यासाठी नवनवीन प्रयोग हाती घेत आहे. कोरोना महामारी नंतर दूरस्थ पद्धतीने शिक्षण उपलब्ध करून देणे ही त्या वेळेची एक गरज बनली होती. परंतु यामुळे पारंपारिक शिक्षण पद्धती सोबतच दूरस्थ मार्गाने जगभरातील शैक्षणिक अभ्यासक्रम आणि संसाधने विद्यार्थ्यांसाठी सहज उपलब्ध झाली आहेत. आम्ही विद्यार्थ्यांना महाविद्यालयापुरतेच मर्यादित न ठेवता आयआयटी आणि आयआयएससी सारख्या नामांकित शिक्षण संस्थातर्फे चालवले जात असलेले एनपीटीईएल वरील अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित करीत आहोत. महाविद्यालयाच्या नियमित अभ्यासक्रमासोबतच एनपीटीईएल वरील अभ्यासक्रम देखील सिल्वर आणि एलिट ग्रेड प्राप्त करीत पूर्ण करणे हे आमच्या विद्यार्थ्यांच्या क्षमतेचे विशेष प्रदर्शन म्हणता येईल.

**-डॉ. जे. बी. पाटील (संचालक)**

पुण्यनगरी 29/05/2025

# आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांची सॉफ्टवेअर डेव्हलपर पदावर निवड

**शिरपूर** : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी आणि टी.एस.एस. कन्सल्टन्सी कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच पार पडलेल्या कॅम्पस प्लेसमेंटमद्वारे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची कंपनीत सॉफ्टवेअर डेव्हलपर या पदावर निवड झाल्याची माहिती संचालक डॉ. जे.बी. पाटील यांनी दिली.

टीएसएस कन्सल्टन्सी वित्तीय उद्योगासाठी अद्ययावत तंत्रज्ञान संसाधने निर्माण करून देणारी कंपनी आहे. महाविद्यालयातील प्लेसमेंट विभागामार्फत दरवर्षी नामांकित कंपन्यांना बोलावून थेट मुलाखतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात, तसेच सद्यःस्थितीतील उपलब्ध नोकरीच्या संधींबाबत मार्गदर्शन केले जाते. नुकताच पार पडलेल्या या कॅम्पस प्लेसमेंटमध्ये पदवी अभ्यासक्रमातील



अंतिम वर्षाचे विद्यार्थी पात्र होते. तीन स्तरावर झालेल्या या निवड प्रक्रियेत सुरवातीला बुद्धिमत्ता चाचणी, तांत्रिक मुलाखत व शेवटी एच.आर.राउंड झाला. त्यात आर.सी. पटेल अभियांत्रिकीच्या ४ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. कॅम्पस मुलाखतीत यश प्राप्त करण्यासाठी ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभागाने घेतलेले विविध प्रशिक्षण कार्यक्रम, विद्यार्थ्यांना मुलाखतीचे तंत्र अवगत करण्यासाठी दिलेले प्रशिक्षण, गट चर्चा, ॲप्टिट्यूड टेस्ट, मॉक इंटरव्ह्यू, टेक्निकल आणि नॉलेज स्पर्धा यांचा मोठा फायदा झाला. या सर्व प्रयत्नांचा परिपाक म्हणून पृथ्वीराज विक्रम चौधरी, मितेश सूर्यकांत पाटील, जयेश पोपटराव सोनवणे, तुषार गंगाधर देवरे या ४ विद्यार्थ्यांची सॉफ्टवेअर डेव्हलपर या पदावर निवड झाली. कॅम्पस प्लेसमेंटच्या यशस्वितेसाठी ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट ऑफिसर मिल्केश जैन, प्रा. के.पी. राणे, प्रा.एम. जे. पाटील यांनी प्रयत्न केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतूक केले.

R. C. PATEL
INSTITUTE OF TECHNOLOGY
An Autonomous Institute

**01 June 2024 to 25 March 2026**

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

शिल्पकार विकासाचा...

**देशदूत**

धुळे आवृत्ती

epaper.deshdoot.com
28 May 2025 - 7

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे एनपीटीईएल परीक्षेत सिल्व्हर व एलिट ग्रेडसह घवघवीत यश



■ **शिरपूर । प्रतिनिधी**

एज्युकेशन सोसायटी संचलित, आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नॅशनल प्रोग्राम ऑन टेक्नॉलॉजी एन्हान्स लर्निंग (एनपीटीईएल) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

ही परीक्षा भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी आयोजित करण्यात आली होती. आयआयटी आणि आयआयएससीतर्फे संचालित उच्च तंत्र शिक्षणातील विषयांवरील अभ्यासक्रम पूर्ण करून तब्बल २२७ विद्यार्थ्यांनी यात यश संपादन केल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी.पाटील यांनी दिली.

एनपीटीईएल ही स्वयमम प्लॅटफॉर्मचा एक भाग आहे, जी मॅसिव्ह ओपन ऑनलाइन कोर्सेस शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देते. आयआयटी आणि आयआयएससी बंगळुरू सारख्या संस्थांमधील उच्च शैक्षणिक गुणवत्ता असलेल्या प्राध्यापकांद्वारे त्यासाठी अभ्यासक्रम तसेच शैक्षणिक संसाधने तयार केले जातात.अभियांत्रिकी व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील अद्ययावत आणि नवनवीन संकल्पनांवर आधारित हे अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थी दिलेल्या कालमर्यादेतच पूर्ण करून यावरील अति उच्च काठीण्य पातळी असलेल्या परीक्षांना सामोरे जातात. यामुळे पारंपारिक मार्गाव्यातिरिक्त ज्ञान प्राप्त करण्याची सवय लागते आणि त्याचबरोबर सदर एनपीटीईएल च्या प्रमाणित उमेदवारांना मुलाखत देतेवेळी निवडकर्त्यांवर विशेष प्रभाव देखील मिळवता येतो.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी क्लाऊड कॉम्पुटिंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग, इंट्रोड्क्शन टु इंटरनेट ऑफ थिंग्ज, ऑप्टिकल वायरलेस कम्युनिकेशन्स बीयोंड ५ जी अँड आय. ओ. टि., इंट्रोड्क्शन टु इलेक्ट्रिक अँड हायब्रीड इलेक्ट्रिक वेहिकल्स, पॉवर क्वालिटी, मेन्टेनन्स अँड रिपेअर ऑफ कॉंक्रिट स्ट्रॅक्टचर, एन्विरॉन्मेंटल रेमेडिएशन ऑफ कॉंटॅमिनटेड साईट्स, प्रिंसिपल्स ऑफ इंडस्ट्रियल इंजिनीरिंग, ऑप्टिमिझशन फ्रॉम फंडामेंटल्स, अडवान्सड कॉम्प्युटर नेटवर्क्स, सोशल नेटवर्क्स, रिइन्फोर्समेंट लर्निंग या विषयांमध्ये अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करून परीक्षेस सामोरे गेले होते. नुकताच जाहीर झालेल्या निकालात महाविद्यालयातील एकूण २२७ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश संपादन केले आहे. त्यापैकी १४ विद्यार्थ्यांनी त्यात सिलव्हर ग्रेड तर ८३ विद्यार्थ्यांना एलिट ग्रेड प्राप्त केला आहे. त्याचबरोबर १३० विद्यार्थ्यांनी एनपीटीईएलच्या वरील विषयांवर अभ्यासक्रम मर्यादित काळातच यशवीरित्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र संपादित केले आहे.

महाविद्यालयाच्या संगणक अभियांत्रिकी विभागाचे प्रा.डॉ. मोहम्मद अली मुझफ्फर अली सय्यद यांनी एनपीटीईएल समन्वयक म्हणून विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेले अभ्यासक्रमाबद्दलची माहिती, परीक्षेची नोंदणी बद्दल वेळोवेळी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजीमंत्री आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### हे विद्यार्थ्यांच्या क्षमतेचे विशेष प्रदर्शन



आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी आधुनिक शिक्षण पद्धतीचा अवलंब करावा यासाठी नवनवीन प्रयोग हाती घेत आहे. कोरोना महामारी नंतर दूरस्थ पद्धतीने शिक्षण उपलब्ध करून देणे ही त्या वेळेची एक गरज बनली होती. परंतु यामुळे पारंपारिक शिक्षण पद्धती सोबतच दूरस्थ मार्गाने जगभरातील शैक्षणिक अभ्यासक्रम आणि संसाधने विद्यार्थ्यांसाठी सहज उपलब्ध झाली आहेत. आम्ही विद्यार्थ्यांना महाविद्यालयापुरतेच मर्यादित न ठेवता आयआयटी आणि आयआयएससी सारख्या नामांकित शिक्षण संस्थातर्फे चालवले जात असलेले एनपीटीईएल वरील अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित करीत आहोत. महाविद्यालयाच्या नियमित अभ्यासक्रमासोबतच एनपीटीईएल वरील अभ्यासक्रम देखील सिल्वर आणि एलिट ग्रेड प्राप्त करीत पूर्ण करणे हे आमच्या विद्यार्थ्यांच्या क्षमतेचे विशेष प्रदर्शन म्हणता येईल.

**-डॉ. जे. बी. पाटील (संचालक)**

पुण्यनगरी 27/05/2025

# आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे एनपीटीईएल परीक्षेत यश



**शिरपूर :** शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नॅशनल प्रोग्राम ऑन टेक्नॉलॉजी एन्हान्स लर्निंग (एनपीटीईएल) परीक्षेत यश संपादन केले आहे. ही परीक्षा भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी आयोजित करण्यात आली होती. आयआयटी आणि आयआयएससीतर्फे संचालित उच्च तंत्र शिक्षणातील विषयांवरील अभ्यासक्रम पूर्ण करून तब्बल २२७ विद्यार्थ्यांनी यात यश संपादन केल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी क्लाऊड कॉम्पुटिंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग, इंट्रोड्कशन टु इंटरनेट ऑफ थिंग्ज, ऑप्टिकल वायरलेस कम्युनिकेशन्स बीयोंड ५ जी ॲण्ड आय. ओ. टि., इंट्रोड्कशन टु इलेक्ट्रिक ॲण्ड हायब्रीड इलेक्ट्रिक वेहिकल्स, पॉवर क्वलिटी, मेन्टेनन्स ॲण्ड रिपेअर ऑफ कॉंक्रेट स्ट्रँक्टचर, एन्विरॉन्मेंटल रेमेडिएशन ऑफ कॉंटॅमिनटेड साईट्स, प्रिंसिपल्स ऑफ इंडस्ट्रियल इंजिनीरिंग, ऑप्टिमिझशन फ्रॉम फंडामेंटल्स, अडवान्सड कॉम्प्युटर नेटवर्क्स, सोशल नेटवर्क्स, रिइन्फोर्समेंट लर्निंग या विषयांमध्ये अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करून परीक्षेस सामोरे गेले होते. नुकताच जाहीर झालेल्या निकालात महाविद्यालयातील एकूण २२७ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश संपादन केले आहे. त्यापैकी १४ विद्यार्थ्यांनी त्यात 'सिलव्हर' ग्रेड तर ८३ विद्यार्थ्यांना 'एलिट' ग्रेड प्राप्त केला आहे. त्याचबरोबर १३० विद्यार्थ्यांनी एनपीटीईएलच्या वरील विषयांवर अभ्यासक्रम मर्यादित काळातच यशवीरित्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र संपादित केले आहे. महाविद्यालयाच्या संगणक अभियांत्रिकी विभागाचे प्रा. डॉ. मोहम्मदअली मुझफ्फरअली सय्यद यांनी एनपीटीईएल समन्वयक म्हणून विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेले अभ्यासक्रमाबद्दलची माहिती, परीक्षेची नोंदणी बद्दल वेळोवेळी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक, विभाग प्रमुख, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतूक केले.



आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी आधुनिक शिक्षण पद्धतीचा अवलंब करावा यासाठी नवनवीन प्रयोग हाती घेत आहे. पारंपारिक शिक्षण पद्धती सोबतच दूरस्थ मार्गाने जगभरातील शैक्षणिक अभ्यासक्रम आणि संसाधने विद्यार्थ्यांसाठी सहज उपलब्ध झाली आहेत. आम्ही विद्यार्थ्यांना महाविद्यालयापुरतेच मर्यादित न ठेवता आयआयटी आणि आयआयएससी सारख्या शिक्षण संस्थातर्फे चालवले जात असलेले एनपीटीईएलवरील अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित करीत आहोत. जेणे करून विद्यार्थ्यांचा तंत्रशिक्षणातील अध्ययनाचा अनुभव हा व्यापक ठरेल. महाविद्यालयाच्या नियमित अभ्यासक्रमासोबतच एनपीटीईएल वरील अभ्यासक्रम देखील 'सिल्वर' आणि 'एलिट' ग्रेड प्राप्त करीत पूर्ण करणे हे आमच्या विद्यार्थ्यांच्या क्षमतेचे विशेष प्रदर्शन म्हणता येईल.

-डॉ. जे.बी. पाटील (संचालक)

लोकमत 27/05/2025



## पटेल महाविद्यालय वर्ल्ड सर्वेक्षणात १८ वे

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर** : येथील आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाने एज्युकेशन वर्ल्ड सर्वेक्षण २०२५ च्या सर्वेक्षणातील रँकिंगमध्ये महाराष्ट्रातील अग्रगण्य कॉलेजेसमध्ये १८ वे स्थान प्राप्त केल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

एज्युकेशन वर्ल्ड रँकिंग हे एक प्रतिष्ठित सर्वेक्षण आहे जे भारतातील शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, महविद्यालये, शाळा यांचे सर्वेक्षण करून त्या आधारे गुणांकन तयार करून सार्वजनिक पद्धतीने प्रसिद्ध केले जाते. या सर्वेक्षणात लीडरशिप अँड गव्हर्नन्स क्वालिटी, फॅकल्टी क्वालिफायर अँड डिव्हलपमेंट, कॅम्पसेस ऑफ फॅकल्टी, करिकुलम अँड पेडगोगी, इंडस्ट्री इंटरफेस, रिसर्च अँड इनोव्हेशन, इन्फ्रा अँड फॅसिलिटीज, प्लेसमेंट व व्हॅल्यू फॉर मनी आदी निकषांच्या आधारे सहभागी शैक्षणिक संस्था आवश्यक माहिती सादर करावी लागते. अंतिम क्रमवारी निश्चित केली जाते.

या सर्व निकषांवर आर. सी. पटेल अभियांत्रिकीने उत्तम गुण प्राप्त करत महाराष्ट्रातील अग्रगण्य अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये १८ वे स्थान प्राप्त केले आहे.

या कामगिरीबद्दल माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, रेशा पटेल, अतुल भंडारी, डॉ. जे. बी. पाटील, डॉ. पी. जे. देवरे आदींनी आनंद व्यक्त केला.

Hello Dhule
Page No. 1 May 27, 2025
Powered by: erelego.com

दैनिक दिव्य मराठी
A Marathi Daily from Dainik Bhaskar Group

26/05/2025

# पटेल महाविद्यालयामधील तिघांची अभियंता म्हणून निवड, 3 लाख ८० हजार वार्षिक वेतन

प्रतिनिधी | शिरपूर

शिरपूर येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामार्फत झायडस कंपनीतर्फे कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले. या प्रक्रियेतून महाविद्यालयातील अंतिम वर्षातील तीन विद्यार्थ्यांची प्रॉडक्ट इंजिनिअर या पदावर वार्षिक ३ लाख ८० हजार रुपये वेतनश्रेणीवर निवड केल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

कॅम्पस प्लेसमेंटमध्ये महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमातील अंतिम वर्षाच्या ज्या विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी ६० टक्के गुण आहे ते विद्यार्थी सहभागी झाले होते. तीनस्तरावर झालेल्या निवड प्रक्रियेत सुरुवातीला बुद्धिमत्ता चाचणी, तांत्रिक मुलाखत व शेवटी एच.आर. राउंड झाला. त्यानंतर अंतिम वर्षात शिकत असलेल्या दीप अविनाश पाटील, शुभम भय्यासाहेब पाटील, यशोधन रमेश पाटील यांची प्रॉडक्ट इंजिनिअर या निवड झाली. कॅम्पस प्लेसमेंटच्या यशस्वितेसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर मिल्केश जैन, प्रा. व्ही. व्ही. पटेल, डॉ. पी. एस. पाटील, प्रा. के. पी. राणे यांनी प्रयत्न केले. हा उपक्रम संस्थेचे अध्यक्ष, आमदार अमरीश पटेल, कार्याध्यक्ष भूपेश पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची यापूर्वीही कॅम्पस प्लेसमेंटद्वारे विविध कंपनीत निवड करण्यात आली आहे.

पुण्य नगरी 26/05/2025

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या तीन विद्यार्थ्यांची निवड

**शिरपूर :** स्वायत्त दर्जा प्राप्त आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांची रिहल सॉफ्टवेअर टेक्नोलॉजी सोल्युशन कंपनीत सिस्टीम इंजिनिअर या पदावर कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

पुणे स्थित रिहल सॉफ्टवेअर टेक्नोलॉजी सोल्युशन कंपनी ऑफशोर डेव्हलपमेंटच्या संकल्पनेवर आवश्यक असलेले सोफ्टवेअर निर्माण करून उपलब्ध करून देते. आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्लेसमेंट विभागामार्फत गेल्या वर्षी देखील या कंपनीस येथील विद्यार्थ्यांच्या कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड प्रक्रियेसाठी आमंत्रित करण्यात आले होते. पटेल अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांमधील तांत्रिक कौशल्य, रोजगार कौशल्य, सॉफ्ट स्किल्स, नामांकित विद्यापिठे, अकॅडमीचे आणि ट्रेनिंग प्लॅटफॉर्म्सचे सर्टीफिकेशन,



विद्यार्थीदशेतच पूर्ण केलेले अंतरवासिता या सर्वांच्या जोरावर सदर कंपनीतर्फे पटेल अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना पुन्हा या वर्षी देखील निवड प्रक्रियेसाठी प्राधान्य देण्यात आले. नुकत्याच पार पडलेल्या या कॅम्पस प्लेसमेंटमध्ये पदवी अभ्यासक्रमातील अंतिम वर्षाचे विद्यार्थी या प्लेसमेंटसाठी पात्र होते. तीन स्तरावर झालेल्या या निवड प्रक्रियेत सुरवातीला बुद्धिमत्ता चाचणी, तांत्रिक मुलाखत व शेवटी एच.आर. राउंड झाला. त्यात आर. सी. पटेल अभियांत्रिकीच्या ३ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. कॅम्पस मुलाखतीत यश प्राप्त करण्यासाठी ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभागाने घेतलेले विविध प्रशिक्षण कार्यक्रम, विद्यार्थ्यांना मुलाखतीचे तंत्र अवगत करण्यासाठी दिलेले प्रशिक्षण, गट चर्चा, ॲप्टिट्यूड टेस्ट, मॉक इंटरव्ह्यू, टेक्निकल आणि नॉलेज स्पर्धा यांचा मोठा फायदा झाला. यात अंतिम वर्षातील मराठे सायली सुनिल, पाटील लोकेश प्रभाकर, माळी सुजित सुभाष या ३ विद्यार्थ्यांची सिस्टीम इंजिनिअर या पदावर निवड झाली. प्लेसमेंटच्या यशस्वीतेसाठी ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट ऑफिसर मिल्केश जैन, प्रा. के.पी. राणे, प्रा. एम. जे. पाटील यांनी प्रयत्न केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतूक केले.

Dhule Edition
May 26, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्य नगरी 25/05/2025

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाला राज्यात १८ वे आणि देशात ९२ वे स्थान

**शिरपूर** : शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करत आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने आपली गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. प्रतिष्ठित एज्युकेशन वर्ल्ड सर्वेक्षण २०२५ मध्ये या महाविद्यालयाने महाराष्ट्रातील आघाडीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये १८ वे तर राष्ट्रीय स्तरावर ९२ वे स्थान मिळवले आहे. ही माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.



एज्युकेशन वर्ल्ड रँकिंग हे भारतातील शैक्षणिक संस्थांचे विविध निकषांवर आधारित सर्वेक्षण आहे. यामध्ये लीडरशिप व प्रशासन गुणवत्ता, प्राध्यापकांचे पात्रता व प्रशिक्षण, अभ्यासक्रम व अध्यापन पद्धती, उद्योगजगतातील सहभाग, संशोधन व नवोपक्रम, पायाभूत सुविधा, प्लेसमेंट आणि व्हॅल्यू फॉर मनी यांसारख्या महत्त्वपूर्ण निकषांचा समावेश असतो. सहभागी संस्थांकडून सादर करण्यात आलेल्या माहितीचे तज्ज्ञांमार्फत काटेकोर परीक्षण करून अंतिम रँकिंग निश्चित केली जाते.

या सर्व निकषांवर आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करत महाराष्ट्रात १८ वे स्थान मिळवले आहे. विशेष म्हणजे, देशभरातून सहभागी झालेल्या १९९ अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये हे महाविद्यालय ९२ व्या स्थानावर आहे, जे त्याच्या शैक्षणिक गुणवत्ता आणि राष्ट्रीय ओळखीचे प्रतिक आहे. या यशानंतर शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री .अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे तसेच परीक्षा नियंत्रक, विभागप्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी समाधान व्यक्त केले.

Dhule Edition
May 25, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

दिव्य मराठी

धुळे सिटी 25-05-2025

# रँकिंगमध्ये पटेल महाविद्यालय राज्यात १८ वे

**प्रतिनिधी | शिरपूर**

येथील आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरीच्या जोरावर एज्युकेशन वर्ल्ड सर्वेक्षणात महाराष्ट्रात १८ वे स्थान प्राप्त केल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

एज्युकेशन वर्ल्ड रँकिंग हे एक प्रतिष्ठित सर्वेक्षण आहे. जे भारतातील शैक्षणिक संस्था, विद्यापीठ, महाविद्यालय, शाळांचे सर्वेक्षण करून त्या आधारे गुणांकन तयार करते. हे सर्वेक्षण लीडरशिप अँड गव्हर्नन्स क्वालिटी, फॅकल्टी क्वालिफायर अँड डेव्हलपमेंट, रिसर्च अँड इनोव्हेशन, इन्फ्रा अँड फॅसिलिटीज, प्लेसमेंट व व्हॅल्यू फॉर मनी आदी निकषांच्या आधारे होते. शैक्षणिक संस्थांनी सादर केलेल्या माहितीचे तज्ज्ञांकडून परीक्षण केले जाते. त्यानंतर अंतिम क्रमवारी निश्चित केली जाते. सर्व निकषांवर आर. सी. पटेल अभियांत्रिकीने उत्तम गुण प्राप्त करत महाराष्ट्रात १८ वे स्थान प्राप्त केले आहे. विशेष म्हणजे आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाने देशभरातून एज्युकेशन वर्ल्ड सर्वेक्षण २०२५च्या सर्वेक्षणातील रँकिंगमध्ये १९९ महाविद्यालयांमध्ये ९२ स्थान मिळवले. महाविद्यालयाच्या कामगिरीबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, आमदार अमरीश पटेल, कार्याध्यक्ष भूपेश पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतन पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

शिल्पकार विकासाचा...

देशदूत

धुळे आवृत्ती

epaper.deshdoot.com
25 May 2025 - Page 7

## एज्युकेशन वर्ल्ड रँकिंगमध्ये आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाला महाराष्ट्रात १८ वे स्थान

**■ शिरपूर । प्रतिनिधी**

स्वायत्तता दर्जा प्राप्त असलेल्या व उत्तर महाराष्ट्र परीक्षेत्रात अग्रगण्य अभियांत्रिकी महाविदयालय म्हणून नावलौकिक असणाऱ्या आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरीच्या जोरावर एज्युकेशन वर्ल्ड सर्वेक्षण २०२५ च्या सर्वेक्षणातील रँकिंगमध्ये महाराष्ट्रातील अग्रगण्य कॉलेजेस मध्ये स्थान कायम राखत १८ वे स्थान प्राप्त केल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.



एज्युकेशन वर्ल्ड रँकिंग हे एक प्रतिष्ठित सर्वेक्षण आहे जे भारतातील शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, महविद्यालये, शाळा यांचे सर्वेक्षण करून त्या आधारे गुणांकन तयार करून सार्वजनिक पद्धतीने प्रसिद्ध केले जाते. या सर्वेक्षणात लीडरशिप अँड गव्हर्नन्स क्वालिटी, फॅकल्टी क्वालिफायर अँड डिव्हलपमेंट, कॅम्पसेस ऑफ फॅकल्टी, करिकुलम अँड पेडगोगी, इंडस्ट्री इंटरफेस, रिसर्च अँड इनोव्हेशन, इन्फ्रा अँड फॅसिलिटीज, प्लेसमेंट व व्हॅल्यू फॉर मनी आदी निकषांच्या आधारे सहभागी शैक्षणिक संस्था आवश्यक माहिती सादर करावी लागते. शैक्षणिक संस्थांनी सादर केलेल्या माहितीचे तज्ज्ञांकडून कठोर परीक्षण केले जाते आणि त्यानंतर अंतिम क्रमवारी निश्चित केली जाते. या सर्व निकषांवर आर. सी. पटेल अभियांत्रिकीने उत्तम गुण प्राप्त करत महाराष्ट्रातील अग्रगण्य अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये १८ वे स्थान प्राप्त केले आहे.

विशेष म्हणजे आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाने देशभरातून एज्युकेशन वर्ल्ड सर्वेक्षण २०२५ च्या सर्वेक्षणातील रँकिंगमध्ये सहभागी झालेल्या १९९ महाविद्यालयांमध्ये ९२ स्थान मिळविल्यामुळे महाविद्यालयाची राष्ट्रीय स्तरावरची ख्याती अजून वाढली आहे.

महाविद्यालयाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आनंद व्यक्त केला.

सकाळ 24/05/2025

# आर. सी. पटेलच्या विद्यार्थ्यांना झायडस कंपनीत नियुक्ती

**सकाळ वृत्तसेवा**

शिरपूर, ता. २३ : येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांना झायडस प्रा. लि. या उद्योगात नियुक्ती देण्यात आली. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट विभागामार्फत झायडस प्रा. लि. कंपनीचा कॅम्पस उपक्रम नुकताच राबविण्यात आला.

महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रत्येकवर्षी ६० टक्के गुण असलेले अंतिम वर्षाचे विद्यार्थी कॅम्पस प्लेसमेंटसाठी पात्र होते. तीन स्तरावर झालेल्या या निवड प्रक्रियेत सुरवातीला बुद्धिमत्ता चाचणी, तांत्रिक मुलाखत व शेवटी एच. आर. राउंड झाला. त्यात अंतिम वर्षात शिकत असलेल्या दीप अविनाश पाटील, शुभम भय्यासाहेब पाटील, यशोधन रमेश पाटील या तीन विद्यार्थ्यांना प्रॉडक्ट इंजिनिअर पदावर नियुक्ती देण्यात आली.

ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ऑफिसर मिल्केश जैन, प्रा. व्ही. व्ही. पटेल, डॉ. पी. एस. पाटील, प्रा. के. पी. राणे यांनी संयोजन केले. नियुक्तीपात्र विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतन पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे आदींनी कौतुक केले.

पुण्य नगरी

23/05/2025


## आर.सी.पटेल अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांची निवड

**शिरपूर** : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट विभागामार्फत झायडस प्रा. लि. कंपनीला संपर्क साधत कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले होते. या प्रकियेस यशस्वीरीत्या सामोरे जात महाविद्यालयातील अंतिम वर्षातील तीन विद्यार्थ्यांची कंपनीत प्रॉडक्ट ईंजिनिअर पदावर निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.


झायडस कंपनी व पटेल अभियांत्रिकी, शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले होते. प्लेसमेंटमध्ये महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमातील प्रत्येक वर्षी ६० टक्के गुण मिळविलेले अंतिम वर्षाचे विद्यार्थी पात्र होते. तीन स्तरावर झालेल्या या निवड प्रक्रियेत सुरवातीला बुद्धिमत्ता चाचणी, तांत्रिक मुलाखत व शेवटी एच. आर. राउंड झाला. त्यात दीप अविनाश पाटील, शुभम भैय्यासाहेब पाटील,



यशोधन रमेश पाटील या तीन विद्यार्थ्यांची प्रॉडक्ट इंजिनिअर या पदावर निवड झाली. कॅम्पस प्लेसमेंटच्या यशस्वितेसाठी ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट ऑफिसर मिल्केश जैन, प्रा. व्ही.व्ही. पटेल, डॉ. पी.एस. पाटील, प्रा. के.पी. राणे यांनी प्रयत्न केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक, विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतूक केले.


Dhule Edition
May 23, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

**सकाळ 05/05/2025**



शिरपूर : प्रा. मनीषा पाटील यांचा सत्कार करताना संचालक डॉ. जे. बी. पाटील, डॉ. पी. जे. देवरे, डॉ. उज्वला पाटील आदी.

## प्रा. मनीषा पाटील यांना डॉक्टरेट प्रदान

**शिरपूर, ता. ४ :** येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील डेटा सायन्स विद्याशाखेच्या प्रा. डॉ. मनीषा शांताराम पाटील यांना उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे पीएच. डी. पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली. त्यांना धुळे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हितेंद्र पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. 'मल्टीमॉडेल ॲप्रोच फॉर ॲक्यूट पेन इंटेन्सिटी रेकग्निशन' हा त्यांच्या संशोधनाचा मुख्य विषय होता. डॉ. मनीषा पाटील यांनी विकसित केलेली स्वयंचलित प्रणाली, स्मृतिभ्रंश झालेले वृद्ध रुग्ण, शस्त्रक्रिया झालेले रुग्ण किंवा अशक्त व्यक्ती असे घटक जे स्वतःच्या वेदना सांगण्यास असमर्थ असतात, त्यांच्या वेदना शोधण्यासाठी आणि वेदनेचे मूल्यांकन करण्यासाठी उपयुक्त आहे. त्यांना डेटा सायन्स विद्याशाखेच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. उज्वला पाटील यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या यशाचे संस्थाध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, विश्वस्त जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतन पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे आदींनी कौतुक केले.

दै. सकाळ दि. 5/5/2025

पुण्य नगरी
28/04/2025

# प्रा. प्रवीण सरोदे यांना पीएचडी पदवी प्रदान



**शिरपूर :** शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील यांत्रिकी अभियांत्रिकी विद्याशाखेचे विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रविण लक्ष्मणराव सरोदे यांना यांत्रिकी अभियांत्रिकी विषयात पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांना धुळे येथील देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे यांत्रिकी विभागप्रमुख प्रा. डॉ. संजीव दामोदर सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले. डेव्हलपमेंट ऑफ वेहिकल चेसीस फ्रेम टू रिड्यूस द सेव्हेरीटी ऑफ फ्रंटल इम्पॅक्ट डूरिंग द कोलीजन या विषयावर त्यांनी शोधप्रबंध सादर केला. त्यांच्या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांनी कौतुक केले.

Nandurbar Edition
Apr 28, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

दैनिक पुण्यनगरी **27/04/2025**

| धुळे | रविवार, २७ एप्रिल २०२५ | ३

## जिल्हा

# आर.सी.पटेल अभियांत्रिकीला राष्ट्रीय पातळीवर ९ वे तर राज्यात ४ थे स्थान

'ग्लोबल ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट सेंटर' ची स्थापना १९९७ मध्ये झाली असून, ही संस्था व्यवसाय व्यवस्थापन आणि अभियांत्रिकी शिक्षण तसेच संशोधन क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देत आहे. या संस्थेच्या सर्वेक्षणातून मिळणारी माहिती आणि मानांकन हे शैक्षणिक संस्था, विद्यार्थी आणि नोकरी देणारे उद्योजक अशा सर्व भागधारकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. गुणवत्ता, विश्वासार्हता आणि पारदर्शकतेमध्ये सातत्य राखत, जी.एच.आर.डी.सी. सन २००९ पासून भारतातील अभियांत्रिकी महाविद्यालयांचे यशस्वीपणे सर्वेक्षण करत आहे.



महाविद्यालय संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, संस्थेच्या मजबूत शैक्षणिक कामगिरीमुळे हे उल्लेखनीय स्थान प्राप्त झाले आहे. जी.एच.आर.डी.सी. अभियांत्रिकी महाविद्यालये सर्वेक्षण भारतातील विद्यापीठे, महाविद्यालये आणि शाळांसह शैक्षणिक संस्थांचे सखोल मूल्यांकन करते, यामधून तपशीलवार अभ्यासानंतर रँकिंग निश्चित केली जाते. सन २०२५ च्या सर्वेक्षण पद्धतीमध्ये विविध निकषांवर आधारित मूल्यांकन करण्यात आले. यात पायाभूत सुविधा (भौतिक आणि शैक्षणिक), प्राध्यापक वर्ग, प्रकाशन, संशोधन, सल्लागार सेवा, उद्योजकता विकास कार्यक्रम आणि इतर कार्यक्रम, प्रवेश प्रक्रिया, अभ्यासक्रम आणि वितरण प्रणाली, प्लेसमेंट (राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय), सामाजिक जबाबदारी, नेटवर्किंग आणि उद्योग संवाद यांचा समावेश आहे. सर्वेक्षणात सहभागी होणाऱ्या संस्थांना माहिती सादर करावी लागते, ही माहिती तज्ज्ञ समितीद्वारे कठोरपणे तपासली जाते आणि प्रमाणित केली जाते. त्यानंतर अंतिम रँकिंग निश्चित केली जाते. या कठोर निकषांवर आधारित कामगिरीमुळे, शिरपूर येथील आर. सी. पटेल तंत्रज्ञान संस्था, या स्वायत्त संस्थेला प्रतिष्ठित उत्कृष्ट अभियांत्रिकी महाविद्यालय मानांकन श्रेणीत ९ वा क्रमांक मिळाला असून महाराष्ट्रात संस्थेने ४ थे स्थान मिळवले आहे. या यशस्वीतेबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजीमंत्री आ. अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026



देशदूत पांझराकान खोरे...

शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५ ७

## ग्लोबल ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट सेंटरच्या सर्व्हेक्षणात पटेल स्वायत्त अभियांत्रिकीला राष्ट्रीय पातळीवर ९ वे, महाराष्ट्रात ४ थे स्थान

शिरपूर । प्रतिनिधी

ग्लोबल ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट सेंटरच्या सन २०२५ च्या अभियांत्रिकी महाविद्यालयांसाठी घेण्यात आलेल्या सर्व्हेक्षणात शिरपूर येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने अनेक निकषांवर उत्कृष्ट कामगिरी केली. राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट तंत्रज्ञान शिक्षणाच्या श्रेणीत ९ वे व महाराष्ट्रातील अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये ४ थे स्थान प्राप्त केले. संस्थेच्या मजबूत शैक्षणिक कामगिरीमुळे हे उल्लेखनीय स्थान प्राप्त झाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

ग्लोबल ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट सेंटर ही संस्था व्यवसाय व्यवस्थापन आणि अभियांत्रिकी शिक्षण तसेच संशोधन क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देत आहे. यांच्या सर्वेक्षणातून मिळणारी माहिती आणि मानांकन हे शैक्षणिक संस्था, विद्यार्थी आणि नोकरी देणारे उद्योजक अशा सर्व भागधारकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. गुणवत्ता, विश्वासार्हता आणि पारदर्शकतेमध्ये सातत्य राखत, जी.एच.आर.डी.सी. सन २००९ पासून भारतातील अभियांत्रिकी महाविद्यालयांचे यशस्वीपणे सर्वेक्षण करत आहे.

२०२५ च्या सर्वेक्षण पद्धतीमध्ये विविध निकषांवर आधारित सखोल मूल्यांकन केले जाते, ज्यात पायाभूत सुविधा (भौतिक आणि शैक्षणिक), प्राध्यापक वर्ग, प्रकाशन, संशोधन, सल्लागार सेवा, उद्योजकता विकास कार्यक्रम आणि इतर कार्यक्रम, प्रवेश प्रक्रिया, अभ्यासक्रम आणि वितरण प्रणाली, प्लेसमेंट (राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय), खास वैशिष्ट्ये, सामाजिक जबाबदारी, नेटवर्किंग आणि उद्योग संवाद यांचा समावेश आहे. सर्वेक्षणात सहभागी होणाऱ्या संस्थांना सविस्तर माहिती सादर करावी लागते, जी तज्ञ समितीद्वारे कठोरपणे तपासली जाते आणि प्रमाणित केली जाते, त्यानंतर अंतिम रँकिंग निश्चित केली जाते. या कठोर निकषांवर आधारित कामगिरीमुळे, शिरपूर येथील आर. सी. पटेल तंत्रज्ञान संस्था, या स्वायत्त संस्थेला प्रतिष्ठित उत्कृष्ट अभियांत्रिकी महाविद्यालय मानांकन श्रेणीत ९ वा क्रमांक मिळाला असून महाराष्ट्रात संस्थेने ४ थे स्थान मिळवले आहे.

या यशस्वीतेबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजीमंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी सौ. जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

दै. देशदूत दि. 26/5/2025

दिव्य मराठी

धुळे सिटी 24-04-2025

## आर. सी. पटेल अभियांत्रिकी कॉलेजमधील प्रा. भूषण पाटील यांना पीएचडी पदवी प्रदान



**धुळे** | शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागात कार्यरत असलेले प्रा. भूषण प्रतापराव पाटील यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथून विद्युत अभियांत्रिकी विभागांतर्गत डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. अ डेव्हलपमेंट ऑफ इफिशियंट मेथडॉलॉजी फॉर क्लासिफिकेशन ऑफ फॉल्ट्स इन ट्रान्स्फॉर्मर हा त्यांच्या संशोधनाचा मुख्य विषय होता. या कामी त्यांना क.ब.चौ. उमवि च्या विद्युत विभागातील प्रा.डॉ. परेश जयचंद शाह यांचे मार्गदर्शक म्हणून अनमोल मार्गदर्शन लाभले. प्रा. भूषण पाटील यांचे संशोधनपर शोधनिबंध स्कोपस इंडेक्स सारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहे. अनेक परिसंवाद व परिषदांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत त्यांच्या संशोधन विषयावर आधारित सादरीकरण केले आहे.

पुण्य नगरी

# आयआयटी मुंबईच्या व्हर्च्युअल लॅब उपक्रमात आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी प्रथम

## प्रादेशिक केंद्र म्हणून झाली निवड





देशातील ३५८ उच्च तंत्रज्ञान देणाऱ्या संस्था व महाविद्यालयांपैकी आय.आय.टी. मुंबई च्या व्हर्च्युअल लॅब रँकिंगमध्ये प्रथम क्रमांक मिळवणे ही उपलब्धी आमच्या प्राध्यापक, विद्यार्थी आणि व्हर्च्युअल लॅब समन्वयकांच्या अथक परिश्रमांचे फलित आहे. शैक्षणिक गुणवत्ता, तांत्रिक नवोन्मेष आणि डिजिटल शिक्षणातील उत्कृष्टतेसह शैक्षणिक क्षेत्रात महाविद्यालयाने नवी उंची गाठली आहे. या उपक्रमात पटेल स्वायत्त अभियांत्रिकीने दाखवलेली आघाडी शैक्षणिक अभ्यासक्रमात आधुनिक डिजिटल साधनांचा प्रभावी समावेश करण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची साक्ष आहे. तसेच प्रादेशिक केंद्र म्हणून नियुक्त केल्यामुळे पटेल अभियांत्रिकीची व्हर्च्युअल लॅब या उपक्रमात भविष्यातील जबाबदारी आणि भूमिका महत्वाची ठरणार आहे.

**-डॉ. जे. बी. पाटील,** संचालक

**शिरपूर :** शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आय.आय.टी.), मुंबई द्वारे निर्मित आणि देशातील उच्च तंत्रज्ञान देणाऱ्या संस्थासाठी उपलब्ध करून दिलेल्या व्हर्च्युअल लॅब कार्यशाळेच्या उपक्रमात उल्लेखनीय कामगिरीचे प्रदर्शन करीत देशातील नामांकित ३५८ उच्च तंत्रज्ञान देणाऱ्या संस्था व महाविद्यालयांपैकी व्हर्च्युअल लॅब रँकिंगमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. तसेच आर. सी. पटेल अभियांत्रिकीची आय. आय.टी. मुंबई च्या वतीने पश्चिम भारतासाठी प्रादेशिक केंद्र म्हणून नेमणूक करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

आय.आय.टी. मुंबई द्वारे संचलित असलेल्या व्हर्च्युअल लॅब उपक्रमाचा उद्देश देशभरातील विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिकाद्वारे शिक्षणाचा अनुभव वाढवणे आहे. पटेल अभियांत्रिकीने या उपक्रम सुरवातीपासूनच स्वीकारत त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली आहे. आपल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आय. आय.टी. बॉम्बे च्या व्हर्च्युअल संसाधनांचा प्रभावीपणे वापर करण्यातही उत्कृष्ट कामगिरी करीत आहे. ही मान्यता पटेल अभियांत्रिकी मधील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सहयोगी प्रयत्नांचा दाखला आहे. व्हर्च्युअल लॅब हा एक अनोखा उपक्रम आहे जो संगणकीय सॉफ्टवेअरद्वारे कार्यान्वित केले जातो. या लॅबच्या मदतीने विज्ञान आणि अभियांत्रिकीचे विद्यार्थी ऑनलाइन अभ्यास करू शकतात. विविध डोमेन्समध्ये दूरस्थ प्रयोग आणि शिकण्याची सुविधा असते. या उपक्रमाद्वारे दुर्गम भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील प्रयोग करता येणार आहेत. स्वायत्त दर्जा प्राप्त असल्यामुळे पटेल अभियांत्रिकीने व्हर्च्युअल लॅबच्या उपक्रमातील आभासी संसाधने अभ्यासक्रमात समाविष्ट केली आहेत. पटेल अभियांत्रिकीची आय.आय.टी. मुंबई द्वारे देशाच्या पश्चिमेकडील राज्यांसाठी प्रादेशिक केंद्र म्हणून निवड केली आहे. कार्यशाळा यशस्वीतेसाठी नोडल सेंटरचे समन्वयक डॉ. जगदीश जाधव आणि त्यांच्या टीमने मोलाची भूमिका बजावली. डॉ. विपुल पंजाबी, डॉ. किरण सुर्यवंशी, प्रा. योगेश सोनवने, प्रा. के. ए. सनेर, प्रा. आर.एस. पाटील, डॉ. जे.पी. पाटील, प्रा. अतुल मैराळे यांनी विभागीय समन्वयक म्हणून प्रयत्न केले. प्रादेशिक केंद्र म्हणून निवड झाल्याबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजीमंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे मुख्य परीक्षा नियंत्रक, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट अधिकारी, रजिस्ट्रार व जनसंपर्क अधिकारी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतूक केले.

Dhule Edition
Apr 21, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

लोकमत 20/04/2025

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराविषयी तज्ज्ञांचे मार्गदर्शन

## शिरपूर न.पा. कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** शहरातील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या डेटा सायन्स आणि ए. आय. एम. एल. विभागातर्फे (ए.आय.सी.टी.ई.) पुरस्कृत महाविद्यालयाच्या कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष-२०२५ या उपक्रमांतर्गत शिरपूर वरवाडे नगर परिषद येथील कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण शिबिर नुकतेच पार पडले.

शिबिराचे उद्घाटन संचालक डॉ. जे. बी. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमुख्याधिकारी हर्षल भामरे व इतर अधिकारी उपस्थित होते. शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढविण्यासाठी अनेक कार्यक्रम हाती घेतले आहेत. यामध्ये स्मार्ट सिटी मिशन, डिजिटल महाराष्ट्र आणि इतर प्रशासकीय कामे तसेच लोक कल्याणकारी योजनांचा समावेश आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे प्रशासन अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक होण्यास मदत होणार आहे. शासनाच्या तंत्रज्ञान प्रशिक्षणाच्या या उपक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयातर्फे नगर परिषदेतील प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी पटेल स्वायत्त अभियांत्रिकीतर्फे प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीस विभाग प्रमुख डॉ. उज्ज्वला पाटील यांनी शिबिराची रूपरेषा आणि नगर परिषदेचे दैनंदिन कामकाज कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराने कसे सुकर होऊ शकते, याबद्दल माहिती दिली.



नगरपालिका कर्मचाऱ्यांसोबत डॉ. जे. बी. पाटील, हर्षल भामरे, डॉ.उज्ज्वला पाटील आदी.

शिरपूर वरवाडे नगर परिषदेतील सर्वच विभागांतील लिपिक, अभियंते, लेखापाल व प्रशासकीय कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

### तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन...

ए.आय.एम.एल. विभागाच्या डॉ. नितीन शिंदे यांनी कर्मचाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या ओपन एआय, जेमिनी, डीपसीक, कोपायलट अशा साधनांचा वैधानिक वापर दैनंदिन प्रशासकीय कागदपत्रे, दाखले, महत्त्वाच्या फाईल्स बनवणे, प्रस्ताव तयार करणे, आर्थिक व्यवहार सांभाळणे, प्रेझेंटेशन देणे इत्यादी कामांसाठी प्रभावीपणे कसा करता येईल याविषयी माहिती दिली. यानंतर डेटा सायन्स विभागातील प्रा. कैलास देवरे यांनी कर्मचाऱ्यांना एम.एस. ऑफिसचे उपयोग सांगितले. अद्ययावत एम.एस. ऑफिस आणि एआय साधने या विषयांवर प्रात्यक्षिक पद्धतीने प्रशिक्षण देण्यात आले.

Hello Dhule
Page No. 4 Apr 20, 2025
Powered by: erelego.com

दैनिक दिव्य मराठी 17/ 04 /2025



## प्रा. मोहम्मद अली सय्यद यांना पीएचडी पदवी प्रदान

प्रतिनिधी | शिरपूर

आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी विभागातील प्रा. मोहम्मद अली मुझफ्फर अली सय्यद यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, येथून संगणक अभियांत्रिकी विषयामध्ये डॉक्टरेट पदवी प्रदान केली. मोहम्मद अली सय्यद हे धुळे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सेक्रेटरी मुजफ्फर अली सय्यद यांचे चिरंजीव आहेत. पोलिस निरीक्षक इफ्तेखार सय्यद यांचे लहान बंधू आहेत. त्यांचे जिल्हा कबड्डी असो. अध्यक्ष राजवर्धन कदमबांडे, मनोहर चौधरी, ॲड.रवी देसर्डा, ॲड. सी. डी. सोनार आदींनी स्वागत केले आहे.

दै. दिव्यमराठी दि. 17/4/25

दिव्य मराठी धुळे सिटी 17-04-2025

# पालिका कर्मचाऱ्यांना एआय वापराचे मार्गदर्शन

**प्रतिनिधी** | शिरपूर

येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या डेटा सायन्स आणि एआयएमएल विभागातर्फे कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष उपक्रमांतर्गत शिरपूर वरवाडे नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण शिबिर झाले. शिबिराला अखिल भारतीय तंत्र परिषदेचे सहकार्य लाभले.

शिबिराचे उद्घाटन डॉ. जे. बी. पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी हर्षल भामरे उपस्थित होते. राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढवण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ते सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे प्रशासन अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक होईल. तसेच शासकीय कामकाजाची प्रक्रिया जलद आणि पारदर्शक होण्यास मदत होईल. या पार्श्वभूमीवर हे शिबिर घेण्यात आले. विभाग प्रमुख डॉ. उज्वला पाटील यांनी शिबिराची रूपरेषा आणि नगर परिषदेचे दैनंदिन कामकाज कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराने कसे सुकर होऊ शकते याबद्दल माहिती दिली. एआयएमएल विभागाच्या डॉ. नितीन शिंदे यांनी ओपन एआय, जेमिनी, डिपसीक, कोपायलट अशा साधनांचा वैधानिक वापर कसा करावा याची माहिती दिली. तसेच कर्मचाऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. प्रा. कैलास देवरे यांनी एमएस ऑफिसची माहिती दिली.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्य नगरी

## आर.सी. पटेल अभियांत्रिकी व पॉवर हाऊस ग्लोबल सर्व्हिसेसमध्ये सामंजस्य करार

**शिरपूर** : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने आपल्या विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील करिअर तसेच उच्च शिक्षणाच्या संधींसाठी सक्षम करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, पॉवर हाऊस ग्लोबल सर्व्हिसेस, नाशिक यांच्यासोबत सामंजस्य करार (एमओयू) यशस्वीरीत्या स्थापित केल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.



पॉवर हाऊस ग्लोबल सर्व्हिसेस ही संस्था आंतरराष्ट्रीय शिक्षण व करिअर मार्गदर्शनाच्या क्षेत्रातील असून, परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे मार्गदर्शन आणि सहाय्यता पुरवण्याकरिता परिचित आहे. या करार अंतर्गत विद्यार्थ्यांना समुपदेशन, प्रोफाइल मूल्यांकन, परदेशातील योग्य विद्यापीठांची निवड, स्पर्धा परीक्षा तयारी आणि व्हिसा प्रक्रियेतील सहाय्यता अशी सेवा कंपनीकडून उपलब्ध होणार आहे. या करारामुळे विद्यार्थ्यांना यूएसए, यूके, कॅनडा, जर्मनी, ऑस्ट्रेलिया तसेच इतर आघाडीच्या देशांतील उच्च शिक्षण व करिअर संधींचा शोध घेण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे. ही भागीदारी पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षणासाठी असलेल्या दूरदृष्टीचे आणि विद्यार्थी केंद्रित दृष्टिकोनाचे प्रतिक ठरली आहे. हा सामंजस्य करार नाशिक येथे पॉवर हाऊस ग्लोबल सर्व्हिसेसच्या प्रमुख प्रतिनिधींच्या उपस्थितीत झाला. यावेळी महाविद्यालयाच्या आंतरराष्ट्रीय संबंध व उच्च शिक्षण विभागाच्या अधिष्ठाता प्रा.डॉ. स्मितल पाटील व सहकाऱ्यांची उपस्थिती होती. महत्वाकांक्षी सामंजस्य कराराच्या यशस्वी पूर्तीबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतूक केले.

Nandurbar Edition
Apr 09, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीतर्फे नगरपरिषद कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण शिबिर



**शिरपूर :** आर. सी. पटेल स्वायत्त्य अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या डेटा सायन्स आणि ए.आय.एम.एल विभागातर्फे अखिल भारतीय तंत्र परिषद, नवी दिल्ली ( ए.आय.सी.टी.ई.) पुरस्कृत महाविद्यालयाच्या कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष-२०२५ या उपक्रमांतर्गत शिरपूर वरवाडे नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण शिबिर नुकतेच झाले.

शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी हर्षल भामरे व इतर अधिकारी उपस्थित होते. शासनाच्या तंत्रज्ञान प्रशिक्षणाच्या उपक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयातर्फे शिरपूर-वरवाडे नगरपरिषदेतील प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी पटेल स्वायत्त अभियांत्रिकीतर्फे प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. सुरवातीस विभाग प्रमुख डॉ. उज्वला पाटील यांनी शिबिराची रूपरेषा आणि नगरपरिषदेचे दैनंदिन कामकाज कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराने कसे सुकर होऊ शकते याबद्दल उपस्थितांना माहिती दिली. यानंतर ए.आय. एम.एल. विभागाच्या डॉ. नितीन शिंदे यांनी कर्मचाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या ओपन ए.आय., जेमिनी, डीपसिक, कोपायलट अशा साधनांचा वैधानिक वापर दैनंदिन प्रशासकीय कागदपतत्रे, दाखले, महत्वाच्या फाईल्स बनवणे, प्रस्ताव तयार करणे, आर्थिक व्यवहार सांभाळणे, प्रेझेंटेशन देणे इत्यादी कामांसाठी प्रभावीपणे कसा करता येईल याविषयी माहिती दिली. डेटा सायन्स विभागातील प्रा. कैलास देवरे यांनी कर्मचाऱ्यांना अद्ययावत एम. एस. ऑफीस आणि त्याचे उपयोग यावर सविस्तर प्रकाश टाकला. अशाप्रकारे अद्ययावत एम. एस. ऑफीस आणि एआय साधने या विषयांवर प्रात्यक्षिक पद्धतीने प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी शिरपूर वरवाडे नगरपरिषदेतील सर्वच विभगातील कार्यरत असलेले लिपिक, अभियंते, लेखापाल आणि इतर प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. शिबिरासाठी शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांचे मार्गदर्शन लाभले.

Dhule Edition
Apr 15, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

पुण्यनगरी

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या २५ विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड

**शिरपूर :** आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या २५ विद्यार्थ्यांची टेक महिंद्रा या बहुराष्ट्रीय कंपनीत असोसिएट सिस्टीम इंजिनिअर या पदावर निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली. कंपनी व पटेल अभियांत्रिकी, शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पस प्लेसमेंटसाठी पदवी अभ्यासक्रमातील अंतिम वर्षाचे विद्यार्थी ज्यांना पदवी अभ्यासक्रमाच्या प्रत्येक वर्षी ६० टक्के गुण आहेत असे विद्यार्थी पात्र होते. तीन स्तरावर झालेल्या या निवड प्रक्रियेत सुरुवातीला बुद्धिमत्ता चाचणी,



तांत्रिक मुलाखत व शेवटी एच. आर. राउंड झाला. त्यात बोरसे भाग्यश्री संदीप, बोरसे शुभम उमाकांत, पवार साक्षी भानुदास, राजपूत जागृती महेंद्रसिंग, पाटील सौरव दीपक, देवरे दिनेश जीवन, साळुंखे गणेश संजय, जाधव चेतना अशोक, वाडीले हितेश गोकुळ, चौधरी यश नितीन, चौधरी हितेश सुनील, पाटील भावेश संजय, सोनजे ऋषिकेश रमेश, वाघ विनोद रामदास, पाटील रुषिकेश योगराज, भारतीया उदय दिनेशकुमार, पाटील रोहित महेंद्र, जैन खुशाल नरेंद्र, चौधरी तेजस विजय, पाटील मोहित भरत, पाटील विजय सतीश, सैंदाणे निकिता सुधीर, सोनवणे रुचिता प्रकाश, मोरे सुमित नंदू, कापडे दुर्गेश जितेंद्र या २५ विद्यार्थ्यांची असोसिएट सिस्टीम इंजिनिअर या पदावर निवड झाली. कॅम्पस प्लेसमेंटच्या यशस्वितेसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी मिल्केश जैन, प्रा. के. पी. राणे, प्रा. एम. जे. पाटील, प्रा. व्ही. व्ही. पटेल व प्रा. के. डी. देवरे यांनी प्रयत्न केले. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.सुहास शुक्ल, विभाग प्रमुख प्रा. डॉ. व्ही. एस. पाटील, प्रा. जी. व्ही. तपकिरे, प्रा. पी. एल. सरोदे, डॉ. एस. व्ही. देसले, डॉ. आर. बी. वाघ, डॉ. डी. आर. पाटील, डॉ. उज्वला पाटील, डॉ. एस. ए. पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. एम. पी. जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतूक केले.



टेक महिंद्रा ही जगातील पहिली भारतीय कंपनी आह. कंपनीला सस्टेनेबल मार्केट्स इनिशिएटिव्हच्या टेरा कार्टा सीलने सन्मानित केले आहे. जागतिक स्तरावरील कंपनीत पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांची निवड दरवर्षी होते. विद्यार्थी निवडीची संख्या प्रत्येक वर्षी वाढतच आहे. अजून अंतिम वर्षाचे शिक्षण घेत असतांना अशा कंपनीतून करिअरची सुरवात होणे ही विद्यार्थ्यांसाठी नक्कीच अभिमानाची बाब आहे.

-प्रा. डॉ. जे. बी. पाटील, संचालक

Dhule Edition
Feb 14, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

**लोकमत** 07/04/2025

# शिरपूर अभियांत्रिकीने देशात पटकावले २५६ वे स्थान

## तुर्की आंतरराष्ट्रीय हायर एज्युकेशन रँकिंग परिषद

**शिरपूर :** शहरातील आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने तुर्की येथील आंतरराष्ट्रीय हायर एज्युकेशन रँकिंग २०२५ च्या क्रमवारीत जागतिक स्तरावरील सहभागी उच्च शिक्षण संस्थांमधून २५६ वे स्थान पटकावले आहे. सदर आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानांकन आणि गौरव महाविद्यालयास गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन कार्य तसेच जागतिक शैक्षणिक क्षेत्रातील योगदानामुळे प्रदान झाल्याची माहिती संचालक डॉ.जे.बी. पाटील यांनी दिली.

भारतीय शिक्षण क्षेत्रातील प्रगतीने आशिया आणि जागतिक स्तरावर प्रभावी प्रगती केली आहे. यात देशातील शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, महाविद्यालये यांची कार्यप्रणाली तसेच संशोधक आणि त्यांचे संशोधन कार्य यांनी संपूर्ण जगाचे आपल्याकडे लक्ष वेधले आहे. यामुळेच अनेक मानांकन आणि सर्वेक्षण संस्थांच्या शीर्ष क्रमवारीत स्थान मिळवत आहेत. यातच शिरपूरसारख्या छोट्या शहरातील आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयास तुर्कीच्या आंतरराष्ट्रीय हायर एज्युकेशन रँकिंगतर्फे त्यांच्या २०२५ च्या क्रमवारीत जागतिक स्तरावरील उत्कृष्ट शिक्षण संस्थांमध्ये २५६ वे स्थान बहाल करण्यात आले. सदर रँकिंग प्रकल्प हा एक वैज्ञानिक, शैक्षणिक आणि संशोधन प्रकल्प आहे, जो उच्च शिक्षण संस्थांना अनेक निकषांनुसार मानांकन देण्याचे काम करतो. ज्यामध्ये उच्च शिक्षण संस्थांचे कामकाज आणि कामगिरी सुधारण्यास हातभार लावणारे तसे अनेक निर्देशक समाविष्ट आहेत.

रँकिंगमध्ये सहभागी संस्थांना एका प्रश्नावली लिंकनुसार जोडले जाऊन उच्च शिक्षण संस्थांची कामगिरी रँकिंगमध्ये निर्दिष्ट केलेल्या पद्धतीनुसार मोजली जाते. दरवर्षी रँकिंगमध्ये जगभरातील हजारपेक्षा जास्त उच्च शिक्षण संस्थांचा यात सहभागी असतो.

मस्ट READ

(दै. लोकमत दि. 7/4/2025)

दिव्य मराठी

धुळे सिटी 06-04-2025

# हॅकेथॉन स्पर्धेत आर. सी. पटेल महाविद्यालयाला उपविजेतेपद

प्रतिनिधी | शिरपूर

शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचालित आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी पुणे येथील झेंसार टेक्नॉलॉजी व एडब्ल्यूएसतर्फे झालेल्या वुमन हॅकेथॉन स्पर्धेत उपविजेतेपद मिळवले.


हॅकेथॉन स्पर्धेत यश मिळवणाऱ्या विद्यार्थिनींसह मान्यवर.

ही स्पर्धा एमआयटी एडीटी युनिव्हर्सिटी, लोणी-काळभोर आणि झेंसार टेक्नॉलॉजीजमध्ये झाली. स्पर्धेत राज्यभरातून १३० महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी नवकल्पना आणि तांत्रिक कौशल्याचा आविष्कार सादर केला. एआयएमएल, डेटा सायन्स, संगणक अभियांत्रिकी, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन या विद्या शाखांमधील विद्यार्थिनींसाठी ही स्पर्धा झाली. स्पर्धकांनी तांत्रिक कौशल्य वापरून विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रात्यक्षिक सादर केले. स्पर्धेत शेतकऱ्यांसाठी शेतीबद्दल माहिती जाणून घेण्यासाठी आणि त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळवण्यास मदत करेल असे ॲप तयार करायचे होते. हे ॲप बनवण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी एडब्ल्यूएस पार्टी रॉक वापरले. आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या ५७ विद्यार्थिनींनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. स्पर्धेत धनश्री किरण पाटील, तनया महेश पाटील, दीक्षा माधव पाल यांनी उपविजेतेपद पटकावले. विजेत्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. विद्यार्थिनींना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. मिल्केश जैन, प्रा. के. पी. राणे, प्रा. व्ही. व्ही. पाटील, प्रा. एम. जे. पाटील, डॉ. पी. एस. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, आमदार अमरीश पटेल, कार्याध्यक्ष भूपेश पटेल आदींनी समाधान व्यक्त केले आहे. गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला.

दैनिक दिव्य मराठी **04/05/2025**

## आर. सी. पटेल महाविद्यालयाच्या प्रा. मनीषा पाटील यांना पीएचडी पदवी



**शिरपूर** | शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील डेटा सायन्स विद्या शाखेच्या प्रा. डॉ. मनीषा शांताराम पाटील यांना पीएचडी पदवी मिळाली. त्यांना संशोधन एसएसव्हीपीएस संस्थेचे बी. एस. देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हितेंद्र धनसिंग पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. डॉ. मनीषा पाटील यांचे आतापर्यंत आठ शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहे. त्यांनी एनपीटीईएलतर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेत विशेष प्रावीण्य प्राप्त केले आहे. त्यांना डेटा सायन्स विद्या शाखेच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. उज्ज्वला पाटील यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, आमदार अमरीश पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेश पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांनी समाधान व्यक्त केले आहे.

दै. दिव्यमराठी दि. 4/5/25

दिव्य मराठी धुळे सिटी 03-04-2025

## आर. सी. पटेल अभियांत्रिकीचे प्रा. अनूपकुमार जयस्वाल यांना विद्यापीठातर्फे पीएचडी पदवी



शिरपूर | येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागात कार्यरत असलेले प्रा. अनुपकुमार भट्टुलाल जयस्वाल यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने पीएचडी पदवी दिली. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विभागांतर्गत त्यांना पदवी देण्यात आली. डॉ. जयस्वाल यांचे शोधनिबंध स्कोपस इंडेक्स सारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहे. किडनीतील गाठींचे अचूक निदान करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स यासारख्या तंत्रज्ञानाचा वापर कसा आणि किती उपयुक्त आहे याचा अभ्यास त्यांनी संशोधनाद्वारे मांडला आहे. त्यांना विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. पाटील यांच्यासह सहकारी प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.

शिल्पकार विकासाचा...

देशदूत

धुळे आवृत्ती

epaper.deshdoot.com
03 Apr 2025 - 3

# पटेल स्वायत्त अभियांत्रिकीने आंतरराष्ट्रीय हायर एज्युकेशन रँकिंगमध्ये पटकावले स्थान

**शिरपूर । प्रतिनिधी**

येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने तुर्की येथील जागतिक आंतरराष्ट्रीय हायर एज्युकेशन रँकिंग-२०२५ च्या क्रमवारीत जागतिक स्तरावरील सहभागी उच्च शिक्षण संस्थांमधून २५६ वे स्थान पटकावले आहे. सदर आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानांकन आणि गौरव महाविद्यालयास गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन कार्य तसेच जागतिक शैक्षणिक क्षेत्रातील योगदानामुळे प्रदान झाल्याची माहिती संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

भारतीय शिक्षण क्षेत्रातील प्रगतीने आशिया आणि जागतिक स्तरावर प्रभावी प्रगती केली आहे. यात देशातील शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, महाविद्यालये यांची कार्यप्रणाली तसेच संशोधक आणि त्यांचे संशोधन कार्य यांनी संपूर्ण जगाचे



आपल्याकडे लक्ष वेधले आहे. यामुळेच अनेक मानंकन आणि सर्वेक्षण संस्थांच्या शीर्ष क्रमवारीत स्थान मिळवत आहेत. यातच शिरपूर सारख्या छोट्या शहरातील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयास तुर्की च्या जागतिक आंतरराष्ट्रीय हायर एज्युकेशन रँकिंगतर्फे त्यांच्या २०२५ च्या क्रमवारीत जागतिक स्तरावरील उत्कृष्ट शिक्षण संस्थांमध्ये २५६ वे स्थान बहाल करण्यात आले.

सदर रँकिंग प्रकल्प हा एक वैज्ञानिक, शैक्षणिक आणि संशोधन प्रकल्प आहे, जो उच्च शिक्षण संस्थांना अनेक निकषांनुसार मानंकन देण्याचे काम करतो. ज्यामध्ये उच्च शिक्षण संस्थांचे कामकाज आणि कामगिरी सुधारण्यास हातभार लावणारे तसे अनेक निर्देशक समाविष्ट आहेत. रँकिंगमध्ये सहभागी संस्थांना एका प्रश्नावली लिंकनुसार जोडले जाऊन उच्च शिक्षण संस्थांची कामगिरी रँकिंगमध्ये निर्दिष्ट केलेल्या पद्धतीनुसार मोजली जाते. दरवर्षी रँकिंगमध्ये जगभरातील हजार पेक्षा जास्त उच्च शिक्षण संस्थांचा यात सहभागी असतो.

पटेल स्वायत्त अभियांत्रिकीला आपल्या शैक्षणिक पद्धतीत नियमित सुधारणा, विद्यार्थी-केंद्रित शिक्षण प्रणाली आणि आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन सुरवातीपासूनच अंगिकारला आहे. महाविद्यालयाने अद्ययावत शिक्षणाच्या पद्धतींसह, उच्च दर्जाच्या संशोधन कार्यांना प्रोत्साहन दिले आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धात्मक कौशल्य प्राप्त होतात. तसेच, महाविद्यालयाने प्रगत तंत्रज्ञान आणि उद्योगाशी संबंधित शैक्षणिक कार्यक्रम तसेच इंटरनॅशनल पार्टनरशिप प्रस्थापित केल्या आहेत. या उपक्रमांमुळे विद्यार्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर तयार होतात आणि जागतिक कार्यक्षेत्रात प्रभावी भूमिका बजावू शकतात.

महाविद्यालयाच्या २५६ व्या स्थानावर येण्यामागे त्याच्या कार्यसंस्कृतीतील उत्तम शिक्षकवर्ग, संशोधन प्रयोगशाळा, तसेच प्रगतीशील सुविधा यांचा मोठा हात आहे. या यशामुळे महाविद्यालयाचे स्थान जागतिक शैक्षणिक रँकिंगमध्ये स्थिर झाले आहे.

महाविद्यालयास प्राप्त झालेल्या या आंतरराष्ट्रीय स्तर्वरील गौरवाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे आदिंनी आनंद व्यक्त केला.

दिव्य मराठी धुळे सिटी 02-04-2025

# शिरपूरच्या १५ विद्यार्थ्यांचे जपानी भाषा परीक्षेत यश

## विदेशात कामासाठी संवाद कौशल्याचा विकास

प्रतिनिधी | शिरपूर

शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील द्वितीय व तृतीय वर्षात शिकणाऱ्या १५ विद्यार्थ्यांनी 'नॅट-क्यू ५' व 'जेएलपीटी एन ५' या जपानी भाषा प्रमाणपत्र परीक्षांमध्ये यश संपादन केले.

महाविद्यालयात जपानी आणि जर्मन भाषा प्रशिक्षणाचा उपक्रम अनेक वर्षांपासून हाती घेण्यात आला आहे. प्रत्येक वर्षी महाविद्यालयातील विद्यार्थी या भाषेचे प्रशिक्षण घेऊन उच्च काठिण्य पातळी असलेल्या जागतिक स्तरावरील परीक्षेत उत्तीर्ण होत आहे. त्यानुसार महाविद्यालयाच्या १५ विद्यार्थ्यांनी 'नॅट-क्यू ५' व 'जेएलपीटी एन ५' परीक्षेत यश मिळवले. त्यामुळे विद्यार्थ्यांना जपानमधील उच्च शिक्षण आणि करिअरची संधी मिळाली आहे. विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय संबंध आणि उच्च शिक्षण समितीच्या अधिष्ठाता डॉ. स्मितल पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. मिल्केश जैन यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तथा माजी मंत्री अमरीश पटेल, ट्रस्टी जयश्री पटेल, कार्याध्यक्ष भूपेश पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांनी समाधान व्यक्त केले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यापूर्वीही या प्रकारच्या परीक्षेत यश मिळवले असल्याची माहिती देण्यात आली.

### हे विद्यार्थी झाले उत्तीर्ण

परीक्षा पास होणाऱ्यांमध्ये हिरल उदय भालकर, हिमांशू प्रकाश पाटील, चेतन दीपक पाटील, प्रणव नितीन तातार, शिवम विवेक देसले, विनय नंदकिशोर शहा, यश पांडुरंग पवार, प्राजक्ता अनिल पाटील, नेहा रवींद्र चव्हाण, कोमल प्रकाश महाजन, दीक्षा माधव पाल, अश्विनी पाटील, जान्हवी बडगुजर, परिमल शिरसाठ, मानसी पाटील यांचा समावेश आहे.

पुण्य नगरी

# आर.सी.पटेल अभियांत्रिकीच्या १५ विद्यार्थ्यांचे नॅट-क्यू ५, जेएलपीटी एन ५ परीक्षेत यश

**शिरपूर** : शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी जपानी आणि जर्मन भाषा प्रशिक्षणाचा उपक्रम अनेक वर्षांपासून हाती घेण्यात आला आहे. प्रत्येक वर्षी महाविद्यालयातील विद्यार्थी या भाषांमध्ये प्रशिक्षित होऊन उच्च काठीण्य पातळी असलेल्या जागतिक स्तरावरील परीक्षा उत्तीर्ण होत आहेत. नुकतेच महाविद्यालयाच्या द्वितीय व तृतीय वर्षात शिकणाऱ्या १५ विद्यार्थ्यांनी 'नॅट-क्यू ५' व 'जेएलपीटी एन ५' या जपानी भाषा प्रमाण पत्र परीक्षांमध्ये उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले.



महाविद्यालयातील परकीय भाषा प्रशिक्षण उपक्रमाचे उद्दिष्टे विद्यार्थ्यांना आवश्यक भाषिक कौशल्यांनी सुसज्ज करणे आणि त्याद्वारे जागतिक स्तरावर नवीन शैक्षणिक आणि करिअरच्या संधी उपलब्ध करवून देणे हा आहे. विद्यार्थ्यांसाठी शेक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून जपानी भाषेचा विशेष प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात आला आहे. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभागामार्फत विद्यार्थ्यांना बहुराष्ट्रीय कंपनीच्या इतर देशांमधील नोकरीची संधी अधिकाधिक वाढवण्याकरिता परकीय भाषा कौशल्य विकासाचे उपक्रम हाती घेण्यात आले. जपानी भाषेच्या प्राविण्यता परीक्षेत १५ विद्यार्थ्यांनी 'नॅट-क्यू ५' व 'जेएलपीटी एन ५' परीक्षेत उत्तीर्ण होत यश संपादन केले. यात भालकर हिरल उदय, हिमांशू प्रकाश पाटील, पाटील चेतन दीपक, प्रणव नितीन तातार, शिवम विवेक देसले, विनय नंदकिशोर शहा, यश पांडुरंग पवार, प्राजक्ता अनिल पाटील, नेहा रवींद्र चव्हाण, कोमल प्रकाश महाजन, दीक्षा माधव पाल, अश्विनी पाटील, जान्हवी बडगुजर, परिमल शिरसाठ, मानसी पाटील या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. प्रशिक्षण वर्गांचे आयोजन व संचालनासाठी 'आंतरराष्ट्रीय संबंध आणि उच्च शिक्षण' समितीच्या अधिष्ठाता डॉ. स्मितल पाटील, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी प्रा. मिल्केश जैन, सहकारी समन्वयक यांनी प्रयत्न केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतूक केले.

Dhule Edition
Mar 31, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

R. C. PATEL
INSTITUTE OF TECHNOLOGY
An Autonomous Institute

**01 June 2024 to 25 March 2026**

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
29 Mar 2025 - Page 3

## प्रा. प्रशांत गोड यांना पीएच.डी.



■ शिरपूर । प्रतिनिधी

शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित, आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकम्युनिकेशन विभागात कार्यरत असलेले प्रा. प्रशांत मगनलाल गोड यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथून इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विभागांतर्गत डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. ॲन इंटेलिजन्ट कॉम्प्यूटर एडेड सिस्टिम फॉर प्रेडिक्शन ऑफ कार्डिओव्हस्क्युलरलर डिसीजेस हा त्यांच्या संशोधनाचा मुख्य विषय होता. यासाठी त्यांना संशोधन मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. प्रमोद देवरे यांचे मार्गदर्शन लाभले. तर विभाग प्रमुख डॉ. व्ही.एस.पाटील आणि सहकारी प्राध्यापकांचे विशेष सहकार्य मिळाले. या यशाबद्दल त्याच शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी सौ. जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, डॉ. जे. बी. पाटील, डॉ. पी.जे. देवरे आदींनी कौतूक केले.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती 25/03/2025

# डेटाक्वेस्ट टॉप टी-स्कूल रँकिंगमध्ये आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी उत्कृष्ठ महाविद्यालय



**शिरपूर :** डेटाक्वेस्ट टॉप टी-स्कूल रँकिंगमध्ये आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यायाचा भारतातील उत्कृष्ट १०० अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये समावेश झाला आहे.

डेटाक्वेस्ट टॉप टी-स्कूल २०२५ या क्रमवारीची नुकतीच घोषणा करण्यात आली. त्यात खाजगी अभियांत्रिकी तंत्रज्ञान उद्योगातील योगदान व कौशल्ये या आधारावर व्यापक माध्यमातून मूल्यांकन प्रक्रिया करून क्रमवारी प्रसिद्ध करण्यात आली. स्वायत्त दर्जा प्राप्त आर.सी.पटेल अभियांत्रिकी महाविद्यायाचा भारतातील उत्कृष्ठ पहिल्या १०० मध्ये (एकूण खाजगी व सरकारी क्षेत्र) पटेल अभियांत्रिकीने भारतातून ८२ वा तर खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयात भारतातून ७७ वा क्रमांक तर महाराष्ट्रातील खाजगी महाविद्यालयातून १२ वा क्रमांक प्राप्त केल्याची माहिती डायरेक्टर डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

आय.टी. पब्लिकेशन असलेल्या डेटाक्वेस्ट द्वारे डेटाक्वेस्ट टी-स्कूल सर्वेक्षण हे विद्यार्थी, पालक आणि नोकरी प्रदान करणारे यांच्या विश्वासास उतरलेले व उद्योग प्रशंसित नामांकित सर्वेक्षण असून देशभरातील टी-स्कूल म्हणजेच तंत्रशिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांची तंत्रज्ञान उद्योगातील योगदान व कौशल्ये या आधारावर व्यापक माध्यमातून मूल्यांकन प्रक्रिया करून क्रमवारी प्रदान करते. या क्रमवारीतील निवडीसाठी विविध निकष लावले जातात, यात अकॅडेमिक एनव्हायरमेंटच्या अंतर्गत किती प्राध्यापकांनी स्वलिखित पुस्तके प्रकाशित केली आहेत. शोधनियतकालिकात किती शोध निबंध प्रकाशित आहेत तसेच पेटंट किती आहेत यांचा समावेश आहे. त्यानुसार सर्वेक्षणासाठी डेटाक्वेस्ट द्वारे निर्देशित करण्यात आलेल्या काळात पटेल अभियांत्रिकीच्या प्राध्यापकांनी एकूण २३ पुस्तके तर ७३ शोध निबंध प्रकाशित आहेत, तसेच ४२ पेटंटची नोंदणी केली आहे. इंडस्ट्री इंटरफेस च्या अंतर्गत पटेल महाविद्यालयातील हजाराच्या वर विद्यार्थ्यांनी विविध कंपनीमध्ये इंटर्नशिप केली आहे. तसेच विद्यार्थ्यांना उद्योगजगतात सुरु असलेल्या बदलांसंबंधी वेळोवेळी माहिती होण्यासाठी विविध उद्योगांमधील ८१ तज्ञांना विद्यार्थी मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात आले. महाविद्यालयाने विविध नामांकित कंपनीसोबत सामंजस्य करार केले आहेत, त्याद्वारे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व नोकरीच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. या सर्व बाबी व महाविद्यालयातील इतर सोयी सुविधा म्हणून भारतातील उत्कृष्ट १०० अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये पटेल अभियांत्रिकीचा समावेश झाला. या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतूक केले.

(दै. लोकसत्ता 25 मार्च 2025).

दिव्य मराठी **धुळे सिटी** 21-03-2025

## आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीचे प्रा. संदीप सोनवणे यांना पीएचडी पदवी प्रदान



**शिरपूर** | शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचालित आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी विभागातील प्रा. संदीप रवींद्र सोनवणे यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातून संगणक अभियांत्रिकी विभागांतर्गत डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ अ सिस्टिम फॉर विड डिक्टेशन अँड कंट्रोल हा त्यांच्या संशोधनाचा मुख्य विषय होता. त्यांना संशोधन मार्गदर्शक डॉ. नितीन नामदेव पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. संदीप सोनवणे यांचे संशोधन शोधनिबंध स्कोपस इंडेक्स, वेब ऑफ सायन्स सारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जर्नल्समध्ये प्रकाशित झाले. तसेच अनेक परिसंवाद व परिषदेत सक्रीय सहभाग नोंदवला आहे. त्यांना विभाग प्रमुख डॉ. आर. बी. वाघ आणि सहकारी प्राध्यापकांचे विशेष सहकार्य लाभले.

R. C. PATEL
INSTITUTE OF TECHNOLOGY
An Autonomous Institute

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
धुळे आवृत्ती
19/03/2025
epaper.deshdoot.com
19 Mar 2025 - 3

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या १४ विद्यार्थ्यांना प्री-प्लेसमेंट ऑफर

■ शिरपूर । प्रतिनिधी



आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील १४ विद्यार्थ्यांची क्वालिटी किओस्क या बहुराष्ट्रीय कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर ट्रेनी पदावर वार्षिक २.५० लाख रुपये वेतनश्रेणीवर प्री-प्लेसमेंट ऑफर अंतर्गत निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

क्वालिटी किओस्क कंपनी व आर.सी.पटेल अभियांत्रिकी, शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमातील अंतिम वर्षाच्या संगणक, डेटा सायन्स आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेचे विद्यार्थी ज्यांना पदवी अभ्यासक्रमाच्या प्रत्येक वर्षी ६० टक्के गुण आहेत, असे विद्यार्थी या कॅम्पस प्लेसमेंटसाठी पात्र होते. तीन स्तरावर झालेल्या या निवड प्रक्रियेत सुरवातीला बुद्धिमत्ता चाचणी, तांत्रिक मुलाखत व शेवटी एच. आर. राउंड झाला. त्यात अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षातील सोनवणे गौरव धनराज, भोजने कांचन किशोर, खोर केतन प्रमोद, जैन प्रसन्नजीत देवेंद्र, रोकडे प्रणल मनोहर, बावा कृतिक्षा भाऊसाहेब, खलाणे ललित तुकाराम, बेलदार यशोदिप ज्ञानेश्वर, मोरे निशा देविदास, पाटील आचल भाऊसाहेब, बारी सनी संजयकुमार, खुरपाडे रुषिकेश विनोद, लोहार खुशी नरेंद्र, पाटील आदिती अजय या १४ विद्यार्थ्यांची सॉफ्टवेअर इंजिनिअर ट्रेनी या पदावर वार्षिक रुपये २.५० लाख या वेतनश्रेणीवर प्रीप्लेसमेंट ऑफर अंतर्गत निवड झाली. कॅम्पस प्लेसमेंटच्या यशस्वितेसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मिल्केश जैन, प्रा. एम. जे. पाटील, प्रा. व्ही. व्ही. पटेल, प्रा. के. पी. राणे, प्रा. के. डी. देवरे यांनी प्रयत्न केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजीमंत्री आ. अमरिशभाई पटेल, ट्रस्टी सौ. जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे आदींनी कौतूक केले.

पुण्य नगरी

17/03/2025

# प्रा.शैलेंद्र परदेशी यांना पीएचडी प्रदान



**शिरपूर :** शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी विभागात कार्यरत असलेले प्रा. शैलेंद्र मदनसिंग परदेशी यांना ओरिएंटल युनिव्हर्सिटी इंदुर (मध्य प्रदेश) येथून संगणक अभियांत्रिकी विभागांतर्गत पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. 'मशीन लर्निंगद्वारे भावनांचे विश्लेषण वापरून भावनांची तपासणी' या विषयावर त्यांनी शोध प्रबंध सादर केला. त्यांना ओरिएंटल युनिव्हर्सिटीचे प्रा. डॉ. दिनेश जैन यांचे मार्गदर्शन आणि विभाग प्रमुख डॉ. आर. बी. वाघ यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांनी कौतुक केले.

पुण्य नगरी 14 / 03 / 2025


# आर.सी.पटेल अभियांत्रिकीच्या रासेयो शिबिराचा समारोप




**शिरपूर :** येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत श्रमसंस्कार शिबिर नुकतेच करवंद ता. शिरपूर येथे झाले.

शिबिराचे उद्घाटन महाविद्यालय संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, सरपंच हिरामण भिल, भास्कर अहिरे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. शिबिरांतर्गत विद्यार्थ्यांनी विविध उपक्रम राबविले. यात महिला दिनी जनजागृती अभियान फेरी, ग्रामपंचायत चौकात पथनाट्य, गोरक्षनाथ मंदिर परिसरात वृक्षारोपण, माझी वसुंधरा जलसंधारण अभियान अंतर्गत करवंद साठवण बंधाऱ्याकाठची स्वच्छता या उपक्रमांचा समावेश होता. शिबिरदरम्यान डॉ. श्रीकांत वाडीले यांनी दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व या विषयावर, जयपाल गिरासे यांनी स्वामी विवेकानंद आणि युवक या विषयावर व डॉ. अनिल जाधव यांचे आणीबाणी प्रसंगीचे प्रथमोपचार या विषयावर व्याख्यान झाले. शिबिराची सांगता जिल्हा परिषद केंद्र शाळा करवंद येथे झाली. यावेळी रासेयो एककातर्फे विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यातील विजेत्यांना शालेपयोगी बक्षिसे देण्यात आली. मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी आभार मानले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. भूषण पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. सपना रघुवंशी, शिक्षक समन्वयक प्रा. मनोज पटेल, प्रा. महेश महाजन, प्रा.अमित महिरे, प्रा.निलेश महाजन, डॉ.प्रमोद पाटील, डॉ.महेश पाटील, डॉ. नितीन शिंदे, प्रा.प्रियंका लांजेवार, प्रा.मनोज पाटील, अविनाश पाटील यांनी प्रयत्न केले. उत्कृष्ट विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून जागृती देसले व धीरज रवंदळे यांची निवड करण्यात आली.


Nandurbar Edition
Mar 14, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

पुण्य नगरी
13/03/2025

# आर.सी.पटेल अभियांत्रिकीत सायबर गुन्हे व सुरक्षेवर व्याख्यान

**शिरपूर :** येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून धुळे सायबर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेशकुमार घुसर, पोलीस उपनिरीक्षक प्रतिक कोळी, संगणक तज्ज्ञ अथर्व बिरारी (एम.के.सी.एल.) या वक्त्यांना आमंत्रित करून 'सायबर गुन्हे आणि सुरक्षा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.




प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, विद्यार्थी कल्याण समिती अधिष्ठाता प्रा. डॉ अमृता भंडारी, प्रा. डॉ. उज्वला पाटील, सर्व विद्या शाखांचे महिला कर्मचारी उपस्थित होते. पोनि घुसर यांनी ऑनलाईन सायबर गुन्हे घडत असून महिला त्यांच्या मानसिक, आर्थिक, भावनिक आणि शारीरिक छळास बळी पडत असल्याच्या घटना घडत आहेत. अशा वेळी महिलांनी सायबर गुन्हे संदर्भात जागृत राहून सायबर गुन्ह्यात बळी न ठरता नजीकच्या पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवावा, असे सांगितले. पोनि प्रतिक कोळी यांनी ऑनलाईन माध्यमाचा महिला वर्गाने कसा वापर करावा यावर विचार मांडले. अथर्व बिरारी यांनी सोशल मिडियाचा वापर करताना महिलांनी कोणती खबरदारी घ्यावी व सुरक्षा प्रणाली कशी कार्यान्वित करावी, यावर विचार मांडले. यावेळी महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान पत्र देऊन सत्कार करण्यात आला. महाविद्यालयात नुकतेच गेल्या शैक्षणिक सत्र परीक्षेच्या निकालात अव्वलस्थानी उत्तीर्ण झालेल्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पटेल अभियांत्रिकीच्या 'विमेन ॲण्टी हरॅसमेंट सेल'ने समन्वयन केले तर सूत्रसंचालन डॉ. प्रीती सांजेकर यांनी केले.

Dhule Edition
Mar 13, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

लोकमत 13/03/2025



लायब्ररीचे उद्घाटन करताना राजगोपाल भंडारी समवेत अतुल भंडारी, संचालक डॉ. जे. बी. पाटील, डॉ. प्रमोद देवरे, डॉ अमृता भंडारी, डॉ. स्मितल पाटील आदी.

# विद्यार्थ्यांना परदेशातही नोकरीच्या संधी मिळणार

## पटेल अभियांत्रिकीत फॉरेन लँग्वेज लायब्ररीचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीमध्ये तंत्रज्ञानाच्या शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना इतर कौशल्य आत्मसात करवून देण्यासाठी, अनेक कौशल्य आधारित विकास कक्षांची उभारणी केली आहे. याच प्रमाणे भाषिक कौशल्य विकसित होण्याकरिता आणि त्याद्वारे परदेशात नोकरी आणि उच्च शिक्षणाची संधी प्राप्त करण्यासाठी फॉरेन लँग्वेज सेल आणि फॉरेन लँग्वेज लायब्ररीचे उद्घाटन शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात उच्च गुणवत्ताधारक अभियंते निर्माण करण्याचे कार्य करीत असताना विद्यार्थ्यांमध्ये रोजगार क्षमता तसेच उद्यमशीलता निर्माण होण्याकरिता निरनिराळे उपक्रम राबवत असते. येथून पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेले अनेक विद्यार्थी देश-विदेशात बहुराष्ट्रीय कंपनीत उच्चपदस्थ आहेत. यापुढे देखील फक्त देशातच नव्हे तर, परदेशात सुद्धा येथील विद्यार्थ्यांना नोकरी आणि उच्च शिक्षणाची संधी सहज प्राप्त करता यावी, या उद्देशाने वरील फॉरेन लँग्वेज सेल आणि फॉरेन लँग्वेज लायब्ररीची उभारणी आंतरराष्ट्रीय संबंध आणि उच्च शिक्षण समितीच्या अधिष्ठाता डॉ. स्मितल पाटील यांच्या समन्वयात करण्यात आली आहे.

**विद्यार्थ्यांमध्ये रोजगार क्षमता तसेच उद्यमशीलता निर्माण होण्याकरिता निरनिराळे उपक्रम राबवत असते.**

## परदेशात शिक्षणासह नोकरीसाठी मार्गदर्शन

फॉरेन लँग्वेज लायब्ररीच्या माध्यमातून परकीय भाषेचे ज्ञान आणि कौशल्य आत्मसात करवून देत मोठ्या स्तरावर हा उपक्रम पुढे नेण्यासाठी कौशल्य विकास कक्षाची उभारणी केली आहे.

**लायब्ररीच्या सहाय्याने नियमित प्रशिक्षण वर्ग, कार्यशाळा, तज्ज्ञांचे मार्गदर्शक व्याख्याने, जर्मन आणि जपानी भाषांवरील सत्रे, जीआरई, टीओईएफएल आणि आयईएलटीएस परीक्षांच्या तयारीसाठी तज्ज्ञांचे व्याख्याने होतील**

टी. सी. एस. इंदूर जेडीसी टीम द्विभाषिक उमेदवारांसाठी इंटर्नशिप, प्लेसमेंट आणि इतर शैक्षणिक संधींसाठी पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयासोबत सामंजस्य करार आणि सहकार्य करण्यास सकारात्मकपणे उत्सुक आहे.

### यांची होती उपस्थिती

टाटा कन्सल्टन्सीसे मॅनेजर मनीष मेहरा, तज्ज्ञ अभिषेक मौर्य, अतुल भंडारी, डॉ. जे. बी. पाटील, डॉ. प्रमोद देवरे, अमृता भंडारी उपस्थितीत होते. या उपक्रमाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आमदार अमरीशभाई पटेल, जयश्रीबेन पटेल, भूपेशभाई पटेल, राजगोपाल भंडारी, चिंतनभाई पटेल, रेषा पटेल, अतुल भंडारी, डॉ. जे. बी. पाटील, डॉ. पी. जे. देवरे, यांनी कौतुक केले.

Hello Dhule
Page No. 4 Mar 13, 2025
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

# देशोन्नती

## आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात 'कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष-२०२५' उपक्रमाचे उद्घाटन

देशोन्नती वृत्तसंकलन

**शिरपूर -** येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या डेटा सायन्स आणि ए.आय.एम.एल. विभागातर्फे एआयसीटीई, नवी दिल्ली येथून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार २०२५ हे वर्ष 'कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष' म्हणून साजरे करणाच्या उपक्रम हाती घेण्यात आला.

सदर उपक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी सावळदे येथील एन.एम.आय.एम.एस. चे प्राध्यापक डॉ. प्रवीण लोहारकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सध्या जागतिक स्तरावर सर्वच क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्ता आधारित तंत्रज्ञानास प्रचंड मागणी आहे. येणाऱ्या काळात देखील असे आत्याधुनिक तंत्रज्ञान ज्या देशाकडे असणार त्या देशाचे जागतिक स्तरावरील औद्योगिक क्षेत्राचे भवितव्य उज्वल असणार आहे यात शंका नाही. म्हणूनच ए.



आय. च्या क्षेत्रात भारतास देखील विश्वात अग्रगण्यस्थान मिळवून देण्याच्या उद्देशाने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई, नवी दिल्ली) तर्फे महत्वाची पाऊले उचलण्यात आली आहेत. भारतात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संबंधित जागरूकता, प्रसार, संशोधन, चर्चा, स्पर्धा आणि असे अनेक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात आयोजित व्हावीत यासाठी एआयसीटीई, नवी दिल्ली च्या सूचनेनुसार २०२५ हे 'कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष' म्हणून साजरे करण्याचे जाहीर करण्यात आले आहे. या अनुषंगाने आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या डेटा सायन्स आणि ए.आय.एम.एल. विभागातर्फे 'कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष' या उपक्रमाची सुरवात झाली. येत्या वर्षभरात या उपक्रम अंतर्गत विभागातर्फे राबविल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या कार्यक्रमांची सविस्तर माहिती विभाग प्रमुख डॉ. उज्वला पाटील यांनी उपस्थितांना दिली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. लोहारकर यांनी विद्यार्थ्यांना 'नो कोडिंग' आणि भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात निर्माण होणाऱ्या नोकरींच्या संधींबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास विभागाच्या सर्वच वर्षातील विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भारताला विश्वगुरू बनविण्याच्या मनोदयाला अनुसरून उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांनी ए. आय. पुष्टीकरण प्रतिज्ञा देखील घेतली.

२०२५ हे वर्ष 'कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष' म्हणून साजरे करणासाठी शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, ट्रस्टी सौ. जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या.

Dhule Edition
Mar 11, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

**पुण्य नगरी** 10/03/2025

## आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत 'फॉरेन लँग्वेज लायब्ररीचे' उद्घाटन



**शिरपूर :** येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत तंत्रज्ञानाच्या शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना इतर कौशल्य आत्मसात करवून देण्यासाठी विविध कौशल्य आधारित विकास कक्षांची उभारणी केली आहे. याच प्रमाणे भाषिक कौशल्य विकसित होण्याकरिता आणि त्याद्वारे परदेशात नोकरी आणि उच्च शिक्षणाची संधी प्राप्त करण्यासाठी 'फॉरेन लँग्वेज सेल' आणि 'फॉरेन लँग्वेज लायब्ररीचे' उद्घाटन शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इंदूर येथील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसच्या जापनीज डेव्हेलप्मेंट सेंटरचे प्रोग्राम मॅनेजर मनीष मेहरा, एन २ स्तरावरील वरिष्ठ द्विभाषिक तज्ञ अभिषेक मौर्य, संस्था संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. प्रमोद देवरे, अधिष्ठाता अमृता भंडारी आदी उपस्थित होते. 'फॉरेन लँग्वेज सेल' आणि 'फॉरेन लँग्वेज लायब्ररी'ची उभारणी 'आंतरराष्ट्रीय संबंध आणि उच्च शिक्षण' समितीच्या अधिष्ठाता डॉ. स्मितल पाटील यांच्या समन्वयात करण्यात आली. या उपक्रमाबद्दल शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी समाधान व्यक्त केले.



आज संपूर्ण जगात भारतीय अभियंत्यांचा बोलबाला असून जगातील विकसित देश जर्मनी, जपान अमेरिका, ब्रिटन आणि अशा विविध देशांमधील उद्योगांमध्ये भारतीय अभियंत्यांना मागणी आहे. परंतु ही संधी मिळवण्याकरिता तंत्रज्ञानाच्या शिक्षणासोबतच तेथील भाषा आणि संवाद कौशल्य येणे अनिवार्य असते. म्हणून त्या त्या देशाच्या भाषेत संवाद करू शकणाऱ्या विद्यार्थ्यांना तेथे निवड होण्याची शक्यता अधिक असते. तसेच परदेशातील नामांकीत विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना देखील त्या देशाची भाषा अडसर ठरू शकते. बऱ्याच वेळा या भाषिक कौशल्याच्या अभावामुळे संधी हुकु शकतात. म्हणूनच महाविद्यालयातर्फे यापूर्वीच विद्यार्थ्यांना जर्मन आणि जापानी भाषेचे प्रशिक्षण देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. यामार्फत आज अनेक विद्यार्थी थेट जर्मनी, जापान आणि इतर विकसित देशांमध्ये उच्च शिक्षण, नोकरी आणि व्यवसायानिमित्त स्थायिक झाले आहेत.

**-डॉ. जे. बी. पाटील,** संचालक

Dhule Edition
Mar 10, 2025 Page No. 06
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्य नगरी 10/03/2025

# महापुरुषांच्या पुतळ्यांची केली स्वच्छता

## आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उपक्रम

**शिरपूर :** येथील आर. सी. पटेल स्वायत्त दर्जा प्राप्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल इंजिनिअरींग विभागाच्या विद्यार्थ्यांनी शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यांची स्वच्छता केली. यासाठी सन्मान मोहीम हाती घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी समाजप्रबोधन आणि स्वच्छतेचा संदेश या उपक्रमातून दिला.



महाविद्यालयाच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन स्तरावर 'मेसा ग्रूप' मेकॅनिकल इंजिनिअरिंग स्टुडटंस असोसिएशनची स्थापना केली असुन, या ग्रूप अंतर्गत विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. याच उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी शहरातील थोर व्यक्तींच्या पुतळ्यांची स्वच्छता आणि स्मारकांच्या आजूबाजूचा परिसर देखील स्वच्छ केला. यात राजपूत वाड्यातील महाराणा प्रताप पुतळा, शिवाजी मार्केट येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, वरवाडे येथील महात्मा ज्योतिबा फुले पुतळा आणि धान्य मार्केट मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा या ठिकाणी स्वच्छता व सन्मान मोहीम राबविली. या उपक्रमात यश मेघराज पवार, राजपूत भागेश चंद्रकांत, राजपूत रोहित केवलसिंग, जय वाणा माळी, राजपूत कृष्णा निंबासिंग हे विद्यार्थी सहभागी झाले होते. विभागप्रमुख प्रा. पी. एल. सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'मेसा ग्रूप'चे समन्वयक प्रा. प्रदीप जमादार यांनी संयोजन केले. महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांनी कौतुक केले.

Dhule Edition
Mar 10, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

सकाळ 04/02/2025

# अभियंत्यांनो, विकसित भारताची स्वप्नपूर्ती करा

## राजगोपाल भंडारी : पटेल अभियांत्रिकीत 'कन्व्हर्जेस २०२५' ला प्रतिसाद

**सकाळ वृत्तसेवा**



**शिरपूर :** कन्व्हर्जेस तंत्र महोत्सवाचे उद्घाटन करताना राजगोपाल भंडारी, संचालक डॉ. जे. बी. पाटील व पदाधिकारी.

शिरपूर, ता. ३ : भारताच्या विकासाची गती पाहता लवकरच आपण विकसित राष्ट्र म्हणून सुस्थापित होणार आहोत. या लक्ष्यपूर्तीत अभियंत्यांचे स्थान खूप महत्त्वाचे असणार आहे. भावी युवा अभियंत्यांनी तंत्रज्ञानाचे कौशल्य व अद्ययावत शिक्षण आत्मसात करुन संशोधन करीत विकसित भारताची स्वप्नपूर्ती करावीत, असे आवाहन शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांनी केले.

येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे आयोजित 'कन्व्हर्जेस २०२५' या राष्ट्रीय तंत्र महोत्सवाचे उद्घाटन करताना ते बोलत होते. इंदूर येथील 'टीसीएस'च्या जापनीज डेव्हलपमेंट सेंटरचे व्यवस्थापक मनीष मेहरा, एन २ स्तरावरील वरिष्ठ द्विभाषिक तज्ज्ञ अभिषेक मौर्य, दुबई येथील पावर हाउस ग्लोबल सर्व्हिसेसचे कृष्णा पाटील, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, विभागप्रमुख, अधिष्ठाता उपस्थित होते.

### दोन हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

तंत्रज्ञान महोत्सवातील विविध स्पर्धांमध्ये एकूण दोन हजार १९९ विद्यार्थ्यांनी सहभाग अनस्टॉप पोर्टलवरून नोंदविला. विद्यार्थी कल्याण विभागाच्या अधिष्ठाता डॉ. अमृता भंडारी, प्रा. संदीप सोनवणे, डॉ. के. ए. सनेर, विद्यार्थी समन्वयकांमधून चिन्मय खैरनार, निनाद पाटील व दीक्षिता पाटील यांनी संयोजन केले. विविध कंपन्यांचे प्रायोजकत्व महोत्सवाला लाभले.

### विजेत्यांना पारितोषिके

सेरेब्रल निमेव्हर्स, म्युगल मिस्ट्री, स्क्विड मेझ, ब्रिज मेकिंग, बोट फ्लोट, ट्रेड टेक, इलेक्ट्रो टॉय, ब्रेन चार्ज, वॉटर रॉकेट चॅलेंज आदी स्पर्धांमधील विजेत्यांना संस्थेच्या सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

Dhule, Dhule-Today
04/03/2025 Page No. 3

पुण्य नगरी

# युवा अभियंत्यांनी विकसित भारताची स्वप्नपूर्ती हेच ध्येय मानावे

## राजगोपाल भंडारी : आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत 'कन्व्हर्जेस'ला उत्स्फूर्त प्रतिसाद



**शिरपूर** : भारताच्या विकासाची गती बघता नजीकच्या काळात आपण विकसित राष्ट्र म्हणून लवकरच उदयास येत आहोत. म्हणून युवा अभियंत्यांनी विकसित भारताची स्वप्नपूर्ती हेच आपले ध्येय ठेऊन तंत्रज्ञानाचे कौशल्य आणि शिक्षण आत्मसात करून संशोधन करावे, असे प्रतिपादन शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांनी केले.

आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे आयोजित 'कन्व्हर्जेस २०२५' या राष्ट्रीय तांत्रिक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. इंदूर येथील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसच्या 'जापनीज डेव्हेलपमेंट सेंटर'चे प्रोग्राम मॅनेजर मनीष मेहरा, एन २ स्तरावरील वरिष्ठ द्विभाषिक तज्ञ अभिषेक मौर्य, दुबई येथील पावर हाउस ग्लोबल सर्व्हिसेसचे कृष्णा पाटील, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे, सर्व विभागप्रमुख, विविध समितीचे अधिष्ठाता. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. तंत्रज्ञान उत्सवातील विविध स्पर्धेत २१९९ विद्यार्थ्यांनी 'अनस्टॉप पोर्टल' वरून सहभाग नोंदविला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यार्थी कल्याण विभागाच्या अधिष्ठाता डॉ. अमृता भंडारी, प्रा. संदीप सोनवणे, डॉ.के.ए. सनेर, विद्यार्थी समन्वयकांमधून चिन्मय खैरनार, निनाद पाटील, दिक्षिता पाटील यांनी प्रयत्न केले. टेक्निकल फेस्टिवलसाठी दुबई येथून पावर हाउस ग्लोबल सर्व्हिसेस मुख्य प्रायोजक म्हणून तर बेंगलोरस्थित कोडशेफ, कोल्हापूर येथून टॅलेंट बॅट्ल, मुंबई येथील कॅम्पस क्रेडेन्शिअल, छत्रपती संभाजी नगर येथून मेटारोल, इंदोरस्थित बुक्झी एज्युफाई, नाशिक येथून टी अँण्ड डी इन्फ्रा एनर्जी आणि शिरपूरस्थित कीस्टोन आर्किटेक्चर हे सहप्रायोजक म्हणून लाभले.

### विजेत्यांना पारितोषिक वितरण

स्पर्धेतील विजेत्यांमध्ये सेरेब्रल ॲनिमेव्हर्समध्ये हेरंब चौधरी, ओजस्विनी बोरसे, ऋषी पाटील, साहिल सोनवणे यांना प्रथम पारितोषिक, डोंगरसिंग पाटील, ओम बोरले, हर्षदा चव्हाण, मोहिनी पाटील यांना द्वितीय पारितोषिक, शुक्ला ओम, रामकृष्ण गिरासे, रुपेश खैरनार, पवन गुजरात यांना तृतीय पारितोषिक, म्युगल मिस्ट्रीमध्ये श्रावणी पाटील, समिक्षा पाटील, हर्षल चौधरी, महेश पाटील यांना प्रथम पारितोषिक, राकेश शेवाळे, सेजल वाघ, खुशाल पाटील, विशाल मराठे यांना द्वितीय पारितोषिक, पूर्वा शिंपी आर.सी.पटेल पॉलिटेक्निक, प्रविणितु शिरसाठ, रोशनी पाटील, मनन मित्तल यांना ततीय पारितोषिक. कोडक्रेझमध्ये जय पाटील, अदनान कुरेशी, गौरव बोरसे, आकांक्षा बोरसे यांना प्रथम पारितोषिक, आदित्य भावसार, सिद्धेश जाधव, हिमांशू पवार, उत्कर्ष सोनवणे यांना द्वितीय पारितोषिक, काजल देवरे, तुषार शिंपी, कृष्णा पाटील, साहिल देवरे यांना तृतीय पारितोषिक, स्क्विड मेझमध्ये निखिल भालकर, भूपेश चौधरी, जिग्नेश देवरे, निकिता सैंदाणे यांना प्रथम पारितोषिक, हेमाली फिरके, श्रुती मराठे, हर्षदा मोरे, राजेश्वरी शुक्ला यांना द्वितीय पारितोषिक, निपुण वाणी, सर्वेश वाणी, यश बाफना, राज महाजन यांना तृतीय पारितोषिक, ब्रिज मेकिंगमध्ये तेजस तुसे, वैभव खतळे यांना प्रथम पारितोषिक. हंसराज धनगर, सुमित भावसार, काजल निकुंभे, वृषभ चव्हाण यांना द्वितीय पारितोषिक, अमन सैंदाणे, धिरज पाटील, कुणाल पाटील, कौस्तुभ पाटील यांना तृतीय पारितोषिक, बोट फ्लोटमध्ये गौतम खंडारे, शंतनू पाटील, शिवम वाडीले, अनुराग पवार यांना प्रथम पारितोषिक, सिद्धिका राठोड, जयेश पवार, खुशी सिसोदे, अनुराग शहा यांना द्वितीय पारितोषिक, श्रद्धा पाटील, भारती पाटील, प्रियंका सूर्यवंशी यांना तृतीय पारितोषिक, ट्रेड टेकमध्ये अनिश मौर्य प्रथम पारितोषिक, ओम आव्हाड द्वितीय पारितोषिक, प्रफुल्ल भामरे तृतीय पारितोषिक, इलेक्ट्रो टॉयमध्ये कोमल कमावत. यशोदीप मोरे, जयकुमार गिरासे, चिन्मय चव्हान यांना प्रथम पारितोषिक, निलेश मगर, महेश निकम, दिनेश वाडीले, महेंद्र महाजन यांना द्वितीय पारितोषिक, हर्षल चौधरी, गौरी सोनार, प्रजन्या गुळवे, विजय गोसावी यांना तृतीय पारितोषिक, ब्रेन चार्ज मध्ये परिणिती पाटील, दीप्ती वाघ, सुशांत सोनगीरे,पूजा पाटील यांना प्रथम पारितोषिक, प्रणव कुमार, तेजस पंचभाई, प्रणव शिरसाट, हर्षल पाटील यांना द्वितीय पारितोषिक, हितेश वारुडे, प्रमोद पाटील, यश खैरे, चेतन भामरे यांना तृतीय पारितोषिक, वॉटर रॉकेट चॅलेंजमध्ये चेतन वारुळे, हितेश परदेशी, ऋषिकेश ठाकरे, जयेश पाटील यांना प्रथम पारितोषिक, निलेश माळी, राहुल निकम, चेतन महुले, दिग्विजय गिरासे यांना द्वितीय पारितोषिक, सुमित चौधरी, तन्मय महाजन, कल्पेश राजपूत, उज्ज्वल जाधव यांना तृतीय पारितोषिक, एरो ग्लाइडिंग मध्ये धीरज पाटील. अथर्व पाटील, गौरव चौहान, मंगेश चौधरी यांना प्रथम पारितोषिक, नितेश महाजन, राहुल निकम, सचिन सनेर, दिग्विजय गिरासे यांना द्वितीय पारितोषिक, गौरव पाटील निखिल पाटील, कृष्णा राजपूत यांना तृतीय पारितोषिक, गुगलर मध्ये कोमल भामरे, हर्षदा भोई प्रथम पारितोषिक, हितेश पाटील, रोहित जाधव यांना द्वितीय पारितोषिक, पुष्पराज पाटील, मनोज चव्हाण यांना तृतीय पारितोषिक, रोबो फिफा मध्ये रुद्र पंड्या, शिवम पटेल, जय जिल्का, शिखर शाह यांना प्रथम पारितोषिक, रौनक जाधव, गौरव खांडे, चैतन्य पाटील यांना द्वितीय पारितोषिक, सिद्धी शिंपी, मंदार पाटील, अनारिया सोनवणे यांना तृतीय पारितोषिक, द लास्ट प्लेयर मध्ये मयूर मराठे प्रथम पारितोषिक, कलरवेव्ह मध्ये रिया निकम प्रथम पारितोषिक, दिशा बत्तीसे द्वितीय पारितोषिक, मयूर समुद्रे तृतीय पारितोषिक, ग्रीनोवेषण मध्ये भाविका गंडियाल. जह्नी. कर्सीजा यांना प्रथम पारितोषिक, चेतन सोनवणे यांना द्वितीय पारितोषिक, शार्क टँक मध्ये जय गिरासे, खुशी अहिरे, राज बारी, विनीत बारी, वैष्णवी भावसार यांना प्रथम पारितोषिक, स्नेहा कोतकर, उमेश चौधरी, रोहित लोहार, उमेश भामरे यांना द्वितीय पारितोषिक, तुषार सूर्यवंशी (पीच ऑफ डे) यांचा समावेश आहे. विजेत्यांना शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, डॉ. जे.बी. पाटील, डॉ. पी.जे. देवरे यांच्या हस्ते रोख पारितोषिक, सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, प्रयोजकांतर्फे भेटवस्तू देण्यात आली. उपक्रमाबद्दल शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, डॉ. जे.बी. पाटील, डॉ. पी.जे. देवरे यांनी कौतक केले.

Dhule Edition
Mar 03, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

पुण्य नगरी 28/02/2025

# आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीचे विद्यार्थी रोबोरेस स्पर्धेत अव्वल

**शिरपूर ।** येथील आर. सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकम्युनिकेशन्स, डाटा सायन्स आणि मेकॅनिअकल विभागाच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी संजीवनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोपरगाव येथे नुकतेच आयोजित केलेल्या 'टेक-संजीवनी २०२५', टेक फेस्टच्या रोबोरेस स्पर्धेत पहिला, दुसरा आणि तिसरा क्रमांक पटकावून स्पर्धेत निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले.



सध्या तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये दुसरे शैक्षणिक सत्र सुरु आहे आणि या सत्रात तंत्रज्ञानावर आधारित स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. संजीवनी तंत्रज्ञान महाविद्यालय, कोपरगाव, यांच्याकडून टेक फेस्ट २०२५ चे आयोजन करून विविध स्पर्धा भरविण्यात आल्या होत्या. तसेच यामध्ये रोबोरेस एक स्वयंचलित रोबोटवर आधारित स्पर्धेत एकूण ३५ संघ सहभागी झाले होते.

या रोबोरेस स्पर्धेत आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकम्युनिकेशन्स विभागाच्या स्पर्धकांनी स्वतः रेसिंग रोबोट्स तयार केले होते. स्पर्धक विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रतिस्पर्धी समूहावर मात करून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावून संस्थेचा गौरव वाढविला. या स्पर्धेत विविध प्रकारची बॉट्सची (रेसिंग प्रकार) स्पर्धकांकडून वापरण्यात आली होती. संघातील प्रत्येक सदस्याने आपली भूमिका जबाबदारीने पार करून यश संपादित केले. यामुळे पटेल अभियांत्रिकीच्या समूहाने उत्कृष्ट नियंत्रण, वेग आणि अचूकता यामुळे शानदार कामगिरी करत प्रथम, द्वितीय, तृतीय अशी पहिल्या तीनही स्थानांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. रोबोरेस स्पर्धेत सुमित गिरासे, राज बारी, प्रथम चव्हाण, वैष्णवी भावसार यांच्या संघास प्रथम क्रमांक, प्राची गुजर, श्रद्धा चव्हाण, सानिका पाटील, देवयानी बोरसे, दुर्गेश राजपूत यांच्या संघास द्वितीय क्रमांक, चैताली सैंदाणे, लोकेश पाटील, गौरव कदम, डिंपल बडगुजर यांना तृतीय क्रमांक, प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. विजेत्या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक, विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतूक केले.

Dhule Edition
Feb 28, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

शिल्पकार विकासाचा...
देशदूत 26/02/2025
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
26 Feb 2025 - Page 6

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत उद्यापासून राष्ट्रीय परिषद

■ शिरपूर । प्रतिनिधी

येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीमध्ये कन्व्हर्जेस २०२५ या राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक परिषदेचे २७ व २८ फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले आहे.

शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे. या वेळी इंदूर येथील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसच्या, जापनीज डेव्हेलप्मेंट सेंटरचे प्रोग्राम मॅनेजर मनीष मेहरा, एन २ स्तरावरील वरिष्ठ द्विभाषिक तज्ज्ञ अभिषेक मौर्य, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असल्याचे परिषदेचे समन्वयक व महाविद्यालयाचे उपसंचालक डॉ. प्रमोद देवरे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात विकसित होणाऱ्या नवनवीन प्रवाहांची ओळख व्हावी, त्यामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांचा समर्थपणे सामना करण्याची क्षमता त्यांच्यात यावी तसेच विद्यार्थ्यांना नवकल्पना व संशोधन मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे या उद्देशाने आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे दरवर्षी कन्व्हर्जेस या राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक परिषदेचे उत्कृष्ठ पद्धतीने आयोजन करते. यावर्षी देखील महाविद्यालयाच्या आयोजन समितीद्वारे कन्व्हर्जेस २०२५ या होऊ घातलेल्या कार्यक्रमाचे सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नियोजन केले आहे. याचबरोबर उपस्थित असलेल्या मान्यवरांच्या हस्ते फॉरेन लँग्वेज सेल आणि फॉरेन लँग्वेज लायब्ररीचे अनावरण होणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर उच्च शिक्षण किंवा बहुराष्ट्रीय कंपनीत नोकरीची संधी प्राप्त व्हावी यासाठी परकीय भाषेचे ज्ञान आणि कौशल्य आत्मसाद असणे ही काळाची गरज बनली आहे. ही बाब ओळखून महाविद्यालयातर्फे फार आधीपासूनच शेकडो विद्यार्थ्यांना जर्मन आणि जापानी भाषेचे प्रशिक्षण दिले जात आहे.



विद्यार्थ्यांनी त्यांना रुची आणि आकर्षण असणाऱ्या तंत्रज्ञानाचा उपयोग व्यावहारिक आणि सामाजिक जीवनात करीत असतांना सर्जनशीलता, नाविन्यता, कल्पकता, सौंदर्य आणि नैतिकता हा भाव जोपासत देश आणि समाजाच्या प्रगतीस हातभार लावावा तसेच परस्पर सहकार्यातून नोरोगी स्पर्धा करीत उत्कृष्टता आणि प्राविण्य प्राप्त करावे यासाठी आम्ही प्रत्येक वर्षी 'कन्व्हर्जेस' या तंत्र परिषदेचे आयोजन करीत असतो. हजारोच्या संख्येने विद्यार्थी सहभागी होऊन लाखो रुपयांची बक्षिसे देखील प्राप्त करीत असतात. या वर्षी देखील २७ ते २८ फेब्रुवारी रोजी या तंत्र उत्सवात राज्यातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे. -डॉ. जे.

आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीद्वारे तंत्रज्ञातील निरनिराळ्या क्षेत्रातील आवड आणि रुची असणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना कन्व्हर्जेस २०२५ या कार्यक्रमात सहभागी करून तंत्रज्ञाचा उत्सव घडवून आणण्याचा मानस ठेवला आहे. तंत्र परिषदेच्या जाहिरात आणि प्रसिद्धी समितीत असणारे विद्यार्थी-स्वयंसेवक परिसरातीलच नव्हे तर राज्यातील अनेक भागातील महाविद्यालयांत पोहचून या तंत्र परिषदेची माहिती व आमंत्रण तेथील विद्यार्थ्यांना सादरीकरण, भित्तीपत्रक, निमंत्रण पत्रिका आणि इतर माध्यमांद्वारे देत आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करण्यासाठी https://converges.rcpit.ac.in/ ही लिंक देखील प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामुळे मोठ्या संख्येने वेगवेगळ्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी होऊन आपले तंत्रज्ञाचे कौशल्य प्रदर्शित करतील. विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनासह तंत्रज्ञानातील नाविन्यता व परस्परांतील समन्वयावर भर देत या स्पर्धेच्या जगात कसे टिकावे हे अनुभवण्याची संधी याद्वारे प्राप्त होणार आहे. यात एरो ग्लाइडिंग आणि म्युगल मिस्ट्रीचे, ब्रेन चार्जचे आणि सेरेब्रल निमेव्हर्स, इलेक्ट्रो टॉय आणि मॉडेल मेकिंग, द लास्ट प्लेयर, वॉटर रॉकेट चॅलेंज, ट्रेड टेक, बोट फ्लोट, गुगलर, स्किड मेझ, ब्रिडगोमॅनिया, कोडक्रेझ आणि रोबो फिफा या मुख्य स्पर्धा आणि खेळांचे आयोजन सर्जनशीलता, समस्या सोडवणे आणि सहयोगी शिक्षणासाठी सर्वसमावेशक मानवी मूल्य आणि नैतिकता यांच्या विकासासाठी असे विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. या स्पर्धामधील विजेत्यांना एकूण २ लाख रुपयांची पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. या परिषदेसाठी राज्यभरातून विविध अभियांत्रिकी तसेच तंत्रनिकेतन महाविद्यालयातील तीन हजारहून अधिक विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी केली असल्याची माहिती या परिषदेचे प्रसिध्दी प्रमुख प्रा.सुहास शुक्ल व रजिस्ट्रार डॉ. प्रशांत महाजन यांनी दिली आहे.

**लोकमत 25/02/2025**



पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनात नृत्याविष्कार सादर करताना विद्यार्थी, विद्यार्थिनी.

## पटेल अभियांत्रिकीत स्नेहसंमेलन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे रिफ्लेक्शन थीमवर आधारित वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाचे उद्घाटन शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांच्या हस्ते झाले. तसेच कनव्हर्जस-२५ या तंत्र उत्सव भित्तिपत्रकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे बी. पाटील, उपसंचालक डॉ. प्रमोद देवरे, सर्व विभागप्रमुख, मुख्य परीक्षा नियंत्रक, विविध समित्यांचे अधिष्ठाता व रजिस्ट्रार प्रशांत महाजन उपस्थित होते. फार्मसी महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनात राष्ट्रीय, राज्यस्तरीय व विद्यापीठस्तरीय स्पर्धांमध्ये विविध क्रीडा प्रकारात नैपुण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

### विद्यार्थ्यांनी सादर केले विविध कलाविष्कार

महाविद्यालयाच्या 'अंतर्नाद' या संगीत आणि गायन कलेच्या समूहातर्फे सादर करण्यात आलेली समूह गाणी, याचसोबत वाद्यवादन, बासरी वादन, पोवाडा, पारंपरिक मराठी गाण्यांपासून, सध्या प्रचलित व हीट असलेल्या अनेक बॉलिवूड गीतांच्या तालावर सादर झालेल्या बहारदार नृत्याविष्कारांनी उपस्थितांना खिळवून ठेवले. या वर्षातील अनेक हिट चित्रपटातील तसेच पंजाबी, रॅप आणि रिमिक्स गाण्यावर सादर झालेल्या नृत्यांना प्रेक्षक, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी समुहनृत्याने प्रतिसाद देत प्रचंड दाद दिली. सुमारे तीन तास चाललेल्या या संगीतमय सांस्कृतिक कार्यक्रमात भारतीय व पाश्चात्त्य संगीताच्या तालावर नृत्याचा मनसोक्त आनंद लुटणाऱ्या तरुणाईच्या उत्साहाला व जल्लोषाला उधाण आले होते. उपस्थितांची उत्स्फूर्त दाद लाभली.

### रंगमंच ठरला लक्षवेधी

कलात्मकरीत्या उभारलेले रंगमंच, नेत्रदीपक प्रकाश योजना व उत्कृष्ट ध्वनी यंत्रणा यामुळे स्नेहसंमेलनाची भव्यता कोल्ड-प्ले सारख्या म्युझिक कॉन्सर्ट फंक्शनसारखीच होती. उत्तोरोत्तर रंगलेल्या नृत्याविष्कारांनी कार्यक्रमाची उंची वाढतच गेली.

### यांचे लाभले सहकार्य

स्नेहसंमेलनात सहभागी विद्यार्थ्यांनी मोठा जल्लोष केला. सूत्रसंचालन मानसी बेंडाळे, जागृती देसले, दिव्या भामरे, जिया पटेल यांनी, तर आभार प्रदर्शन श्रुती पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी सहायक परीक्षा नियंत्रक प्रा. विजय सूर्यवंशी, अधिष्ठाता डॉ. अमृता भंडारी, रिफ्लेक्शन क्लब, सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

Hello Dhule
Page No. 3 Feb 25, 2025
Powered by: erelego.com

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
धुळे आवृत्ती
epaper.deshdoot.com
24 Feb 2025 - 7

## प्रा.पंकज पाटील यांना पीएच.डी

■ शिरपूर । प्रतिनिधी



शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी विभागात कार्यरत असलेले प्रा. पंकज रामभाऊ पाटील यांना एमिटी युनिव्हर्सिटी, मुंबई (महाराष्ट्र), येथून संगणक अभियांत्रिकी विभागांतर्गत डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर करून अचूक स्टॉक मार्केट अंदाजासाठी प्रभावी फ्रेमवर्कची रचना आणि विकास हा त्यांच्या संशोधनाचा मुख्य विषय होता. या कामी त्यांना एमिटी युनिव्हर्सिटी, मुंबई येथील संगणक अभियांत्रिकी विभागातील प्रा. डॉ. दीपा परासर यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. या संशोधन कार्यात प्रा. पाटील यांना त्यांचे विभाग प्रमुख डॉ.आर.बी.वाघ आणि सहकारी प्रध्यापकांचे विशेष सहकार्य लाभले. या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजीमंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी सौ. जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, डॉ.जे.बी.पाटील, डॉ.पी.जे.देवरे आदींनी कौतूक केले आहे.

पुण्य नगरी 22/02/2025

# आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या १५ विद्यार्थ्यांची निवड

**शिरपूर** : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीमध्ये बिल्ड आय.एन.टी. तर्फे प्रथमच झालेल्या कॅम्पस प्लेसमेंटच्या प्रक्रियेतून महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील १५ विद्यार्थ्यांची प्रीप्लेसमेंट ऑफर अंतर्गत सॉफ्टवेअर डेव्हलपर इंटर्न आणि डेटा विश्लेषक इंटर्न म्हणून निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली. तीन स्तरावर झालेल्या या निवड प्रक्रियेत सुरवातीला बुद्धिमत्ता चाचणी, तांत्रिक मुलाखत व शेवटी एच. आर. राउंड झाला. यात जोशी सानिका विजय,



भावसार नेहा राजेश, बागल अनुष्का अविनाश, जैन प्रसन्नजीत देवेंद्र, बावा कृतिक्षा भाऊसाहेब, जाधव ओम बाळकृष्ण, पाटील ईशा भाऊसाहेब, भोई संस्कृती रमेश, चव्हाण जानव्ही गजानन, पाटील दुर्गेश विकास, पाटील उदय सुधाकर, चौधरी अविनाश गजानन, महाजन रुचिता ललित, फेगडे लोकेश मनोज, बेडसे राजश्री आनंदा या विद्यार्थ्यांची निवड झाली. कॅम्पस प्लेसमेंट यशस्वितेसाठी ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी प्रा. एम.पी. जैन, प्रा. के.पी. राणे, प्रा. एम.जे. पाटील, प्रा. व्ही.व्ही. पटेल, प्रा. के.डी. देवरे यांनी प्रयत्न केले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, मुख्य परीक्षा नियंत्रक यांनी कौतूक केले.

Dhule Edition
Feb 22, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

देशोन्नती

# आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीची विद्यार्थिनी चेतना सोनवणे हिच्या काव्य संग्रहाचे प्रकाशन

देशोन्नती वृत्तसंकलन



**शिरपूर** - येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन विद्याशाखेतील द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी चेतना रणजित सोनवणे हिच्या 'माझ्या मनाची लेखणी' या कविता संग्रहाचे प्रकाशन आळंदी देवाची येथे आयोजित तृतीय राज्यस्तरीय शिव बाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलनात प्रसिद्ध पत्रकार सुधीर गाडगीळ व ज्येष्ठ कवयित्री सुमती पवार यांच्या हस्ते झाले. पुणे जिल्ह्यातील संत ज्ञानेश्वर महाराजांची आळंदी येथे शिवचर्यणउज्जैनकर फाउंडेशन, मुक्ताईनगर आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तिसरे राज्यस्तरीय शिव बाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनात राज्यभरातील नामवंत साहित्यिक, कवी आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्यातील उदयोन्मुख युवा आणि बाल साहित्यिक आणि कवी यांनी देखील आप आपले साहित्य सादरीकरणाची संधी प्राप्त केली. यात आर. सी. पटेल या स्वायत्त अभियांत्रिकीची विद्यार्थिनी तसेच शिरपूर येथील रहिवासी चेतना रणजित सोनवणे हिच्या 'माझ्या मनाची लेखणी' या कविता संग्रहाचे वाचन आणि प्रकाशन करण्यात आले. लहानपणापासून वाचनाची आणि काव्य लेखणाची आवड असलेल्या चेतनाचा नवोदित कवयित्री म्हणून साहित्य क्षेत्रातील इयत्ता ७ वी पासूनच सुरु होऊन तिने तिचा स्वतःचा शालेय जीवनात तसा वेगळा ठसा उमटवला होता. सदर काव्य संग्रह 'माझ्या मनाची लेखणी' यात तीने आईवडील, नातेवाईक, निसर्ग, स्वातंत्र्य सैनिक, भावना, विनोद आणि अध्यात्म यांसारख्या विविध विषयांवरील कवितांची निर्मिती केली आहे. साधी, सरळ व विषयाची भावनिक मांडणी हे तिच्या कवितांचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

Dhule Edition
Feb 22, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

**पुण्य नगरी** 18/02/2025

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या १४ विद्यार्थ्यांची निवड



**शिरपूर** : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या आवारातच ॲप्मोसीस टेक्नॉलॉजीज प्रा. लि.तर्फे झालेल्या कॅम्पस प्लेसमेंटच्या प्रक्रियेतून महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या १४ विद्यार्थ्यांची असोसिएट सिस्टीम इंजिनिअरपदी निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील यांनी दिली.

कंपनी व पटेल अभियांत्रिकी, शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले होते. यात महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमातील अंतिम वर्षाचे विद्यार्थी ज्यांना पदवी अभ्यासक्रमाच्या प्रत्येक वर्षी ६० टक्के गुण आहेत असे विद्यार्थी पात्र होते. तीन स्तरावर झालेल्या या निवड प्रक्रियेत सुरवातीला बुद्धिमत्ता चाचणी, तांत्रिक मुलाखत व शेवटी एच. आर. राउंड झाला. त्यात अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षातील पवार रोहन किशोर, भालकर निखिल सुकलाल, राजपूत तृप्ती सुनील, कलाल माधुरी दीपक, देवरे पुनम नागराज, चौधरी रुतुजा दुर्गेश, सोनवणे रुचिता प्रकाश, बाविस्कर नेहा बापू, बोरसे भाग्यश्री संदीप, चौधरी यश नितीन, दर्शन सुभाष खैरनार, शिंपी रुतिका गुलाब, शेजोळे कोमल प्रकाश, गोसावी स्वाती गजेंद्रगीर या १४ विद्यार्थ्यांची ॲप्मोसीस टेक्नोलोजीज प्रा. लि. कंपनीत असोसिएट सिस्टीम इंजिनिअर या पदावर निवड झाली. कॅम्पस प्लेसमेंटच्या यशस्वीतेसाठी ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी प्रा. एम.पी. जैन, प्रा. के. पी. राणे, प्रा. एम. जे. पाटील, प्रा. व्ही. व्ही. पटेल व डॉ. पंडित पाटील यांनी प्रयत्न केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा. सुहास शुक्ल, विभाग प्रमुख प्रा. डॉ. व्ही.एस. पाटील, प्रा. जी.व्ही. तपकिरे, प्रा. पी. एल. सरोदे, डॉ. एस. व्ही. देसले, डॉ. आर.बी. वाघ, डॉ. डी.आर. पाटील, डॉ. यू.एम. पाटील, डॉ. एस.ए. पाटील, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी प्रा. एम. पी. जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतूक केले.


Dhule Edition
Feb 18, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्य नगरी 17/02/2025

## आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत 'रिफ्लेक्शन' थीमवर स्नेहसंमेलनाचा जल्लोष





**शिरपूर** : आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे 'रिफलेक्शन' वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. महाविद्यालयाच्या 'आंतर्नाद' या संगीत आणि गायन कलेच्या समूहातर्फे सादर करण्यात आलेली समूह गाणी, याच सोबत वाद्य वादन, बासरी वादन, पोवाडा, पारंपारिक मराठी गाण्यांपासुन, सध्या प्रचलीत व हीट असलेल्या बॉलीवुड गितांच्या तालावर सादर झालेल्या बहारदार नृत्याविष्कारांनी उपस्थितांना खिळवून ठेवले. सुमारे तीन तास चाललेल्या या संगितमय सांस्कृतिक कार्यक्रमात भारतीय व पाश्चात्य संगिताच्या तालावर नृत्याचा मनसोक्त आनंद लुटणाऱ्या तरुणाईच्या उत्साहाला व जल्लोषाला उधाण आले होते.

शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. तसेच यावर्षी फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या महाविद्यालयाच्या 'कनव्हर्जस-२५' या तंत्र उत्सव भित्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.प्रमोद देवरे, सर्व विभागप्रमुख, मुख्य परीक्षा नियंत्रक, विविध समित्यांचे अधिष्ठाता आणि महाविद्यालयाचे रजिस्ट्रार प्रशांत महाजन उपस्थित होते. स्नेह संमेलनात राष्ट्रीय, राज्यस्तरिय व विद्यापीठ स्तरीय स्पर्धामध्ये विविध क्रीडा प्रकारात नैपुण्य मिळविलेल्या व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यात बॉक्सिंगसाठी रोहित सोनवणे, ओम देवरे, दर्शन माळी, यश येवले, क्रिकेटसाठी हितेश खाताळ, जय सोनवणे, पियूष खैरनार, भागेश राजपूत, फेन्सिंगसाठी ओम देवरे, रोहित सोनवणे, पंकज पाटील, सौरभ बडगुजर, रिया देशमुख, धनश्री चव्हाण, दर्शन कोळी, ॲथलेटिक्ससाठी रुपेश पाटील, व्हॉलीबॉलसाठी विनीत चौधरी, मानसी महाजन, फुटबॉलसाठी दिवेश पाटील, शूटिंगसाठी जयेश देवरे तसेच राष्ट्रीय योग स्पर्धेसाठी गिरासे वेदिका या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात 'आंतर्नाद' समूहातर्फे सादर करण्यात आलेल्या गणेश वंदना, स्वागत गीत आणि ईश्वर स्तवनाने झाली. उत्तोरोत्तर रंगलेल्या नृत्याविष्कारांनी कार्यक्रमाची उंची वाढतच गेली. प्रथम वर्षाच्या मोनीश चौधरी व ग्रुपने 'डोल्बिवाल्या' गीतावरील नृत्य, द्वितीय वर्षाची श्रुती पाटील आणि समूह यांनी 'उफ तेरी अदा', संस्कृती पवार आणि समृद्धी पवार या दोन्ही भगिनींनी 'शेप ऑफ यू..' या इंग्रजी गाण्यावर भारीतीय शास्त्रीय नृत्य, तृतीय वर्षातील मिहीर पाटील आणि ग्रुप यांनी खानदेशी बॉईज या संकल्पनेनुसार हास्य नृत्य सादर केले. तृतीय वर्षातीलच कामिनी राजपूत आणि ग्रुपने 'रक्तचरित्र' या शीर्षक गीतावर नृत्य सादर करून नवरसांपैकी एक भय आणि बीभत्स सादर करून सर्वांनाच भयभीत केले. रिफ्लेक्शन ग्रुपने 'मल्हारी' आणि इतर मिक्स गाण्यांवर सर्वांनाच ठेका घेण्यास भाग पडले. प्रथम वर्षातील प्रणव बोरसेने सुमधुर बासरी वादनामुळे वातावरण मंत्रमुग्ध केले. चारुदत्त शिर्के याने छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावरील स्वलिखित काव्य सादर केले. शेवटी दीप पाटील आणि समूहाने छत्रपती शिवाजी महाराज आणि अफजल खान यांची प्रतापगडाच्या पायथ्याशी झालेल्या भेटीच्या ऐतिहासिक घटनेवर पोवाडा सादर केला. सूत्रसंचालन मानसी बेंडाळे, जागृती देसले, दिव्या भामरे, जिया पटेल यांनी तर आभार प्रदर्शन श्रुती पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहाय्यक परीक्षा नियंत्रक प्रा. विजय सुर्यवंशी, अधिष्ठाता डॉ. अमृता भंडारी, रिफ्लेक्शन क्लब, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

Dhule Edition
Feb 17, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

दैनिक दिव्य मराठी
A Marathi Daily from Dainik Bhaskar Group
17/02/2025

सांस्कृतिक • आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत 'रिफ्लेक्शन' संकल्पनेवर तीन तास स्नेहसंमेलन

## बासरीवादन, पोवाड्यासह काव्य सादरीकरणातून जल्लोष

प्रतिनिधी | शिरपूर

शहरातील आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अभियांत्रिकी महाविद्यालयात रिफ्लेक्शन वार्षिक स्नेहसंमेलन झाले. महाविद्यालयातील अंतर्नाद समूहातर्फे विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात समूह गाणी, वाद्य वादन, बासरीवादन, पोवाडा आदी कार्यक्रमांचा समावेश होता. सुमारे तीन तास कार्यक्रम सुरू होता.

शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. महाविद्यालयाच्या 'कनव्हर्जस-२५' या तंत्र उत्सव भित्तिपत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. प्रमोद देवरे, रजिस्ट्रार प्रशांत महाजन उपस्थित होते. प्रथम वर्षाच्या मोनीश चौधरी व ग्रुपने सादर केलेले 'डोल्बिवाल्या' या गीतावरील नृत्य, द्वितीय वर्षातील श्रुती पाटील आणि समूहाच्या 'उफ तेरी अदा' गाण्यावरील नृत्य, संस्कृती पवार आणि समृद्धी पवार या दोन्ही भगिनींनी 'शेप ऑफ यू..' या इंग्रजी गाण्यावर सादर केलेले शास्त्रीय नृत्य, तृतीय वर्षातील मिहीर पाटील आणि ग्रुपच्या खान्देशी बॉईज या संकल्पनेवरील हास्य नृत्याने उपस्थितांची दाद मिळवली. तृतीय वर्षातील कामिनी राजपूत आणि ग्रुपने 'रक्ताचरित्र' या शीर्षक गीतावर नृत्य सादर केले.



आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात नृत्य सादर करताना विद्यार्थी.

**गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार :** राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठस्तरीय स्पर्धेत विविध क्रीडा प्रकारात नैपुण्य मिळवलेल्या व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार झाला. बॉक्सिंगमध्ये रोहित सोनवणे, ओम देवरे, दर्शन माळी, यश येवले, क्रिकेटमध्ये हितेश खताळ, जय सोनवणे, पीयूष खैरनार, भागेश राजपूत, फेन्सिंगमध्ये ओम संजय देवरे, रोहित सोनवणे, पंकज पाटील, सौरभ बडगुजर, रिया देशमुख, धनश्री चव्हाण, दर्शन कोळी, ॲथलेटिक्समध्ये रूपेश पाटील, व्हॉलिबॉलमध्ये विनीत चौधरी, मानसी महाजन, फुटबॉलमध्ये दिवेश पाटील, शूटिंगमध्ये जयेश देवरे, योग स्पर्धेत वेदिका गिरासे यांनी यश मिळवल्याने त्यांचा सत्कार झाला. दरम्यान, चारुदत्त शिर्केने छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर स्वलिखित काव्य सादर केले. या कवितेने उपस्थितांची दाद मिळवली.

( दै. दिव्यमराठी दि. 17 फेब 2025 )

दिव्य मराठी

धुळे सिटी 16/02/2025

# पटेल कॉलेज आयआयटी व्हर्च्युअल रँकिंगमध्ये प्रथम

**प्रतिनिधी** | शिरपूर

आयआयटी मुंबईच्या व्हर्च्युअल लॅब रँकिंगमध्ये आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक मिळवल्याची माहिती संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

आयआयटी मुंबईच्या व्हर्च्युअल लॅब उपक्रमाचा उद्देश देशभरातील विद्यार्थ्यांसाठी व्यावहारिक शिक्षणाचा अनुभव वाढवणे हे आहे. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाने केवळ हा उपक्रम स्वीकारला नाही तर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आयआयटी मुंबईच्या व्हर्च्युअल संसाधनांचा प्रभावीपणे वापर केला. त्यामुळे महाविद्यालयाला प्रथम क्रमांक मिळाला. व्हर्च्युअल लॅब हा अनोखा उपक्रम असून, तो संगणकीय सॉफ्टवेअरद्वारे कार्यान्वित केला जातो. व्हर्च्युअल लॅबच्या मदतीने विज्ञान व अभियांत्रिकीचे विद्यार्थी ऑनलाइन अभ्यास करू शकतात. व्हर्च्युअल लॅब कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी नोडल सेंटरचे समन्वयक डॉ. जगदीश जाधव, प्रा. विपुल पंजाबी, डॉ. किरण सूर्यवंशी, प्रा. योगेश सोनवणे, प्रा. अनिल कुंभार, प्रा. कुणाल गांधी, प्रा. अतुल मैराळे यांनी विभागीय समन्वयक म्हणून प्रयत्न केले. महाविद्यालयाच्या यशाबद्दल अध्यक्ष, आमदार अमरीश पटेल यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

देशोन्नती 16/02/2025

## आय.आय.टी. मुंबईच्या व्हर्च्युअल लॅब रँकिंगमध्ये आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयास प्रथमस्थान

देशोन्नती वृत्तसंकलन

शिरपूर - आय.आय.टी. मुंबई च्या व्हर्च्युअल लॅब रँकिंग मध्ये आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयास प्रथम स्थान प्राप्त झाले.

प्रतिष्ठित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आय.आय.टी.), मुंबई द्वारे निर्मित आणि देशातील उच्च तंत्रज्ञान देणाऱ्या संस्थासाठी उपलब्ध करून दिलेल्या व्हर्च्युअल लॅब कार्यशाळेच्या उपक्रमात उल्लेखनीय कामगिरीचे प्रदर्शन करीत देशातील नामांकित ३५८ उच्च तंत्रज्ञान देणाऱ्या संस्था व महाविद्यालयापैकी आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने व्हर्च्युअल लॅब रँकिंग मध्ये प्रथम स्थान प्राप्त केल्याची माहिती संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

ही मान्यता पटेल अभियांत्रिकी ची शिक्षणात उत्कृष्टता वाढविण्याच्या व विद्यार्थ्यांना अत्याधुनिक संसाधने प्रदान करण्याच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते. आय.आय.टी. मुंबई द्वारे व्हर्च्युअल लॅब उपक्रमाचा उद्देश देशभरातील विद्यार्थ्यांसाठी व्यावहारिक शिक्षणाचा अनुभव वाढविणे आहे. पटेल अभियांत्रिकीने केवळ हा उपक्रम स्वीकारलाच नाही तर आपल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक



प्रगतीसाठी आय.आय.टी. मुंबई च्या व्हर्च्युअल संसाधनांचा प्रभावीपणे वापर करण्यातही उत्कृष्ट कामगिरी केली आहे. ही मान्यता पटेल अभियांत्रिकी मधील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सहयोगी प्रयत्नांचा दाखला आहे. संस्था तिच्या शैक्षणिक साधनांमध्ये सतत सुधारणा आणि नावीन्यपूर्ण करण्यासाठी वचनबद्ध आहे.

व्हर्च्युअल लॅब हा एक अनोखा उपक्रम आहे जो संगणकीय सॉफ्टवेअरद्वारे कार्यान्वित केले जातो. व्हर्च्युअल लॅबच्या मदतीने विज्ञान व अभियांत्रिकीचे विद्यार्थी या क्षेत्रात ऑनलाइन अभ्यास करू शकतात. व्हर्च्युअल लॅब उपक्रम विविध डोमेन्स मध्ये दूरस्थ प्रयोग आणि शिकण्याची सुविधा देते, विद्यार्थ्यांना पारंपारिक प्रयोगशाळेच्या सेटिंगच्या मर्यादे पलीकडे प्रयोग करण्यास सक्षम करते. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना दुर्गम भागातही प्रयोग करता येणार आहेत. व्हर्च्युअल लॅब हा एक अनोखा उपक्रम आहे. पटेल अभियांत्रिकीने ही आभासी संसाधने त्याच्या अभ्यासक्रमात सक्रियपणे समाकलित केली आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या निवडलेल्या अभ्यासाच्या क्षेत्रात व्यावहारिक अंतर्दृष्टी मिळू शकते. व्हर्च्युअल लॅब कार्यशाळा यशस्वीतेसाठी नोडल सेंटरचे समन्वयक डॉ. जगदीश जाधव, प्रा. विपुल पंजाबी, डॉ. किरण सुर्यवंशी, प्रा. योगेश सोनवणे, प्रा. अनिल कुंभार, प्रा. कृणाल गांधी, प्रा. अतुल मैराळे यांनी विभागीय समन्वयक म्हणून प्रयत्न केले.

महाविद्यालयाच्या यशाबद्दल शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षानियंत्रक प्रा. सुहास शुक्ल, विभागप्रमुख प्रा. डॉ. व्ही. एस. पाटील, प्रा. जी. व्ही. तपकिरे, प्रा. पी. एल. सरोदे, डॉ. एस. व्ही. देसले, डॉ. आर. बी. वाघ, डॉ. डी. आर. पाटील, डॉ. उज्वला पाटील, डॉ. एस. ए. पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. एम. पी. जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आनंद व्यक्त केला.

Dhule Edition
Feb 16, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

धुळे आवृत्ती

**15/02/2025**

epaper.deshdoot.com
15 Feb 2025 - Page 7

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या २५ विद्यार्थ्यांची निवड

■ **शिरपूर । प्रतिनिधी**



आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची टेक महिंद्रा या बहुराष्ट्रीय कंपनीत असोसिएट सिस्टीम इंजिनिअर या पदावर वार्षिक ३.२५ लाख या वेतनश्रेणीवर निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

टेक महिंद्रा प्रा. लि. कंपनी व पटेल अभियांत्रिकी, शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पस प्लेसमेंटमध्ये महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमातील अंतिम वर्षाचे विद्यार्थी ज्यांना पदवी अभ्यासक्रमाच्या प्रत्येक वर्षी ६० टक्के गुण आहेत, असे विद्यार्थी या कॅम्पस प्लेसमेंटसाठी पात्र होते. तीन स्तरावर झालेल्या या निवड प्रक्रियेत सुरुवातीला बुद्धिमत्ता चाचणी, तांत्रिक मुलाखत व शेवटी एच. आर. राउंड झाला. त्यात अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षातील बोरसे भाग्यश्री संदिप, बोरसे शुभम उमाकांत, पवार साक्षी भानुदास, राजपूत जागृती महेंद्रसिंग, पाटील सौरव दिपक, देवरे दिनेश जीवन, साळुंखे गणेश संजय, जाधव चेतना अशोक, वाडीले हितेश गोकुळ, चौधरी यश नितीन, चौधरी हितेश सुनील, पाटील भावेश संजय, सोनजे ऋषिकेश रमेश, वाघ विनोद रामदास, पाटील रुषिकेश योगराज, भारतीया उदय दिनेशकुमार, पाटील रोहित महेंद्र, जैन खुशाल नरेंद्र, चौधरी तेजस विजय, पाटील मोहित भरत, पाटील विजय सतीश, सैंदाणे निकिता सुधीर, सोनवणे रुचिता प्रकाश, मोरे सुमित नंदू, कापडे दुर्गेश जितेंद्र या २५ विद्यार्थ्यांची असोसिएट सिस्टीम इंजिनिअर या पदावर वार्षिक ३.२५ लाख रूपये या वेतनश्रेणीवर निवड झाली.

कॅम्पस प्लेसमेंटच्या यशस्वितेसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी मिल्केश जैन, प्रा. के. पी. राणे, प्रा. एम. जे. पाटील, प्रा. व्ही. व्ही. पटेल व प्रा. के. डी. देवरे यांनी प्रयत्न केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव सौ.रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी.पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे.देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.सुहास शुक्ल, विभाग प्रमुख प्रा. डॉ.व्ही. एस.पाटील, प्रा.जी.व्ही.तपकिरे, प्रा.पी.एल.सरोदे, डॉ.एस.व्ही. देसले, डॉ. आर. बी. वाघ, डॉ. डी. आर. पाटील, डॉ. उज्वला पाटील, डॉ.एस.ए.पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. एम.पी.जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ.प्रशांत महाजन, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतूक केले.

**पुण्य नगरी** 17/01/2025

# 'स्मार्ट फ्लश सिस्टम'द्वारे जलसंवर्धनासाठी दिला नवा दृष्टिकोन

## आर.सी.पटेल अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांकडून 'हॅकाथॉन'मध्ये अभिनव प्रकल्प सादर



**शिरपूर** : येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी कोईम्बतूर (तामिळनाडू) येथे राष्ट्रीय स्तरावरील उपक्रम 'ग्रँड फायनल : स्मार्ट इंडिया हॅकाथॉन २०२४' मध्ये सहभाग घेत हार्डवेअर श्रेणीअंतर्गत पाणी बचतीसाठी 'स्मार्ट फ्लश सिस्टम' अभिनव प्रकल्प सादर करून जलसंवर्धनासाठी तांत्रिकदृष्ट्या नवा दृष्टिकोन उपलब्ध करुन दिल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ. जे.बी. पाटील यांनी दिली.

'ग्रँड फायनल : स्मार्ट इंडिया हॅकाथॉन २०२४' हा राष्ट्रीय स्तरावरील उपक्रम तामिळनाडू येथील कोईम्बतूर इनोव्हेशन अँड बिझनेस इन्क्युबेटर (फोर्ज इन्क्युबेशन)मध्ये आयोजित करण्यात आला होता. उद्घाटन कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'स्मार्ट इंडिया हॅकेथॉन'मध्ये सहभागी संघांना संबोधित केले. यावेळी अखिल भारतीय तंत्र शिक्षण संचालनालय, नवी दिल्लीचे अध्यक्ष प्रा. डॉ. टी. जी. सीताराम यांनी मार्गदर्शन केले. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना समस्यांचे सर्जनशील समाधान शोधण्याची संधी मिळते, असे प्रतिपादन केले.

आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या यंत्र अभियांत्रिकी संघाने पाणी बचतीसाठी 'स्मार्ट फ्लश सिस्टम' नामक प्रणाली विकसित केली. ही प्रणाली फ्लशसाठी आवश्यक पाण्याचे प्रमाण स्वयंचलितपणे ठरवते आणि दरवर्षी हजारो लिटर पाणी वाचवण्यास सक्षम आहे. यामुळे ऊर्जा बचतही होते. हे केवळ पाणी वाचवण्याचे तंत्रज्ञान नाही तर पर्यावरण संरक्षण आणि आरोग्य सुधारण्यासाठी एक प्रभावी उपाय आहे. शाळा, सार्वजनिक स्वच्छतागृहे, कारखाने यांसारख्या ठिकाणीही याचा वापर करता येईल. या संघाचे नेतृत्व मेकॅनिकल अभियांत्रिकी विद्याशाखेचा विद्यार्थी चेतन रवींद्र पाटील याने केले असून उज्वल नरेंद्रसिंग जाधव, धनंजय जाधव चौधरी, तेजस्विनी रमेश सोनवणे, यशश्री कमलेश पाटील, मेघना प्रभाकर बोरसे यांनी प्रकल्पाच्या तांत्रिक बाबी कौशल्याने हाताळल्या. स्पर्धेदरम्यान ज्युरी पॅनेलने मूल्यांकन केले आणि विद्यार्थ्यांना पुढील सुधारणा व व्यावसायिक अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सहभागी संघांना प्रमाणपत्र आणि ट्रॉफी प्रदान करून गौरविण्यात आले. 'स्मार्ट फ्लश सिस्टम'साठी आर. सी. पटेल अभियांत्रिकीच्या संघाला विशेष प्रशस्तीपत्र मिळाले. मार्गदर्शक प्रा.डॉ.हेमराज कुमावत, प्रा. निलेश शिंदे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी दाखविलेली कल्पकता आणि तांत्रिक कौशल्य यामुळे अशा समस्यांसाठी प्रभावी उपाय साकारता येतात. स्मार्ट इंडिया हॅकाथॉनसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर आपली क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळते, असे त्यांनी सांगितले. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ. अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा. सुहास शुक्ल, विभाग प्रमुख डॉ. व्ही.एस. पाटील, प्रा. पी.एल. सरोदे, प्रा. जी.व्ही. तपकिरे, डॉ. एस.व्ही. देसले, डॉ. आर.बी. वाघ, डॉ. डी.आर. पाटील, डॉ. उज्वला पाटील, डॉ. एस.ए. पाटील, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. एम.पी. जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन यांनी कौतूक केले.

**लोकमत** 17/01/2025




विजेत्या संघाला गौरविताना जयश्रीबेन पटेल, कृतिबेन पटेल, द्वेताबेन पटेल, रेशा पटेल, किरण अंचन, आमदार काशीराम पावरा, डॉ. जे. बी. पाटील, डॉ. उमेश शर्मा आदी.

# आरसीपी आयटीचा संघ ठरला विजेता

## महिला क्रिकेट स्पर्धेत रणरागिनी संघ उपविजेता

लोकमत न्यूज नेटवर्क

शिरपूर : शहरातील अस्तित्व सोशल वेलफेअर फाउंडेशनतर्फे आयोजित महिला क्रिकेट लीग स्पर्धेतील अंतिम सामना आरसीपीआयटी संघ व रणरागिनी संघात खेळला गेला. यात आरसीपीआयटी संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले.

**५१**
**विजेत्या संघाला मान्यवरांचे हस्ते बक्षीस**

पटेल फार्मसी महाविद्यालयाच्या क्रिकेट मैदानावर माजी शालेय शिक्षणमंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते व माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन अमरिशभाई पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत अस्तित्व सोशल वेलफेअर फाउंडेशन आयोजित महिला क्रिकेट लीगचे उदघाटन करण्यात आले होते. महिला क्रिकेट लीग २०२५ चा समारोप आमदार काशिराम पावरा यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला.

## विजेत्या संघाला ५१ हजारांचे बक्षीस

अस्तित्व सोशल वेलफेअर फाउंडेशन व एसव्हीकेएम संस्था यांच्यावतीने पारितोषिक देण्यात आले. आरसीपीआयटी संघाने विजेतेपद पटकावले. या संघाला ५१ हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक व चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच उपविजेतेपद रणरागिनी संघाने पटकावले असून, त्यांना ३१ हजार रुपयांचे पारितोषिक व चषक देण्यात आले. तिसरे बक्षीस द ईलाईट इलेव्हन यांना २१ हजार रुपयांचे पारितोषिक व चषक देण्यात आले. तसेच इतरांचाही गौरव करण्यात आला.

दैनिक दिव्य मराठी **11/01/2025**

२

# शिरपूर महिला लीग क्रिकेट स्पर्धेत आरसीपीआयटी संघ ठरला अजिंक्य



अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशनतर्फे झालेल्या क्रिकेट स्पर्धेतील विजेत्यांसह उपस्थित असलेले मान्यवर.

**प्रतिनिधी | शिरपूर**

येथील अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशनतर्फे महिला क्रिकेट लिग झाली. या स्पर्धेत आरसीपीआयटी संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले.

येथील आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयाच्या क्रिकेट मैदानात ही स्पर्धा झाली. स्पर्धेचा समारोप आमदार काशीराम पावरा यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी शिरपूर एज्युकेशन सोसायटी ट्रस्टी जयश्री पटेल, कृति पटेल, अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशनच्या संचालिका द्वेता भूपेश पटेल, संस्थेच्या सचिव रेशा पटेल, सीईओ डॉ. उमेश शर्मा आदी उपस्थित होते. द्वेता भूपेशभाई पटेल यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा झाली. आमदार काशीराम पावरा यांनी मनोगत व्यक्त केले. स्पर्धेत विरांगणा, एचआरपीआयपीईआर, घे भरारी, एसव्हीकेएम, मारवाडी क्वीन, बुलेट आर्मी, गोल्डन गार्डीनर, मनिकर्निका, आरसीपीआयटी, एच. आर. पटेल सेकंडरी अँड हायर सेकंडरी स्कूल, आर. सी. पटेल प्राथमिक मराठी शाळा, आर. सी. पटेल ज्युनिअर कॉलेज, इलाइट इलेव्हन, मास्टर माईंड, आर. सी. पटेल प्रायमरी वॉरियर्स, गुलाबी गँग, एआरपी सीबीएसई, लेडी सिंघम आदी १९ संघांनी सहभाग घेतला होता. आरसीपीआयटी संघाने विजेतेपद पटकावले. प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील यांच्यासह संघाला ५१ हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक व चषक देण्यात आला. उपविजेतेपद रणरागिणी संघाने पटकावले. संघाला ३१ हजार रुपयांचे पारितोषिक व चषक दिला.

## उत्कृष्ट फलंदाज, क्षेत्ररक्षक, गोलंदाज कोण

वुमन ऑफ द मॅच पुरस्कार दीप पगारे, फायनल वुमन ऑफ द मॅच पुरस्कार प्रतिभा कोळी, उत्कृष्ट फलंदाज प्रतिभा कोळी (आरसीपीआयटी संघ), उत्कृष्ट गोलंदाज भूमिका जमादार (आरसीपीआयटी संघ), उत्कृष्ट क्षेत्ररक्षक पुरस्कार हर्षदा पाटील (द इलाइट इलेव्हन) यांना देण्यात आला. सर्वांना रोख बक्षिस देण्यात आली. सोनिया भसीन यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन राकेश साळुंखे यांनी केले.

दै. दिव्यमराठी दि. 11/01/2025

दैनिक दिव्य मराठी

A Marathi Daily from Dainik Bhaskar Group

09/01/2025

# आर. सी. पटेल अभियांत्रिकीत पालक-शिक्षक सभा उत्साहात



आर. सी. पटेल अभियांत्रिकीत पालक- शिक्षक सभेत उपस्थित पालकवर्ग.

**प्रतिनिधी** | शिरपूर

येथील आर. सी. पटेल अभियांत्रिकी स्वायत्त महाविद्यालयाच्या अप्लाइड सायन्सेस अँड ह्युमॅनिटीज विभागाच्या विद्यार्थ्यांचा पालक-शिक्षक मेळावा झाला. दैनंदिन अध्ययन व अध्यापन, स्वायत्त अभियांत्रिकीची शैक्षणिक कार्यप्रणाली, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी तसेच विद्यार्थ्यांची हजेरीचे प्रमाण, प्रथम घटक चाचणीचा निकाल, महाविद्यालयातील विविध शैक्षणिक उपक्रम यावर विस्तृत चर्चा सदर शिक्षक-पालक मेळाव्यात घेण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

या प्रसंगी शाखानिहाय सर्व तुकडीनुसार पालकांना वर्गीकृत करून संबंधित वर्गशिक्षक आणि लोकल गार्डियन यांनी महाविद्यालय सुरू झाल्यापासून ते आतापर्यंतचा सर्व शैक्षणिक लेखाजोखा पालकांसमोर पीपीटी प्रेझेंटेशनद्वारे सादर केला. यात हजेरीचे प्रमाण, घटक चाचणी-१ मधील प्राप्त गुण तसेच विद्यार्थ्यांना पुढील वर्षात प्रवेश मिळवण्याकरिता आवश्यक क्रेडिट आणि ग्रेड्स याची सहज पद्धतीने माहिती करवून दिली. शिक्षक-पालक सभेचे अध्यक्ष विभागप्रमुख डॉ. एस. व्ही. देसले यांच्या मार्गदर्शनात सभेच्या यशस्वी आयोजनासाठी अप्लाइड सायन्सेस अँड ह्युमॅनिटीज विभागाच्या सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

दै. दिव्यमराठी दि. 9/1/2025

पुण्य नगरी 03/01/2025

# आर.सी.पटेल अभियांत्रिकीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमाला सुरुवात

**शिरपूर :** येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात महाराष्ट्र शासन सहसंचालक उच्च व तंत्र शिक्षण विभागीय नाशिक कार्यालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या अभिनव उपक्रमाची महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे ग्रंथ प्रदर्शन व वाचन कार्यशाळेने सुरुवात करण्यात आली आहे, अशी माहिती संचालक डॉ. जे.बी. पाटील यांनी दिली.

नूतन वर्षाची सुरुवात विद्यार्थ्यांमध्ये वाचन प्रेरणा निर्माण करुन व्हावी या उद्देशाने राज्य सरकारर्फे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा अभिनव उपक्रम राबविला जात आहे. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयात सर्वप्रथम ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले. यावेळी संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील उपलब्ध असलेल्या पुस्तक आणि अमूल्य अश्या ग्रंथ भांडाराचा नियमित वाचन करीत स्वतःला समृद्ध करून त्याचा उपयोग समाजाच्या हितासाठी करावा. तसेच एकदिवसीय वाचन कौशल्य कार्यशाळा विभाग प्रमुख डॉ. सतिश देसले यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आली. यात वाचन प्रक्रिया, वाचनाच्या पद्धती, वाचन विकासाची तंत्र आणि पुस्तक परीक्षण या मुद्द्यांवर डॉ. किशोर ठाकरे यांनी सादरीकरणाच्या सहाय्याने मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रंथ प्रदर्शन, वाचन कार्यशाळा या उपक्रमांच्या आयोजनासाठी ग्रंथपाल प्रा. महेश सोनवणे यांच्या समन्वयात सहाय्यक ग्रंथपाल एन. डी. राठोड, दीपा गुजराथी, कविता पाटील आणि महाविद्यालायातील 'कम्युनिकॅडो' या विद्यार्थी समूहातील स्वयंसेवकांनी मेहनत घेतली. यावेळी महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.सुहास शुक्ल, विभाग प्रमुख डॉ. व्ही.एस. पाटील, प्रा. पी.एल. सरोदे, प्रा. जी.व्ही. तपकिरे, डॉ. एस.व्ही. देसले, डॉ. आर. बी. वाघ, डॉ. डी.आर. पाटील, डॉ. उज्वला पाटील, डॉ. एस.ए. पाटील, ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. एम.पी. जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ.प्रशांत महाजन, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



R. C. PATEL INSTITUTE OF TECHNOLOGY
An Autonomous Institute

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

लोकमत 28/07/2024

## पटेल अभियांत्रिकीत आंतरराष्ट्रीय कक्ष

### सुविधा : विद्यार्थांना परदेशातील नोकरीच्या संधी शोधता येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपुर :** शहरातील आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या स्वायत्त महाविद्यालयात परदेशात उच्च शिक्षण घेण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांना किंवा नोकरीच्या संधी ओळखण्याकरिता योग्य मार्गदर्शन प्राप्त व्हावे, म्हणून नुकतेच आंतरराष्ट्रीय संबंध व उच्च अध्ययन कक्षाचे उद्घाटन महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

स्वायत्त दर्जा प्राप्त असलेल्या आर. सी. पटेल अभियांत्रिकीत विद्यार्थ्यांच्या फक्त पदवी अभ्यासक्रमावरच लक्ष केंद्रित न करिता पदवी प्राप्त केल्यानंतर सुद्धा त्याची करिअर आणि उच्च शिक्षण भारतात किंवा परदेशात सुरू राहील, यासाठी आंतरराष्ट्रीय संबंध व उच्च अध्ययन कक्षाची निर्मिती करण्यात आली.

या कक्षाच्या उद्घाटन प्रसंगी येन अकादमी, इंदूर येथील चेतन धामोरीकर, जर्मनी येथील अॅडमिशन लॅब्सचे सह-संस्थापक सौरभ लोया व कनिष्का लोया यांना उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरिता आमंत्रित करण्यात आले होते.

यावेळी उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा. सुहास शुक्ल, विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. पाटील, प्रा. पी. एल. सरोदे, प्रा. जी. व्ही. तपकिरे, डॉ. एस. व्ही. देसले, डॉ. आर. बी. वाघ, डॉ. डी. आर. पाटील, डॉ. उज्ज्वला पाटील, डॉ. एस. ए. पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. एम. पी. जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन आदी उपस्थित होते.



**शिरपूर येथे आंतरराष्ट्रीय कक्षाचे उद्घाटन करताना डॉ. जे. बी. पाटील, डॉ. पी. जे. देवरे, डॉ. स्मितल पाटील, डॉ. अमृता भंडारी, चेतन धामोरीकर, सौरभ लोया, कनिष्का लोया, प्रा. सुहास शुक्ल, डॉ. व्ही. एस. पाटील आदी.**

#### शिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार

आंतरराष्ट्रीय संबंध व उच्च अध्ययन कक्षामुळे परदेशात उच्च शिक्षण घेण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि समर्थन प्रदान करणे, उच्च शिक्षणाच्या विविध संधी, शिष्यवृत्ती आणि आर्थिक मदत पर्यायांबद्दल जागरुकता निर्माण करणे, विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी आणि करिअरच्या उद्दिष्टांशी जुळणारे योग्य अभ्यासक्रम, विद्यापीठे आणि कार्यक्रम ओळखण्यात मदत करणे, प्रमाणित चाचण्या, प्रवेश प्रक्रियेबद्दल संसाधने व माहिती प्रदान करणे आणि विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या लँडस्केपमध्ये नेव्हिगेट करण्यात मदतीसाठी कार्यशाळा, सेमिनार व समुपदेशन सत्र आयोजित केले जाणार आहे.

Hello Dhule
Page No. 4 Dec 28, 2024
Powered by: erelego.com

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

सकाळ 22/12/2024

# धुळ्याचा संकेत पाटील लेफ्टनंट

## ढोल-ताशांच्या गजरात स्वागत; शुभेच्छांचा वर्षाव

**सकाळ वृत्तसेवा**

धुळे, ता. २१ : येथील संकेत पाटील यांची भारतीय सैन्यदलात लेफ्टनंटपदी नियुक्ती झाली. यानंतर ते धुळे शहरात दाखल झाले असता त्यांचे नातेवाईकांसह मित्र परिवारातर्फे ढोलताश्यांच्या गजरात स्वागत झाले.

लेफ्टनंट पाटील यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण चावरा हायस्कूलमध्ये झाले. नंतर एसएसव्हीपीएस महाविद्यालयातून त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकीत डिप्लोमा केला. शिरपूर येथील आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयातून स्थापत्य (सिव्हील) अभियांत्रिकीची पदवी घेतली. त्यांना भारतीय सैन्यदलात सेवा करण्याची आवड निर्माण झाली होती. त्यांनी तांत्रिक पदवी अभ्यासक्रम (टीजीसी) परिक्षा उत्तीर्ण होत वर्षभरासाठी डेहराडून येथील भारतीय सैन्य अकादमीत प्रशिक्षण पूर्ण केले. यानंतर त्यांना ७१ आर्मड रेजिमेंटमध्ये लेफ्टनंटपदी नियुक्ती देण्यात आली आहे. लेफ्टनंट संकेत पाटील यांच्या मातोश्री अनिता पाटील या धुळे महापालिकेत विषय शिक्षका आहेत, तर वडिल हिरालाल पाटील हे येथील जिल्हा परिषदेत शाखा अभियंता म्हणून कार्यरत आहेत. लेफ्टनंट संकेत पाटील यांच्यावर विविध मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



**धुळे** : कुटुंबियांसह उपस्थित लेफ्टनंट संकेत पाटील.

Dhule, Dhule-Today
22/12/2024 Page No. 1

**पुण्य नगरी** 22/12/2024


# आंतरराष्ट्रीय संबंध व उच्च अध्ययन कक्ष कार्यान्वीत

## आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत उद्घाटन



**शिरपूर :** आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या स्वायत्त महाविद्यालयात परदेशात उच्च शिक्षण घेण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांना किंवा नोकरीच्या संधी ओळखण्यासाठी योग्य मार्गदर्शन प्राप्त व्हावे, म्हणून नुकतेच आंतरराष्ट्रीय संबंध व उच्च अध्ययन कक्षाचे उद्घाटन महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी.पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

स्वायत्त दर्जा प्राप्त असलेल्या आर. सी. पटेल अभियांत्रिकीत विद्यार्थ्यांच्या पदवी अभ्यासक्रमासह करिअर आणि उच्च शिक्षण भारतात किंवा परदेशात सुरु राहील, यासाठी आंतरराष्ट्रीय संबंध व उच्च अध्ययन कक्षाची निर्मिती अधिठाता डॉ.स्मितल पाटील यांच्या समन्वयात असलेल्या इंटरनॅशनल रिलेशन ॲण्ड हायर स्टडीज अंतर्गत करण्यात आली. यावेळी येन अकादमी इंदूरचे चेतन धामोरीकर, जर्मनीचे ॲडमिशन लॅब्सचे सहसंस्थापक सौरभ लोया, कनिष्का लोया यांनी मार्गदर्शन केले. उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा व संचालक जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.सुहास शुक्ल, विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. पाटील, प्रा. पी. एल. सरोदे, प्रा. जी. व्ही. तपकिरे, डॉ. एस. व्ही. देसले, डॉ. आर. बी. वाघ, डॉ. डी. आर. पाटील, डॉ. उज्वला पाटील, डॉ. एस. ए. पाटील, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. एम. पी. जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन यांनी कौतुक केले.

लोकमत 11/12/2024

# शिवपुराण कथेनंतर शिरपुरात स्वच्छता मोहीम

## परिसर केला स्वच्छ : अस्तित्व फाउंडेशनने घेतला पुढाकार

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर** : शहरातील अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशन, शिरपूर एज्युकेशन सोसायटी, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट व शिरपूर वरवाडे नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित प्रदीप मिश्रा यांच्या शिवपुराण स्थळावर व करवंद रोड परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. दरम्यान, फाउंडेशनच्या डायरेक्टर द्वेता भूपेशभाई पटेल यांच्या संकल्पनेतून व्यापक स्वरूपात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

९ रोजी या स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ शहरातील करवंद नाका येथे अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशनच्या डायरेक्टर द्वेता भूपेशभाई पटेल यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशनच्या डायरेक्टर द्वेता भूपेशभाई पटेल, शिरपूर एज्युकेशन सोसायटी सचिव रेशा पटेल, सीईओ डॉ. उमेश शर्मा, विविध शाखा प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक उपस्थित होते.

यावेळी आर. सी. पटेल शैक्षणिक संकुलाच्या आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, तसेच विविध महाविद्यालयांचे ७५० पेक्षा जास्त स्वयंसेवक विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी तसेच शहर व परिसरातील पदाधिकारी, महिला पदाधिकारी, नागरिक, शिरपूर वरवाडे नगर परिषदेचे स्वच्छता, आरोग्य निरीक्षक, सफाई कर्मचारी तसेच आमदार कार्यालयातील भूपेशभाई पटेल फ्रेंड सर्कल, अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशन टीम व मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट टीम, कार्यकर्ते उपस्थित होते.



शिवमहापुराण कथेनंतर आयोजित स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेले विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते

Hello Dhule

पुण्य नगरी 01/12/2024

# पटेल स्वायत्त अभियांत्रिकीचे प्रा.जमीर शेख यांना पीएच.डी.



**शिरपूर** : शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागातील प्रा. डॉ.जमीर सलीम शेख यांना मेडी-कॅप्स विदयापीठ, इंदूर (म.प्र.) येथून गणित विषयात विज्ञान विभागांतर्गत डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. 'अ मॅथेमॅटिकल स्टडी ऑफ सम आस्पेक्टस ऑफ स्प्लिट डॉमिनेशन नंबर ऑफ ग्राफ्स टूवॉड्‌र्स जनरलायजेंशन' हा त्यांच्या संशोधनाचा मुख्य विषय होता. याकामी त्यांना मेडी-कॅप्स विदयापीठाच्या गणित विभागातील प्रा. डॉ. प्रांजली केकरे यांचे मार्गदर्शन लाभले.

डॉ. जमीर शेख यांचे संशोधनपर शोधनिबंध वेब ऑफ सायन्स व स्कोपस इंडेक्स सारख्या अंतरराष्ट्रीय दर्जाच्या जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहेत. अनेक परिसंवाद व परिषदांमध्ये त्यांनी सक्रीय सहभाग नोंदवित त्यांच्या संशोधन विषयावर आधारित सादरीकरण केले आहे. डॉ. शेख यांचे सदर संशोधन हे कॉम्प्युटर नेटवर्क, पब्लिक हेल्थ, ऑप्टिमिझशन थेअरी इ. क्षेत्रात नवा मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. नेटवर्कची कनेक्टिव्हिटी आणि स्थिरतेचा दर्जा अधिक सुधारू शकतो, म्हणून यामुळे भविष्यात या ग्राफ थेरी संबंधित संशोधनातील निष्कर्ष इलेक्ट्रिकल तसेच कॉम्प्यूटर क्षेत्रातील नेटवर्किंग मध्ये प्रभावी उपाय-योजनांसाठी महत्त्वपूर्ण ठरतील. या यशाबद्दल शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष. माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.सुहास शुक्ल, विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. पाटील, प्रा. पी. एल. सरोदे, प्रा. जी. व्ही. तपकिरे, डॉ. एस. व्ही. देसले, डॉ. आर. बी. वाघ, डॉ. डी. आर. पाटील, डॉ. उज्वला पाटील, डॉ. एस. ए. पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. एम. पी. जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन आदींनी कौतुक केले आहे.

**दिव्य मराठी** धुळे सिटी 01-12-2024

उपक्रम • एसव्हीकेएम, एनएमआयएमएसच्या सेंटर फॉर टेक्स्टाइलतर्फे झाली स्पर्धा

## कौशल्यासह उद्योजकता विकासाला प्रोत्साहन

प्रतिनिधी | शिरपूर

एसव्हीकेएम, एनएमआयएमएसच्या सेंटर फॉर टेक्स्टाइल फंक्शन्समध्ये उडान-इनोव्हेशन ॲण्ड बिझनेस आयडिया स्पर्धा झाली. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण, उद्योजकतेच्या नवकल्पना, त्यासाठी लागणारे कौशल्य विकसित व्हावे या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. ही स्पर्धा एनएमआयएमएस विद्यापीठाच्या सेंटर फॉर टेक्स्टाइल फंक्शन व इन्स्टिट्युशन्स इनोव्हेशन कौन्सिलअंतर्गत आयपीआर-सेल आणि सोबसतर्फे झाली.

स्पर्धेत माध्यमिक, उच्च माध्यमिक, अभियांत्रिकी, फार्मसी, पॉलिटेक्निक शाखेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धकांनी कृषी व आरोग्य, शिक्षण तंत्रज्ञान, ऑटोमोबाइल, आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर आधारित ट्राफिक कंट्रोल, सस्टेनेबल प्रोडक्ट्स, स्मार्ट टेक्स्टाइल्स आदी विविध विषयांवर संकल्पनांचे सादरीकरण केले. प्रा. डॉ. संदीप पाटील, प्रा. डॉ. मनोज पटेल यांनी परीक्षण केले. पारितोषिक वितरण सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजय शिवणकर यांच्या हस्ते झाले. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी जॉब सिकर्स न होता जॉब क्रिएटर्स बनावे, असेही ते म्हणाले. स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिक व सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रक देण्यात आले. हा उपक्रम संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार अमरीश पटेल, सह-अध्यक्ष भूपेश पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल आदींच्या मार्गदर्शनाखाली झाला.



शिरपूर येथे झालेल्या स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस देताना मान्यवर.

**यांना मिळाले बक्षीस :** स्पर्धेत बिझनेस आयडियाचे प्रथम पारितोषिक अश्वथ खडसे व देवेन बैसाणे (अमरीशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल, शिरपूर) यांना, द्वितीय पारितोषिक तुषार सूर्यवंशी (आर.सी.पटेल उच्च माध्यमिक विद्यालय, शिरपूर), मयूरी राजपूत व शीतल पिंपळे (एच. आर. पटेल फार्मसी कॉलेज, शिरपूर) यांना मिळाले. बिझनेस प्रोटोटाइप ॲण्ड मॉडेलचे प्रथम पारितोषिक तेजस पाटील, दुर्गेश साळुंखे, अंकित पाटील, प्रमोद कोळी (आर. सी. पटेल इंजिनिअरिंग कॉलेज, शिरपूर) यांना तर द्वितीय पारितोषिक साक्षी भारती व विवेक चव्हाण (एच. आर. पटेल फार्मसी कॉलेज, शिरपूर), जयेश नेरकर व राहुल पाटील यांना मिळाले.

पुण्य नगरी 26/11/2024

# आर.सी. पटेल अभियांत्रिकीचे प्रा.प्रदीप पाटील यांना पीएच.डी. प्रदान



**शिरपूर** : शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील आर्टीफिशिअल इंटेलिजन्स ॲण्ड मशीन लर्निंग अभियांत्रिकी विभागातील प्रा. प्रदीप कैलास पाटील यांना राजस्थान येथील अमिटी युनिव्हर्सिटी, जयपूर येथून यांत्रिकी अभियांत्रिकी विभागांतर्गत डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली.

'इन्व्हेस्टिगेशन ऑन व्हेपर कॉम्प्रेशन रेफ्रिजरेशन सिस्टीम युजिंग नॅचरल रेफ्रिजरंट ॲण्ड नॅनोल्युब्रिकंट' हा त्यांच्या संशोधनाचा मुख्य विषय होता. या कामी त्यांना अमिटी विद्यापीठाच्या यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील प्रा. डॉ. ऋषी देवांगन यांचे मुख्य मार्गदर्शक तर आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील डॉ. हेमंत वाघ यांचे सह-मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन लाभले. या संशोधनाचा उद्देश नैसर्गिक रेफ्रिजरंट्स आणि उत्कृष्ट नॅनो-ल्युब्रिकंट्स वापरून व्हेपर कॉम्प्रेशन रेफ्रिजरेशन प्रणालींचे कार्यक्षम करून त्याचा अधिकाधिक वापर व्हावा हा होय. यामुळे सामान्यपणे वापरल्या जाणाऱ्या आणि पर्यावरणास घातक असलेल्या हायड्रोक्लोरो फ्लुओरो कार्बन या वायूचा रेफ्रिजरंट म्हणून वाढत्या वापरास आळा घालता येईल. या यशाबद्दल त्यांचे शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.सुहास शुक्ल, विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. पाटील, प्रा. पी. एल. सरोदे, प्रा. जी. व्ही. तपकिरे, डॉ. एस. व्ही. देसले, डॉ. आर. बी. वाघ, डॉ. डी. आर. पाटील, डॉ. उज्वला पाटील, डॉ. एस. ए. पाटील, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. एम. पी. जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतूक केले.

लोकमत

न्यूज Inbox

## हर्षल जगताप यांना पीएच.डी.

**शिरपूर :** शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागात कार्यरत असलेले डॉ. हर्षल सुभाषराव जगताप यांना मेडी-कॅप्स विद्यापीठ, इंदूर (म.प्र.) येथून गणित विषयात विज्ञान विभाग अंतर्गत डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. 'नॉन-न्यूटोनियनवर थर्मल आणि सोल्युटल परफॉर्मन्स समानता विश्लेषण वापरून द्रव मॉडेल' हा त्यांच्या संशोधनाचा मुख्य विषय होता.

Hello Dhule
Page No. 4 Nov 11, 2024
Powered by: erelego.com

R. C. PATEL
INSTITUTE OF TECHNOLOGY
An Autonomous Institute

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्य नगरी 11/11/2024

## आर.सी.पटेल अभियांत्रिकीचे डॉ. कुमावत यांचे इंडिस्ट्रीअल डिझाइन आणि पेटंटचे शतक

**शिरपूर** : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विद्याशाखेचे प्रा.डॉ. हेमराज कुमावत यांच्या नावे आतापर्यंत वर्ष २०२१ ते २०२४ या कालावधीत एकूण १०० फाईल इंडिस्ट्रीअल डिझाइन पैकी ९७ इंडिस्ट्रीअल डिझाइन इंडियन पेटंट ऑफिस, कोलकाता येथून यशस्वीरित्या नोंदणी झाली आहे. सध्याच्या त्यांच्या अर्जित १८ युटिलिटी पेटंट पैकी ३ पेटंट इंडियन पेटंट ऑफिस, मुंबई येथे मंजूर झाले आहेत. याप्रमाणे डॉ. कुमावत यांचे आत्तापर्यंत भारतीय पेटंट कार्यालय, मुंबई, कोलकाता आणि चेन्नईमध्ये एकूण १०० पेटंट आणि इंडस्ट्रियल डिझाईन्स यशस्वीरित्या नोंदणीकृत झाल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

डॉ. कुमावत यांच्याद्वारे दाखल केलेल्या बौद्धिक संपदा अधिकारांची १०० ही सर्वाधिक संख्या त्यांनी अल्प कालावधीत साध्य केली आहे. या मध्ये अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र, कृषी, वैद्यकीय, नॅनो आणि ड्रोन तंत्रज्ञान भिन्न विषयांमधील नवकल्पनांचा (आयपीआर) समावेश आहे. वर्ष २०२४ मध्ये डॉ. कुमावत यांनी केवळ पेटंट दाखल करण्याच्या बाबतीत एक शतक ओलांडले असून आत्मनिर्भर भारतासाठी योगदान देणारे परिवर्तनात्मक संशोधन करून संरचनात्मक उपक्रम परिश्रमपूर्वक राबविले आहेत. स्थापत्य अभियांत्रिकीत काँक्रीट चाचणी हॅमर, माती शोधण्याचे यंत्र, भूप्रदेश शोधणारे ड्रोन, डिजिटल कॅलिब्रेशन इन्स्ट्रुमेंट, काँक्रीट स्कॅनिंग उपकरण, काँक्रीट मोबिलिटी मशिन, मृदा



सामर्थ्य निर्धारक उपकरण यासह इतर. यांत्रिक अभियांत्रिकीत नेल पिकर, ऑटोमेटेड इनक्यूबेटर, ड्रिलिंग मशीन, कव्हर, सोलर डिंपल कलेक्टर, फटिग टेस्टिंग मशीन, व्हील चेअर, व्हीलचेअर कम स्ट्रेचर, ट्रायसायकल, वॉटर फ्लो एनर्जी जनरेटर, सेल्फ-ऑपरेटेड प्रोटेक्शन डिव्हाईस, पीव्ही प्लॅनिंग मशीन, बेव्हल गियर स्क्रू जॅक यासह इतर. इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीत डीसी अल्टरनेटर, पॉवर्ड फोअरआर्म मशीन, विंड व्हायब्रेटिंग जनरेटर, ट्रान्सफॉर्मर थेफ्ट डिटेक्शन सिस्टम, थर्मोइलेक्ट्रिक जनरेटर सिस्टम, सोलर इंटिग्रेटर, मल्टीपर्पज सोलर बॅटरी. इलेक्ट्रोनिक्स अँड टेलीकम्युनिकेशनमध्ये गंज शोधक, स्वयंचलित अडथळा प्रणाली (सेट), डिजिटल इलेक्ट्रिकल ॲनालॉजी उपकरण, स्मार्ट फर्टिलायझर स्प्रेअर मशीन यासह इतर. संगणक अभियांत्रिकीत दिव्यांग डिजिटल हेल्पर, फूट माऊस, क्वाड्रपॅड स्पायडर रोबोट, स्मार्ट वोव्हर बोर्ड यासह इतर तर वैद्यकीय क्षेत्रात फ्रांझ डिफ्यूजींग सेलसाठी रिफिटिंग क्लॅप, सॅनिटरी नॅपकिन इनसीएरेटर, पोर्टेबल स्मार्ट ऑक्सिजन कॉन्सेंट्रेटर, योगा पोस्चर अँड रिकग्निजन असे नवसंकल्पना पेटंट त्यांनी विकसित केले आहेत. पेटंट आणि औद्योगिक डिझाईन्स सर्जनशील उपायांसह समाजातील जटिल आव्हानांना तोंड देण्यासाठी उपयोगी ठरणार आहे. या यशाबद्दल त्यांचे शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.सुहास शुक्ल, विभाग प्रमुख डॉ. व्ही.एस. पाटील, प्रा. पी.एल. सरोदे, प्रा. जी.व्ही. तपकिरे, डॉ. एस.व्ही. देसले, डॉ. आर.बी. वाघ, डॉ. डी.आर. पाटील, डॉ. उज्वला पाटील, डॉ. एस.ए. पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. एम.पी. जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन यांनी कौतूक केले.

सकाळ **21/10/2024**



**शिरपूर :** येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात नृत्य स्पर्धेतील विजेत्यांसह संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, विभागप्रमुख व सहकारी.

# गरबा नृत्य महोत्सवाला प्रतिसाद

**शिरपूर, ता. २० :** येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात भावी अभियंत्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत 'गरबा नाईट'चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पारंपरिक वेशभूषेत एकत्रित येऊन 'गरबा नाईट' साजरी केली.

माजी नगराध्यक्षा तथा संचालिका जयश्रीबेन पटेल यांच्या हस्ते दुर्गा देवीची आरती करून महोत्सवाला सुरुवात झाली. संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, कृतीबेन पटेल, रिताबेन पटेल, रेशाबेन पटेल, शोभा भंडारी, अतुल भंडारी, 'सीईओ' डॉ. उमेश शर्मा, प्राचार्या डॉ. शारदा शितोळे, डॉ. वैशाली पाटील, संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, स्टुडंट अफेअर कमिटीच्या अधिष्ठाता डॉ. अमृता भंडारी उपस्थित होत्या.

विजेते असे : शिक्षक वर्ग : प्रा. मयूर पाटील, प्रा. हर्षल पाटील, प्रा. पूजा सराफ, प्रा. तेजल गिरासे (सर्वोत्कृष्ट नृत्य), डॉ. व्ही. एस. पाटील व जयश्री पाटील (उत्कृष्ट दांपत्य नृत्य), रोहन जाधव, गौरव मोह्कर, संदीप कंखरे (गरबा किंग्स), हर्षा दहिवदकर, साक्षी कुलकर्णी, भूमिका महाले (गरबा क्वीन्स), तुषार खैरनार आणि खुशी चौधरी (उत्कृष्ट पोशाख). अरुंधती पाटील, दीपिका बागूल, हेमाक्षी ठाकरे यांनी परीक्षण केले. रजिस्ट्रार डॉ. प्रशांत महाजन, डॉ. अमृता भंडारी, विद्यार्थी समन्वयक वेदांत देशमुख, स्वयंसेवक यश महाजन, ओजस पाटील, यश पाटील, नयन पाटील, अक्षय जैन, सिद्धेया सोनवणे, पंकज धनगर, तन्मय विसपुते, यश चौधरी, जतिन पाटील, मितेश चौधरी यांनी संयोजन केले. परीक्षा नियंत्रक प्रा. सुहास शुक्ल, विभागप्रमुख डॉ. व्ही. एस. पाटील, प्रा. पी. एल. सरोदे आदी उपस्थित होते.

Dhule, Dhule-Today
21/10/2024 Page No. 4

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

सकाळ 18/10/2024

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची डॉक्टरेट प्रा. पाटील यांना प्रदान


प्रा. स्मितल पाटील

शिरपूर, ता. १७ : स्त्रियांच्या गर्भाशयात होणाऱ्या गाठींनी गंभीर स्वरूप धारण करण्यापूर्वीच त्यांचे अचूक निदान करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारे संशोधन येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रा. स्मितल पाटील यांनी केले आहे. या संशोधनाबद्दल त्यांना उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत नुकतीच डॉक्टरेट प्रदान करण्यात आली.

पटेल अभियांत्रिकीच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन विभागात कार्यरत प्रा. स्मितल पाटील यांनी 'इंटेलिजन्ट कॉम्प्युटर एडेड सिस्टिम फॉर डिटेक्शन अँड कॅरॅक्टरायझेशन ऑफ ओवॅरियन मासेस' या विषयावर संशोधन केले. त्यांना पटेल अभियांत्रिकीचे शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. प्रमोद देवरे यांचे मार्गर्शन लाभले. संशोधनात्मक अभ्यासाद्वारे वैद्यकीय क्षेत्रातील रेडिओलॉजिस्टला स्त्रियांच्या गर्भाशयातील गाठींचे अचूक निदान करण्यासाठी मदत होणार आहे. या संशोधनामुळे गाठींचे वेळेपूर्व निदान झाल्यामुळे गर्भाशयाच्या कॅन्सरसारख्या दुर्धर विकारांवर सुरवातीलाच उपचार करणे शक्य होईल.

प्रा. स्मितल पाटील यांचे संशोधनपर शोधनिबंध स्कोपस इंडेक्ससारख्या आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकेत प्रकाशित झाले असून, त्यांनी अनेक परिसंवाद व परिषदांमध्ये सहभाग घेतला आहे. त्या धुळे येथील प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. धनराज पाटील यांच्या कन्या, तर येथील माय होम अप्लायन्सेसचे संचालक प्रीतम पाटील यांच्या पत्नी आहेत. त्यांच्या यशाबद्दल आमदार अमरिशभाई पटेल, जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतन पटेल, डॉ. जे. बी. पाटील, डॉ. पी. जे. देवरे आदींनी कौतुक केले.

Dhule, Dhule-Today
18/10/2024 Page No. 6

R. C. PATEL
INSTITUTE OF TECHNOLOGY
An Autonomous Institute

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

लोकमत 22/09/2024

कौतुकास्पद : जैविक खतासाठी निर्माल्य नगरपालिकेकडे सुपुर्द

## अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी अरुणावती नदीचे पात्र केले स्वच्छ

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** शहरातील आर. सी. पटेल स्वायत अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी समर्पण या सोशल ॲक्टिव्हिटी क्लबतर्फे अनंत चतुर्दशीनिमित्त सार्वजनिक गणेशोत्सवात आगळावेगळा उपक्रम राबविला. या विद्यार्थ्यांनी अरुणावती नदीच्या काठावर निर्माल्य गोळा करून त्यांचे वर्गीकरण करून ते नगरपालिकेस जैविक खत तयार करण्यासाठी सुपूर्द केले. तसेच विद्यार्थ्यांनी निर्माल्यातील फळे व नारळ गरिबांना वाटप केले. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

महाविद्यालयाच्या विद्यार्थी कल्याण विभागाच्या अधिष्ठाता डॉ. अमृता अतुल भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली या सामाजिक उपक्रमासाठी समर्पण गटातील मुख्य समन्वयक मंथन सुभाषराव पाटील, समन्वयक कुणाल सोनार, देवयानी बडगुजर, इशिता पाटील, चौरक्षा चौधरी, मयूर चव्हाण, हर्षल चव्हाण, गौरव गवळी, गौरव साळुंके, ओम देवरे, जय सोनवणे, हिमानी पवार, निकिता सोनवणे, भूपेश पाटील, जागृती देसले, पूर्वा सणजे, नेहा गायकवाड, स्वामिनी पाटील, भाग्यश्री भदाणे, आकाश शिंदे, विनायक पाटील, लक्षवेधी पाटील, श्रुती पाटील, ज्ञानेश्वरी राजपूत, प्राजक्ता महाजन, वैष्णवी बोरसे, धनश्री पाटील, खुशी चौधरी, चैताली पाटील, हंसिका पाटील, सानिका पाटील, प्रेरणा भोलाणे, सौरभ भारूड, आयुष चौधरी, प्रा. एन. एम. शिंदे या विद्यार्थ्यांनी अरुणावती नदीपात्रात स्वच्छता केली.



विद्यार्थ्यांसमवेत उद्योगपती भूपेशभाई पटेल, डॉ. अमृता भंडारी.

समर्पणच्या या स्तुत्य सामाजिक उपक्रमाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आमदार अमरीशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आनंद व्यक्त केला.

### विद्यार्थ्यांचा समर्पण क्लबच्या माध्यामातून सामाजिक उपक्रम

अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाचे उच्च शिक्षण घेत असतानाच सामाजिक जबाबदारीचे महत्त्व लक्षात येण्यासाठी विविध स्तरांवर लक्ष दिले जाते. त्या दृष्टीने विविध उपक्रमदेखील राबविले जातात. याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांचा समर्पण हा क्लब स्थापन झाला आहे. समर्पण हा क्लब सोशल ॲक्टिव्हिटी करणारा क्लब असून, दरवर्षी समर्पणचे वेगवेगळे उपक्रम शिरपूरमध्ये व शिरपूर बाहेर होत आहेत. सामाजिक बांधिलकी जोपासत फक्त शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर विविध धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक कार्यातदेखील महाविद्यालयाचे विद्यार्थी सक्रिय सहभाग नोंदवित आहेत.

Hello Dhule
Page No. 4 Sep 22, 2024
Powered by: erelego.com

पुण्य नगरी 21/09/2024


## आर. सी. पटेल स्वायत अभियंत्रिकीच्या समर्पण क्लबचा उपक्रम

**शिरपूर :** आर. सी. पटेल स्वायत अभियांत्रिकीच्या समर्पण या सोशल ॲक्टिव्हिटी क्लबतर्फे विद्यार्थ्यांनी सार्वजनिक गणेशोत्सवात आगळा वेगळा उपक्रम राबविला. सामाजिक बांधिलकी जोपासत विविध धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक कार्यात महाविद्यालयाचे विद्यार्थी सक्रीय सहभाग घेत असल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.



समर्पण क्लबच्या विद्यार्थ्यांनी अरुणावती नदीच्या पात्रातील निर्माल्य गोळा केले. पान, फुल, फळ आणि प्लास्टिक गोळा करून त्याचे वर्गीकरण केले. गोळा झालेले निर्माल्य नगरपालिकेस जैविक खत तयार करण्यासाठी सुपूर्द केले. मेकॅनिकल शाखेच्या विद्यार्थांनी कन्वेयर बेल्टच्या सहाय्याने गणेशमूर्तींचे विसर्जन केले. नदीच्या काठी कृत्रिम तलाव करून त्यात गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. महाविद्यालयाच्या विद्यार्थी कल्याण विभागाच्या अधिष्ठाता डॉ. अमृता भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक उपक्रमासाठी 'समर्पण' गटातील मुख्यसमन्वयक पाटील मंथन सुभाषराव, समन्वयक सोनार कुणाल व सहकारी देवयानी बडगुजर, इशिता पाटील, चौरक्षा चौधरी, मयुर चव्हाण, हर्षल चव्हाण, गौरव गवळी, गौरव साळुंके, ओम देवरे, जय सोनवणे, हिमानी पवार, निकिता सोनवणे, भूपेश पाटील, जागृती देसले, पूर्वा सणजे, नेहा गायकवाड, स्वामींनी पाटील, भाग्यश्री भदाणे, आकाश शिंदे, विनायक पाटील, लक्षवेधी पाटील, श्रुती पाटील, ज्ञानेश्वरी राजपूत, प्राजक्ता महाजन, वैष्णवी बोरसे, धनश्री पाटील, खुशी चौधरी, चैताली पाटील, हंसिका पाटील, सानिका पाटील, प्रेरणा भोलाणे, सौरभ भारूड, आयुष चौधरी, प्रा. एन. एम. शिंदे यांचे सहकार्य लाभले. 'समर्पण' च्या सामाजिक उपक्रमाबद्दल शिरपूर एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष आ. अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांनी कौतुक केले.


Dhule Edition
Sep 21, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com

दिव्य मराठी

21/10/2024

(दै. दिव्यमराठी 21/10/2024)

# शिरपूर शहरात रंगली विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांसाठी गरबासह दांडिया स्पर्धा

प्रतिनिधी | शिरपूर

येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात गरबा सांस्कृतिक महोत्सव झाला. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. या उपक्रमासाठी दांडिया आणि गरब्याची तीनदिवसीय कार्यशाळा झाली. त्यानंतर विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पारंपरिक वेशभूषेत एकत्रित येत विविध उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

हा उपक्रम रिफ्लेक्शन क्लबकडून झाला. कार्यशाळेत विद्यार्थ्यांना गरब्याचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यानंतर मुख्य कार्यक्रम झाला. या वेळी माजी नगराध्यक्षा जयश्री पटेल, माजी नगरसेविका संगीता देवरे, संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, कृतीबेन भूपेश पटेल, रिताबेन पटेल, रेशाबेन पटेल आदी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते दुर्गा देवीची आरती झाली. सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पारंपरिक वेशभूषेत गरबा, दांडिया केला. अरुंधती पाटील, दीपिका बागुल, हेमाक्षी ठाकरे परीक्षक होत्या. उत्कृष्ट समूह गरबा, उत्कृष्ट पोशाख, सर्वोत्कृष्ट नृत्याची निवड करण्यात आली.



शिरपूर येथे झालेल्या स्पर्धेत विजयी ठरलेल्या स्पर्धकांसह मान्यवर.

**विजेते कोण :** शिक्षक वर्गातून प्रा. मयूर पाटील, प्रा. हर्षल पाटील, प्रा. पूजा सराफ, प्रा. तेजल गिरासे यांची सर्वोत्कृष्ट नृत्यासाठी तर उत्कृष्ट नृत्य जोडी म्हणून डॉ. व्ही. एस. पाटील व जयश्री पाटील यांची निवड करण्यात आली. द्वितीय वर्षाचा रोहन जाधव, तृतीय वर्षाचा गौरव मोहकर व चतुर्थ वर्षाचा संदीप कंखरे यांची गरबा किंग्स व हर्षा दहिवदकर, साक्षी कुलकर्णी व भूमिका महाले यांची गरबा क्विन्स म्हणून निवड झाली. उत्कृष्ट पोशाख म्हणून तुषार खैरनार आणि खुशी चौधरी यांची निवड झाली. सर्वोत्कृष्ट गटाला पाच हजार रुपयांचे बक्षीसदिले.

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

**पुण्य नगरी** 06/10/2024

## पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत प्रथम वर्ष विद्यार्थ्यांच्या 'आरंभ' आनंददायी फ्रेशर्स पार्टीला प्रतिसाद



**शिरपूर :** आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा 'आरंभ' स्वागत समारंभ संस्थेच्या राजगोपाल भंडारी हॉलमध्ये उत्साहात झाला. प्रथम वर्ष विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी महाविद्यालयातर्फे संचालक डॉ. जे.बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली 'आरंभ' या फ्रेशर्स पार्टीचे आयोजन करण्यात आले. दोन आठवड्यापासून एआयसीटीई, नवी दिल्लीच्या मार्गदर्शक तत्वानुसार स्टुडंट इंडक्शन प्रोग्राम-२०२४ सुरु होता. यात शिक्षण, आरोग्य, योग, रोजगार, व्यवस्थापन, खेळ, परीक्षा, सायबर लॉ अशा विविध क्षेत्रातील तज्ञ वक्त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. सेल्फी विथ सक्सेस आणि ब्रिज कोर्स असे दोन उपक्रम देखील पार पडले. क्रिकेट, चेस, कॅरम, बॅडमिंटन अशा खेळांच्या स्पर्धा झाल्या.इंडक्शन प्रोग्रामच्या शेवटच्या दिवशी 'आरंभ' या फ्रेशर्स पार्टीचे आयोजन करण्यात आले. सकाळी ९.३० वाजता कॉलेज लॉनवर झुम्बा डान्स व समूह नृत्याने सुरुवात झाली. सकाळी १० वाजता ड्रॉईंग हॉलमध्ये कला दालनाचे उद्घाटन झाले. राजगोपाल भंडारी हॉलमध्ये दुपारी २ वाजता महाविद्यालयाच्या सिनियर विद्यार्थ्यांनी व त्यांच्या 'रिफ्लेक्शन' आणि 'अंतर्नाद' या समूहांच्या वतीने सांस्कृतिक उपक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे यांच्या हस्ते करण्यात आले. फ्रेशर्स पार्टीमध्ये संगीत, नृत्य व नाटक यासह विविध परफॉर्मन्स सोबत सांस्कृतिक उपक्रम आकर्षण होते. यात फ्रेशर्स विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन करण्यासाठी आणि सहकारी विद्यार्थ्यांसोबत एकत्र येण्यासाठी व्यासपीठ प्राप्त झाले. विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि सन्मान चिन्ह मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. रॅम्प वॉक, जलद प्रश्नावली आणि इतर निकषांच्या आधारे नवप्रवेषित विद्यार्थ्यांमधून 'मिस्टर फ्रेशर' हा किताब पार्थ पाटील तर 'मिस. फ्रेशर' किताब समृद्धी पवार यांनी पटकावला. सायंकाळी रीफ्रेशमेंट म्हणून फूड पॅकिट वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन अभिषेक पवार, मानसी बेंडाळे, प्रज्ञा गिरासे, पुष्पक माळी व रुपेश कोष्टी या विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विभागप्रमुख डॉ. एस. व्ही. देसले यांच्या मार्गदर्शनाखाली अधिष्ठाता डॉ.अमृता भंडारी, समन्वयक डॉ.व्ही.एस. बाविस्कर, प्रा.महेंद्र वाघ, विद्यार्थी स्वंयसेवक इशिता पाटील, प्रतिक पाटील, सिद्धी पाटील यांनी प्रयत्न केले.

महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.सुहास शुक्ल, विभाग प्रमुख प्रा.डॉ.व्ही.एस. पाटील, प्रा.जी.व्ही. तपकिरे, प्रा.पी.एल. सरोदे, डॉ.एस.व्ही. देसले, डॉ.आर.बी. वाघ, डॉ.डी.आर. पाटील, डॉ.उज्वला पाटील, डॉ.एस.ए. पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. एम.पी. जैन, प्रा. डॉ. अमृता भंडारी, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी समाधान व्यक्त केले.

पुण्य नगरी 19.09.2024

# कॉर्पोरेट जगतात नवीन तंत्रज्ञान आत्मसात करा – डॉ. जे. बी. पाटील

## आर . सी . पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत स्टुडंट इंडक्शन प्रोग्रामला उत्स्फूर्त प्रतिसाद



**शिरपूर :** आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ नुकताच राजगोपाल भंडारी हॉल, मेन बिल्डींग शिरपूर येथे उत्साहात झाला.कार्यक्रमाच्या उदघाटनाप्रसंगी संचालक डॉ.जे.बी.पाटील यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करतांना अभियांत्रिकी शिक्षण आणि त्यात यश प्राप्त करून समाजाच्या कल्याणासाठी आजचा विद्यार्थी भविष्यात सक्षम नागरिक निर्माण होण्यासाठी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयातील प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया पूर्ण होऊन नुकताच ए.आय. सी.टी.ई, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार स्टुडंटस इंडक्शन प्रोग्राम प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला. महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील यावेळी म्हणाले की, शालेय व महाविद्यालयीन जीवनातील प्रवास हा विद्यार्थ्याच्या जीवनात सर्वात आव्हानात्मक असतो. १२ वी नंतरचे शिक्षण घेताना चांगले महाविद्यालय निवडणे महत्वाचे ठरते. ऑटोनॉमस महाविद्यालयाचे मोठे महत्व असून विविध फायदेही आहेत. विद्यापीठाच्या परीक्षेत सुवर्ण पदके व गुणवत्ता यादीत स्थान मिळवत असतांनाच विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त व्हावा यासाठी महाविद्यालय प्रयत्नशील असते. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट विभागातर्फे वर्षभर कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी मेहनत घेतली जाते. तसेच कौशल्य आत्मसात करण्यासाठी महाविद्यालयातर्फे नामांकित संस्थामार्फत प्रशिक्षण दिले जाते. परदेशी भाषा प्रशिक्षणा अंतर्गत जपानी व जर्मन भाषा प्रशिक्षण वर्ग हे अभ्यासक्रम सुरु केले आहे. कॅम्पस ड्राईव्ह प्रक्रियेसाठी व आवश्यकतेनुसार मॉक ग्रुप डिस्कशन्स, वैयक्तिक आणि तांत्रिक मुलाखत संदर्भात मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांनी तांत्रिक, व्यावसायिक कौशल्याबरोबरच व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष द्यावे.नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. कॉर्पोरेट जगतात विद्यार्थ्यांनी स्वतःला अपडेट ठेवावे. पटेल अभियांत्रिकीला उत्तम शिक्षण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि कॅम्पस प्लेसमेंटची गौरवशाली परंपरा आहे, असेही संचालक डॉ. जे.बी.पाटील म्हणाले. यानंतर असेसिफाय, एआय लर्निंग आऊटकम मेजरमेंट सिस्टीमचे संस्थापक तसेच एजीस स्कूल ऑफ डाटा सायन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.भूपेश दहेरिया यांनी विद्यार्थांना आर्टिफिशल इंटेलिजन्स आणि त्याचा उपयोग समाजातील विविध अडचणीसाठी, आव्हानासाठी कसा करावा, भविष्यात आर्टिफिशल इंटेलिजन्स आणि मनुष्य यांची भूमिका याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख अतिथी एजीस स्कूल ऑफ डाटा सायन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. भूपेश दहेरिया, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे यांच्याहस्ते झाले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. सतीष देसले, मुख्य समन्वयक म्हणून डॉ. व्ही. एस. बाविस्कर यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. किशोर ठाकरे यांनी केले. प्रा. समाधान पाटील यांनी प्रमुख अतिथीचा परिचय करून दिला. स्टुडंट अफेअर्सच्या अधिष्ठाता डॉ. अमृता भंडारी यांनी आभार मानले. महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.सुहास शुक्ल, विभाग प्रमुख प्रा. जी. व्ही. तपकिरे, प्रा. डॉ. व्ही. एस. पाटील, प्रा. पी. एल. सरोदे, डॉ. एस. व्ही. देसले, डॉ. आर. बी. वाघ, डॉ. डी. आर. पाटील, डॉ. उज्वला पाटील, डॉ. एस. ए. पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. एम. पी. जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन आदी उपस्थित होते.

Dhule Edition Edition
Sep 19, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

पुण्य नगरी 14/09/2024

## आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीत कार्यशाळा



**शिरपूर :** आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स स्टडी सेंटर, नाशिक द्वारा 'इंडस्ट्रीअल अॅप्रोच इन इलेक्ट्रिकल अॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स' या विषयावर इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी व इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलीकम्युनिकेशन विभागातील द्वितीय वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी चार दिवसीय कार्यशाळा झाली.

सदर कार्यशाळेत अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स या विषयांचे कौशल्य विकसित करण्यावर भर देण्यात आल्याची माहिती महाविद्यालायाचे संचालक प्रा. डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली. या चार दिवशीय कार्यशाळेत नाशिक येथील इलेक्ट्रॉनिक्स स्टडी सेंटर मार्फत शिक्षण आणि उद्योग यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकासावर भर देण्यात आला. या कार्यशाळेत 'कंपोनंट आयडेंटीफिकेशन अॅण्ड टेस्टिंग प्रॅक्टिस, असेम्ब्ली, सोल्डरिंग, डीसोल्डरिंग टिप्स, चेकिंग अॅण्ड कम्पॅरीजन विथ स्टॅंडर्ड व्हॅल्युज, आयडेंटीफिकेशन ऑफ व्हेरीअस पॉसीबल फॉल्टस युजिंग डीएमएम, प्रोजेक्ट असेम्ब्ली अॅण्ड देअर कनेक्शन अॅण्ड टेस्टिंग आणि पीसीबी सर्किट स्टडी' या विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले.

अभियांत्रिकी पदवी अभ्यासकांना अत्याधुनिक उत्पादक कौशल्यातील प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न झाले. कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. इलेक्ट्रिकल विभागाकडून ४२ तर इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलेकम्युनिकेशन्स या विभागाकडून १११ अशा १५३ विद्यार्थ्यांना या कार्यशाळेचा लाभ झाला. कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयचे संचालक डॉ.जे.बी.पाटील यांच्याहस्ते झाले. या उपक्रमासाठी तज्ञ प्रशिक्षक म्हणून इलेक्ट्रॉनिक्स स्टडी सेंटर, नाशिकचे संचालक संजय चौधरी यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या आयोजनासाठी इलेक्ट्रिकल विभागाकडून कार्यशाळेचे समन्वयक प्रा. कृणालकुमार गांधी, प्रा. रुपेश पाटील व इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलेकम्युनिकेशन्स या विभागाकडून समन्वयक प्रा. के. एच. सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.एस.पी. शुक्ल, विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. ए. पाटील, प्रा. डॉ. व्ही. एस. पाटील, प्रा. जी. व्ही. तपकिरे, प्रा. पी. एल. सरोदे, डॉ. एस. व्ही. देसले, डॉ. आर. बी. वाघ, डॉ. डी. आर. पाटील, डॉ. यु. एम.पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. एम. पी. जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Dhule Edition Edition
Sep 14, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

## पुण्य नगरी

08/09/2024

# आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या ४७ विद्यार्थ्यांची निवड



**शिरपूर :** आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील ४७ विद्यार्थांची कॅम्पस प्लेसमेंटद्वारे क्वलिटी किओस्क कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर ट्रेनी या पदावर निवड झाली, अशी माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील यांनी दिली. क्वलिटी किओस्कतर्फे निवडक अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या पात्र विद्यार्थ्यांसाठी पूल कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले होते.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातून केवळ आर.सी.पटेल अभियांत्रिकीतील विद्यार्थ्यांना क्वलिटी किओस्कच्या निवड प्रक्रियेला सामोरे जाण्याची संधी प्राप्त झाली होती. अंतिम वर्ष संगणक अभियांत्रिकी शाखेचे सार्थक अरुण येवले, गुणवंत विनोद देसले, आकाश अजय जैन, धीरज महेंद्र गिरासे, खुशी सुनील अग्रवाल, गीतांजली गोरख पाटील, सुचिता पंडितराव पाटील, नंदन किशोर निकवडे, सिद्धी अविनाश कुलकर्णी, स्वाती शशिकांत चव्हाण, गुंजना रमेश कुलकर्णी, वेदांत राजेश गुजराती, ऋषिकेश शांताराम सनेर, तेजस प्रकाश शिंपी, कविता विलास बोरणे, सेजल अनिल सरनाईक, साक्षी अनिल कोठावडे, मुकेश रवींद्र पाटील, सौरभ रघुनाथ पाटील, विशाखा महेंद्र गोसावी, प्राजक्ता नंदकुमार पाटील, यश अनिल महाजन, निकिता छोटू पाटील, मयूर अविनाश सूर्यवंशी, अनुजा ज्ञानेश्वर पाटील, भावेश सुनील पाटील, जान्हवी पंकज अहिरराव, निशांत संजीव जगताप, ओम दिपक बाविस्कर ,पुण्या प्रसन्न जोशी व विशाल सुरेश वाणी तसेच डेटा सायन्स शाखेतील श्रुती लक्ष्मीकांत पाठक, अनुज मोहन गुजराती, जयेश संजय पटेल, गिरीश सुरेंद्र पाटील, हर्षदा संजय माळी, अक्षय भालेराव पवार, पंकज सनेर धनश्री, प्रभात रमेश वाकडे, अश्विनी अविनाश पाटील, सचिन विनायक दाभाडे, आदिल भिकन खाटीक, कांचन प्रकाश महाजन व राम गिरीश पालीवाल आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेचे व्यंकटेश भरत चव्हाण, रिद्धी कैलास भावसार व यश विजय वैश्यवानी या ४७ विद्यार्थ्यांची सॉफ्टवेअर इंजिनिअर ट्रेनी या पदावर निवड झाली. कॅम्पस प्लेसमेंटच्या यशस्वितेसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर मिल्केश जैन, प्रा.एम. जे. पाटील, प्रा.व्ही.व्ही. पटेल, प्रा.के.पी. राणे यांनी प्रयत्न केले. या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा व संचालक जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ.पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.सुहास शुक्ल, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा.एम.पी.जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले.

Dhule Edition Edition
Sep 08, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

पुण्य नगरी 08/09/2024

# प्रा. महेश पाटील यांना पीएच.डी.



**शिरपूर:** शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर.सी.पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागात कार्यरत असलेले प्रा. महेश नवनाथ पाटील यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या विद्याशाखेअंतर्गत डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. मिश्रणावर आधारित सेल्फ-क्युरिंग काँक्रिटसाठी प्रायोगिक तपासणी आणि त्याचा ताकदीवर होणारा परिणाम हा त्यांच्या संशोधनाचा मुख्य विषय होता. त्यांना प्रा. डॉ. शैलेंद्रकुमार दुबे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आ.अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा व संचालक जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.सुहास शुक्ल, विभाग प्रमुख प्रा. जी. व्ही. तपकिरे, डॉ. व्ही. एस. पाटील, प्रा. पी. एल. सरोदे, डॉ. एस. व्ही. देसले, डॉ. आर. बी. वाघ, डॉ. डी. आर. पाटील, डॉ. उज्वला पाटील, डॉ. एस. ए. पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. एम. पी. जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाज, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतूक केले.

Dhule Edition Edition
Sep 08, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com

**लोकमत** **06/06/2024**



## पटेल अभियांत्रिकीच्या १०६ विद्यार्थ्यांचा सॉफ्टवेअर डेव्हलपर कार्यक्रमात सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** शहरातील आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटी पुणे आणि कॅपजेमिनी यांचा संयुक्त विद्यमानाने फुल स्टॅक सॉफ्टवेअर डेव्हलपर सर्टिफिकेशन हा प्रशिक्षण-कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमात गुणवत्तेच्या आधारावर पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या १०६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी. पाटील यांनी दिली.

कार्यक्रमात सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटी तर्फे हर्षल पाटील, विनीथ अमुर्री हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाकडून ट्रेनिंग अँड प्लेसमेंट आॅफिसर प्रा. मिल्केश जैन, प्रा. के.पी.राणे, प्रा. ए.बी.जैस्वाल, प्रा. एम.जे.पाटील आणि स्वयंसेवकांचा उत्साहपूर्ण सहभाग होता. (वा.प्र.)

Hello Dhule
Page No. 2 Sep 06, 2024
Powered by: erelego.com

शिल्पकार विकासाचा...
**देशदूत** **04/09/2024**

# आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या ४७ विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपनीत निवड

**■ शिरपूर । प्रतिनिधी**

आर.सी.प्रटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील ४७ विद्यार्थांनी क्वालिटी किओस्क या बहुराष्ट्रीय कंपनीच्या मुलाखतीस यशस्वीरीत्या सामोरे जात त्यांची सॉफ्टवेअर इंजिनिअर ट्रेनी या पदावर वार्षिक २.५० लाख रुपये वेतनश्रेणीवर निवड झाली आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी.पाटील यांनी दिली.

कंपनी व पटेल अभियांत्रिकी, शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले होते. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातून केवळ आर.सी.पटेल अभियांत्रिकीतील विद्यार्थ्यांना क्वालिटी किओस्कच्या निवड प्रक्रियेला सामोरे जाण्याची संधी प्राप्त झाली होती. महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमातील अंतिम वर्षाच्या संगणक, डेटा सायन्स आणि इलेक्ट्रॉनिक्सअँडटेलिकम्युनिकेशन शाखेचे विद्यार्थी ज्यांना पदवी अभ्यासक्रमाच्या प्रत्येक वर्षी ६० टक्के गुण आहेत, असे विद्यार्थी या कॅम्पस प्लेसमेंटसाठी पात्र होते.

अंतिम वर्ष संगणक अभियांत्रिकी शाखेचे सार्थक अरुण येवले, गुणवंत विनोद देसले, आकाश अजय जैन, धीरज महेंद्र गिरासे, खुशी सुनील अग्रवाल, गीतांजली गोरख पाटील, सुचिता पंडितराव पाटील, नंदन किशोर निकवडे, सिद्धी अविनाश कुलकर्णी, स्वाती शशिकांत चव्हाण, गुंजना रमेश कुलकर्णी, वेदांत राजेश गुजराती, ऋषिकेश शांताराम सनेर, तेजस प्रकाश शिंपी, कविता विलास बोरणे, सेजल अनिल सरनाईक, साक्षी अनिल कोठावडे, मुकेश रवींद्र पाटील, सौरभ रघुनाथ पाटील, विशाखा महेंद्र गोसावी, प्राजक्ता नंदकुमार पाटील, यश अनिल महाजन, निकिता छोटू पाटील, मयूर अविनाश सूर्यवंशी, अनुजा ज्ञानेश्वर पाटील, भावेश सुनील पाटील, जान्हवी पंकज अहिरराव, निशांत संजीव जगताप, ओम दिपक बाविस्कर ,पुण्या प्रसन्न जोशी व विशाल सुरेश वाणी तसेच डेटा सायन्स शाखेतील श्रुती लक्ष्मीकांत पाठक, अनुज मोहन गुजराती, जयेश संजय पटेल, गिरीश सुरेंद्र पाटील, हर्षदा संजय माळी, अक्षय भालेराव पवार, पंकज सनेर धनश्री, प्रभात रमेश वाकडे, अश्विनी अविनाश पाटील, सचिन विनायक दाभाडे, आदिल भिकन खाटीक, कांचन प्रकाश महाजन व राम गिरीश पालीवाल आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेचे व्यंकटेश भरत चव्हाण, रिद्धी कैलास भावसार व यश विजय वैश्यवानी या ४७ विद्यार्थ्यांची सॉफ्टवेअर इंजिनिअर ट्रेनी या पदावर वार्षिक २.५० लाख या वेतनश्रेणीवर निवड झाली.

कॅम्पस प्लेसमेंटच्या यशस्वितेसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर मिल्केश जैन, प्रा.एम.जे.पाटील, प्रा.व्ही.व्ही.पटेल व प्रा.के.पी.राणे यांनी प्रयत्न केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यध्य, माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा व संचालक जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी.पाटील, उपसंचालक डॉ.पी.जे.देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा.सुहास शुक्ल, सर्व विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा.एम.पी.जैन, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले.

(दै देशदूत दि: ५।९।२०२४)

सकाळ 04/09/2024

# पटेल अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना नियुक्ती

## ४७ विद्यार्थी सॉफ्टवेअर ट्रेनी इंजिनिअर

**सकाळ वृत्तसेवा**

शिरपूर, ता. ३ : येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील ४७ विद्यार्थ्यांना क्वालिटी किओस्क या बहुराष्ट्रीय कंपनीत सॉफ्टवेअर ट्रेनी इंजिनिअर पदावर नियुक्ती देण्यात आली आहे, अशी माहिती संचालक डॉ. जे. बी. पाटील यांनी दिली.

क्वालिटी किओस्क व पटेल अभियांत्रिकी यांच्यातर्फे महाविद्यालयात कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले होते. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परीक्षेत्रातून केवळ पटेल अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना मुलाखतीची संधी मिळाली. पदवी अभ्यासक्रमातील संगणक, डेटा सायन्स आणि इलेक्ट्रॉनिक्स अँन्ड टेलिकम्युनिकेशन शाखेत प्रत्येक वर्षी ६० टक्के गुण असलेले अंतिम वर्षातील विद्यार्थी कॅम्पस प्लेसमेंटसाठी पात्र होते.

संगणक अभियांत्रिकी, डेटा सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स अँन्ड टेलिकम्युनिकेशन अशा शाखानिहाय ४७ विद्यार्थी पात्र होते. ट्रेनिंग अँन्ड प्लेसमेंट ऑफिसर मिल्केश जैन, प्रा. एम. जे. पाटील, प्रा. व्ही. व्ही. पटेल व प्रा. के. पी. राणे यांनी कॅम्पस प्लेसमेंटचे संयोजन केले.

विद्यार्थ्यांच्या यशाचे शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तथा आमदार अमरिशभाई पटेल, संचालक जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतन पटेल, सचिव रेशा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा. सुहास शुक्ल, जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रशांत महाजन यांनी कौतुक केले.

Dhule, Dhule-Today
04/09/2024 Page No. 4

R. C. PATEL
INSTITUTE OF TECHNOLOGY
An Autonomous Institute

# RCPIT IN NEWS

2024 - 2026

पुण्य नगरी 31/08/2024

## प्रा.कपिल सनेर यांना पीएच.डी. पदवी प्रदान



